समाजस्वास्थ्य

मासिकांतील निवडक लेख

भाग दुसरा

जुलै १९३०—जून १९३३

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ७८

REFBK-004811

संपादक :
र. धों. कर्वे, एम्. ए.

[किंमत दोन रुपये

'समाजस्वास्थ्य'

मासिकांतील निवडक लेख

भाग दुसरा

वर्ष ४ ते ६

संपादक: र. धों. कर्वे, एम्. ए.

डिप्लोम् द् पत्युद् स्युपेरिअर (पॅरिस)



REFBK-0004811

किंमत दोन रुपये

मुद्रक—बी. जी. गण्डभीर, पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
सूर्यमहाल, ठाकुरद्वार, मुंबई. नं. ४.

प्रकाशक—र. धों. कर्वे, राइट् एजन्सी,
जयकर बिल्डिंग, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई. नं. ४.

७०८०५

प्रस्तावना

स्वत: झीज सोसून एखादा मनुष्य कांही सामाजिक कार्य करण्याचा प्रयत्न करूं शकेल अशी कल्पनाच कांही लोकांस करतां येत नाही. अशा प्रकारचे एक विद्वान (त्यांचें नांव सांगणें रास्त होणार नाही, त्यांना आपण रा. आडमुठे म्हणूं.) नुकतेच आमच्या ऑफिसांत आले होते, आणि निष्कारण आमचा दोन तास वेळ घेऊन त्यांनी एक महत्वाची गोष्ट आम्हांस सांगितली की आम्ही केवळ वैयक्तिक विचार मात्र करतों, सामाजिक विचार करीत नाही. आमचे बाजूने पुरावा म्हणून आम्ही सांगूं लागलों की आम्हांस वैयक्तिक हितच पहायचें असतें तर आजला आम्ही खुशाल हजार रुपये सरकारी पगार खावून वर्षांतून सहा महिने रजा भोगीत बसलों असतों, आणि विल्सन कालेजांतील नोकरी आम्ही सोडली ती केवळ सामाजिक कार्याकरताच सोडली, तेव्हां ते म्हणाले, 'तें मला सांगूं नका. पैसे कोणीहि कधीहि सोडीत नाही, पैसा सोडला असें म्हणणारे सर्व लोक खोटें बोलतात असें बारकाईने पाहिल्यास दिसतें. आणि समजा तुम्ही आपल्या समजुतीने सामाजिक कार्य करीत आहां असें धरून चाललें तरी समाजाचे मतें तुम्ही समाजाचे शत्रु आहां, तेव्हा तें समाजकार्य नव्हेच. समाजाच्या मताची पर्वा न करतां तुम्ही स्वत:चे मताप्रमाणे लिहितां, तेव्हा तुम्ही वैयक्तिक विचारच करतां, सामाजिक नव्हे.' आम्ही म्हटलें, 'समाजाचें हित कशांत आहे हें बहुजनसमाजाला कळतेंच असें नाही, तें सुशिक्षित विचारवंतांसच ठरवावें लागतें, आणि या वर्गांत आम्ही स्वत:ची गणना करतों. शिवाय सर्वांसच आमचीं मतें नापसंत आहेत असें नाही. तसें असतें तर आमचें मासिक आज सातव्या वर्षापर्यंत टिकलेंच नसतें, आणि आमचीं पुस्तकेंहि लोक वाचतात.' आडमुठे म्हणाले, 'कांही थोडे लोक तुमच्या बाजूला असतील, पण चांगलें काय हें बहुमताने ठरवलें पाहिजे. तुमचीं पुस्तकें लोक वाचतात यावरून लोकांची अभिरुचि वाईट असते, इतकेंच होतें, ती चांगली असती तर माझीं पुस्तकें खपलीं असतीं.' (!) हे गृहस्थ स्वतः सरकारीच

नोकर आहेत, व त्यांची समाजसत्तेची कल्पना अशी की समाजास पसंत नसलेलें कांही कोणी करतां किंवा बोलतां कामा नये !

दुसरे एक विद्वान एका प्रसिद्ध मासिकाकरता जाहिरात मागण्यास आले होते. तुमचें मासिक वेळेवर निघत नाही, असे आम्हीं म्हणतांच ते म्हणाले, '**किर्लोस्कर** व **स्त्री** यांशिवाय कोणतेंच मासिक वेळेवर निघत नाही.' 'आमचेंहि मासिक तितक्याच नियमितपणें निघतें' असें आम्हीं म्हटल्यावर त्यांनी तें कबूल केलें, पण त्यांचे मतें आमची आर्थिक स्थिति चांगली असल्यामुळे आम्हांस तें करतां येतें, इतरांस शक्य नाही. आम्हीं म्हटलें, 'तुमचे मासिक मोठें आहे, त्याचा खप आमचेपेक्षा जास्त आहे असें तुम्हीच म्हणतां, एका अंकांत निदान १२ पानें जाहिराती आहेत, तेव्हा मुळीच जाहिराती नसलेल्या आमच्या मासिकाची आर्थिक स्थिति तुमचेपेक्षा चांगली कशी ?' ते म्हणतात 'पण तुम्हाला तर एक अमेरिकन संस्था पैसे पुरवते असें ऐकतों !'

आमच्या शत्रूंनी आणखी काय काय कंडया पिकवल्या आहेत हें माहीत नाही, परंतु मासिकांत वेळोवेळीं ज्या देणग्यांची पोंच आली आहे, त्यांशिवाय एक पैहि आम्हांस कोठून मिळालेली नाही, व या मदतींतून आमचे खटल्याचा खर्चहि पुरा निघालेला नाही. खटल्यामुळे जाहिरात होवून आमचा भयंकर फायदा झाला असला पाहिजे असेंहि कित्येकांस वाटतें, तेंहि खरें नाही. ज्या अंकासंबंधी खटला झाला होता त्याच्या ३१०० प्रती काढलेल्या होत्या, हल्लीं दर महिना ३२०० प्रती काढतों. इंग्लंदांत ब्रॅडलॉवरील अश्लीलतेचा खटला चालू असतांच त्याचे पुस्तकाच्या लाखों प्रती खपल्या, परंतु इकडील मानसिक गुलामगिरीमुळे खटला झालेलें पुस्तक ध्यावयास लोक घाबरूं लागले.

ज्या लेखासंबंधी खटला झाला तो अर्थातच या पुस्तकांत गाळावा लागला आहे. परंतु खटल्याचे हकीकतीवरून त्याचा मथितार्थ लक्षांत येईलच. कामशास्त्रासंबंधी लेखांचा समावेश 'आधुनिक कामशास्त्र' या पुस्तकांत अगोदरच झाला असल्यामुळे ते लेखहि गाळले आहेत.

गिरगांव, मुंबई,
१८ आक्टोबर १९३३.

र. धों. कर्वे.

अनुक्रमणिका

—*०*—

	विषय				पृष्ठ:
१.	विवाहापासून फायदे	...	...	...	१
२.	अकलेपासून तोटे	...	...	...	५
३.	कामशास्त्राचा खून	...	...	...	७.
४.	शाकाहार कीं मांसाहार	...	...	...	११:
५.	काय खावें ? कसें खावें ?–१		...	...	१४:
६.	,, ,, ,, ,, –२		...	...	१६:
७.	पातिव्रत्यविचार	...	...	...	१८
८.	जगांतील सर्वात वाईट व्यसन : धुरकट्टणें	...		...	२८
९.	लैंगिक शिक्षण	...	...	...	३४
१०.	आमचे खटल्याची हकीकत...		...	...	३७,४४.
११.	कठिण प्रसंग	...	...	...	४२.
१२.	निकालाचें भाषांतर	...	...	...	४८.
१३.	समाजस्वास्थ्याचा विजय	...	...	...	५७.
१४.	थंड पेयें ...	...	...	...	६०.
१५.	आमचा हायकोर्टात अर्ज	...	...	...	६३
१६.	निकालासंबंधी दोन शब्द	...	...	...	६४
१७.	अश्लीलतेचे कायदे	...	...	...	६८.
१८.	बुरशीचे पुरस्कर्ते	...	...	...	७५.
१९.	पित्ताशयाचे विकार	...	...	...	८०.
२०.	शास्त्रीबुवांशीं संवाद	...	...		८४,९९,१०५
२१.	हातपाय कशाने फुटतात ?		...	...	९०.
२२.	आर्यसंस्कृतिवाल्यांचें ढोंग	...	...	...	९३.

	विषय	पृष्ठ
२३.	अश्लीलतेचें आणखी एक दालन	९७
२४.	शिंकेचा शकुन	१०२
२५.	ब्रह्मचर्याचें खूळ	१०७
२६.	अंडकोश	११४
२७.	अन्नाची विविधता	११६
२८.	मलावरोध	११९
२९.	गोरक्षणाचें ढोंग	१२२
३०.	शारदेचीं पत्रें, १-२४	१२०
३१.	पत्रव्यवहार	१९०

समाजस्वास्थ्य

मासिकांतील निवडक लेख

भाग २ दुसरा

विवाहापासून फायदे

विवाहाची संस्था प्राचीन आहे हा एक तिचा उत्तम गुण आहेच, पण तोच गुण वेश्यावृत्तींतही असल्यामुळे या गुणावर फारशी भिस्त न ठेवतां, विवाहापासून जे अनंत फायदे होतात त्यांनाच जास्त महत्व देणें भाग आहे. हे फायदे अजून लोकांच्या चांगलेसे लक्षांत आलेले दिसत नाहींत, तेव्हां त्यासंबंधी थोडें विवरण करणें इष्ट होईल.

वेगवेगळ्या पद्धतीच्या विवाहापासून वेगवेगळ्या प्रकारचे फायदे होतील हें उघड आहे. लग्नापूर्वी वधुवरांची दृष्टादृष्ट सुद्धा होऊं नये अशी कोणाची पद्धत असते, त्यांत एक मोठें नीतितत्व आहे. परपुरुषाचें किंवा परस्त्रीचें दर्शन घेणें योग्य नाही हें उघडच आहे, व लग्नापर्यंत तीं पतिपत्नी होत नसल्यामुळे त्यांची पूर्वीच दृष्टादृष्ट झाल्यास कसें चालेल? शिवाय त्यांपैकी एक अत्यंत कुरूप किंवा व्यंगी असल्यास तो विवाह कदाचित मोडून सत्कार्याला बाध येणार. तेव्हा ही पद्धत याही दृष्टीने उत्तम ठरते. आणखी तरुणजनसहज साहसाला ही पद्धत उत्तेजक आहे हें कोणीही कबूल करील. या गुणाशिवाय धडाडीचीं कामें मनुष्याच्या हातून कधी होत नाहीत. लग्न होऊन गेल्यावर पति किंवा पत्नी कितीही कुरूप किंवा दुर्गुणी निघालीं तरी इलाजच नसल्यामुळे आलेल्या प्रसंगास धैर्याने तोंड देण्याची संधि एरवी कशी मिळाली असती?

दुसऱ्या बाजूने पाहिलें तर पतिपत्नींचें एकमेकांशीं पटत नाहीसें झाल्यास दोघांनाही ही उत्तम सबब असते. सर्व दोष इतर लोकांवर ढकलून राजरोस भांडायची मोकळीक होते. पुरुषांस तर दुसरें लग्न करण्यासही ही सबब उपयोगी पडते. एकमेकांच्या निवडीनें विवाह झाल्यास दुसऱ्या कोणास दोष देणें शक्य नसतें.

प्रचलित पारंपरिक हिंदु पद्धतींत बहुधा वधूवरांस एकमेकांचे चेहेरे व कपडे पाहण्याची संधि मिळते. परंतु लग्नें आईबापांच्याच मताप्रमाणें होत असल्यामुळें वधूवरांस आत्मसंयमनाचा एक उत्तम धडा मिळतो. वधूवरें एकमेकांस नापसंत असलीं तरीही त्यांनी आत्महत्या केल्याचीं किंवा निदान पळून तरी गेल्याचीं उदाहरणें फारच थोडीं घडतात. आत्मसंयमनासारखा दुसरा गुणच नाहीं. किरकोळ आत्मसंयमनाचे प्रसंग कडू औषधें घेतांना सुद्धा येतात, परंतु जन्माचें नुकसान होत आहे हें माहीत असतांही न डगमगतां, आज्ञापालनाचें उच्च ध्येय डोळ्यापुढे ठेऊन, येईल त्याचा स्वीकार करणें काय सोपें काम आहे ? आज हिंदु समाज जो प्रगतीच्या सीमेला जाऊन पोंचलेला आढळतो त्यांतील इंगित हेंच आहे. अशा प्रसंगाला तोंड देण्याची ज्यांना संवय होते त्यांना परराज्याचा जुलूम म्हणजे कःपदार्थ वाटणें साहजिक आहे, व या सोशीकपणाचा फायदा ब्रिटिश लोकांस पुष्कळ मिळालेला आहे हें कोणीही कबूल करील. या पद्धतीपासून आणखीही एक मोठा फायदा होत असतो तो हा की लग्न ठरवतांना आईबाप बहुधा दुसऱ्या पक्षाच्या सांपत्तिक स्थितीकडे विशेष लक्ष देत असतात. ती स्थिति समाधानकारक असून सुद्धां बहुतेक लोक सुखी होत नाहींत, व असें झालें म्हणजे सुख हें पैशावर अवलंबून नसतें, या सर्वमान्य तत्वाचा प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळे तें मनावर चांगलें बिंबतें. अर्थात् अशा रीतीनें तें बिंबल्याचा फारसा उपयोग नसतो, परंतु स्वतःचें उदाहरण दाखवून दुसऱ्यास उपदेश करण्याची उत्तम संधि मिळते, हें काय थोडें झालें ?

विवाहापासून फायदे

अलीकडे स्वतःला सुधारक समजणारे कांही लोक आपल्या मुलांमुलींचीं लग्नें ठरवतांना त्यांचेंही मत घेत असतात व कांही तर सुधारणेची शिकस्त करून त्यांचें मत प्रतिकूल पडल्यास लग्न मोडतात. अशीं सर्व वधूवरें वरील फायद्यांस मुकतात, परंतु हे लोकही लग्नांचा हंगाम आला म्हणजे दहा वीस मुलगे किंवा मुली पाहून शेवटच्या मूहूर्तावर तरी लग्न उरकलेंच पाहिजे, वगैरे पारंपरिक प्रकार चालू ठेवीत असल्यामुळें यांतही अनेक फायदे असतात. मनुष्याचा स्वभाव सांपत्तिक स्थितीप्रमाणेंच चेहेरेपट्टीवर किंवा कपड्यावर अवलंबून नसतो याचा यामुळे पुष्कळ स्त्रीपुरुषांस प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

तसेंच कांही लोक प्रेमविवाहाची तरफदारी करूं लागले आहेत, पण यामुळे वर सांगितलेले बहुतेक फायदे नष्ट होतील हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. तरी सुद्धां कामशास्त्राच्या दृष्टीनें पतिपत्नी एकमेकांस अनुरूप नसल्यास तीं दुःखी झाल्यामुळें त्यांस कामशास्त्राचा एक धडा मिळण्याचा संभव राहतोच. परंतु बर्ट्रांड् रसेल म्हणतात, स्त्रीपुरुषांनी पाहिजे तर एकत्र रहावें व गर्भधारणा झाल्यासच लग्न करावें. बाकीच्या सर्व पद्धतींत योनिरहित स्त्रीचें सुद्धा लग्न बिनधोक होतें, पण रसेल साहेबांच्या पद्धतीने अशा स्त्रियांचें काय होईल? असे कांही प्रकार होऊं लागल्यास किंवा घटस्फोट सुरू झाल्यास विवाहापासून होणारे सर्व फायदे एकदम नष्ट होतील. आता कोणी असें म्हणेल की वरील सर्व फायदे दुःखी दंपत्यासच मिळतात असें दिसतें. वरील कोणत्याही पद्धतींत चुकून अनुरूप वधूवरांचेंच लग्न होऊन तीं जन्मभर सुखी झालीं तर? हें अशक्य नाहीं, परंतु त्याला आमचा काय इलाज? आपलें नशीबच फुटकें असें समजून अशा दंपत्यानें शक्य तितक्या लवकर आत्महत्या करावी, कारण त्यांस वरील उच्च तत्त्वांचा कधीही अनुभव मिळणार नाही.

हिंदु विवाहपद्धतीचा एक मोठा फायदा सांगायचा राहिला. ख्रिस्ती धर्मीयांना एकच लग्न करतां येते. मुसलमानी धर्मांत चार बायका करतां येतात व शिवाय रखेल्या ठेवण्याची परवानगी असते, परंतु हिंदु धर्मांत पाहिजे तितक्या बायका करतां येतात व रखेल्यांसंबंधी धर्मांत कांही सांगितलें नसल्या-

मुळे त्याहो पाहिजे तितक्या ठेवतां येतात. यावरून हिंदु धर्म किती श्रेष्ठ आहे हें सहज दिसून येईल. बायकांना कोणत्याच धर्मांत अनेक नवरे करण्याची परवानगी नसते, तेव्हा त्यांचा यांत संबंध येत नाहीं. मुसलमानी धर्मांतील वर सांगितलेल्या परवानगीच्या मूळाशीं एक महत्त्वाचें तत्त्व आहे. एक स्त्री गरोदर झाल्यास बाळंतपणापूर्वी व नंतर कांही महिने तिला विश्रांति देणें जरूर असतें. यामुळें प्रत्येक वर्षांत तीनच महिने एका स्त्रीचा उपयोग करतां येतो. याकरतां चार बायका नसल्यास वर्षांतून कांही दिवस बायकांची तूट येईल व असें झाल्यास पापाकडे प्रवृत्ति होईल. मात्र वरील हिशोब बरोबर जुळावा म्हणून त्यांचा पाळीपाळीनेंच उपयोग केला पाहिजे, म्हणजे तीन महिनेपर्यंत एकपत्नीव्रत पाळलें पाहिजे, नाहीतर घोटाळा व्हायचा. तशी अट हिंदु धर्मांत नाहीं. सर्व बायका एकदम निरुपयोगी झाल्यास एखादी नवी करावी.

पुरुषांस पत्नीचा सर्वांत मोठा उपयोग असतो तो अन्नाचे बाबतींत. कारण अविवाहितांस ब्रह्मचर्यापासून फायदाच होतो असें कांही लोक तरी म्हणतात, परंतु उपोषणाचे पुरस्कर्ते सुद्धा कायमचें उपोषण करण्यास सांगत नाहींत. ज्यांना ब्रह्मचर्याचे भयंकर फायदे नको असतील त्यांना वेश्यांकडे जावें लागतें ही गैरसोय असतेच या दोन्ही सोयी घरचेघरीं असलेल्या बऱ्या असें कोणासही वाटणें साहजिकच आहे. शिवाय विवाहित पुरुषांसही वेश्यांकडे वंदी नसतेच व वेश्यांचे निंमेपेक्षा जास्त आश्रयदाते विवाहित असतात. तेव्हा या दोन्ही बाबतींत विवाहाचा दुहेरी फायदा आहे. मर्जी लागेल तेव्हा घरीं (पत्नीची मर्जी नसली तरी), व फेरपालट पाहिजे असेल तेव्हा बाहेर. वेश्यांस सुद्धा नाही म्हणण्याचा हक्क असतो, पण पत्नीस नसतो ही एक मोठी सोय आहे. आतां कोणी म्हणेल की पत्नीच्या दृष्टीनें ही गैरसोय आहे, परंतु एकतर त्यांत तिचें कांहीच नुकसान दिसत नाहीं व शिवाय तिने असा विचार केला पाहिजे की तिला या बाबतींत नको म्हणण्याचा अधिकार दिला की पतीला वेश्यांकडे जाण्यास चांगलीच सबब झाली, म्हणजे ते हल्ली चोरून जात असले तर नंतर राजरोस जाऊं लागतील.

विवाहापासून इतके फायदे असतांही अलीकडे कांही लोक या संस्थेची चेष्टा करूं लागले आहेत. यावरून असें दिसतें कीं हिंदुसमाज प्रगतीच्या सीमेला पोंचल्यामुळे आतां पुढे जाण्यास मार्गच नाहीं, तेव्हा आता अशा रीतीने अवनतीला सुरवात होणार, कारण कोणताही समाज स्थिरावस्थेंत राहणें शक्य नाही.

अकलेपासून तोटे

—*०*—

अकलेपासून मनुष्याचा कांही फायदा असतो असें वरवर पाहणारास वाटतें खरें, परंतु हें खरें आहे काय ? खोल विचार केल्यास तसें नाही असें म्हणावें लागतें. स्वतःची अक्कल चालवण्यास सुरवात खरें म्हटलें असतां मनुष्याच्या पूर्वजांनीं, म्हणजे कांही पुच्छरहित वानरांनी कित्येक युगांपूर्वी केली. ईश्वराने चांगले चार पाय दिले असतां त्यापैकी दोहोंचाच उपयोग चालण्याकडे करून, बाकीच्या दोहोंनी बहुसाळ कामें करूं लागल्यामुळे त्यांचे शेवटी हात बनले व यामुळेच इतर प्राण्यांवर त्यांनी वर्चस्व मिळवलें, व त्यांच्या मेंदूचीही अकल्पित फार्जील वाढ होऊन पुढे याच वानरांपासून मनुष्यप्राणी झाला हें सर्व आधुनिक शास्त्रज्ञांस संमत आहे. परंतु ही अक्कल चालण्यापूर्वी सर्व इंद्रियांची वाढ चतुष्पाद स्थितीस अनुरूप झाल्यामुळे, व नंतर ती स्थिती बदलून, डोक्यापासून ढुंगणापर्यंत सर्व शरीर आडवें असायचें तें एकदम सरळ रेषेंत असल्यामुळें पोटांतील सर्व इंद्रियांची घडी बिघडून प्रकृतीच्या दृष्टीने सर्व मनुष्य जातीचें अत्यंत नुकसान झालेलें आहे, व मलावरोध झाल्यास दररोज कांही वेळ चतुष्पाद पद्धतीने चालण्याचा उपचार कांही डाक्तर सांगतात, तो याकरतां. हा अकलेचा पहिला प्रताप.

यानंतर मनुष्याने आपल्या अकलेचा पुष्कळ निरनिराळ्या रीतींनी उपयोग किंवा दुरुपयोग केला. त्याने आपल्या अक्कलेनेच वेगवेगळ्या आकाराचे देव

निर्माण केले परंतु हे सर्व आकार अत्यंत गचाळ झाल्यामुळे शेवटी देव निराकार आहे असें म्हणून तो आपलें समाधान करून घेऊं लागला. कित्येक तर यापेक्षाही पुढे जाऊन देव नाही असेच म्हणूं लागले. यापैकी एकच मत खरें व बाकीचीं खोटीं हें सर्वांस मान्य असल्यामुळे, अकलेपासून नुकसान होतें हें सर्वानुमतें सिद्ध झालें.

हेंच इतर अनेक रीतींनी सिद्ध करतां येईल. उदाहरणार्थ अग्नीचा शोध म्हणजे मनुष्याच्या अकलेचा सर्वांत मोठा उपयोग समजलेला आहे. पण त्यामुळे किती ताप झाला आहे ! त्याने कधी कधी आग लागते, शेगडी पेटवितांना माणसें जळून मरतात, वगैरे गोष्टी जरी सोडून दिल्या, तरी त्याचा मुख्य उपयोग म्हणजे अन्न शिजवणें, यांत तरी कांही सुख आहे ? पूर्वी वनस्पती किंवा मांस सांपडेल तसें कच्चें खावें लागत असे. त्यामुळे राहणी किती साधी असे ! आता शिजवल्या-शिवाय खाणें शक्यच नाहीसें झालें आहे, यामुळे एक पुरुषांना, स्वयंपाक करतां येत नाही म्हणून किंवा वेळ नाही या सबबीवर, लग्न करावें लागतें, नाहीतर स्वयंपाकी ठेवावा लागतो किंवा खाणावळीचा आश्रय करावा लागतो. कांही केलें तरी त्रासच ! या साध्या राहणींत वस्त्रप्रावरणाचीही जरूर नसे परंतु मनुष्याची अक्कल वाढत चालली तेव्हा सौंदर्याचो कल्पना आली व शरीर शृंगारण्याकरतां जरूर नसतांही लोक वस्त्रें वापरूं लागले. त्याचा उपयोग शरीर झांकण्याकरतां आहे ही कल्पना नंतर आली व या शेवटच्या कल्पनेने इतकें नुकसान केलें की आतां लोक नग्नतेचा गौरव करूं लागले आहेत.

त्याहून अलीकडच्या कल्पना घेतल्या तरी तीच स्थिती. घड्याळाची कल्पना घ्या. त्यापूर्वीही कालाची गति अबाधित चालली होती, आताहि चालली आहे. तो मोजून आपण काय मिळविलें ? आता ऑफिसला उशीर होईल, गाडी चुकेल, फलाणा अमुक वाजतां भेटायला येणार आहे, मिळून मनुष्याची एक-सारखी धांदल !

या यांत्रिक युगांत कामें लवकर व्हावीं म्हणून अनेक प्रकारचीं यंत्रें

निघालीं आहेत. त्यांनी कोणाचा कांही फायदा होतो म्हणतां काय ? नांव नाही. कामें लवकर संपल्यावर मनुष्याने करायचें काय ? कांहीच काम शिल्लक न राहिल्यामुळे मनुष्य आळशी होतो. "आलस्यं हि मनुष्याणाम्.. ". वर्षानुवर्ष सारा दिवसभर काम करून जेमतेम अन्नवस्त्र मनुष्याला मिळालें म्हणजे बस. यापेक्षा जास्त म्हणजे ऐषआराम समजला पाहिजे. याचकरतां गिरणीचा कपडा त्याज्य मानून प्रत्येकाने स्वतःपुरते सूत काढून विणलें म्हणजे प्रत्येकाला भरपूर काम मिळेल व कोणीही आळशी होण्याची भीति नाहीं.

आगगाडीची युक्ति निघाल्यापासून प्रवास इतका सोपा झाला आहे की यात्रा वगैरे करण्याने पूर्वी जें पुण्य लागत असे त्याच्या शतांश सुद्धा आता लागणें शक्य नाहीं, कारण मनुष्याचे हाल किती होतात यावर पुण्य अवलंबून असतें.

छापखान्याची युक्ति निघाल्यापासून किती नुकसान झालें आहे पहा ! त्यापूर्वी सरकारला प्रेस ॲक्ट करण्याचेंही कारण नव्हतें व त्यामुळे लोक भराभर तुरुंगांतही जात नव्हते.

सामान्यतः मनुष्य आपल्या अकलेचा उपयोग नसते चैनीचे पदार्थ उत्पन्न करण्याकडे किंवा श्रम वांचवण्याकडे करतो. श्रम वांचल्यानें मनुष्य आळशी होतो हें वर पाहिलेंच आहे, आणि चैनीच्या पदार्थांनी कांही फायदा होतो असें म्हणण्याचें धाडस कोणी करणार नाहीं. तेव्हां अकलेपासून नुकसान होतें हेंच खरें.

कामशास्त्राचा खून

—=:०*०:=—

शास्त्रीय अज्ञान, विसंगत विचार, धार्मिक वेडगळपणा व स्वतःच्या डोक्यांतून काढलेलीं, रामभरोसे ठोकून दिलेलीं असत्य विधानें जर कोणास

एकत्र पहायचीं असतील तर त्यांनीं 'रत्नाकर' मासिकाच्या जून-जुलै अंकांतील श्री. कृ. गो. किनरे यांचा 'वंध्यत्वविचार' अवश्य वाचावा. अज्ञान-प्रसारक मंडळाचे हे उत्साही घटक आज बरेच दिवस आपलें काम नेटानें करीत आले आहेत, परंतु त्यांची विशिष्ट शैली या लेखांत अधिक स्पष्ट दिसते. तर्कशुद्ध विचाराचीच जेथे किंमत नाहीं, तेथे तर्काच्या मुळाशीं कांही माहिती असावी लागते याची जाणीव कोठून असणार?

या लेखांतील खोट्या विधानांची केवळ यादी केली तरी देखील जागा फार लागेल, तेव्हां कांही मुद्देच घेऊं. कामवासनेच्या बाबतींत मनुष्य पशूंसारखा नाहीं म्हणून पशूच मनुष्यापेक्षां श्रेष्ठ, ही अजब विचारसरणी अर्थातच वरील लेखकास पसंत आहे, परंतु त्यांतील मूर्खपणा कोणासहि दिसण्यासारखा आहे. पशू अन्न रुचकर करून खात नाहीत म्हणून आपणहि खाऊं नये, चित्रें काढीत नाहीत म्हणून आपणहि काढूं नये, ते काव्य करीत नाहीत म्हणून आपणहि करूं नये, त्यांची कामवासना प्रजोत्पादनापुरतीच असते (असें धरून चाललें तरीही) तेव्हां आपलीहि तशी असावी, असें म्हणणारे लोक पशू होण्यासच योग्य आहेत व ते मनुष्य झाले ही निसर्गाची, किंवा त्यांच्या भाषेंत बोलायचें म्हणजे त्यांच्या विधात्याची, चूक आहे. यालाच अरसिकत्व म्हणतात 'कवि आम्हांला अरसिक म्हणोत' असें विनयाने म्हणण्याचें कारण नाहीं, ते खरोखरच तसे आहेत असें आम्ही त्यांस आश्वासन देतों. त्यांच्या या तोंडच्या गप्पांवर कोणी विश्वास ठेवतो किंवा त्याप्रमाणें कोणी वागतो अशी जर त्यांची कल्पना असेल तर ती मात्र चुकीची आहे. समागम संततीपुरताच असला पाहिजे असा उपदेश महात्मा गांधींनीहि केला आहे, परंतु त्यांच्यासारख्या निग्रही मनुष्यास सुद्धा स्वतःच्या उपदेशाप्रमाणें वागणें शक्य झालें नाही, असें त्यांनीच कबूल केलें आहे, मग पशूंप्रमाणेंच आपण वागलें पाहिजे असा आग्रह कां? जें लाखांत एका मनुष्यालाहि करतां येत नाहीं व जें केवळ नपुंसकालाच शक्य आहे, तेंच नैसर्गिक आहे असें समजण्यापेक्षा मनुष्याच्या गरजा पशूंपेक्षा वेगळ्या आहेत असेंच समजणें योग्य नाही काय? स्त्रीपुरुषसमागमाची पापाशीं घालून

दिलेली पारंपरिक सांगड हीच काय ती याला अडचण आहे, हें पारंपरिक लेखकांस कसें समजावें ? यांच्या विचारसरणीचे मासले वरील लेखांत विपुल आहेत. उदाहरणार्थ ' इंद्रियभोगांविषयी हा सामान्य नियम झाला, पण अपवादावांचून नियम बहुधा असतच नाहीं **म्हणून** हा सामान्य नियमहि सापवाद आहे. ' याचप्रमाणें, पशूंतहि वांझपण कधीकधी सांपडतें, असें स्वतःच म्हणून सुद्धा लगेच पुढे ' पशुपक्ष्यांत तें अपवादात्मकच आहे, सामान्य नियम नाही. पशुपक्षी रानांत राहतात वगैरे कारणामुळें त्यांना विकार असा कोणताच होणें संभवनीय नसतें ' असें विधान हे गृहस्थ खुशाल ठोकून देतात. स्वतःच्या अकलेवरच केवळ भिस्त ठेवण्यापेक्षा त्यांनी वस्तुस्थितीबद्दल माहिती मिळवण्याचा जर प्रयत्न केला असता तर अशीं खोटीं विधानें केलीं नसतीं. जे लोक घरीं बसून मनास येतील तीं विधानें करण्याऐवजी पशुपक्ष्यांचें स्वतः निरीक्षण करतात, ते असें सांगत नाहींत. स्वच्छ हवा व व्यायाम यांमुळे रोग कमी होतील हें खरें, परंतु मुळींच होत नाहींत असें नाहीं. पशुपक्ष्यांत अनेक रोग सांपडतात असें अनेकांच्या नजरेस आलें आहे.

कामशास्त्राचें गाढ अज्ञान वरील लेखांत ठिकठिकाणी दिसून येतें. उदाहरणार्थ वांझपणाचें एक कारण त्यांत पुढीलप्रमाणें दिलें आहे. ' स्त्री व पुरुष यांच्या प्रकृतीच अगदी भिन्न असतात. प्रकृतींत दोष असा दोघांच्याहि नसतो, पण प्रकृतिभेदाने दोघांनाहि संभोगसमाधान लाभत नाही (तें कां लाभत नाही याबद्दल खुलासा नाही, पण तें असो). समाधानावांचून गर्भधारणा कशी होणार ? ' हें साफ खोटें आहे, व ज्यांना संभोगसमाधान कधींहि लाभत नाहीं व ज्यांना मुलें मात्र नको इतकीं होतात, अशा शेंकडों स्त्रिया असतात. इतकी साधी गोष्ट ज्याला माहीत नाही त्याने वंध्यत्वविचारावर लेख लिहावा व तो एका सन्मान्य म्हणवणाऱ्या मासिकाने प्रसिद्ध करावा हें महाराष्ट्राचें दुर्दैव आहे. या लेखकाची अशीच कल्पना दिसते की लेखांत बऱ्याच वेळां देवाचें नांव घेतलें, उपोषण वगैरे धार्मिक प्रकारांची तरफदारी केली ब्रह्मचर्य, पावित्र्य वगैरे पारंपरिक बावळटपणा उचलन धरला, म्हणजे पाहिजे त्याला पाहिजे त्या

विषयावर लेख लिहितां आलाच पाहिजे. हे विद्वान् आणखी कोणकोणत्या विषयांस बरील पद्धत लावतात नकळे !

या लेखकाने वंध्यत्वावर जे उपाय सांगितले आहेत तेहि कुचकामाचे आहेत. श्री. किनरे उपोषणाचा प्रयोग करावयास सांगतील याचें कोणास आश्चर्य वाटणारच नाहीं, व त्याबरोबरच ते ब्रह्मचर्याचाहि उपाय सांगतात. हे उपाय वंध्यत्व घालवण्यास तर उपयोगी नाहीतच, परंतु नपुंसकत्व आणण्यास मात्र उपयोगी आहेत, असें प्रसिद्ध तज्ज्ञांचें मत आहे. श्री. किनऱ्यांचे मतें उपोषणाने कोणतीहि इष्ट गोष्ट घडून आलीच पाहिजे असे दिसतें, परंतु ज्यास उपोषणाचें वेड लागलेलें नाही त्यानी यांचे नादीं लागूं नये अशी आमची शिफारस आहे. हे लेखक खरोखरच धार्मिक आहेत की धार्मिकपणाचें ढोंग करतात, याचा लेखावरून मुळीच पत्ता लागत नाही. निरनिराळे उपाय सांगून झाल्यावर मधेच यांना ईश्वराची आठवण होते. ' लौकर निजावें, जागरण करूं नये....ईश्वरावर हवाला ठेऊन स्वस्थ चित्ताने असावें. आंथरूण मऊ असावें'... आमच्यासारख्या नास्तिकांस ईश्वराची चेष्टा करणें शोभतें, धार्मिक मनुष्यास शोभत नाही. ईश्वरावर हवाला ठेवायचा तर मग हे बाकीचे उपाय कशाला ? या उपायांशिवाय ईश्वराला कांही करतां येत नाही काय ? असा कसा ईश्वर ? इतर उपायांचा परिणाम होत असेल तर मग ईश्वराला त्याचें श्रेय कां ? ही केवळ ईश्वराची चेष्टा आहे इतकेंच नव्हे तर सामान्य वाचकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ, 'सकाळीं चार वाजतां उठून, अगोदर पाणी पिऊन, नंतर देवाचें स्मरण करून मग शौचमुखमार्जन (हें सर्व अर्थात याच क्रमाने झालें पाहिजे !) करून गांवापासून २–३ मैलांवर असलेल्या एखाद्या देवाच्या दर्शनास पायीं जाऊन पायीं परत यावें ..जातांयेतां देवादिकांच्या गोष्टीच बोलाव्या ..श्वासोच्छ्वासक्रिया सुदीर्घ ठेवावी. असें रमणीय देवस्थान जवळपास नसल्यास पतीने लांब फिरावयास जाऊन ८–१० मैलाची सणसणीत रपेट करावी'...येथे जो काय परिणाम लेखकाच्या मतें होतो, तो व्यायामाचाच असून त्यांत देवादिक केवळ आगंतुक आहेत अशी स्पष्ट कबुली

आहे. यावरून देवाच्या दर्शनाने वंध्यात्वावर कांही परिणाम होतो असे मानण्या-इतका लेखकहि मूर्ख नाही असें दिसतें. असें असेल तर भोळसट वाचकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न कां? किंवा आपण खरे उपाय सांगितले असतां तुळशीचा व इतर देवांचा आपल्यावर कोप होईल अशी त्यांची कल्पना आहे, तेव्हां मधून मधून देवाचें नांव घेऊन त्याला फसवून हळूच वाचकांना खरे उपाय सांगण्याची ही युक्ति आहे? वास्तवीक खरे उपाय लेखकाला स्वतः-लाच माहीत नाहीत, तेव्हां ते कसे सांगणार?

शेवटी आम्हांस इतकेंच म्हणावयाचें आहे कीं श्री. किनरे ईश्वराची चेष्टा पाहिजे तर खुशाल करोत, त्यांत त्यांचें किंवा इतर कोणाचेंहि नुकसान नाही, कारण ईश्वर नसतोच, व इतकेंच करून तें थांबले असते तर त्यांचे वाटेस जाण्याचें कारणच नव्हतें. परंतु ज्या विषयाची त्यांना बिलकुल माहिती नाही अशा विषयांत दुसऱ्याला उपदेश करण्याचा आव त्यांनी आणल्यामुळे त्यांत आम्हांस लक्ष घालावें लागलें. त्यांचे उपाय केवळ निरुपयोगीच नाहीत, तर हानिकारक आहेत, परंतु ज्यांस नपुंसकत्व पाहिजे असेल त्यांनी जरूर करावे.

पोंच व अभिप्राय.

शाकाहार कीं मांसाहार–लेखक, शं. वि. साठे, प्रकाशक, सि. द. आजगांवकर, संपादक, कुंजबिहारी सावंतवाडी, किं. १ आणा.

जगांत सर्वांत अधिक धार्मिक कोण असतात, असा जर कोणी विचार केला तर असें आढळून येईल की रानटी लोक, प्रत्येक समाजांतील सर्वांत खालच्या दर्जाचे अशिक्षित लोक, पोलिसाच्या यादींत कायम झालेले कुकर्मी लोक, हे नेहमी अत्यंत धार्मिक असतात. यावरून सर्व धार्मिक लोक अशिक्षित किंवा दुराचारी असतात असें जरी अनुमान निघत नाहीं, तथापि धार्मिकपणा

म्हणजे उच्च दर्जाची खूण नव्हे असें म्हणावयास हरकत नाही. ज्यांना विचार करण्याची शक्तीच नाही, त्यांना दुसऱ्यावर विश्वास ठेवणेंच भाग असल्यामुळे ते साहजिकच धार्मिक बनतात. आतां कांही लोक विचार करण्याची शक्ति असूनही बनतात, याचें मुख्य कारण ते त्या शक्तीचा उपयोग धार्मिक बाबतींत करणें म्हणजे पाप समजतात किंवा निदान उपयोग करूं नये असें त्यांचें मत असतें असें दिसतें. एरवीं 'सर ऑलिव्हर लॉज' सारखे शास्त्रज्ञ देखील अशा बाबतींत अडाणीपणा करतात याचा उलगडा होत नाहीं.

वरील पुस्तकाच्या लेखकाने जरी धार्मिक दृष्टीने न लिहिण्याचा आव आणला तरी त्याच्या धार्मिकपणाबद्दल कोणत्याहि वाचकास शंका येणार नाहीं. सात्विक, राजस व तामस या शब्दांस आधुनिक दृष्टीने बिलकुल महत्व नाही. या लेखांतील सर्वच खोटीं विधानें खोडून काढण्यास स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल, येथें त्यांतील मुख्य तेवढीं घेऊं. कोणत्याहि प्राण्याच्या आहारावर त्याचा स्वभाव अवलंबतो हें साफ खोटें आहे. पुष्कळ मांसाहारी कुत्रे अत्यंत गरीब असतात व पुष्कळ बैल मारकुटे असतात. मनुष्यांतही जैनादि शाकाहारी लोक सर्वच स्वभावाने गरीब व मांसाहारी सर्वच क्रूर असें दिसत नाहीं. इतकेंच काय, पण एकाच कुटुंबांतील एकच आहार खाणारांचा स्वभाव देखील सारखा नसतो हा अनुभव सर्वांस असला पाहिजे.

'अहिंसा परमो धर्मः' म्हणून एक संस्कृत वाक्य आहे त्यावर लेखकाची विशेष भिस्त दिसते. संस्कृत म्हणजेच जर खरें असेल तर 'जीवो जीवस्य जीवनम्' असेंहि एक वाक्य आहे, त्याचें काय करायचें तें अगोदर ठरवलें पाहिजे. जेथे स्वतःची अक्कल चालत नाही तेथे ईश्वराला पुढे करण्याची युक्ति असतेच व तो सेवेला हजरच असतो. तो स्वतः कांहीच सांगत नाही, तेव्हां ओढ्याच्या गाढवाप्रमाणें त्याच्यावर पाहिजे तें लादलें तरी चालतें. कां होईना ? पण त्याचा तरी उपयोग करतां आला पाहिजे ! ज्या भगवद्गीतेंत संहार करण्याचा उपदेश स्वतः ईश्वराने केलेला आहे, तिचा अहिंसेला आधार

कसा मिळणार ? लेखक म्हणतो ' ईश्वर जर सृष्टीचा कर्ता म्हटला (त्याचीहि खात्री नाहींच !) तर आपण सर्व प्राणीमात्र त्याचीं लेंकरें आहों. " समजा असलों, तरी जो ईश्वर स्वतःच्या लक्षावधि लेकरांचा दररोज संहार करतो, त्याला थोडेसे प्राणी मनुष्याने मारल्याचें काय वाटणार ? अशा परमेश्वराला अमर्यादं दयेचा सागर म्हणणें म्हणजे त्याची चेष्टा करणें आहे शिवाय ईश्वर प्रत्यक्ष कोणालाच मारीत नाही, तो वेगवेगळ्या रीतींनी संहार करीत असतो दुष्काळ, प्लेग वगैरे जसे त्याचे मार्ग आहेत, तसेंच कांही प्राण्यांकडून इतर प्राण्यांस मारवणें हीहि त्याचीच युक्ती आहे. त्याची इच्छा नसेल तर कोणत्याहि प्राण्याला मारण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? कांही लोक मांसाहार करतात ते त्याच्याच इच्छेने करीत असले पाहिजेत. तसें नसूनही जर तें त्यास बंद करतां आलें नाही तर तो ईश्वर कसला ? शिवाय लेखकाच्या म्हणण्याप्रमाणें ईश्वराने मनुष्याला हरएक बाबतींत आपली प्रतिमाच केली असली तर ईश्वराप्रमाणेंच आपणांस संहार करावयास नको काय ?

भूतदया हा मोठा सद्गुण समजण्याची वहिवाट आहे परंतु थोडासा जास्त विचार केल्यास त्यांत फारसें तथ्य नाही असें म्हणावें लागते. व्याघ्रसिंहादि हिंस्रपशु व कोणत्याहि प्रकाराने मनुष्याला त्रास देणारे प्राणि यांचा संहार करायला बौद्ध किंवा जैनांशिवाय कोणीहि मागेपुढे पहात नाही. केवळ निरुपद्रवी प्राण्यांसच दया दाखवण्याची आपणास बुद्धि होते. परंतु ही सुबुद्धि नाही. स्वतःचें संरक्षण हें जर महत्त्वाचें समजायचें असेल, तर ही दया अत्यंत मूर्खपणाची आहे. कोणत्याही प्राण्याची संख्या कांही नैसर्गिक कारणांनी मर्यादित होते, तीं कारणें म्हणजे त्यांस मारणारे इतर प्राणी, रोगराई, अन्नाचा तुटवडा हीं होत. हिंस्रपशू मारून त्यांपैकी एक मुख्य कारण आपण नाहीसें करतों, आपल्याच फायद्याकरतां रोगराईही आपण शक्य तितकी कमी करतों. याचा परिणाम असा होईल की इतर प्राण्यांची वाढ अतोनात होईल व त्यांच्यांत व मनुष्यांत शाकान्नाबद्दल चढाओढ लागल्यास स्वतःचा आहार कमी करून इतर प्राण्यांस अन्न देण्यास जैन लोक देखील तयार होणार नाहीत,

मग इतरांची गोष्टच नको ! म्हणजे त्यांच्यावर भुकेने मरण्याची पाळी येणार हें उघडच आहे. असें होण्यापेक्षा मांसाहाराकरतां त्यांचा संहार होणें वाईट आहे असें कोणाहि समंजस मनुष्यास वाटणार नाही, व ज्याअर्थी त्यापासून आपणांस अखेर त्रासच होणार, त्याअर्थी मनुष्याने स्वसंरक्षणाकरतां त्यांचा संहार करणें हाच शहाणपणा आहे, एरवी जीवनच अशक्य होईल.

मांसाहार की शाकाहार करावा, याचें उत्तर ज्याचे त्याचे प्रकृतीवर अवलंबेल. ज्यास जें मानवेल तें त्याने खावें, व बहुतेक लोकांचा अनुभव असा आहे की सामान्यतः या दोहोंचा मिश्र आहारच जास्त मानवतो.

काय खावें ? कसें खावें ?—१

—×—

अन्नाचे बाबतींत शास्त्रीय ज्ञानाची प्रगतीच अजून फारशी झाली नाही व जी थोडी शास्त्रीय माहिती उपलब्ध आहे तिचा अर्धवट उपयोग झाल्यामुळे नुकसान होतें. एकंदर मनुष्यजातीचा विचार केल्यास असें दिसतें की मनुष्य हा सर्वभक्षक प्राणी आहे, म्हणजे मांस, भाज्या, फळें व इतर प्रकारचें अन्न खाण्याची मनुष्याला संवय आहे. कित्येक शतकांच्या अनुभवावरून असें ठरतें कीं अमुक एका प्रकारचे पदार्थ मनुष्याने वर्ज करावे असें म्हणणें ही मोठी चूक आहे, उदाहरणार्थ मांस किंवा मद्य. (येथें मद्य याचा अर्थ द्राक्षें किंवा इतर फळांच्या रसापासून आपोआप तयार होणारी दारू समजावी, भट्टी लावून तयार केलेला मद्यार्क नव्हे. सं.) कांही प्रकारचें अन्न निषिद्ध कां मानलें गेलें हें पाहण्याचें हें स्थळ नव्हे. त्याचीं कारणें धार्मिक किंवा इतर असतील, परंतु शास्त्रीय नसतात. नैसर्गिक तेवढें चांगलें असेंहि समजणें योग्य नाहीं, कारण आंधाशीपणाचा दोष अत्यंत सुधारलेल्या लोकांत व अत्यंत रानटी म्हणजे नैसर्गिक लोकांतहि दिसतो. कोणत्याहि प्रकारच्या अन्नाचा उपयोग करण्यास हरकत

नाही, परंतु दुरुपयोग मात्र करूं नये. मनुष्याला इतकी अक्कल असायला पाहिजे होती, परंतु ती नाही असा अनुभव आहे, म्हणून मद्यपानाविरुद्ध चळवळ करावी लागते. परंतु व्यसनी लोकांस दारूची बंदी करतांना सर्वांसच बंदी करणें सयुक्तिक आहे काय ? दारुबंदीचा कायदा करणें म्हणजे शक्तीचा दुरुपयोग नव्हे काय ?

नैसर्गिक मद्याने पित्ताशयाचे कार्यास उत्तेजन मिळतें असें नुकतंच सिद्ध झालें आहे. आंतड्यांतील रोगजंतु मारण्यासहि मद्य हें उत्तम साधन आहे व अलीकडे त्याऐवजी बरेच लोक पाणी पिऊं लागल्यामुळेंच आंतड्यांच्या रोगांचा जास्त प्रसार झाला आहे असें मानण्यास सबळ जागा आहे. यावरून दारूबंदीचा कायदा करणें म्हणजे दारूबाज लोकांना वांचवण्याकरतां सरसकट सर्वांवर रोगांचें संकट आणण्यासारखें आहे, व दारूबाज लोकहि वांचत नाहींतच, कारण ते दारूऐवजी दुसरें कसलें तरी व्यसन धरतात. शास्त्रीय दृष्टीने विचार करायचा म्हणजे असले प्रकार करतां कामा नये.

शास्त्रीय दृष्ट्या इतकें सिद्ध झालें आहे की अन्नाची जरूर देशावर, व्यक्तीवर व व्यक्तीस पडणाऱ्या कामावर अवलंबते. अमुक अन्नापासून किती उष्णता उत्पन्न होईल, याला आजपर्यंत बरेंच महत्त्व देत असत, परंतु एवढ्यावरूनच योग्य अन्न कोणतें हें ठरवतां येत नाहीं. आपण किती अन्न खातों यावर आपलें जीवित अवलंबत नाहीं, तर त्यांतलें अंगीं किती लागतें, यावर अवलंबतें. ज्याप्रमाणें सर्वांची अक्कल किंवा शारीरिक शक्ति सारखी नसते त्याचप्रमाणें पचनशक्तीहि सारखी नसते. नुसते दुधाचे पदार्थ च फळें खाऊन राहणारा एक डॉक्टर अत्यंत सुदृढ असून खूब काम करीत असे. दुसरा एक शस्त्रवैद्य केवळ शाकाहारी असूनहि विलक्षण सशक्त असे. परंतु केवळ दुधावर राहिल्यामुळे कांही लोक मेल्याचींही उदाहरणें आम्हीं पाहिलीं आहेत. एखाद्याला बटाटे खायला मिळाले नाहींत तर तो क्षीण होतो. कांहीं लठ्ठ लोकांनी कीतिहि कमी खाल्लें तरी ते बारिक होत नाहींत. त्यांस कमी खायला लावलें तर ते अशक्त होतात पण त्यांचा आकार कमी होत नाहीं.

तर मग अन्नासंबंधी जे वेडगळ नियम कांही लोक पाळीत असतात त्यांस काय म्हणावें ? विशिष्ट रोग झाल्यास डाक्टराच्या सल्ल्याने अन्नाचे कांहीं नियम पाळावे लागतात हें खरें, परंतु याशिवाय इतर नियम म्हणजे वेडगळ समजुतीच समजल्या पाहिजेत. तरमग निरोगी लोकांनी काय खावें ? याचें उत्तर इतकेंच देतां येतें कीं त्यांनीं सर्वभक्षक व्हावें. याचा अधिक विचार पुढें करूं.

काय खावें ? कसें खावें ?—२

—:o:—

इतर प्राण्यांप्रमाणेंच शिकारीवर अवलंबणारे रानटी लोक मिळेल तेव्हा कोणत्याहि वेळीं खातात, परंतु सुधारलेल्या लोकांत नेमक्या वेळीं खाण्याची पद्धत पडते, कारण समाजाची व्यवस्थाच तशी असते. शहरांत तर भूक असो वा नसो, अमुक वेळीं जेवलेंच पाहिजे, अशी बहुतेकांची स्थिति होते. या जेवणाच्या वेळा जर योग्य नसतील तर त्या बदलणें समाजासच शक्य आहे, व्यक्तीच्या हातून तें होणार नाहीं.

फ्रान्समधे सकाळीं ७ वाजतां थोडेसें खाऊन नंतर १२ वाजतां भरपूर जेवण, व सायंकाळीं ७ वाजता दुसरें जेवण असतें. यावेळीं कमी कमी खाण्याची प्रवृत्ति हल्लीं वाढत चालली आहे. जर्मनींतहि जवळजवळ हीच पद्धत आहे. इंग्लंड व हॉलंडमधे मात्र फरक आहे. ते सकाळीं किंचित उशीरा व थोडें अधिक खातात नंतर १२ व २ चे मधें जेवतात, परंतु तेंही फार नाही, व सायंकाळीं मात्र भरपूर जेवतात. शिवाय चार पांच वाजतां चहाबरोबर कांही तरी खातातच व जरूर वाटल्यास निजण्यापूर्वी पुन्हा कांहीतरी खातात. ज्यांना कांही कामच नसतें, किंवा ज्यांचें काम सायंकाळीं असतें, त्यांना फ्रेंच किंवा जर्मन पद्धत सोयीची आहे, परंतु ज्यांना दिवसभर काम असतें त्यांना दुसरी पद्धतच योग्य आहे. भर-

पूर जेवणानंतर मनुष्याचे हातून फारसें काम होणें शक्य नसतें, याकरतां ज्यावेळीं काम करायचें असेल तेव्हां पोट हलकें असलें पाहिजे, व दिवसांतील मुख्य जेवण काम संपल्यावर म्हणजे सायंकाळीं ठेवणें इष्ट असतें. जेवणानंतर जर पुष्कळ काम पडेल तर पचन बरोबर होत नाही. कांही लोकास जेवणानंतर किंचित व्यायामाने पचनास मदत होते, परंतु कांहीस पूर्ण विश्रांतीची जरूर असते. या दृष्टीने पुढील प्रयोग महत्वाचा आहे. एका कुत्र्याला खायला घालून लगेच शिकार करावयास लावलें व दोन तासांनी त्याचें पोट फाडून पाहिलें तर पचनास सुरवात झालेली नाही असें दिसतें. त्याच्याच बरोबर दुसऱ्या एका कुत्र्यास खायला घालून त्याला स्वस्थ पडूं दिलें व दोन तासांनी त्याचेंही पोट फाडलें तर पचनक्रिया चालू राहिलेली दिसते. अलीकडे असा शोध लागलेला आहे की चरबीच्या पचनास फुप्फुसांची मदत होते. म्हणजे श्वासोच्छवास बरोबर चालावा लागतो. कांही लोकांस जेवणानंतर वामकुक्षीची जरूरी असते, व वीस मिनिटें स्वस्थ पडून राहिल्याचा पचनास नेहमी उपयोग होतो. परंतु फार वेळ झोप घेणेंहि पचनास बरें नाही, याकरतां रात्रीं जेवणानंतर लगेच निजणें बरें नव्हे.

सकाळीं उठल्याबरोबर कांहीतरी खाणें बरें, व सकाळीं लवकर उठणारांनी दुपारचें जेवण मध्यान्हापूर्वीच घेणें इष्ट आहे. रिकामटेकड्या लोकाच्या संवयी काम करणारांस चालणार नाहीत, परंतु पुष्कळ लोकांस नसते श्रीमंती चोचले केवळ अनुकरण म्हणून करावेसे वाटतात. काम करणाऱ्यास श्रीमंती वेळा मानवत नाहीत पुष्कळ लोकांस दुपारच्या जेवणानंतर अपचन होतें, परंतु सायंकाळीं होत नाही. सायंकाळीं जेवणानंतर विश्रांति मिळते दुपारीं मिळत नाही.

अमुक पदार्थ सकाळीं खाऊं नये, अमुक सायंकाळीं खाऊं नये, हाही एक मूर्खपणाच आहे. हें खरें असल्यास अन्नाच्या अंगचे गूण वेळावर अवलंबतात असें मानावें लागेल व याला कोणताही शास्त्रीय आधार नाही.

ग्रंथपरीक्षण

—:*०*:—

पातिव्रत्य-विचार, प्रस्तावनालेखिका, श्री. सौ. कमलाबाईसाहेब किबे; लेखिका, श्री. सौ. अनुसूयाबाई काळे, श्री. ताराबाई पाथरे, श्री. सौ. कमलाबाई पंतवैद्य जी. ए.; किंमत एक रुपया, ज्ञानमित्र पुस्तकमाला, पुणें.

इंदूरच्या महाराष्ट्र साहित्यसभेने वरील विषयावर मागवलेल्या निबंधांपैकी तीन या पुस्तकांत एकत्र छापले आहेत. पातिव्रत्याचें महत्त्व प्रस्थापित करण्याकरितां भगिनीवर्गाकडूनच निबंध मागवण्यांत साहित्यसभेने जें चातुर्य दाखवलें त्याची तारीफ करावी तितकी थोडी आहे. या चारी लेखिकांची अत्यंत कींव येते. एखाद्याला खांबाशीं बांधून चाबूक उगारून जर प्रश्न केला की 'बोल तुला फटके मारलेले आवडतात की नाही, की लगावूं आणखी दोन?' तर तो जितकें खरें बोलण्याचा संभव आहे, तितकेंच हल्लीच्या समाजव्यवस्थेंत ज्यांना नांदायचें आहे अशा स्त्रिया पातिव्रत्यासंबंधी बोलण्याचा आहे. एखाद्या सौ. ची स्वतःची वागणूक कशीही असली व तिने पातिव्रत्याला जरी धाब्यावर बसवलें असलें तरी उघडपणें पातिव्रत्याविरुद्ध ब्र काढण्याची तिची छाती होणार नाही. किंबहुना अशी स्त्रीच पातिव्रत्यास जास्त महत्त्व देईल. प्रस्तुत लेखिकांचे वागणुकीबद्दल आम्हास शंका काढावयाची नाही. परंतु हे निबंध स्त्रियांकडूनच मागवण्याची युक्ति हुशार डोक्यांतून निघाली असली पाहिजे यांत शंका नाही.

स्त्रियांची विचारशक्ति वापर नसल्यामुळे क्षीण झालेली असते, किंवा विचाराची परवानगी नसल्यामुळे तिची वाढच झालेली नसते, तेव्हा त्यांना यांतला कावा न कळणें साहाजिक आहे. स्त्रियांचें पातिव्रत्य म्हणजे पुरुषांची अरेरावी आहे. बायका पातिव्रत्याचा घोष करतात हें खरें, परंतु एकतर तसें केल्याशिवाय त्यांस गत्यंतर नसतें, कारण बहुतेकांस स्वतंत्रपणें राहण्याची शक्ति किंवा इच्छा नसते, व पातिव्रत्याविरुद्ध बोलणारी बायको कोणीही

पतकरणार नाहो. शिवाय ज्यांना मोकळ्या हवेची संवय नाही, त्यांना ज्याप्रमाणें मोकळ्या हवेंत सरदीची भीति वाटते, त्याचप्रमाणें स्वातंत्र्याची संवय नसल्यास त्याची भीति वाटते. जगाशीं घर्षणाने अंग खरचटण्याचा संभव असतो, तेव्हां तें पुरुषांनी करावें, व आपण त्याचा मोवदला म्हणून पतीची पडेल ती चाकरी करावी, अशी पारंपरिक स्त्रियांची मनोवृत्ति असते. हा त्यांचा दोष नाहो, परिस्थितीचा दोष आहे, व त्यांचें या बाबतींत मत आदर्श मानण्याचें ढोंग करण्यांत अर्थात् पुरुषांचा फायदा आहे. आपणांस देव समजणारा, कोणत्याहि बाबतींत विरुद्ध न जाणारा व घरकाम झटून करणारा नोकर कोणाला नको असतो? तो मिळण्याची सोय धर्माने आयती केलेली असतांही त्याविरुद्ध बोलून स्वतःचें नुकसान करून घेण्याइतका प्रामाणिकपणा क्वचितच सांपडणार हें उघड आहे.

यामुळें पातिव्रत्याचे विरुद्ध बोलण्याचें कोणीं धाडस केल्यास पुरुष व स्त्रिया दोघेंही चवताळतात व आपल्या दर्जाचे मानानें सभ्य किंवा असभ्य शिव्या देऊं लागतात. परंतु ही पुरुषांची हातचलाखी व स्त्रियांचा नेभळटपणा समाजास अत्यंत घातक आहेत. प्रस्तुत पुस्तक स्त्रियांच्या विचारशक्तीच्या ऱ्हासाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रस्तावनेसह चार निबंधांपैकी विचारांचा गोंधळ प्रस्तावनेंतच सर्वांत कमी सांपडतो. जुनें तितकें सर्व चांगलें, नवें तितकें वाईट, पातिव्रत्या-सारखा उत्तम दुसरा गूणच असणें शक्य नाही, पुनर्विवाह म्हणजे भयंकर पाप, कारण मग पातिव्रत्य काय राहिलें, वुरसलेलीं मतेंच सर्वांत उत्तम, वुरशाचा स्वाद रसिकांशिवाय कोणाला कसा कळणार, पातिव्रत्याचीं उदाहरणें द्यायचीं तीं देखील आधुनिक नाटकेंकादंबऱ्यांतील देणें चूक आहे, तीं रामायण, महाभारत वगैरे प्राचीन कादंबऱ्यांतीलच द्यावीं, वगैरे प्रामाणिक मतें **श्री. सौ. कमला-बाईसाहेबांनी** पोक्तपणे पुढें मांडलीं आहेत. त्यांचें असेंही मत त्यांनी सांगि-तलें आहे की त्यानाच प्रस्तावना लिहायला सांगितली हें बरें झालें, नाहीतर कांही लेखिकांनी पुनार्विवाह गौणपक्ष म्हणून तरी करूं द्यावा असें म्हटलें आहे तेंच लोकांना खरें वाटून भयंकर अनर्थ झाला असता. हें प्रामाणिक मत आहे,

यावर टीका काय करणार?

श्री. सौ. अनुसूयाबाई काळे या एम्. एल्. सी. झाल्यापासून त्यांस घमेंड आली आहे असें दिसतें, किंवा ती अगोदरचीच असल्यास आम्हांस माहीत नाही. पण ती आहे हें खरें, एरवी, 'सध्यां नवीन विचारांच्या ओघावरोबरच अनीती व पाप ह्या कल्पना नाहींशा होत चालल्या आहेत. "ह्यांत काय आहे? त्यांत काय आहे? स्त्रीपुरुषसंबंध आरोग्याच्या दृष्टीनें अत्यंत अवश्यक आहे, त्यांत पापपुण्याचा भाग कोठें येतो?" वगैर मतें **कांहीं अर्धशिक्षित पुरूष** बेलाशक प्रतिपादन करतांना आढळतात.....हे पाखंडी पुरुष आपल्या स्वैराचाराचें उघड उघड समर्थन करतात, पण आपल्या बायकांनी मात्र तो नियम काल्पनिक सृष्टींतसुद्धां लागू केलेला त्यांना खपणार नाहीं,' असलीं बेजबाबदार विधानें करण्याचें धाष्टर्य त्यांनी केलें नसतें. या शिव्या आम्हालाच दिल्या असतील तर आम्ही त्यांस इतके कळवण्याची परवानगी घेतों की आमचें शिक्षण **निदान** त्यांचेइतकें तरी झालेलें आहे, व शिक्षणाकरतां एम्. एल्. सी. होण्याची जरूर नसते. आमची गोष्ट सोडल्यास वरील मत प्रतिपादन करणारे बरट्रँड रसेल्, एच्. जी. वेल्स, बर्नार्ड् शॉ, हॅवलॉक् एलिस्, माग्नुस् हिर्शफेल्ट्, व्हिक्टर मार्गरित्, डॉ. रॉबिनसन् इत्यादि जगन्मान्य विद्वानांस अर्धशिक्षित म्हणावयाचें झाल्यास अनुसयाबाईंस अशिक्षित म्हणावें लागेल. शिक्षणाच्या परिणामाच्या दृष्टीने पहावयाचें असल्यास वरील चारी लेखिकांसच 'अर्धशिक्षित' ही पदवी मिळेल. वर ज्या विद्वानांची नांवें दिलीं त्यांपैकी एकही स्वैराचारी नाही हेंही आम्ही अनुसूयाबाईंस कळवतों, व यांपैकी कांही लोकांना तरी आपल्या बायकांस केवळ काल्पनिक सृष्टींतच नव्हे तर सत्यसृष्टींत पूर्ण स्वातंत्र दिल्याचें आम्हांस माहीत आहे. पापपुण्याच्या कल्पना बेअकली लोकांकरता आहेत, धार्मिक लोकां करता आहेत; त्या मानीव आहेत, वास्तविक नाहीत. स्त्रीपुरुषसंबंध आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे की नाही, यासंबंधी अनुसूयाबाईंपेक्षा आम्ही केव्हाही हॅवलॉक् एलिस् सारख्याच्या मतालाच अधिक मान देऊं. त्यांत पापपुण्याचा विचार पाहिजे तर धार्मिक वेडगळांनी करावा, परंतु ते आपली मतें दुसऱ्यावर

लादूं लागल्यास तीं अरेरावी या युगांत चालणार नाही, निदान चालतां कामा नये, एतदर्थच आम्हां आधुनिकांचें भांडण आहे. हीं मतें प्रतिपादणारांनी त्याचा फायदा स्वतः घेऊं नये असें कांही लोक म्हणतात, परंतु तेंही आम्हांस कबूल नाही. उलट नवीन मतें स्वार्थी आहेत असा आरोप येण्याचा संभव असतांही त्यांचा फायदा घेण्यास असामान्य धैर्य लागतें. उदाहरणार्थ ज्यावेळीं मुलींचीं लग्नें १४ वर्षांचे आंत होत असत, तेव्हां पुनर्विवाह केल्याने प्रौढ बायको मिळणें हा निःसंशय स्वार्थ होता. परंतु म्हणून पुनर्विवाहास अनुकूल मत देणारांनी स्वतः अशा रीतीने स्वार्थ साधतां कामा नये म्हणणारा शतमूर्ख ठरेल. वर उल्लेखिलेले बर्‌ ट्रेड रसेल्‌ यांनी स्वतःच्या मताकरतां पुष्कळ हाल सोसले आहेत. असे लोक स्वतःच्या स्वैराचाराचें समर्थन करतात म्हणणें दुराग्रहाचें द्योतक आहे. केवळ स्वैराचारच करायचा असेल तर धार्मिकपणाचें ढोंग माजवून करणारे काय थोडे लोक आहेत? परंतु अनुसूयाबाईंसारखे लोक शिव्या देणार हें माहित असूनही स्वतःचे क्रांतिकारक विचार बेलाशक पुढे मांडणें यालाच धैर्य लागतें, पारंपरिक मतांची तरफदारी करण्यास बिलकूल लागत नाही. अशा लोकांस 'अर्धशिक्षित' म्हणणें म्हणजे स्वतःचें हंसें करून घेणें आहे.

तथापि श्री. सौ. अनुसूयाबाईंचे विचार एकंदरींत फारसे पारंपरिक नाहींत हेंच खरें. " प्रजोत्पादन हा तर जगाचा नियमच आहे, पण त्यांत सुद्धा स्वैराचार विघातक आहे. " हें आम्हास सर्वथैव कबूल आहे. प्रजोत्पदनांत स्वैराचार बिलकूल उपयोगी नाहीं. प्रकृतीस व ऐपतीस मानवतील त्यापेक्षा जास्त मुलें कोणलाही होतां कामा नये. " पाश्चिमात्य शिक्षणामुळें आपण जास्त पाखांडी बनत चाललों आहोंत. आणि त्यामुळेच आपला धर्मावरचा विश्वास उडत चाललेला आहे. " वाः ! फारच उत्तम ! आणखी काय पाहिजे ? त्याने आपलें नुकसान होतें हें मात्र खरें नाही. 'तातस्य कूपोऽयम्‌' म्हणून खारें पाणी पिण्यास आमची बिलकूल तयारी नाही. आमच्या एका वात्रट मित्राने 'तातस्य कूपोऽमिति ब्रुवाणाः । क्षारं जलं का पुरुषाः पिबन्ति ?' असा मूळ श्लोकांत किंचित्‌ फरक करून त्याचा अर्थ 'खारें पाणी काय पुरुष पितात ?

(छे, तें बायकाच पिणार !),' असा केला होता, तें या चारी लेखिका सिद्ध करूं पाहतात. निर्बंध असतील तितके चांगले, धार्मिक निर्बंध सुटल्यास दुसऱ्या कोणत्या तरी निर्बंधांनी मनुष्यास जखडलें पाहिजे, हा विचार गुलामगिरीची संवय असणारांसच सुचायचा. पूर्ण स्वातंत्र्य हेंच प्रत्येक बाबतींत ध्येय ठेवून नाइलाच तेथेंच निर्बंध घालायचा, हा उत्कृष्ट मार्ग त्यांच्या डोक्यांतच कसा यावा ? " आजकाल पुरुषांचा असा एक वर्ग बनूं लागलेला आहे कीं, त्यांमध्यें परिस्थिती, संस्कृती, धर्म वैगरे सर्व बंधनांना झुगारून मन मानेल तसें वागण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली आहे. " उत्तम गोष्ट आहे, परंतु अनुसूयाबाईंस ती पसंत नाही असें दिसतें. वास्तविक पाहतां परिस्थितीस व संस्कृतीस झुगारून देणें कोणासही शक्य नसतें, त्यांचा परिणाम मात्र सर्वांवर सारखा होत नाही. त्यांचा परिणाम अनुसूयाबाईंपेक्षा भिन्न झाला की तो मनुष्य विघडला अशी त्यांची कल्पना दिसते. ही घमेंड आहे. राहतां राहिला धर्म. तो झुगारून दिल्यासच कांही उपयुक्त काम करणें शक्य आहे. धर्मामुळे जगाचें अतर्क्य नुकसान झालेलें आहे व जे त्याला झुगारून देण्यास समर्थ असतील त्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

अनुसूयाबाई म्हणतात, स्वार्थ साधण्याऐवजी सामाजिक जबाबदारी ओळखून वागलें पाहिजे. हें आम्हास सर्वथैव मान्य आहे परंतु सामाजिक जबाबदारी काय ती अनुसयाबाईंसच कळते व वर उल्लेखिलेल्या जगन्मान्य विद्वानांस ती कळत नाही ही त्यांची समजूत घमेंडखोरपणाची आहे. समंजस नाही. त्या म्हणतात, विलायती शिक्षणाबरोबर आपल्यांत जडमतवाद शिरला आहे व त्यामुळें व्यक्तीचें कर्तव्य योग्य रीतीने पार पडत नाही. जडमतवाद याचा अर्थच अनुसयाबाईंना कळला नाही असें या विधानावरून नाइलाजाने म्हणावें लागतें. आज जडमतवाद्यांच्या व धार्मिक लोकांच्या वागणुकीची तुलना केल्यास जडमतवादीच अधिक सदाचारी आहेत असें निःसंशय आढळून येईल, पण जडमतवाद हा शब्द शिवीसारखा वापरणारांना त्याची काय फिकीर ? धार्मिक लोकांना ' प्रातःकाले शिवं दृष्ट्वा .. ' वैगरे पापक्षालनाचे मार्ग मोकळे

असल्यामुळे पापास परवानगीच असते, तशी जडमतवाद्यांस नसते.

एवंच एम्. एल् सी. च्या उच्च शिखरावर गेल्यामुळे अनुसूयाबाईंना जग स्पष्ट दिसेनासें झालें आहे. त्या खाली उतरतील तर त्यांचा बराच फायदा होण्याचा संभव आहे.

श्री. ताराबाई पाथरे यांचा दुसरा निबंध आहे. यांचे विचारही ठराविक छापाचेच आहेत व त्यांची समर्थन करण्याची पद्धत हास्यास्पद आहे. उदाहरणार्थ एकत्र कुटुंबपद्धति त्यांस पसंत आहे. प्रथम त्या म्हणतात कीं सासूसासऱ्यांची मर्जी राखणे पतिव्रतेचें कर्तव्य आहे. पण लवकरच त्या खरें कारण पोतडींतून बाहेर काढतात की, 'लवकर लवकर चार मुलें झालीं की ती सांभाळावयाला जड जातात.' आमचे मतें याला उत्तम उपाय म्हणजे चार मुलें लवकर लवकर न होऊं देणें. बारकाईने पाहतां एकत्र कुटुंबांतील सर्व माणसें सुखी आढळत नाहींत.

'स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास हरकत नाहीं' असें मत देऊन त्याचें समर्थन केले आहे की "आमच्या आर्यमहिलांच्या मनावर पातिव्रत्याचा ठसा इतका भक्कम उठलेला आहे की स्त्रियांना स्वातंत्र्य दिलें तरी त्या पुरुषवर्गाच्या मदती-शिवाय कांहीही करूं शकणार नाहीत." वाहवा! तारीफ आहे! हेंच आमचें पातिव्रत्याविरुद्ध मुख्य म्हणणें.

विधवांनी पतिनिधनानंतर समाजकार्यास लागावें असें यांचें मत आहे. मग लग्नच करायला कोणी सांगितलें होतें? लग्न केल्यावर समाजकार्य करतां येत नाही हा समज चुकीचा आहे. स्वतःचीं मुलें उत्तम रीतीने वाढवणें हेंही समाजकार्यच आहे व याशिवाय विवाहित लोकास प्रत्यक्ष रीतीने देखील समाजकार्य मनांत असल्यास करतां येईल. विधवांस पुनर्विवाह करूं न देण्या-करतां कांहीतरी युक्ति काढण्यांत अर्थ नाही, व त्या आतां परवानगीची वाटही पहात नाहीत. आमचे मतें विधवांस लग्न करण्याचा पूर्ण हक्क पोंचतो. श्री. ताराबाईनाही विधवांविषयीं कळकळ वाटते, कारण त्या समाजास उद्देशून

म्हणतात " ज्यांच्या पूर्वार्जित भयंकर पातकामुळें या जन्मीं ज्या वैधव्यस्थिती-रूप प्रखर अग्नींत हारपळत आहेत, अशांच्यावर आणखी असे निंदेचे तडाखे देऊं नको, हेंच तुजपाशी आमचें मागणें आहे." वैधव्यस्थिति जर पूर्वार्जित पातकामुळे येत असेल तर समाजनिंदाही त्याच कारणामुळे कशावरून नसेल ? त्यांच्या कपाळींच समाजनिंदा लिहिलेली असल्यास त्याला समाजाचा कांही इलाज आहे ? भवितव्यता वलीयसी ! असल्या धार्मिक कल्पनांचा मूर्खपणा सुशिक्षित म्हणवणाऱ्या स्त्रियांच्याही लक्षांत येत नाही, यावरून त्या अजून परंपरेंतच गुरफटलेल्या आहेत हें स्पष्ट आहे. धर्म झुगारून देतील तरच विचार करतां येईल. शेवटीं ज्यांना ब्रह्मचर्याने राहवतच नसेल त्यांस त्यांनी लग्नाची परवानगीही दिली आहे, जणूं काय ब्रह्मचर्य हीच नैसर्गिक स्थिति, व कामवासना असणें म्हणजे वहकणें. धर्माने पछाडल्याची ही खूण आहे.

श्री. सौ. कमलाबाई पंतवैद्य यांचा तिसरा निबंध आहे. या निबंधांत विचारांचा गोंधळ सर्वांत जास्त सांपडतो. त्यांचे मतें " आकाशांतील तारे, ग्रह, गोल...वगैरे सर्वांना परमेश्वराने विशिष्ट तऱ्हेचें बंधन लावून दिलेलें आहे. म्हणूनच सर्व गोष्टी व्यवस्थितपणें होतात व त्यामुळे मनुष्याला सर्व व्यवहार करण्यास सुलभ जातें. नित्याचा क्रम थोडासा बदलतांच सर्वत्र अंदाधुंदी होते. तोच नियम मानवी व्यवहारासही लागू आहे." तारांचा क्रम बदलण्यासंबंधी कमलाबाईनी कांही प्रयोग केले असल्यास त्याची माहिती जरूर प्रसिद्ध करावी ! बरें, ताऱ्यांची व्यवस्था ज्याप्रमाणें केली त्याप्रमाणे परमेश्वराने मनुष्याचीही कां नाही केली ? ग्रह ज्याप्रमाणे आपापल्या कक्षेंत आपोआप फिरतात, त्याचप्रमाणे मनुष्याने दिवसांतून सात वेळां (किंवा अधिक) परमेश्वराची स्तुति आपोआप करावी, ब्राह्मणांची आपोआप स्नानसंध्या व्हावी, पाहिजे तर मुसलमानांचा नमाजही आपोआप पढून व्हावा, वगैरे व्यवस्था त्याला सहज करतां आली असती !

या लेखिकेचें असें म्हणणें दिसतें की ज्या वेळीं जी पद्धत होती ती

त्यावेळीं बरोबर होती. "वैदिक कालापासून महाभारत कालापर्यंत शौर्य व मोठेपणा यांचें दर्शक म्हणून कांही काल अनेकपत्नी विवाहपद्धती होती. एका अर्थी कौटुंबिक संकलनाच्या दृष्टीने तें फायदेशीर होतें. पण त्यामुळे प्रेम, सहानुभूति, माया हीं नाहीशीं होतात..... म्हणून ही पद्धती दोषास्पद ठरून एकपत्नीविवाह अमलांत आला." याच लेखिकेने पुढे अनेकपतिवाल्या द्रौपदीचें उदाहरण आदर्श पतिव्रता म्हणून दिलें आहे, पण तेथे प्रेम, सहानुभूति, माया वगैरे होतीं की नाही, याचा खुलासा केला नाही.

"पूर्वजन्मीं पुण्य करून प्राप्त झालेला मानवजन्म, त्यांतच आपल्या हातून सत्कृत्यें घडावींत व त्यांतच मानवदेहाचें साफल्यही आहे. हीं बंधनें पाळल्याने आपल्या पूर्वजांचें आयुष्य सुखमय झालें असें आपण पाहतों." यांतील प्रत्येक विधान खोटें किंवा निदान पुराव्याशिवाय केलेलें आहे. आपले पूर्वज आपल्यापेक्षां जास्त सुखी होते या समजुतीला कोणत्याही प्रकारचा आधार नाही.

यांची पातिव्रत्याची व्याख्या बरीच सैल आहे, म्हणजे त्यांतील अत्यंत वाईट गोष्ट तेवढीच आवश्यक आहे असें त्यांचें म्हणणें. "पतीला परमेश्वरासमान पूज्य मानून त्याच्या सुखाला पोषक होईल, असें वर्तन ठेवणें म्हणजे पातिव्रत्य." पतीला जर थोडीबहुत तरी अक्कल असेल तर त्याला अशा वागणुकीपासून मुळीच सुख मिळणें शक्य नाहीं. कमलाबाई म्हणतात "पतीशी वागतांना नम्रता, आज्ञाधारकपणा वगैरे ठेवावा," आमचे मतें हे दोन अत्यंत वाईट गूण आहेत व त्यांचा परिणाम पतीवर केव्हांही वाईटच होणार. अशा रीतीने वागल्यामुळे तो शेफारून बहकल्यास मग त्याला लोक विनाकारण नांवें ठेवतात! कमलाबाईंस कायिक पातिव्रत्याचें महत्त्व विशेष वाटतें, तर यांतीलच एका लेखिकेनें, अहल्येचा व्यभिचार शारीरिक झाला, पण मानसिक झाला नाही म्हणून तिची स्तुति केली आहे (अहल्येनें जाणून व्यभिचार केला, अशीहि कथा आहे. सं.) हें गौडबंगाल काय आहे कळत नाही. इतर सर्व बाबतींत मनाची किंमत जास्त

समजतात परंतु व्यभिचाराचे बाबतींत शरीराचा जास्त समजतात. एकंदरींत पातिव्रत्याची कल्पना फार उदात्त आहे यांत शंका नाहीं ! अहल्येचा व्यभिचार मानसिक झाला नाहीं, म्हणून तीहि पतिव्रता, द्रौपदीचा (कर्णासंबंधी) मानसिक झाला पण शारीरिक झाला नाही, तेव्हां तीहि पतिव्रताच ! या दोन उदाहरणांवरून आर्यस्त्रियांचें पातिव्रत्य कोणत्याहि प्रकारचा व्यभिचार केला तरी नष्ट होत नाही, इतकें तें उज्वल असतें ! धन्य आहेत आर्यस्त्रिया !

कमलाबाई म्हणतात, " आमच्या समाजानें स्त्रियांना पातिव्रत्याचीं इतकी कडक बंधनें घालून ठेवलीं आहेत तरीहि कितीक अत्याचार घडून येतात. " बंधनें घालून वागणूक सरळ होते ही कल्पना अत्यंत पोरकट आहे. सती जाणें, रजपूत स्त्रियांचा जोहार वगैरे अत्यंत निंद्य चालीहि त्यांस पसंत आहेत, कारण त्यांनी पातिव्रत्याचा बचाव होतो. त्यांनां अत्यंत उदार होऊन, 'विधवेने पतीच्या मरणानंतर कुढून मेलेंच पाहिजे असें नाही, समाजसेवेंत आयुष्य घालवलें तरी चालेल, ' अशी परवानगी दिली आहे. याबद्दल विधवांनी त्यांचे आभार मानणें जरूर आहे. पुनर्विवाहाचें नांव काढणें हेंच पाप आहे, कारण 'उपभुक्ता स्त्री विवाहास योग्य नव्हे, असे महाभारतांत स्पष्ट म्हटलें आहे. ' !

द्रौपदीविषयीं त्या लिहितात, " भीष्माने सांगितलेलें तत्त्व हेंच कीं, पतीची पत्नीवरील सत्ता मनांत आणतां, स्वतः जिंकला गेल्यानंतरहि त्याची सत्ता नाहीशी होत नाही. हें उदात्त तत्त्व इतक्या पूर्णतेस पोंचवलें आहे की तो दास झाला तरीहि त्याची आपल्या पत्नीवरील सत्ता कायम असते.....पत्नी ही पतीची छाया. त्याच्यावांचून तिला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. " आमचे मतें महाभारतकालीं लोकांच्या कल्पना किती रानटी होत्या याचा हा पुरावा आहे.

कमलाबाईंची विचारसरणी अनुपम आहे. " पातिव्रत्य हें वैयक्तिक दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. कारण एकतर शारीरिक दृष्टीने पातिव्रत्य जर पाळलें नाहीं तर स्त्या अनीतिमान होतील. नीती बिघडली, म्हणजे नाना तऱ्हेचे सांसर्गिक रोग जडतात. दुसरे असे की नीती बिघडली की माणसाचें शील बिघडलें

(नीति म्हणजे काय, आणि शील म्हणजे काय ?)...आमच्या समाजांत पातिव्रत्याचीं बंधनें कडक आहेत, त्यामुळे नीतीमत्ताही तितक्याच प्रमाणांत राखली जाते. पाश्चिमात्य देशांत आमच्या मानाने ही बंधनें शिथिल आहेत. वाटेल त्याबरोबर हातांत हात घालून हिंडावयास जाणें, नाचणें, खेळणें इ. प्रकार त्यांच्यांत अगदीं नित्याचेच आहेत. आमच्या कल्पनेप्रमाणे पुरुषाचा हस्तस्पर्शही कधीं व्हायचा नाही. त्यामुळें त्यांच्यांत अनीतीही पुष्कळ वाढली आहे. तात्पर्य पातिव्रत्याचीं बंधनें जितकीं शिथिल तितकी नीती जास्त बिघडते. व्यक्ति आणि समाज ह्या दोन्ही दृष्टीनें तें अनिष्ट व अवनतिकारक आहे. '' कमलाबाईनीं कधी पाश्चिमात्य देश पाहिले आहेत की नाही हें माहित नाही, परंतु पाश्चिमात्य स्त्रियांत अनीति जास्त असते हें विधान साफ खोटें आहे. ही नसती घमेंड सनातनी लोकांच्या एकंदर मनःस्थितीला साजेशीच आहे, परंतु केवळ हातांत हात घालणें यालाच अनीति म्हणायचें नसल्यास हें विधान खोटें आहे, व म्हणायचें असल्यास आमचा मतभेद आहे.

कमलाबाईचे मतें पैसे मिळवणें हा दुर्गुण पुरुषांसच शोभतो. त्या म्हणतात "व्यक्तिस्वातंत्र्यामुळे बायका समानहक्क मागूं लागल्या, त्यांचे स्तोम वाजवीपेक्षां जास्त वाढलें. बुद्धिमत्तेंतहि आम्ही पुरुषांच्या जोडीच्याच आहोत. मग पारतंत्र्यांत कोण व काय म्हणून राहणार ? या कल्पनेने पैसे मिळवण्याची चट लागली..." ज्या स्त्रियांना पारतंत्र्यच पसंत असेल त्यांनी त्यांतच खुशाल रहावें, परंतु इतरांनीहि पारतंत्र्यांतच रहावें, स्वतःचे पोट भरण्याचा प्रयत्न करूं नये, या विचारसरणीला हल्ली कोणीही समंजस मनुष्य वेडगळ म्हणेल. या वेडगळपणाचा कळस लेखिकेने शेवटी उपसंहारांत केला आहे. "समाजाची एकदां बसलेली घडी विसकटणें हें प्रशस्त नाही. आजपर्यंत जी एक समाजव्यवस्था टिकली, त्यांत चांगलें तत्त्व आहे म्हणूनच ती टिकली नाही काय ? ती जर इतकी दोषपूर्ण असती तर आपल्या समाजानें त्यांत बदल केला नसता काय ? " याच पदवीधर विदुषीने याच निबंधांत पूर्वी लिहिलें आहे की " फार प्राचीन काळीं विवाहनिर्बंध विशेष कडक नव्हता. तो श्वेतकेतूनें सुरू केला. " एक समाजव्य-

वस्था टिकलेली आहे, ही कमलाबाईंची कल्पना उघडउघड चुकीची आहे. समाजव्यवस्थेंत फरक होण्यास कालावधि लागतो. एका दिवसांत किंवा वर्षांतही तो फरक दिसेल असें नाही. इतकीही कल्पनाशक्ति ज्यांस नाही, त्यांनी असल्या विषयांवर निबंध लिहावे कशाला ? समाज हा व्यक्तींचा बनलेला असतो, त्यास वेगळें अस्तित्व नसतें. समाजाने बदल करायचा म्हणजे तो व्यक्तींनीच करायचा असतो, व तो एकदा झाला म्हणजे ती नवीन व्यवस्थाच कमलाबाईसारख्यांस वज्रलेप वाटते. हा बदल घडवून आणण्याकरतांच आमची खटपट आहे व हें करण्याचा आधिकार जुन्यापुराण्या ऋषींना जितका होता तितकाच आम्हांसही आहे. सुदैवाने पारंपरिक लोकांची अेरावी विशिष्ट मर्यादेपर्यंतच चालते. समाजांत कांही तरी विचार करणारे लोक असतात व ते जुन्या व्यवस्थेला झुगारून देऊन नवी आणण्याचा प्रयत्न करीत असतात. केवळ पारंपरिकच लोक समाजांत असते तर समाजाचा केव्हांच नायनाट झाला असता. जुनी व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न आम्ही, म्हणजे समजाचे कांही घटक, करीत आहोंत, व जुनी व्यवस्था दोषपूर्ण आहे म्हणूनच करीत आहोंत, व पारंपरिक लोकांनी कांही केलें तरी ही चळवळ आता त्यांस आवरत नाहीं.

जगांतील सर्वांत वाईट व्यसनः—धुरकटणें

———*०*———

तंबाखू ओढणें हें इतकें सार्वत्रिक झालेलें आहे की त्यांत मुरलेल्या लोकांस तें व्यसन आहे हेंच कबूल नसतें, तेव्हां त्याला जगांतील सर्वांत वाईट व्यसन म्हटलेलें पाहून आम्हांस वेड लागलें की काय अशी त्यांस शंका येण्याचा संभव आहे. परंतु हें आम्ही पूर्ण विचारांतीं लिहीलें आहे. त्यास सर्वांत वाईट म्हणण्याचें कारण या व्यसनापासून इतरांस जितका त्रास होतो तितका दुसऱ्या कोणत्याही व्यसनापासून होत नाहीं, व दुसऱ्यास त्रास देणें हीच अनीतीची व्याख्या अस-

ल्यामुळे या व्यसनांत सर्वांत जास्त अनीति आहे हें स्पष्ट आहे. विषाने किंवा इतर रीतीने स्वतःचें नुकसान करून घेण्याचा किंवा जीव देण्याचाही हक्क प्रत्येकास पोंचतो असें क्षणभर म्हणतां येईल, परंतु दुसऱ्यास विषप्रयोग करण्याचा हक्क कोणासहो पोंचत नाही हें निर्विवाद आहे. परंतु यावद्दल कायदा नसल्यामुळे असा विषप्रयोग लोक बिनदिक्कत करीत असतात. हें धुरकटणारांचे नजरेस स्पष्टपणें आणून देणें आह्मीं आपलें कर्तव्य समजतों. व्यसनाधीन लोकांवर त्याचा कितपत परिणाम होईल हा प्रश्न वेगळा.

स्त्रियांच्या आर्थिक पारतंत्र्यामुळे त्यांची स्थिति या बाबतींत शोचनीय होते, आयुष्यांत विवाह हेंच बहुतेकींचें ध्येय असल्यामुळे तंबाखूच्या घाणीबद्दल असमाधानही व्यक्त करणें धोक्याचें असतें. जेवणच पुरुषांवर अवलंबून असल्यामुळे तंबाखूची घाणही त्याबरोबरच पत्करावी लागते. स्वतः तंबाखू न ओढणारांस त्याची घाणच येते, परंतु पुष्कळ पुरुष देखील शिष्टाचार म्हणून ती घाण सोसतात. बरीच मंडळी एके घरांत जमली असतां घरचा मालक ओढणारा असला तर अर्थातच ओढण्याची परवानगीच असते व न ओढणारांस कोणी विचारीत नाही. मालक ओढणारा नसेल व कोणी पाहुण्याने ओढण्याची परवानगी विचारली तरी शिष्टाचार म्हणून त्यास नाही म्हणतां येत नाही. एवंच तंबाखु ओढणारांस सर्वत्र परवानगी असते व नसेल तेथेंही ते घेतात कोठे ओढूं नये असा कायदा असला व कोणीं तिकडे बोट दाखवून हरकत केली तर 'काय विलक्षण मनुष्य आहे पहा!' अशा अर्थाने सर्वजण त्याकडे पाहूं लागतात. शिष्टाचार काय तो न ओढणारांस लागू असतो व ओढणारांस त्याची कांही जरूर नसते.

लढाईनंतर युरोपांत पुष्कळ स्त्रिया तंबाखू ओढूं लागल्या आहेत, परंतु हिंदुस्थानांत अजून तो प्रघात सार्वत्रिक नाही, निदान वरच्या वर्गांत फारसा नाही. याचे कारण येथील स्त्रिया अजून स्वतंत्र झाल्या नाहीत, व चिरूट स्वतः ओढणे हें व्यसन नाही असे ज्या पुरुषांस वाटतें त्यांस बायकांचे तोंडांत चिरूट

दिसल्यास मूर्छा येईल यांत शंका नाही. तेव्हा नवऱ्याचें तंबाखूचें व्यसन सुटावें अशी ज्या बायकांची इच्छा असेल त्यांनी स्वतः तेंच सुरू करण्याची धमकी द्यावी व तेवढ्याने न भागेल तर नवरा जेव्हां चार चौघांत चिरूट ओढीत बसला असेल तेथेंच आपणही विडी, चिरूट किंवा चिलीम पेटवल्यास त्याचा बराच उपयोग होण्याचा संभव आहे. पतीला देव मानणाऱ्या स्त्रियांस देखील देवाचें अनुकरण करण्यास हरकत असूं नये. हल्लींच्या आधुनिक म्हणवणाऱ्या स्त्रिया देखील यासंबंधाने कांही करीत नाहीत, कारण पोट भरण्याची ताकद असेल त्यांस देखील इच्छा नसते व श्रीमंत नवऱ्याच्या जिवावर चैन करणें अधिक बरें वाटतें. चैनीकरतां पारतंत्र्य पतकरणाऱ्या स्त्रिया विडीची घाण घेण्यास तयार झाल्यास फारसें नवल नाही. पुरुषांस खूष करण्याकरतां विड्या ठेवण्याची एखादी चांदीची डबी देखील त्यांस बक्षीस देण्यास त्या मागेपुढे पहात नाहीत. मागणी घालणाऱ्या तरुणाचें विडीचें व्यसन सुटल्याशिवाय लग्नाला कबूल न होणारी एखादी तरुणी निघालीच तर तिला आसपासचे सर्व लोक मूर्ख ठरवतील इतकेंच नाही, पण तो तरुणही तें सोडण्यास ९९ हिश्शांनी तयार होणार नाही, व त्यास तरुणीचे प्रेमापेक्षां विडीचें प्रेम अधिक असतें हें कृतीने सिद्ध करील. अर्थात् तो स्वतःचे समाधानाकरतां व तिच्यावर बाजू उलटण्याकरतां असेंही म्हणेल की जी आपल्याकरतां तंबाखूची घाण सोसायला तयार नाही, तिचें आपल्यावर खरें प्रेम नाहीं, इ. जणूं काय प्रेमाकरतां हाल सोसणे हें बायकांचेंच कर्तव्य आहे, पुरुषांचें नाही. पण आमच्या तरुणींत इतकी तडफच नसल्यामुळे त्या असा प्रसंगच येऊं देत नाहींत. पुरुषांना थोडींबहुत व्यसनें असावयाचींच, पंशाने सर्व भरून निघतें, अशी सार्वत्रिक समजूत आहे व जेथें विवाहाचें ध्येय कायम आहे अशा सर्व देशांत हीच वृत्ति सांपडते. घरांत मिळवता पुरुष असेल त्याने खुशाल सर्वभर विडीचा धूर करून घरांतील सर्व माणसांस, स्वतःचे लहान अर्भकांसही विषप्रयोग करावा, त्याला कोणाची आडकाठी नाही. स्त्रियांना पाहिजे तर तंबाखूच्या घाणीचें चुंबन सोसण्याचा हक्क आहे, पण त्यामुळेच निरपराधी बालकांसही विषप्रयोग होतो हें लक्षांत घ्यावें व याविरुद्ध जोराची

चळवळ सुरू करावी. धुरकटणारे लोक सर्वत्र धूर पसरतात, घाण करतात, कधी कधी स्त्रिया हजर असल्यास त्यांचो परवानगीही विचारतात, परंतु परवानगी न देणारी एखादी स्त्री तरी निघते काय? कशी निघणार? आधीच पडती बाजू, आणि त्यांत शिष्टाचार. धुरकटणारे तर अशा रीतीने वागतात की सर्व जग जणूं काय त्यांच्या सोयीकरतां घडवलेलें आहे. आपणांस त्रास होतो असे कोणींही दर्शवल्यास त्यांचा अपमान होतो. मनुष्य अत्यंत स्वार्थी बनणें हा तंबाखूचा एक परिणाम अ हे. शिवाय सामान्य प्रामाणिकपणाही त्यांचे अंगीं पुष्कळ वेळां रहात नाहीं. इतरांस विषप्रयोग होऊं नये म्हणून विडी ओढूं नये अशी कोठे कोणीं मनाई केल्यास, ओठांत असलेली विडी लपवून ती फेंकून दिली असें सांगणारे पुष्कळ लोक भेटतात व हे इतर बाबतींत लुच्चे असतातच असें नाहीं, ते व्यसनामुळें अप्रामाणिक होतात.

तंबाखूचे पायीं गरीबांचेही पैसे व्यर्थ खर्च होतात, परंतु स्वतःचे पेसे पाहिजे तसे खर्च करण्याचा हक्क प्रत्येकास आहे असें कदाचित कोणी म्हणेल. तथापि जगांत सर्वांस खावयास जोंपर्यंत अन्न पुरेसें मिळत नाहीं, तोंपर्यंत जमिनीचा उपयोग धान्याऐवजीं तंबाखूची लागवड करणें म्हणजे दुरुपयोग करणें होय हें निर्विवाद आहे. या व्यसनापासून सरकारास कराचे रुपानें पैसा मिळत असल्यामुळे तें सरकारच्या फायद्याचेंच कलम आहे, याकरितां अफूप्रमाणें यासही तें उत्तेजनच देणार. कारण सरकारचें मुख्य काम लोककल्याण नसून सैन्य राखण्याकरतां पैसे मिळविणें आहे, हा सिद्धांत जगांत लढाई आहे तोपर्यंत ठरलेलाच आहे. तेव्हा या व्यसनाविरुद्ध नैतिक चळवळ समाजांतील समंजस लोकांनीच केली पाहिजे, सरकार कांही करणार नाही.

येथपर्यंत नैतिक विचार झाला. तंबाखू हें खरोखर विष नसून केवळ नाकाला त्रास देणारा पदार्थ असता तरीही हें विवेचन त्यास लागू आहे, कारण निष्कारण त्रास देणें म्हणजेच अनीति. तथापि तें विष कसें हें आता पाहूं. अर्थात् अगदी बेताने धुरकटणारांस त्यापासून तादृश नुकसान **सामान्यतः** होत नाही, हें कबूल

करणें भाग आहे. परंतु ही मर्यादा सर्वांस एकच नसते, व दिवसांत दोन विड्या ओढणारांसही त्याचे अनिष्ट परिणाम पुष्कळ वेळां सोसावे लागतात. पुष्कळ डॉक्टर विड्या ओढतात, तेव्हा त्यापासून विशेष हानि होणें शक्य नाही असें कदाचित कांहीस वाटेल, परंतु डॉक्टरावर कांही अनिष्ट परिणाम झाल्यास त्यास तो तावडतोब कळण्याचा बराच संभव असतो व तसें झाल्यास त्यास काळजी घेतां येते, परंतु इतरांची गोष्ट वेगळी असते, व अर्थातच डॉक्टरही व्यसनी असणे शक्य आहे. तंबाखूचा परिणाम हृदयावर व मज्जातंतूंवर प्रथम किंचित उत्तेजक होतो, व नंतर त्याचे उलट होतो व हा परिणाम केवळ विडी ओढणारासच नव्हे तर ज्या ज्या लोकांचे नाकांत त्याचा धूर जातो त्या सर्वांस सोसावा लागतो. धुरकट्णारांस मनोनिग्रह अशक्य होतो व व्यसनाचे परिणाम चांगले भोंवत असतांही बहुतेकांस हें व्यसन सोडतां येत नाही. त्यांची स्मरणशक्ति कमी होते, कोणत्याही विषयाकडे लक्ष लागत नाहीं, व मग कंटाळा आला म्हणून आणखी धुरकट्ण्याची इच्छा होते. मजूर वर्गांतील बहुतेक लोक विडी ओढतात व त्यांचा बहुतेक वेळ कोंदट हवेंत जात असल्यामुळे त्यांचेवर त्याचा परिणामही अधिक वाईट होतो. यामुळें त्यांनी फावल्या वेळांत शिक्षण घ्यायचें म्हटल्यास तें अत्यंत कठीण होतें. तंबाखूचा मज्जातंतूंवर परिणाम मद्यापेक्षाही जास्त होतो व धुरकटणारांचें वारंवार डोकें जड होतें व दुखतें. शिवाय तंबाखूमुळे त्यांस तात्पुरतें बरें वाटतें यामुळे आपलें डोकें त्यामुळेच दुखत असेल अशी कल्पनाच त्यांस होत नाहीं.

तंबाखूने कधीकधी नपुसंकत्व येतें, व शरीराच्या कोणत्याहि भागाची शक्ति मुळांत कमी असल्यास त्यावर त्याचा विशेष परिणाम होतो. कांही धुरकटणारे लोक ८० वर्षें जगतात व कांही अत्यंत विद्वान लोक धुरकटतात हें खरें, परंतु यावरून इतकेंच सिद्ध होतें की याचा सर्वांवर सारखा परिणाम होत नाही. तथापि त्यांसही त्याचा परिणाम सोसावा लागत नाही असें नाही.

पैशाच्या दृष्टीने पाहतां दर महिन्याला एक दहा रुपयाची नोट जाळून टाकणारा मनुष्य मूर्ख वाटेल खरा, परंतु तेच पैसे विड्यांचे रूपाने जाळणारे

जगातील सर्वांत वाईट व्यसन—धुरकटणें

लोक दसपट मूर्ख नव्हेत काय? घरांत बाप विडी ओढणारा असेल तरी बहुधा तो मुलांस ओढूं देत नाहीं, यामुळे पुष्कळ वेळां मुलें कोठेही पडलेलीं विडीचीं टोंकें जमा करून ओढतात. अशा एखाद्या विडीपासून गर्मीचा देखील संसर्ग होणें शक्य असतें व मुलांस केवळ रागें भरून हे प्रकार बंद होत नाहीत. तंबाखूचा जंतुनाशक परिणाम आहे अशी कांहींची कल्पना असते; परंतु ती खरी असती तर धुरकटणारांचे दांत बहुधा वाईट असतात ते कां? धुरकटणारास गर्मी झाल्यास त्याचे व्रण तोंडांत असतात व चुंबनामुळे किंवा थुंकीपासून इतरांस संसर्ग होण्याचा बराच संभव असतो. पॅरिसमधील एका तज्ज्ञानें ६०० स्त्रियांसमोर ही गोष्ट एका व्याख्यानांत सांगितली होती.

धुरकटणारांची मानसिक स्थिति इतकी खालावते की जेथे खाणीसारख्या ठिकाणीं व इतरत्र आग लागून भयंकर नुकसान होण्याचा संभव असतो तेथेही त्यांचेकडून आत्मसंयमन होत नाही व असे अपघात वारंवार ऐकूं येतात. जेथे हवा कोंडलेली असते अशा ठिकाणीं, सभागृहांत, आगगाडींत, सिनेमांत किंवा इतरत्र विडीच्या धुराने गुदमरून लहान मुलें मेल्याचींही उदाहरणें आहेत, परंतु विडी ही ओढलीच पाहिजे! विडी न ओढणारे पुरुष स्त्रिया, मुलें किंवा आजारी माणसें अशा ठिकाणीं हजर असल्यास त्यांनी वाटेल तर पळुन जावें, किंवा हाल होतील ते सोसावे, धुरकटणारांस त्यांची परवा नसते. यासंबंधी टॉलस्टायने लिहिलें आहेः—"समाजांत सामान्यतः जे शिष्टाचाराचे नियम सर्व सभ्य लोक पाळतात व धुकटणारे लोकही जे सामान्यतः मोडीत नाहीत, त्यांची या एका बाबतींत मात्र त्यांस आठवण होत नाही. स्वतःच्या सुखाकरता दुसऱ्याची गैरसोय करणें, विशेषतः दुसऱ्यांचें आरोग्य बिघडवणें हें सामान्य सुशिक्षित माणसाला सभ्यपणाचें वाटत नाही. जेथे लोक बसले आहेत अशा ठिकाणीं थुंकणें, आवाज करणें, हवा बिघडवणें, किंवा कोणास कोणत्याहि प्रकाराने त्रास देणें सभ्य नाही हें सर्व कबूल करतात. परंतु न धुरकटणारीं बायकामुलें बसलेल्या खोलींत तंबाखूचा धूर काढण्यास हजारांत एकालाहि दिक्कत वाटत नाहीं. अर्थात त्यांतल्या त्यांत सभ्य असेल तो परवानगी विचारतो, पण ती मिळणारच असें

तो धरून चालतो, व खराब झालेली हवा लोकांस आवडणें शक्य नाही हें त्याच्या मनांत येत नाही. मोठ्या माणसांनी परवानगी दिली तरीहि लहान मुलांस त्यापासून त्रास होतोच, पण त्यांस कोण विचारतो ?"

एकंदरींत धुरकटणें हें जगांतील सर्वांत वाईट व्यसन आहे यास आणखी काय पुरावा पाहिजे ?

लैंगिक शिक्षण

एथेल मॅनिन

मागील पिढींचे लोक लिंगसंबंधी गोष्टी गुप्त ठेवीत असत, या पिढींतील लोक त्यांचा मोठा बाऊ करून या गोष्टींना फार महत्व देतात. या दोन्ही मार्गांनी सारखेंच नुकसान होतें. मनुष्याच्या जननासंबंधी माहिती देतांना झाडांफुलांपासून सुरवात करणें माझे मतें मूर्खपणा आहे. आईबापांची अशी कल्पना असते की एकंदरींत लिंगविषयक गोष्टी घाणेरड्या तर खऱ्याच, पण त्या मुलांना सांगणें इष्ट आहे असें आधुनिक मत आहे, तेव्हा त्या सरळ सांगण्याऐवजी त्या झाडांफुलांत गुंतवल्या म्हणजे त्या घाणेरड्या दिसणार नाहीत. या पद्धतीचा परिणाम जुन्या पद्धतीइतकाच वाईट होतो.

माझे मतें झाडांफुलांत शिरण्याची मुळीच जरूर नसते. मुलांना आकाशांतून पाऊस पडतांना दिसतो आणि त्यांत जोपर्यंत त्यांना कांही चमत्कार दिसत नाही, तोंपर्यंत त्यांना बाष्पीभवन वगैरे सांगण्याचें कारण नसतें. मूल प्रश्न विचारील त्याचें शक्य तितकें साधें खरें उत्तर द्यावें आणि त्याला नसतें महत्व देऊं नये. मानसशास्त्रांत शिरलेल्या आईबापांना हें मुळीच कळत नाही. जी माहिती द्यायची ती सहजगत्या दिली पाहिजे, तशी न देतां त्याला फाजील महत्त्व दिल्यास यांत कांहीतरी भानगड आहे असें मुलांस वाटतें आणि याचा परिणाम अत्यंत वाईट होतो.

लैंगिक शिक्षण

एकदा माझी एक मैत्रीण गरोदर आहे की नाही हें ठरवण्याकरता मी तिला घेऊन एका तज्ज्ञाकडे गेलें, तेव्हा माझी ९ वर्षांची मुलगी बरोबर होती. माझी मैत्रीण गरोदर आहे असें डॉक्टरानें सांगितल्यावरून ती रडूं लागली. माझ्या मुलीने विचारलें, 'ती कां रडते?' मीं सांगितलें की तिला मूल होणार आहे असें डॉक्टरानें सांगितलें आणि तिला मूल नको होतें म्हणून ती रडते. ती म्हणाली 'मग तिने असें करायचें नव्हतें.' बकऱ्यांचा समागम तिने पाहिला होता व समागमापासून मूल होतें हें तिला माहीत होतें. मी थोडक्यांत सांगितलें की लोकांना आवडतें म्हणून ते समागम करतात, त्यांना मुलें पाहिजेच असतात असें नाही. ती म्हणाली, 'पण मुलें होतील हें त्यांना माहित नसतें का?' मी म्हटलें 'इतर प्राण्यांचें तसें होतें खरें, पण माणसांना मुलें नको असलीं तर पुरुषाचें बीज गर्भाशयांत जाणार नाही असें कांही तरी बायकोच्या पोटांत बसवतां येतें' तिने पुढे विचारलें, 'ते कांही तरी म्हणजे काय असतें?' मी म्हटलें, 'गर्भाशयावर बसवायच्या रबराच्या टोप्या असतात, त्या बसवल्या म्हणजे काम होतें.' ती म्हणाली 'किती छान युक्ति आहे, नाही? तुला नाही वाटत?' मी होय म्हटलें आणि मग ती दुसरें कांहीतरी विचारूं लागली. यापेक्षा त्याचे जास्त महत्त्व नाही. लिंगसंबंधी कोणतीही गोष्ट अशाच तऱ्हेने सांगता येईल. मुलें कोठून येतात हें माझ्या मुलीला तीन वर्षांच्या वयांत समजलें, कसें तें आठवत नाही. ती ६ वर्षांची झाल्यावर जेवतांना एकदा म्हणाली, 'मुलें कोठून येतात तें मला माहीत आहे, पण तीं कां होतात? तीं पोटांत वाढायला कां लागतात?' मी सांगितलें की पुरुषांच्या आणि बायकांच्या शरीरात बीजें असतात आणि आईच्या पोटांत बापाच्या शरीरांतलें बीज घातलें म्हणजे मूल वाढूं लागतें.' ती म्हणाली, 'पण तें कसें घालतां येईल?' तेव्हा मी तिला पुरुषांच्या आणि बायकांच्या शरीरांतला फरक सांगितला. तिच्या शाळेंत मुलगेही आहेत आणि तिने मुलगे नागवे पाहिले होते. तिने प्राण्यांचा समागम तेथपर्यंत पाहिला नव्हता तो नंतर रोम शहरांतील प्राणिसंग्रहालयांत पाहिला. प्रथम ती घाबरली, कारण मादीला इजा होत असली पाहिजे असें तिला वाटलें. कांही वेळाने ती म्हणाली,

'मग तिला आता मूल होईल, रखवालदाराला सांगितलें पाहिजे.' मीं तिला सांगितलें कीं रखवालदाराच्या तें आपोआप लक्षांत येईल. 'मग माणसाचें सुद्धा असेंच होतें का?' 'जवळजवळ असेंच.' हें पाहिल्यावर तिचें पूर्ण समाधान झालें आणि तिला अगोदर स्वप्नें पडून ती भीत असे तें बंद झालें. यानंतर शेळ्यांना पोरें होतांना तिने पुष्कळ वेळां पाहिलें, आणि मला नसलेली माहिती ती सांगूं लागली. शिक्षणाची ही पद्धत किती सरळ आहे? नाहीतर माझ्या बरोबरचीं मुलें म्हणजे यासंबंधी माहिती मिळवण्याकरता वायबल, ज्ञान-कोश, वैद्यकीय पुस्तकें वगैरे सांपडेल तें चोरून वाचावें, किंवा इतर मुलांनी तुटपुंज्या माहितीवर दोन आणि दोन पांच केले असतील, त्यांच्याकडून आपण शिकावें आणि यांतलें कांही वडील माणसांना कळेल म्हणून घाबरत असावें.

माझा मुख्य मुद्दा असा की लैंगिक शिक्षण व्यावहारिक असावें, पुस्तकी असूं नये, तें सहजगत्या द्यावें, त्याचा विनाकारण बाऊ करूं नये व त्यांत कांही नीतीचे सिद्धांतही गोवूं नये. प्रेमाचा व समागमाचा संबंध मुलांना कळणें शक्य नसतें. तें वयांत येण्याच्या सुमाराला कळतें. आईबापांचें प्रेम असतें **म्हणून** तीं समागम करतात हें त्यांना सांगणें फोल आहे. समागम **कसा** होतो याबद्दल त्यांना जिज्ञासा असते, मानासिक स्थितीबद्दल नसते. त्यांना पाहिजे असेल त्यापेक्षा जास्त माहिती देण्याने त्यांना अजीर्ण होतें. त्यांत नीतितत्वें घुसडल्याशिवाय सरळ खरी माहिती ज्यांना देतां येत नसेल त्यांनी निदान गप्प बसावें या बाबतींत मी असें पाहिलें आहे की समंजस आईबाप सुद्धा स्वसंभोगाचे बाबतींत मूर्खपणा करतात. जुने आईबाप हा भयंकर गुन्हा आहे असें सांगत असत, परंतु हल्लीचे आईबाप त्याला गुन्हा म्हणत नसले तरी त्याने प्रकृति बिघडेल आणि बुद्धि कमी होईल असें सांगतात. हा अत्यंत मूर्खपणा आहे. स्वसंभोगापासून जर कांही नुकसान होत असेल तर इतर लोकांच्या मूर्खपणामुळे होतें, स्वसंभोगामुळे नव्हे. मूल विचारील त्यावेळीं योग्य खरी माहिती दिली म्हणजे स्वसंभोगाने बिलकुल नुकसान होण्याचा संभव नसतो. मुलांमुलींच्या वाढीच्या कांही कालांत ती एक शारीरिक गरजच असते आणि आईबापांस

सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे असा कांही प्रकार नजरेस आल्यास त्याकडे कानाडोळा करणें. म्हणजे मुलांच्या मनांत नसती भीति उत्पन्न होणार नाही व त्यांचें नुकसानही होणार नाही.

आमचे खटल्याची हकीकत

—:०:—

शनिवार, ता. १९ दिसेंबर १९३१ रोजीं सकाळीं ९ वाजतां पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांनी आमचे येथे येऊन मासिकाचे सप्टंबरचे अंकांतील '**व्यभिचाराचा प्रश्न**' नांवाचा लेख अश्लील असल्याचे आरोपावरून आम्हांस गिरफ्तार केलें व पंचांसमक्ष वर्गणीदारांची यादी व वरील अंकाच्या प्रती जप्त करून नेल्या, व आह्मांस लॅमिंग्टन रोडवरील ठाण्यावर नेऊन आमचेकडून रु. २०० जामीन घेऊन आम्हांस गिरगांव पोलीस कोर्टांत २२ तारखेला हजर राहण्यास सांगितलें. त्या दिवशीं सरकारी वकिलाने १५ जानेवारीपर्यंत मुदत मागून घेतली व खटला तहकूब झाला. आमचे तर्फे रा. शेटे व सरकारतर्फे रा. मानकर काम चालवीत आहेत. खटला संपेपर्यंत यासंबंधी जास्त कांहीच लिहितां येत नाही. तथापि हा खटला पुणेरी सनातन्यांचे अर्जावरून भरला आहे असें समजतें. गिरगांव पोलीस कोर्टांत हल्लीं रा. इंद्रवदन मेहता हे मॅजिस्ट्रेट आहेत, त्यांसमोर खटला चालेल.

× × × ×

आमचा खटला ठरल्याप्रमाणें जानेवारीचे १५ तारखेस गिरगांव पोलीस कोर्टातील मॅजिस्ट्रेट इंद्रवदन मेहता यांजपुढें सुनावणीस निघाला त्या दिवशीं पॉप्युलर प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. गंडभीर यांनी मासिक छापल्याबद्दल साक्ष दिली, नंतर आक्षेपित लेखांचें भाषांतर केल्याबद्दल रा. इझिकेल यांची साक्ष झाली. व्यभिचार या शब्दाचा अर्थ Licentiousness (बदफैलीपणा) असा केल्यास तो adultery पेक्षा जास्त बरोबर होईल, असें मॅजिस्ट्रेट साहेबांनी

म्हटलें, परंतु 'मी केलेलें adultery हेंच भाषांतर बरोबर आहे' असें रा. इझिकेल यांनी सांगिल्यावरून त्यांनी तसें लिहून घेतलें. नंतर सरकारतर्फे पुण्याहून साक्षीदार बोलवावे की नाही याबद्दल वाटाघाट होऊन, जे भाडें मागणार नाहीत असेच साक्षीदार बोलवावे असें ठरलें व याकरतां २२ तारखेपर्यंय खटला तहकूब केला.

२२ तारखेला पुण्याहून **आहिताग्नि राजवाडे** व **श्री. डावरे** हे साक्षीदार हजर झाले, व **सरदार जगन्नाथ महाराज** यांनी, कौन्सिल् ऑफ् स्टेटचे सभेस जायचें असल्यामुळे वेळ नाही, अशी सबब सांगितली. यांचेबरोबर पुण्याचे कोणी वकीलहि सल्ला देण्याकरता आले होते असें समजतें.

अहिताग्नि राजवाडे यांचे साक्षीचा सारांशः—प्रस्तुत लेख शास्त्रीय रीतीने लिहिलेला नाही व धार्मिक व नैतिक दृष्टीने तो किळसवाणा वाटतो. बहुपतित्व व बहुपत्नीत्व या 'पद्धति' असल्यामुळे त्यांत व्यभिचार होत नाही. कामसूत्र हा ग्रंथ शास्त्रीय आहे व तो सर्वांनी वाचण्याकरता नाही. बायकामुलांनी तो वाचणें बरोबर नाही, परंतु प्रौढांनी वाचण्यास हरकत नाही. कर्व्यांनी जो उतारा दिला आहे तें वात्स्यायनाचें मत नाही, वात्स्यायनाचें मत 'पारदारिक' प्रकरणाचे शेवटी दिलें आहे व वर वर्णन केलेल्या गोष्टी करूं नये असें त्याचें मत आहे. तें वात्स्यायनाचें मत, असें लेखांतहि कोठे म्हटलेलें नाही, असें मॅजिस्ट्रेट म्हणाले.

उलट तपासणींत राजवाडे म्हणाले, मी जुन्या मताचा ब्राह्मण आहें. धार्मिक प्रवचनें करणें हा माझा धंदा आहे. या लेखाचे लेखकांचे वडील सामाजिक कार्य करतात हें मला माहीत आहे व लेखक स्वतः अनेक कॉलेजांत प्रोफेसर होते. परंतु एका कॉलेजांतून त्यांस काढून टाकलें. कर्व्यांचे लेखांतील सर्व गोष्टी खोट्या आहेत. कुंतीला पांच मुलगे पांच देवांपासून जरी झाले तरी ते नवऱ्यापासून झाले असेंच समजायचें, कारण ते नियोगाचे पद्धतीने झाले. परंतु कुंतीला एक मुलगा लग्नापूर्वी झालेला होता व लग्नापूर्वी नियोगाचा कांही संबंध नाही, असें

ते उलट तपासणींत म्हणाले. पूर्वी कुमारिकांस मुलें झालेलीं चालत असत परंतु त्यावेळी माणसें जनावरांच्या स्थितींत होतीं. श्वेतकेतूचे पूर्वी विवाहसंस्था नव्हती, तेव्हा समागमास पूर्ण मोकळीक होती. महाभारताचे वेळीं व्यभिचाराची परवानगी नव्हती. कुंतीचे नियोगासंबंधी मॅजिस्ट्रेटांनी एक उतारा वाचून दाखवला, त्यांत असें निघालें की तिचे मनांत नसतांहि पुत्रसंतानाचे इच्छेने पंडूने तिला आग्रह केल्यावरून ती देवांस बोलावण्यास तयार झाली, परंतु कोणास बोलवावें हें त्याने सांगितलें नाही, तें तिनेच ठरवलें, व मुलांत गुण पाहिजे होते त्या मानाने निरनिराळे देव बोलावले. राजवाडे म्हणाले, त्यास व्यभिचार म्हणता येणार नाही. मॅजिस्ट्रेट म्हणाले, ही आधुनिक दृष्टि आहे. हल्लीचे काळी जर एखादी बाई अनौरस मुलगे देवांपासून झाले असें सांगूं लागली तर आपण त्यावर विश्वास ठेवाल काय? राजवाडे म्हणाले, ठेवणार नाही. पाश्चात्य ग्रंथकारांचे लेख वाचले आहेत काय, असें विचारतां, बरट्रँड रसेल वाचला नाही, परंतु हॅवलॉक् एलिस् वाचला आहे असें म्हणाले. कर्व्यांना व्याख्यान द्यावयास पुण्यास बोलावलें होतें काय, असें विचारतां म्हणाले, होय, संततिनियमनाचे इष्टानिष्टतेवर व्याख्यान देण्यास बोलावलें होतें, परंतु त्यांचें म्हणणें ऐकून घेण्याकरता नव्हे, तर खोडून काढण्याकरता. परंतु त्यांनी आपलें पुस्तक मात्र पाठवून स्वतः येण्याचें टाळलें.

नंतर रा. डावरे यांची साक्ष झाली. हे गृहस्थ 'शुक्लयजुःशाखीय वैगरे ब्राम्हणसभेचे' चिटणीस आहेत व त्यांनी त्या सभेंत पास झालेला ठराव वाचून दाखवला. त्यांत असें म्हटलें आहे की या मासिकांतील भाषा व विचार अत्यंत अश्लील असून त्याचें प्रकाशन बंद न पाडल्यास आर्यसंस्कृतीचा नाश होण्याचा संभव आहे. रा. डावरे यांनी असेंहि सांगितलें की हें मासिक मुलींचे शाळेसमोर विकलें जातें. उलट तपासणींत ते म्हणाले की मुलींच शाळेसमोर पुस्तकांचें दुकान आहे त्या दुकानांत तें विकावयास असतें, व तें आणखी डेक्कन जिमखान्याजवळहि विकलें जातें. संस्थेच्या ३५० सभासदांपैकी वरील ठरावाचे वेळीं १२५ हजर होते, त्यांत दुमत झालें नाही, व पुण्यांतहि याबद्दल दोन मतें नाहीत.

नंतर पोलीस इन्स्पेक्टर आचरेकर यांची साक्ष झाली. त्यांनी उलट तपासणींत सांगितलें की या मासिकाची भाषा साधी नसून प्रौढ (high-flown) आहे. आपली केस संपली असें सरकारी वकिलाने सांगितल्यावरून मॅजिस्ट्रेटांनी आमचें यावर कांही म्हणणें आहे काय, असें विचारलें, तेव्हा आमचें म्हणणें लेखी देण्याची इच्छा आम्हीं दर्शवल्यावरून आम्हास फेब्रुआरी १ पर्यंत मुदत देवून खटला तहकूब झाला.

कोर्टास वेळ नसल्यामुळे हा खटला पुनः दोन दिवस तहकूब होऊन ३ तारखेस पुनः निघाला. प्रथम आमचें म्हणणें लेखी दिलें त्याचा सारांशः—मी मुंबई युनिव्हर्सिटीचा एम्. ए. असून सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजचा दिप्लोमाहि घेतला आहे, व पॅरिस युनिव्हर्सिटीचाहि गणिताचा दिप्लोमा घेतला आहे. १९०८ पासून १९२१ पर्यंत सरकारी कॉलेजांत गणिताध्यापक होतों. त्या सालीं अहमदाबादचे कॉलेजांत माझी गणिताचे प्रोफेसरचे जागेवर नेमणूक झाली, परंतु त्या जागेचा कमींतकमी पगारहि मला न दिल्यामुळे मीं राजीनामा दिला. नंतर १९२२ सालीं विलसन कॉलेजांत प्रोफेसर झालों. सरकारी नौकरी सोडल्यावर मीं लिंगशास्त्रावर दोन पुस्तकें लिहिलीं, एक संततिनियमनावर व दुसरें गुप्तरोगप्रतिबंधावर. विलसन कॉलेजांत गेल्यावर सुद्धा यासंबंधी लेखन चालूच होतें, तें कॉलेजच्या मिशनरी चालकांस पसंत न पडल्यामुळे मीं पुनः राजीनामा दिला, कारण या कामाचें महत्त्व मला जास्त वाटलें. मला एका कॉलेजांतून काढून टाकलें हें खोटें आहे. नंतर १९२७ च्या जुलैमध्ये मीं हें मासिक सुरू करून आजपर्यंत स्वतः पैशाची बरीच झीज सोसून चालवलें आहे. यांतील लेख मी नेहमी विचारपूर्वक लिहीत असतों. प्रस्तुत लेखाचा उद्देश व्यभिचारासंबंधी सामाजिक समजुतींचें धोरण बदलण्याचा आहे. याकरता प्रथम कांही उदाहरणें देऊन असें दाखवलें आहे की पूर्वी व्यभिचार करणाऱ्या सर्व लोकांना वाईट समजत नसत. याला आणखी जोर आणण्याकरितां वात्स्यायनाचे कामसूत्रांतील कांही उतारे व त्यांतील 'पारंपरिक' प्रकरणाचा

सारांश दिला आहे. यानंतर आधुनिक दृष्टीने समाजांत नियम कितपत असावे यासंबंधी विवेचन केलें आहे व व्यभिचारासंबंधी प्रचलित समजुती केवळ पारंपरिक आहेत, त्यांस कोणताहि सबळ आधार नाही असें दाखवलें आहे. व्यभिचाराने नुकसान असल्यास काल्पनिक आहे, खरोखर नाही, व प्रचलित समजुती बदलल्यास तें होणार नाही, तेव्हा या समजुती बदलणेंच सर्वतोपरी इष्ट आहे. हा लेख किंवा त्याचा कोणताहि भाग अश्लील आहे हें मला कबूल नाही. हींच मतें यापूर्वी जगप्रख्यात तज्ज्ञांनी लिहिलेलीं आहेत व हल्लींच्या काळीं हीं मतें वाचून कोणी बिघडण्याचा संभव नाहीं. तेव्हा मला आरोपमुक्त करावें अशी माझी विनंति आहे.

रियासतकार श्री. **गोविंद सखाराम सरदेसाई** यांचे साक्षीचा सारांशः—मी मुंबई युनिव्हर्सिटीचा पदवीधर असून हल्ली हिस्टॉरिकल रेकॉर्डस कमिशन्चा सभासद आहें. मी कांही दिवस पाटणा युनिव्हर्सिटींत मराठी इतिहासाचा 'पोस्ट् ग्रॅज्युएट् लेक्चरर' होतों व मीं मराठींत इतिहासाचे १० ग्रंथ लिहिलेले आहेत. या मासिकाचा मी आरंभापासून वर्गणीदार आहें. प्रस्तुत लेख मीं वाचला आहे व त्याची भाषा मर्यादशील व उच्च दर्जाची आहे. त्यांत वापरलेले शब्द किंवा शब्दरचना बिलकूल अश्लील नाही. उलटतपासणीः—मला हा लेख अश्लील वाटत नाही, व हल्लीच्या स्वतंत्र विचाराच्या युगांत तर त्याला बिलकुल अश्लील म्हणतां येणार नाही. त्यांत पुढारलेल्या विचारांचा पुरस्कार केला आहे. मी स्वतः कांही वर्षांपूर्वी लिंगसंबंधी प्रश्नांवर येथील **मासिक मनोरंजन** मध्ये लेख लिहिले होते, व या मासिकाचा स्त्रियांत विशेष प्रसार आहे. या लेखाने जुन्या मताचे लोकांस राग येईल हें खरें. या लेखांत व्यभिचाराचा पुरस्कार केला आहे तो आपणास पसंत आहे काय, असें विचारतां ते म्हणाले की व्यावहारिक दृष्ट्या त्यांत नुकसान नाही. आपण हें स्वतःच्या मुलींस वाचण्यास द्याल काय, असें विचारतां म्हणाले, अर्थात देईन. ज्ञानापासून नुकसान नाही. यानंतर खटला १६ फेब्रुवारीपर्यंत तहकूब झाला.

कठिण प्रसंग

मी (हें एका फ्रेंच एंजिनिअरने लिहिलें आहे) **हाईथाँग** येथे असतांना माझ्या ताब्यांत एक बोट असे. तींवर मी एकदा कांही मित्रांसह **सोंग-कोईच्या** बाजूला फिरायला गेलों. आम्ही एकंदर सहा युरोपीय होतों. बाकीचे पांच म्हणजे एक नुकतीच विधवा झालेली तरुणी, तेथे नुकताच आलेला एक तरुण अधिकारी व त्याची बायको, एक श्रीमंत इंग्रज प्रवासी आणि त्याची अत्यंत सुंदर मुलगी. या दोघांना मी त्या मुलीच्या सौंदर्यामुळेच बोलावलें होतें. याशिवाय बोटीवर एक तद्देशीय स्वयंपाकी आणि नावाडी होते. तीन दिवस-पर्यंत आमचा प्रवास सुरळीत झाला. नुकतेंच लग्न झालेलें जोडपें नेहमी हातांत हात घालून बसत असे. समुद्राच्या हवेने नवीन विधवेच्या तोंडावरहि टवटवी दिसूं लागली. इंग्रजी मनुष्य गंभीरपणें सृष्टिसौंदर्य पहात होता आणि त्याची मुलगी जें दिसेल त्याचे फोटो घेत होती. रात्री गरमा असल्यामुळे आम्ही सर्व उघड्यावरच निजत होतों, आणि दोन नोकर पाळीने पहारा करीत असत. एक दिवस सकाळी आम्ही जागे होतों तों आमचे भोंवती चांचे लोकांचा पहारा. आमचे नोकर नाहीसे झाले होते. आणि आम्ही सहा माणसें त्यांच्या सैन्यापुढें काय करणार ? आम्हाला मुकाट्याने ते म्हणतील तें कबूल करावें लागलें त्यांनी आम्हांला शेजारच्या गांवांत नेलें आणि एका झोंपडींत कोंडून ठेवलें, अमुक इतके पैसे मागवून द्या म्हणजे तुमची सुटका होईल, असें सांगितलें. हा तर्क आम्हीं केलाच होता, परंतु त्यांनी एक अकल्पित गोष्ट केली ती आमच्या कधी स्वप्नां-तहि आली नव्हती. त्यांनी आमचे सर्व कपडे काढून घेतले. ते न देण्याकरतां आम्हीं शिकस्त केली, पण आमचा कांही इलाज चालला नाही. युरोपीय मनुष्य प्राण गेला तरी नग्न स्थितींत पळुन जाणार नाही असें त्यांस वाटलें व तें बरोबर होतें. आम्ही खूप संतापलों, चिडलों, पण करणार काय ? आमची त्या वेळची मनःस्थिति वर्णन करून सांगणें कठीण आहे. ज्याला त्याला आपापल्या शरि-

कठिण प्रसंग

राची लाज वाटत होतीच पण त्याबरोबर दुसऱ्याच्या शरिराबद्दल कुतूहलहि वाटत होतें. डाक्टरच्या तपासणीकरतां नग्न होण्याचा ज्यांस प्रसंग आला असेल त्यांस याची कल्पना येईल. विशेषतः अशा वेळीं हातांचें काय करावें हें समजत नाही, व ते नसते तर बरें झालें असतें असे वाटतें. आमच्यापैकी तिन्ही स्त्रियांनी एकमताने आमचेकडे पाठ फिरविली, परंतु असें कितीवेळ चालणार? हळुहळू आम्ही धीट झालों आणि बोलायला सुरवात केली, तरुण अधिकाऱ्याने आपली दुर्बीण काढून हातांस काम दिलें, इंग्रज आपल्या दाढीवरून हात फिरवूं लागला, आणि मला जमिनीवर एक गवताची काडी सांपडली ती घेऊन मी चोखूं लागलों. स्त्रिया तरी तशा किती वेळ राहतील? त्यांनीही तोंडें फिरवलीं. आमची एकमेकांबद्दल जिज्ञासा अजून कायम होती व आम्ही एकमेकांच्या शरीराची तुलना करून त्यांतील बारीक सारीक गुणदोष पाहूं लागलों. ही मनःस्थिति तीन चार दिवस राहिली, परंतु नंतर मात्र आम्ही नग्न आहों हें विसरून केवळ पैसे केव्हा येऊन पोंचतात इकडे आमचें लक्ष लागलें. उष्मा होत असल्यामुळे नग्नतेने उलट बरेंच वाटूं लागलें. एकमेकांस नग्न पाहण्याची संवय झाली, आणि सर्वांनी कपडे घातलेले असले म्हणजे आपलें लक्ष ज्याप्रमाणें कपड्याकडे फारसें जात नाही, तसेंच आतां नग्न शरीराकडे जाईनासें झालें. आठ दिवसांनी रानटी लोकांप्रमाणेच आम्हांला नग्नतेची संवय झाली. शेवटी एकदाचे पैसे आले आणि आमच्या कपड्यांचें गाठोडें आम्हाला परत मिळालें. आणि सर्वांत गमत ती येथेच आहे! कपडे घालण्याकरता इंग्रजाच्या सूचनेवरून मधे एक पडदा सोडून एका खोलीच्या दोन केल्या आणि स्त्रिया व पुरुष कपडे घालूं लागलों. कपड्यांबरोबरच आपल्या लज्जेविषयी कल्पनाहि पुन्हा आल्या. माझी 'नेकटाय' खाली पडली होती ती शोधण्याकरता म्हणुन मी पडदा किंचित वर उचलला आणि पाहूं लागलों तों तिन्ही स्त्रियांनी एक भयंकर किंचाळी फोडली. कां, तर मीं त्यांना अपुऱ्या पोषाखांत पाहिलें म्हणून! माझ्या मनांत कांही उद्देश असणें शक्यच नव्हतें, कारण आता मला नवीन काय दिसणार होतें? यावरून नग्न शरीर अश्लील नाही, तर कपडेच अश्लील आहेत असे सिद्ध होत नाही काय?

आमचे खटल्याची हकीगत

—:०*०:—

(पुढें चालू)

ठरल्याप्रमाणें फेब्रुआरी १६ तारखेस खटला पुन्हा सुनावणीस निघाला. आमचे तर्फेचे वकील रा. शेटे यांनी भाषणास सुरवात केली. परंतु त्यांस सरळ बोलूं न देतां मॅजिस्ट्रेटांनी मधे प्रश्न विचारून जवळ जवळ त्यांची उलटतपासणीच केली. त्यांचे भाषणाचा सारांश:—" पीनलकोडांत अश्लीलतेची व्याख्या दिलेली नाही, म्हणून जस्टिस कॉकबर्न यांचीच व्याख्या सर्वत्र घेतात, ती अशी:—ज्याचे मनावर वाईट परिणाम होण्यासारखा आहे, अशांस भ्रष्ट करणारें तें अश्लील. यांत मतभेद होणारच. या लेखांतील विचारांचा पुरस्कार यापूर्वी सर्व जगांत विद्वान लोकांनी केलेला आहे व त्यांचीं पुस्तकें बंद केलेलीं नाहीत. कोर्टाने लेखाची भाषा विचारांत घ्यावी. यांतील विचार लोकांना शिक्षण देण्याकरितां लिहिलेले आहेत. नीति कालमानाप्रमाणें बदलते व प्राचीन काळींहि सन्मान्य लोकांनी व्यभिचार केलेला आहे, व त्यामुळे त्यांच्या मान्यतेला कमीपणा आलेला नाही. लेखांतील एखादा विशिष्ट भाग किंवा वाक्प्रयोग अश्लील आहे असें फिर्यादीपक्षास दाखवतां आलेलें नाही. कोर्टाचे दृष्टिकोणावरच लेखाचें अश्लीलत्व अवलंबतें. तें ठरवतांना लेखांतील विषयाची वादग्रस्तता, आरोपीचा सुसंस्कृतपणा, पुढारलेली विचारसरणी, प्रौढ भाषा, कामशास्त्रविषयक वाङ्मयाचा सार्वत्रिक फैलाव, या गोष्टि कोर्टानें अवश्य लक्षांत घेतल्या पाहिजेत. या मासिकाचे ७००वर्गणीदार आहेत व ते बहुतेक सर्व सुशिक्षित आहेत. प्रचलित विवाहपद्धतींतील दोष दाखवून व्यभिचारासंबंधी समाजाचा दृष्टिकोण बदलण्याचा प्रयत्न करण्याचा या लेखाचा उद्देश आहे. नॉर्मन हेअर म्हणतो, अनादि कालापासून स्त्रिया दोन मार्गांनी आपला चरितार्थ चालवीत आहेत, आणि दोन्ही मार्ग शरीरविक्रीवर अवलंबतात. लग्न करणाऱ्या स्त्रिया आपलें शरीर

एका पुरुषास कायमचें विकतात, व वेश्या आपलें शरीर वेगवेगळ्या पुरुषांस' कांही वेळ भाड्यानें देतात. **बरट्रॅंड रसेल** यांची धर्मपत्नी **डोरा रसेल** म्हणते कीं विवाहितास " विवाहबाह्य संबंध ठेवण्यास हरकत नसावी. " भाषण संपण्यापूर्वीच कोर्ट बंद होण्याची वेळ झाल्यामुळें यानंतर खटला २५ तारखेपर्यंत तहकूब झ ला, परंतु त्या तारखेस कोर्टास वेळ न मिळाल्यामुळें तो पुन्हां ९ मार्च पर्यंत तहकूब झाला.

ठरल्याप्रमाणें पुनः ९ मार्चला सुनावणी झाली. या दिवशीं आमचे वकील रा. **शेटे** यांनी आपले भाषण पुढे चालवून आक्षेपित लेखाचा विचार करून त्यांत आक्षेपार्ह कांही नाही असें दाखवलें लेखकाचे दृष्टीने वेश्यासमागम देखील वैवाहिक समागमापेक्षा उच्च ठरतो हें योग्य आहे काय, असें मॅजिस्ट्रेटांनी विचारतां ते म्हणाले, वेश्यासमागमांत दोघांची संमति असते व वैवाहिक समागमांत ती असतेच असें नाही, यामुळे वेश्यासमागम उच्च ठरतो असें लेखांत सांगितलें आहे. नंतर कायद्याच्या दृष्टीने कांही खटल्यांचा उल्लेख करतात तों कोर्टाची वेळ संपल्यामुळे खटला १५ मार्चपर्यंत तहकूब झाला.

१५ तारखेला रा. **शेटे** यांनी आपलें भाषण पुढे चालवलें. ते म्हणालेः— आक्षेपित लेखांतील विचार नव्या पद्धतीचे आहेत. या लेखाची भाषा प्रौढ आहे असें फिर्यादी तर्फेच्या साक्षीदारांनीहि कबूल केलें आहे. असे लेख इंग्रजींत नेहमी प्रसिद्ध होत असतात आणि त्यांना अश्लील समजत नाहीत, मग केवळ हा लेख मराठींत आहे म्हणून तो अश्लील समजणें योग्य नाही. लोकांचीं मतें बदलण्याकरतां हा लेख लिहिलेला आहे. तो वाचतांक्षणीं लोक त्याप्रमाणे वागतील हें शक्य नाही. लोकमतांत अमूक फरक झाला असतां कसा फायदा होईल हें यांत दाखवलें आहे. पुण्यांतील ज्या लोकांच्या तक्रारीवरून हा खटला भरण्यांत आला ते अत्यंत जुन्या मताचे आहेत. साक्षीदार श्री. **राजवाडे** हे प्राचीन मताच्या पुरस्कारावर पोट भरतात. येथे मॅजिस्ट्रेट म्हणाले, रा. **कर्वे** आधुनिक मतांवर पोट भरतात, त्यांत विशेष काय झालें? रा. **शेटे** म्हणाले, रा. **कर्वे** मासिकावर

पोट भरीत नाहीत. हें मासिक त्यांनी कित्येक वर्षे नुकसानींत चालवलें आहे व पोटाकरता त्यांना नोकरी करावी लागते. मासिकाचे बहुतेक वर्गणीदार सुशिक्षित लोक आहेत. येथील 'रॅशनॅलिस्ट् असोसिएशन् ऑफ इंडिया' च्या 'रीझन्' नामक मासिकाच्या मार्चच्या अंकांत अमेरिकेंतील अशाच एका खटल्याचा उल्लेख आहे, व तेथेहि जज्जाने भाषेवरच जोर दिला आहे. येथे **तारापोरवाल्या**वरील खटल्यांतहि हेंच तत्व गृहीत धरलें होतें. हें सर्व लक्षांत आणून आरोपीस दोषमुक्त ठरावावें.

नंतर सरकारी वकील रा. **मानकर** यांनी उत्तर दिलें. ते म्हणाले, हा खटला पुण्यांतील लोकांचे तक्रारीवरून भरला हें खोटें. यापूर्वीहि एकदा रा. **कर्वे** यांस सी. आय. डी. ने बोलावलें होतें, व या वेळींहि खटला भरण्याविषयीं सरकारकडूनच लिहून आलें. पुण्यांतील लोकांचीहि तक्रार असल्यामुळे आम्हीं त्यांस साक्षीस बोलावलें इतकेंच. कायद्यांत अश्लील शब्दाची व्याख्या दिलेली नाही, परंतु वेब्स्टरचे कोशांत 'विनयाला अगर शीलाला विघातक, किंवा सामान्य नीतिनियमांविरुद्ध' असा दिला आहे. यावरून लेख अश्लील ठरतो. येथें मॅजिस्ट्रेट व रा. **मानकर** यांत पुढील संवाद झाला.

'सामान्य नीतिनियम म्हणजे काय? हे नियम सर्वकाळ सारखे नसतात'. 'म्हणजे लोक सामान्यतः ज्याला नीति समजतात ती.' 'मुसलमानांस ४ बायका करतां येतात, त्यांनी जास्त बायका कराव्या म्हणणें अश्लील होईल काय?' 'छे, छे, असें कसें होईल?' 'वाङ्निश्चित वरावरोबर वधूने एकटें बाहेर जाणें जुन्या लोकांस मान्य नाही, परंतु तें नीतिविरुद्ध होईल काय?' 'पण या लेखांत भलत्याच गोष्टींना उत्तेजन दिलें आहे.' 'समजा, कांही वर्षांनी या लेखांतील गोष्टी प्रचारांत आल्या, तर मग तुम्ही काय म्हणाल?' 'तितकी प्रगति झाल्यावर मग हरकत नाही. **मारी स्टोप्स** यांचें पुस्तक पूर्वी अश्लील होतें, आतां नाही.' 'या लेखाची भाषा तर अश्लील नाही.' 'नाही, पण **वापरलेला माल** आणि **स्वैरिणी** हे शब्द अश्लील आहेत.' '**वापरलेला माल** यांत अश्लील काय

आहे ? आणि **स्वैरिणी** हा शब्द तर संस्कृत आहे आणि त्याचा अर्थ 'मनाप्रमाणे वागणारी' असा दिला आहे.' 'पण त्या शब्दाने अश्लील कल्पना मनांत येतात.' '**नायकीण** या शब्दाने तुमच्या मनात काय कल्पना येतील ?' 'मी प्रभु असल्यामुळे माझ्या मनांत, गायनाचा धंदा करणारी, यापेक्षा कोणतीहि कल्पना येणार नाही. हा शब्द सभ्य आहे.' 'बरें अंगवस्त्र म्हटलें तर ?' 'हा शब्द अश्लील आहे. त्याने वेश्या असा अर्थ मनांत येतो.' 'पण स्वैरिणी हा शब्द संस्कृत असल्यामुळे कोणाला धड समजणार देखील नाही. तो अश्लील कसा होईल ?' 'बरें तर तें राहूं द्या. या मासिकाच्या ३३०० प्रती छापल्या होत्या, पण वर्गणीदार ७०० च आहेत. बाकीच्या २६०० प्रती किरकोळ विकल्या असल्या पाहिजेत. हें मुलींचे शाळेसमोर आणि डेक्कन जिमखान्यावर विकतात असा पुरावा झाला आहे.'

रा. **शेटे** म्हणाले, असा पुरावा झाला नाही. पुस्तकांच्या दुकानांत तीं विकतात, रस्त्यांत तीं वांटीत किंवा विकीत नाहीत, असें साक्षीदाराने कबूल केलें आहे. हे म्हणणें मॅजिस्ट्रेटांनी कबूल केलें. नंतर रा **मानकरांनी** कांही खटल्यांचे आधार देऊन भाषण पुरें केलें व रा. **शेटे** यांनी आरोपीतर्फे ज्या ग्रंथांतील उतारे वाचून दाखवले होते तीं पुस्तकें मॅजिस्ट्रेटांस वाचण्याकरतां दिलीं. या खटल्याचा निकाल ४ एप्रिल रोजीं सांगण्याचें मॅजिस्ट्रेटांनी आश्वासन देऊन खटल्याचें काम समाप्त केलें.

४ एप्रिल रोजीं मॅजिस्ट्रेटांनी आमचे खटल्याचा निकाल वाचून दाखवला. तो बराच लांब असल्यामुळें पुढील अंकीं देऊं. त्यांनी आम्हांस दोषी ठरवून रु.१०० दंड केला आहे. अर्थात आम्ही शक्य असल्यास हें प्रकरण हायकोर्टाकडे नेऊंच, तथापि तेथेहि कायदा तोच, व या कायद्याने मतभेदाबद्दल कोणासहि शिक्षा करण्याचा अधिकार कोर्टास मिळतो, यामुळे खऱ्याखोट्याचा प्रश्नच रहात नाही. अश्लीलतेची व्याख्याच नसल्यामुळे कोर्ट ज्याला अश्लील म्हणेल तें अश्लील, अशीच व्याख्या अंमलांत येते. अर्थात हा कायद्याचा मूर्खपणा आहे, कोर्टाचा नव्हे. यासंबंधी पुढील अंकीं अधिक लिहूं.

निकालाचें भाषांतर

बादशहा, फिर्यादी, विरूद्ध, **रघुनाथ धोंडो कर्वे**, आरोपी.

आरोपः—सप्टेंबर १९३१ मध्यें इंडियन पीनल कोडाच्या २९२ कलमाखाली गुन्हा केल्याचा. आरोपी नाकबूल.

निकाल. आरोपी **समाजस्वास्थ्य** नावाच्या एका मराठी मासिकाचा संपादक व प्रकाशक आहे व त्यावर सप्टेंबरचे अंकांत **व्यभिचाराचा प्रश्न** या विषयावर एक अश्लील लेख लिहून प्रसिद्ध करून त्याचा प्रसार केल्याचा आरोप पीनल कोडाच्या २९२ कलमाखालीं ठेवला आहे.

फिर्यादीचें म्हणणें असें की आरोपी मुंबई युनिव्हर्सिटीचा एम. ए. असून सरकारी व विल्सन कॉलेजांत दुय्यम प्रोफेसर होता व त्याने जागेचा राजीनामा दिला होता. १९२७ सालापासुन त्याने **समाजस्वास्थ्य** नावाचें एक मराठी मासिक चालवले आहे. त्याचे सप्टेंबर १९३१ चे अंकांत **व्यभिचाराचा प्रश्न** या मथळ्याखाली एक लेख प्रसिद्ध झाला व तो आरोपीने लिहिला. त्याचें ओरिएन्टल ट्रॅन्स्लेटरचे आफिसांत भाषांतर होऊन सप्टेंबर १९३१ व आक्टोबर १९३० हे दोन अंक सरकारने पोलीस कमिशनरकडे पाठवले. १९ दिसेंबर रोजीं इन्स्पेक्टर आचरेकर यांनी आरोपीस नवी भटवाडी येथे त्याचे घरीं पकडलें. त्याचप्रमाणे वर्गणीदारांची यादी व सप्टेंबरच्या अंकाच्या १२ प्रतीहि त्यांनी आपल्या ताब्यांत घेतल्या.

फिर्यादीचें म्हणणें की आरोपीने लिहिलेला व प्रसिद्ध केलेला हा लेख सबंध वाचला असतां तो २९२ कलमाप्रमाणें अश्लील आहे, कारण ज्यांचे हातांत हें पुस्तक पडण्याचा संभव असून मनावर वाईट परिणाम होण्याचा संभव असेल अशांचीं मनें या लेखाने बिघडतील व एकंदर समाजाचे नीतीला बाध येईल

फिर्यादीतर्फे सहा साक्षीदार तपासले त्यावरून असें ठरतें की आरोपी मासिकाचा संपादक असून त्याचे विनंतीवरून तें छापखान्याने छापलें व

आक्षेपित लेख आरोपीनेच लिहिला. रा. **सॉलोमन इझिकेल** यांनी त्याचें इंग्रजी भाषांतर केलें व त्या भाषांतरास आरोपीने हरकत घेतली नाही. आरोपी, त्याचे वकील रा. **शेटे**, व इन्स्पेक्टर **आचरेकर** यांची मातृभाषा मराठी आहे, व एकंदरींत भाषांतर बरोबर आहे असेंच ठरतें.

या खटल्यांत दोन मुद्दे निघतात. १. आरोपी मासिकाचा संपादक असून त्याने सप्टेंबरचे अंकांत सदर लेख लिहून व प्रसिद्ध करून त्याचा प्रसार केला की नाही ? व २. इं. पी. कोडाचे २९२ कलमाप्रमाणे तें अश्लील आहे की नाही ?

पहिल्या प्रश्नास माझा निकाल होकारार्थी आहे व हें सर्व आरोपीनेही कबूल केलें आहे. दुसऱ्या प्रश्नाकरतां लेखाचा विचार केला पाहिजे. कायद्यांत **अश्लील** या शब्दाची व्याख्या नाही. **वेब्स्टरचे** कोशांत याचा अर्थ असा दिला आहे की, शिष्टाचार, पावित्र्य व सभ्यतेच्या दृष्टीने ज्या गोष्टी मनास किंवा दृष्टीस उघड करूं नये अशा गोष्टी उघड करणें. परंतु हा अर्थ कायद्याने घेतलेला नाही. १८६८ सालीं इंग्लंडांत जस्टिस कॉकबर्न यांनी जी व्याख्या दिली आहे तीच हिंदुस्थानांतहि इंग्लंडप्रमाणेंच मान्य केलेली आहे. ती अशी:—अश्लीलतेची कसोटी ही की ज्या कशावर अश्लीलतेचा आरोप असेल तें ज्यांचे हातांत पडण्याचा संभव असेल ते अनीतिग्रहणशील असल्यास त्यांचे मनावर त्याचा वाईट परिणाम होईल की काय ? अलाहाबाद येथील एका खटल्यांत असाहि अर्थ घेतला आहे कीं जें सामाजिक नीतीस बाधक असेल तें अश्लील आहे व तें बंद करण्याचा कायद्याचा उद्देश आहे.

यांचा आधार घेऊन हा लेख अश्लील होतो काय, हें पाहणें आहे. या लेखाचा मथळा **व्यभिचाराचा प्रश्न** असा आहे व त्याचीं ११ कलमें केलीं आहेत. फिर्यादीने त्यांपैकी अमुक कलमें निवडुन तीं अश्लील आहेत असें म्हटलेलें नाही. त्यांचें म्हणणें की ज्यांचे हातात तो पडण्याचा संभव आहे ते अनीतिग्राहक असल्यास त्यांचीं मनें बिघडतील.

ते असें म्हणतात कीं यांतील कांही कलमें युक्तिवाद म्हणून व आणखी कांही त्यांपासून निघणारीं अनुमानें म्हणून लिहिलीं असल्यामुळे त्यांत निवड करतां येत नाही. या म्हणण्यांत वराच अर्थ आहे व खटल्याच्या शेवटीं रा. शेटे म्हणाले की आरोपीवर कोणताहि विशेष आरोप नसून केवळ सामान्य आरोप आहे, यांत मला जोम दिसत नाही. ही समन्स केस असल्यामुळे कायद्याप्रमाणें आरोप ठेवण्याचेंहि कारण दिसत नाही, तरीहि सप्टंबरचे अंकांत अश्लील लेख लिहून प्रसिद्ध करून त्याचा प्रसार करण्याचा आरोप आरोपीला सांगितला आहे व तो त्याला समजला आहे. आरोपीच्या लेखी जबाबांत प्रत्येक कलमाचा उल्लेख आलेला आहे आणि कोर्टांत लेखाची पुष्कळ शहानिशा झालेली आहे.

लेखांतील एकदोन शब्दप्रयोगांशिवाय इतर भागांत अश्लील शब्द नाहीत हें फिर्यादीला मान्य आहे. (' वापरलेला माल ' व ' स्वैरिणी ' हे शब्द सरकारी वकिलांचे मतें अश्लील आहेत. **सं.**) पुण्याचे मराठी व संस्कृत पंडित रा. **एस. आर. राजवाडे** म्हणतात की हा लेख साध्या भाषेंत लिहिला आहे. इन्स्पेक्टर **आचरेकर** म्हणतात की या लेखांतील भाषा साधी नेहमीच्या वापरांतील नाही, उच्च आहे. आरोपीतर्फे साक्षीदार रा. **सरदेसाई** म्हणतात की भाषा प्रौढ असून सामान्य मनुष्यास समजण्यासारखी नाही.

मी स्वतः मूळ लेख वाचला व तो मला समजला, परंतु मला कांही शब्द समजण्यास अडचण पडली. माझें मत असें आहे की मासिकें वाचण्याची संवय असलेल्या सुशिक्षित मराठी बोलणाऱ्या मनुष्याला समजण्यासारखी ही भाषा आहे. ती प्रौढ व भारदस्त आहे हें रा. **सरदेसायांचें** म्हणणें मला कबूल नाही. कुंती, पांडव व श्रीकृष्णपरमात्म्याची पहिल्या कलमांत निंदा करण्यांत मला भारदस्तपणा दिसत नाही. वात्स्यायनाच्या कामसूत्रांतून स्त्रियांस कसें वश करावें हा भाग उद्धृत करण्यांतहि भारदस्तपणा नाही, अविवाहित स्त्रियांत कौमार्य हा एक भयंकर मोठा गुण समजला जातो अशी चेष्टा करण्यांतहि नाही, व वेश्या

ग्रं. क्र. 8699

आणि पतिव्रता यांची तुलना करून वेश्येचा दर्जा पतिव्रतेपेक्षा जास्त आहे असें म्हणण्यांतहि नाही.

- आतां हा लेख कां लिहिला व त्याचा उद्देश काय याचा विचार करूं. पहिल्या कलमांतील पहिल्या वाक्यांतच तो स्पष्ट केला आहे. व्यभिचार हें पाप नाही, व यासंबंधी धार्मिक व पारंपारिक निर्बंध असले तरी ते पाळण्यांत फायदा नसून, रोगांसंबंधीं व संततीसंबंधी प्रतिबंधक उपाय वापरण्याची खबरदारी घेतल्यास ते मोडण्यांतच कांहींचा फायदा आहे असें सिद्ध करण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे व त्याचे मताने तें सिद्ध झालें आहे. (६ वें कलम पहा).

रोग आणि संततीची भीति अशा रीतीने बंद केल्यास पत्नीच्या व्यभिचारापासून पतीचें नुकसान होत नाही व जिला फेरपालट (वेगवेगळ्या पुरुषांशीं समागम) पाहिजे असेल तिला तो मिळतो. व्यभिचाराचे व्याख्येंत त्याने अविवाहितांच्या समागमाचाहि समावेश केला आहे व त्याचीहि गोष्ट तशीच आहे असें प्रतिपादलें आहे. कौमार्य हा अविवाहित स्त्रियांचा मोठा गूण समजण्याच्या कल्पनेची चेष्टा केली आहे, आणि निषिद्ध वयाचे पुढें विवाहाशिवाय मुलांमुलींना समागमास परवानगी दिल्यास शास्त्रीय दृष्ट्या फायदा आहे असें म्हटलें आहे. कुमारिकांचे बाबतींतहि संततिनियमनाचा पुरस्कार केला आहे, आणि व्यभिचार हें पाप आहे ही कल्पना एकदा काढून टाकल्यास विवाहाशिवाय कोणीही केव्हाहि कोणाबरोबरहि समागम करण्यांत बेअब्रू नाही, समागमाचे वेळीं मन मोकळें राहील व आरोग्यदृष्ट्या हा फायदा आहे (दहाव्या कलमाच्या शेवटच्या ओळी पहा.)

सारांश वरींच प्रमाणें (यांचा विचार पुढे करीन) दाखवून लेखकाने विवाहित स्त्रियांस पाहिजे त्याबरोबर विवाहबाह्य समागमाचा उपदेश दिला आहे, अविवाहितांस स्वैरसमागमाचा उपदेश केला आहे, ब्राह्मणांची युक्ति म्हणून विवाहाच्या पवित्र संस्थेवर हल्ला केला आहे व समागमाचे पूर्वी किंवा नंतरहि कोणत्याहि प्रकारच्या करारांचाहि पुरस्कार केलेला नाही. सोव्हिएट रशिया विवाहाचे बाबतींत सर्वांत जास्त प्रागतिक असूनहि तेथे देखील ज्या स्त्रीपुरुषांस एकत्र यावयाचें असेल

त्यांस आपलीं नांवें नोंदणीबुकांत नोंदावीं लागतात (ही माहिती चुकीची आहे. सं.) **नॉर्मन हेअर** व **बरट्रॅण्ड रसेल**सारख्या लोकांनी देखील अशा बेताल मतांचा पुरस्कार केलेला नाही, व विवाहसंस्था तर दोघांनाहि पसंत आहे.

नॉर्मन हेअर हे आपल्या 'Hymen' नामक पुस्तकाच्या ५९ पानावर म्हणतात की 'आजन्म एक पति व एक पत्नी असा विवाह हें माझे मतें ध्येय आहे.' आणि ते जेव्हां अविवाहित स्त्रीपुरुषांच्या समागमाचा पुरस्कार करतात, तेव्हा तो केवळ कामशास्त्र व कामकला माहीत व्हावी म्हणून विवाहपूर्व समागमाचा होय. ते अनेकपत्नीत्वाचा पुरस्कार करतात तो देखील कायदेशीर अनेकपत्नीत्वाचा होय, प्रस्तुत लेखकाप्रमाणें बंधनरहित, अनर्गल, स्वैर समागमाचा नव्हे (पान ६३ पहा.)

बरट्रॅण्ड रसेल हे आपल्या 'Marriage & Morals' या पुस्तकाच्या २४३ पानावर म्हणतात. 'मी ज्या नीतीचा पुरस्कार करतों ती तरुणांस केवळ मन मानेल तसें वागण्यांस सांगत नाही. जीवनांत कांही ताळतंत्र पाहिजे, ज्यापासून तात्कालिक फायदा नाही किंवा ज्या आकर्षक नाहीत अशा गोष्टींबद्दल एकसारखा प्रयत्न करणें जरूर आहे. परहिताचा विचार केला पाहिजे आणि सरळ वागणुकीचे कांही नियम पाहिजेत.' ते ११५ पानावर म्हणतात, 'कांही अटी असल्यास विवाह हा माझे मतें दोन व्यक्तींमधील उच्चतम आणि अतिशय महत्त्वाचा संबंध आहे.' आरोपीतर्फेचे साक्षीदार रा. **सरदेसाई** यांनी उलटतपासणींत कबूल केलें आहे की या लेखांत शास्त्रीय विवेचन नाही, लेखकाने स्वैर समागमाचा पुरस्कार केला आहे, आणि रा. **राजवाडे** म्हणतात की हा लेख शास्त्रीय नाही, तो साध्या मराठींत व सामान्य वाचकांकरितां लिहिला आहे व धार्मिक व नैतिक दृष्टीने तो वाचल्यास किळस येतो.

नार्मन हेअर व **बरट्रॅण्ड रसेल** या दोन्ही लेखकांनी विवाह हा मुख्य विषय घेऊन त्यासंबंधी ज्यांचें महत्त्व असेल अशा विषयांचा विचार तात्पुरताच केला आहे. प्रस्तुत लेखकाने 'व्यभिचार हें पाप नाही' हा मुख्य विषय

घेतला आहे, व या आपल्या आवडत्या कल्पनेशीं संबंध येईल तेवढ्यापुरताच विवाहाचा विचार केला आहे, हिंदुस्तानांतील वेगवेगळ्या समाजांतील वेगवेगळ्या सामाजिक व धार्मिक परिस्थितीचाही त्याने विचार केला नाही व युरोप, अमेरिका व हिंदुस्थानांत कामनीतीची कोणती पायरी आलेली आहे हेंही पाहिलेलें नाही. युद्धानंतर युरोप व अमेरिकेंत जी नवीन नीति उद्भवली आहे, त्याचा हिंदुस्थानांतील हिंदी लोकांशी कांही संबंध नाही. हिंदु लोकांत विवाह हा धार्मिक विधि समजतात व कांही जाती खेरीज करून घटस्फोट किंवा पतिपत्नींस विभक्त होण्यास परवानगी नाही. आरोपीने भटांची युक्ति म्हणून विवाहावर हल्ला केला आहे. परंतु घटस्फोट, विभक्त होणें किंवा पुनर्लग्न वगैरेसारखे संरक्षक मार्ग सुचवलेले नाहींत.

लेखी जबाबाच्या ५ व्या कलमांत आरोपी म्हणतो की स्त्रीपुरुषसंबंध व सामाजिक आरोग्याचे बाबतींत समाजास शिक्षण देणें हा आपला उद्देश आहे. परंतु या म्हणण्यास योग्य मान देऊनहि (असें दिसतें की) एकंदर लेखाचा व विशेषतः ६ ते ११ कलमांचा वाचकांचे मनावर वाईट परिणाम होईल. लेखक शास्त्रीय दृष्टि, सुप्रजाजनन व प्राणिशास्त्रदृष्टीबद्दल बोलतो, परंतु जीं पुस्तकें त्याने कोर्टाला सादर केलीं आहेत, त्यांपैकी ज्या पुस्तकांत १९३० सालीं लंडन येथे भरलेल्या **सेक्शुअल रिफॉर्म कॉंग्रेस** मधील भाषणें आहेत, त्यांतच **कॅप्टन पिल्ले** नांवाच्या एका हिंदी गृहस्थाने एक निबंध वाचलेला आहे, व ८५ पानावर ते म्हणतात की सुप्रजाजननाचे दृष्टीने विवाहसंस्था व पावित्र्य हीं अवश्य आहेत. **कॅप्टन पिल्ले** यांनी अत्यंत विचारयुक्त व सूचक लेख लिहिला आहे. हा लेख आरोपीच्या लेखाशीं ताडून पाहतां आरोपीचा लेख शास्त्रीय व सुप्रजाजननाच्या दृष्टीने लिहिलेला आहे असें कोणता समंजस मनुष्य म्हणेल? हा लेखाचा सामान्य विचार झाला. आतां त्याचा कलमवारी विचार करूं.

पहिल्या कलमाची भाषा परमेश्वराची निंदा करणारी आहे व कृष्णाने व्यभिचाराचें उदाहरण घालून दिलें हें विधान किळसवाणें आहे. माझे मतें पहिल्या कलमाच्या ११ ओळी अश्लील आहेत. धार्मिक हिंदु श्रीकृष्णाला

ईश्वराचा अवतार समजतात व त्याची गोपींशी प्रेमलीला ही रूपकात्मक व आध्यात्मिक समजतात. कलकत्त्याच्या एका खटल्यांत जस्टिस् **चातर्जी** यांनी म्हटलें आहे की, हिंदु व विशेषतः वैष्णव हे राधा व कृष्ण यांस मनुष्य समजत नाहीत, त्यांची वागणूक मानवी नीतीने मोजीत नाहीत व ती अयोग्य समजत नाहीत, त्यांची देवता म्हणून पूजा करतात. राधाकृष्णाच्या लीलेचें आध्यात्मिक स्वरूप समजण्याइतकी अक्कल नसलेला एखादा अज्ञ हिंदु किंवा लहान मूलही त्यांना ईश्वरी व्यक्ति समजून त्यांच्या अनीतीसकट त्यांचें सर्व आयुष्य ईश्वरीच समजेल व त्यांना ईश्वरी समजणारांच्या मनांत त्यामुळे अपवित्र विचार येणार नाहीत. हिंदु लोक लहानपणापासून देवळांत राधाकृष्णाची पूजा केलेली पाहतात आणि कित्येकांच्या घरींही त्यांच्या मूर्ति असतात व लहानपणापासून त्यांना देवता समजण्याची त्यांस संवय असते. परंतु प्रस्तुत लेखक पहिल्या कलमांत म्हणतो की, कृष्णाच्या गोपींशी शृंगारचेष्टांस धार्मिक स्वरूप देण्याचा कितीही प्रयत्न केला तरी फोल आहे, कारण श्रीकृष्णाविषयी शृंगारकाव्याचा विस्तार पाहिला असतां हें कोणासही समजेल की श्रीकृष्णाविषयी लोकांची कल्पना तरी शृंगारमयच आहे, तेव्हा त्याने व्यभिचाराचा धडाच घालून दिला आहे असें म्हणण्यास हरकत नाही. सारांश त्याचें म्हणणें असें की कृष्णाच्या गोपींशीं शृंगारास लोकांनी खरें मानावें व त्यांस ईश्वर मानूं नये, न यावरून त्यांचा देव जो कृष्ण तो व्यभिचारी होता व त्याने व्यभिचाराचा धडा घालून दिला व म्हणून व्यभिचार पाप नाही.

दोन, तीन व चार हीं कलमें पाहतां आरोपी म्हणतो की कामशास्त्रावरील एका प्राचीन संस्कृत ग्रंथांतून आधार म्हणून कांही उतारे घेतले आहेत. आधुनिक दृष्टीने विचार करणारास वरील विवेचनाचा उपयोग नाही हें आरोपीनें कबूल केलें आहे, तरी पुण्याच्या सनातन्यांस गप्प करण्याकरता त्याची जरूर होती असें त्याचें म्हणणें आहे. आरोपीस असें वाटलें असें धरून चाललें तरी वात्स्यायनानें एक पुस्तक लिहून 'पारदारिकं' प्रकरण लिहिलें आहे असें त्यास म्हणतां आलें असतें, परंतु परस्त्री कशी वश करावी व समागमापर्यंत

मजल जाईपर्यंत स्त्रीची कामवासना कशी उत्तेजित करावी, याचा उल्लेख करण्याची काय जरूर होती? माझे मतें हा लेख लिहिण्यांत आरोपीच्या दुष्ट हेतूची ही एक खूण आहे.

या निकालाच्या मागील भागांत सांगितलें आहे की विवाहाला नांवें ठेवतांना विवाहबाह्य समागमाचा व अविवाहित स्त्रीपुरुषांतही स्वैर समागमाचा पुरस्कार करतांना आरोपीने कोणतेहि निर्बंध सांगितलेले नाहीत. आरोपीस त्यांची जरूर समजत नाही असें नाही. तो बुद्धिमान्, सुशिक्षित मनुष्य आहे. ५ वें कलम वाचतां सहज दिसतें की शक्य तितक्या बाबतींत मनुष्यास स्वातंत्र्य देऊन जेथें इलाज नसेल तेवढ्यापुरते नियम करावे, हें समंजस समाजाचें ध्येय असलें पाहिजे, हें त्यास कबूल आहे. आधुनिक नीतिनियमांप्रमाणें आपल्या वागणुकीमुळे कोणाचें नुकसान होतें की काय व तें करण्याचा आपणास हक्क पोंचतो की काय, हें पाहिलें पाहिजे हेंहि त्यास मान्य आहे. हें कबूल करूनहि पुढील ६ ते ११ कलमांत आधुनिक नीतिनियमांप्रमाणें समाजाच्या हक्कांच्या संरक्षणार्थ, व बापाचें व नवऱ्याचें नुकसान होऊं नये म्हणून व नुकसान करण्याचा आपणांस हक्क पोंचतो की काय हे पाहण्याकरतां त्याने नियम दिलेले नाहीत. भटांची युक्ति म्हणून पाहिजे तर विवाहसंस्थेवर हल्ला करावा, परंतु ती संस्था जोंपर्यंत आहे व विशेषतः हिंदूंत धार्मिक विधि म्हणून आहे, तोपर्यंत समाजाच्या सुव्यवस्थेकरतां कांही नियम व कायदे असलेच पाहिजेत हें कबूल केलें पाहिजे. ज्यांचें पटत नाहीं त्यांनी घटस्फोट करावा असें पाहिजे तर म्हणावें, अविवाहित मुलींनी स्वतःचा पति निवडावा असेंहि म्हणावें, किंवा आजन्म एकाच मनुष्यास चिकटून रहावयास नको असेल तर लग्न रजिष्टर करावें, असेंहि पाहिजे तर म्हणावें (हा कोर्टाचा गैरसमज आहे. धार्मिक विवाहाने पुरुषांस वैचित्र्य मिळतें, रजिस्टर करून मिळत नाही, कारण घटस्फोट मिळणें कोर्टाचे मर्जीवर राहतें, परंतु धर्माने पुष्कळ बायका करतां येतात. **सं.**), परंतु आरोपी यापैकी कांहीच करीत नाही. तो विवाहास निंद्य समजतो व ज्या स्त्रियांस वैचित्र्य पाहिजे असेल त्यांनी विवाहबाह्य समागम करण्यास हरकत नाही, कारण संततिनियमन व रोगप्रतिबंध

केल्यास रोगांची व इतरापासून मुलें होण्याची भीति रहात नाही, असें त्याचें म्हणणें आहे. (७ व्या कलमांतील सातव्या ओळीपासून शेवटपर्यंत, व ८ वें कलम पहा).

विवाहित स्त्रिया अशा रीतीने वागल्यास पतीचें नुकसान होत नाही असें लेखकास सत्याला स्मरून सांगतां येईल काय ? ९ व्या कलमांत अविवाहित स्त्रीपुरुषांचीहि त्याने तशीच गोष्ट केली आहे. आईबापांच्या निवडीप्रमाणे ज्यांस धार्मिक विवाह करणें नसेल त्यांनी रजिस्टर लग्न करावें असेंहि तो म्हणत नाही, परंतु उलट समागमाने हितच होतें, शास्त्रीय दृष्ट्या नुकसान होत नाही; तेव्हा व्यभिचार पाप आहे किंवा समागमाने बेअब्रू होते किंवा कौमार्य हा अविवाहित स्त्रियांचा मोठा गूण आहे, या कल्पना अविवाहित स्त्रीपुरुषांनी काढून टाकाव्या, असें तो म्हणतो. ९ व्या कलमाच्या शेवटच्या दोन ओळींत तो म्हणतो की समागम केव्हाहि व कोणाशींहि करणें हें पाप नाही अशी कल्पना रूढ झाल्यास समागमाचे वेळीं मन मोकळें राहील, व हें प्रकृतीचे दृष्टीने अत्यंत इष्ट असतें.

११ वें कलम म्हणजे तर सर्वांवर कळस आहे. आरोपी म्हणतो की समागम हें पाप आहे व फक्त भटांच्या बडबडीनेच त्या पापाला परवानगी मिळते ही वेडगळ धार्मिक कल्पना सोडून दिल्याने सर्वांचा सर्वतोपरी फायदा असून नुकसान कोणाचेंच नाही. कारण असें झाल्यास ज्यांस समागमवैचित्र्य पाहिजे असेल व मिळवतां येईल, त्यांस मनांत किंतु न बाळगतां त्याचा फायदा घेतां येईल, व पुढे म्हणतो की स्वेच्छेने पतिव्रता राहणाऱ्या स्त्रीचें पातिव्रत्य मोठा सद्गुण समजणें चूक आहे, व वेश्या स्वेच्छेनेच वागत असल्यामुळे तिची वेश्येशी तुलना करतो. आरोपीचा जबाब असा आहे की स्त्रीपुरुषसंबंध व सामाजिक आरोग्याचे बाबतींत समाजास शिक्षण देण्याचा त्याचा नेहमी उद्देश असतो व या लेखांत त्याने शास्त्रीयदृष्ट्या या गोष्टीचा विचार केला आहे. माझें मत आहे का एकंदर लेखाचा व ६ ते ११ या कलमांचा समाजावर व ज्यांचे हातांत हें पुस्तक पडेल त्यांचे मनावर वाईट परिणाम होईल. जस्टिस ब्लॅकबर्न यांनी या संबंधी म्हटलें

आहे की आपल्या मतांस जोर आणण्याकरता व आपला उद्देश सरळ आहे या सबबीवर सामाजिक नीतीविरुद्ध कांहीहि करावें व अश्लील लेख प्रसिद्ध करून ते शाळेंतील मुलांस किंवा इतर लोकांस वाटण्याची मोकळीक आहे असें कधीहि म्हणतां येणार नाही. शिवाय ज्या कृत्याचा जो परिणाम अपरिहार्य आहे तो तें करणाराचा उद्देश आहे असेंच समजलें पाहिजे. हें मासिक अमुक प्रकारच्या विशेष सुशिक्षित लोकांकरता आहे असें नाही. ज्याला वर्षाची दीड रुपया वर्गणी देतां येईल अशा कोणालाहि तें मिळेल. तें पुस्तकांच्या दुकानांत दोन आण्याला विकतहि मिळतें. याच अंकाच्या पाठीवर असें लिहिलें आहे की हें मासिक १५००० लोक वाचतात. यावरून तें बहुजनसमाजाकरता आहे असें सिद्ध होतें. वाचकांच्या या मोठ्या समूहांत अनीतिग्राहक असे कांहीतरी स्त्रीपुरुष असणारच, व त्यांचीं मनें या लेखाने नक्की बिघडणार. माझे मतें आरोपी अश्लील लेख प्रसिद्ध करून त्याचा प्रसार केल्याबद्दल २९२ कलमाखाली गुन्हेगार आहे. म्हणून त्यास वरील कलमाप्रमाणें दोषी ठरवण्यांत येत आहे. एकंदर परिस्थितीचा विचार करतां आरोपीस रु. १०० दंडाची शिक्षा फरमावली जात आहे. आरोपीकडून जप्त केलेल्या मासिकाच्या प्रती, त्यांतील वरील लेख फाडून टाकून, आरोपीस परत द्याव्या. लेखाची हस्तलिखित प्रत व छापखान्यांतील प्रुफही फाडून टाकावें.

सही, **आय. एन. मेहता.**

समाजस्वास्थ्याचा विजय

—:*०*:—

या अंकाबरोबर या मासिकास पांच वर्षें पुरीं झालीं. बहुजनसमाजास रुचेल तेंच लिहिण्याचें धोरण संभाळून देखील पुष्कळ मासिकांस इतकेंहि आयुष्य लाभत नाहीं, तेव्हां आमचे लेख लोकमतास नवीन वळण लावण्याचे हेतूने लिहिले असल्यामुळे ते लोकप्रिय होण्याचा संभव बराच कमी असूनहि हें मासिक

पांच वर्षें जीव घरून राहिलें, याबद्दल निदान आम्हाला तरी अभिमान वाटण्यास जागा आहे. नवमतप्रचार करणाऱ्या कोणत्याहि मनुष्यावर सामान्यतः जशीं संकटें येतात तशीं आमचेवरहि आलीं तर त्यांत मोठेंसें नवल नाही, तरी पण आमच्या वर्गणीदारांची संख्या आणि किरकोळ खपहि आरंभापासून आतापर्यंत एकसारखा वाढतच गेला आहे. वर्गणीदारांची संख्या आता ७५० झाली आहे व एकंदर प्रती २५०० निघातात. तथापि पैशाच्या दृष्टीने आमचें आजपर्यंत नुकसानच झालें आहे.

मासिकांच्या नेहमीच्या पद्धतीने आम्हीं जरी गाजावाजा केला नाही, तरी वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की फेब्रुआरीचे अंकापासून प्रत्येक अंकाची पृष्ठसंख्या २४ चे ऐवजीं २८ केली आहे व त्याकरता वर्गणींत किंवा किमतींत कोणताहि फरक केलेला नाही. जास्त लोकाश्रय मिळाल्यास ही पृष्ठसंख्या तितक्याच किंमतींत आणखी वाढवतां येईल अशी आशा आहे.

आमचे खटल्याची हकीकत वाचकांनी वाचलीच आहे. हें मासिक चार वर्षें चालल्यावर कांही पुणेरी सनातनी खडबडून जागे झाले व त्यांनी आमचे 'विरुद्ध चर्चा' (याचा अर्थ काय होत असेल तो असो !) करण्याकरता एक संस्था काढली. अर्थात लोकप्रियता हेंच प्रथमपासून **केसरी** पत्राचें ध्येय असल्यामुळे त्यानें त्यांस पाठिंबा देण्याकरतां आमचेविरुद्ध एक लेख छापला व आम्हीं त्यास उत्तर पाठवलें असतां तें छापण्याचें नाकारलें. पुण्याचे **आहिताग्नि राजवाडे** यांनी आमचे विरुद्ध साक्ष दिली. हे लोक आमचे विरुद्ध कां, याचें कारण कोणासहि सहज समजण्यासारखें आहे. भटांचें महत्व आम्हांस बिलकूल वाटत नाही व हें आम्हीं वेळोवेळीं स्पष्ट लिहिलें आहे, तेव्हां ते आमचे विरुद्ध असणारच, कारण त्यांत धंद्याचा प्रश्न आला. **आहिताग्नि राजवाड्यांनी** कोर्टांतच कबूल केलें की धार्मिक प्रवचनें करणें हा त्यांचा धंदा आहे, तेव्हां त्यांसहि तेंच कारण लागू होतें. आता त्यांनीं कोर्टांत सांगितलें की 'मी जुन्या मताचा ब्राह्मण आहे,' आणि असें असूनहि त्यांची स्वतःची मुलगी पुणें येथील महिलाविद्यापीठाची पदवीधर असून

तिचें लग्नहि त्यांनी बऱ्याच उशिरां केलें असें समजतें, तेव्हा पुराणांतल्या वांग्यां-प्रमाणें या गृहस्थांचीं जुनीं मतेंहि प्रवचनांपुरतींच आहेत हें स्पष्ट आहे. केसरी-कारांची गोष्टही तशाच प्रकारची आहे, कारण ते स्वैरसमागमाच्या विरुद्ध आहेत असें म्हणतात मात्र, परंतु त्याचे परिणाम लपवण्यास ते मदत करतात. हें कोणास खरें न वाटल्यास त्यांनी गेल्या दिसेंबरमधील केसरीचे कांही अंक पाहिल्यास त्यांना पहिल्याच पानावर एका नर्सची फोटोसह जाहिरात सांपडेल, आणि त्यांत पुढील शब्द आहेत. 'गरजू कुलीन व संकटग्रस्त (विधवा वगैरेहि) स्त्रियांकरतां बाळंतपणाची उत्कृष्ट व्यवस्था!' केसरीकारांचें म्हणणें असें की स्वैरसमागमाला परवानगी असावी असें म्हटल्यास तें अश्लील आहे. परंतु विधवा किंवा कुमारिका गरोदर झाल्यास ही गोष्ट लपवून ठेवून समाजास फसवण्यास आम्ही स्वतः मदत करूं. अर्थात स्वैर समागमास समाजाची परवानगी मिळाल्यास त्यांत कांही चोरी राहणार नाही, व अशा नर्सांच्या जाहिरातींचीहि जरूर राहणार नाही. तेव्हा केसरीकार आमचे विरुद्ध असले तरी तेंहि क्षम्यच आहे. आमच्या लिहिण्याने या सर्व लोकांचे पोटावर पाय येतो हें खरें आहे व त्याबद्दल आम्हाला अत्यंत दिलगिरी वाटते. पण काय करणार ? आमचे मताने समाजहिताकरता आम्हीं स्वतः नुकसान सोसून लोकांच्या शिव्या खाऊनहि प्रचाराचे काम चालवलें आहे, तेव्हा त्यांत आणखी कांही लोकांचें अपरिहार्य रीतीने नुकसान होत असेल तर त्याला इलाज काय ? कोणतीहि नवीन गोष्ट समाजांत सुरू झाली की त्यांत कांहींचें नुकसान होणारच. म्हणून कोणतीहि नवीन गोष्ट होतांच कामा नये असें कोणी समंजस मनुष्य म्हणेल काय ?

या खटल्यांत आम्हास रु. १०० दंड झालेला पाहून अर्थातच आमचे कांही शत्रु जघनदुंदुभि झाले आहेंत. केसरीच्या नांवाच्या गतवैभवावर विकूं पाहणारे **वीरशैवकेसरी** नांवाचें एक पिल्लूं आहे, त्यानेहि आमच्यावर तोंड-सुख घेतलें आहे. भालाकारांनी आपणास हिंदु म्हणावें एतदर्थ ज्यांचे दर अंकांत बरेच रकाने खर्च होतात, त्यांना आमची मतें समजतील अशी अपेक्षाच नव्हती.

कारण त्याकरतां विचार करावा लागतो, आणि धार्मिक लोकांस विचाराची परवानगी नसते. **बालबोध**कारांना लहान मुलांस उपदेश करण्याची संवय लागल्यामुळें ते पोक्तपणाने आम्हासही उपदेश करूं पाहतात, परंतु आपण काय लिहितों व त्याचा कांही अर्थ होतो की काय, यासंबंधी त्यांनी विचार केलेला नाही, अर्थात लोकप्रियतेचा सोपा मार्ग म्हणून त्यांनी तसें लिहिलें असल्यास गोष्ट वेगळी. ते म्हणतात की आमची मते लोकांपुढे मांडताना आम्ही कायद्याची मर्यादा उल्लंघन करूं नये, परंतु मर्यादा उल्लंघन करण्यापूर्वी ती मर्यादा आंखलेली असावी लागते हें त्यांस कळूं नये काय ? अश्लीलतेच्या कायद्यांत अश्लीलतेची व्याख्या नाही. तेव्हा ती मर्यादा आंखलेली नाही. कायदा इतकेंच सांगतो की आमची लहर लागेल तेव्हा तुम्ही जितके चाललां असाल त्याचे अलीकडे ती मर्यादा आम्ही आंखूं आणि तुम्हाला गुन्हेगार ठरवून शिक्षा करूं. जी मर्यादा आंखलेली नाही ती उल्लंघन करणेंहि शक्य नाही. कोणताहि लेख कोर्टांत अश्लील ठरेपर्यंत तो अश्लील नसतो. वास्तविक पाहतां अश्लिलतेच्या कायद्याला कायदाच म्हणतां येणार नाही, तो अरेरावीपणा आहे.

आम्ही हायकोर्टाकडे अर्ज केलाच आहे, परंतु त्याचा निकाल काहीहि झाला तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं आमचीं मतें आमचे शत्रूंस युक्तिवादाने खोडून काढतां आलेली नाहीत व यामुळेच त्यांस आमचा पाडाव करण्याकरता मायबापसरकारचे पाय धरून कायद्याच्या पाशवी शक्तीचा आश्रय घ्यावा लागलेला आहे, आणि तो कायदा म्हणजेहि कायद्याचा अभाव आहे. हा आमचा विजय नाही असें कोण म्हणेल ?

थंड पेयें

—=:*:=—

उन्हाळ्यांत थंड पेयें पिण्याची चाल कित्येक शतकें जुनी आहे, इतकेंच नव्हे तर बर्फ घातलेल्या पेयांची संवय लागल्यास तीं थंडीचे दिवसांतहि प्यावींशीं

वाटतात. बर्फ तयार करण्याची युक्ति फार जुनी नाही, परंतु ज्या देशांत बर्फ आकाशांतून पडतें, तेथे त्याचा उपयोग पुरातन कालापासून लोक करीत आले आहेत. रोमन लोक हिंवाळ्यांत पडलेल्या बर्फाचे प्रचंड डोंगर करून ठेवीत व ते त्यांस उन्हाळ्यांतहि पुरत असत. अर्थात हें फक्त विशेष श्रीमंतांसच शक्य असे. तेव्हां बर्फ घातलेलें पेय उन्हाळ्यांत फक्त लक्षाधीशांसच मिळत असे, परंतु आतां कृत्रिम बर्फ करूं लागल्यापासून तें गरिबांसहि मिळतें. तेव्हां श्रीमंतांची एक ऐट आपोआप कमी झाली.

थंड पेयांची आवड श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत पोंचण्यास वेळ लागला नाही. व्यापारी त्याच रीतीने त्याचें संरक्षण करून ते बाजारांत विकूं लागले. आणि आता कृत्रिम बर्फ झाल्यावर तर त्याची संवय झालेल्या माणसाला तें नसणें म्हणजे भयंकर आपत्ति वाटते.

परंतु बर्फ घातलेलें पेय खरोखरच प्रकृतीचे दृष्टीने चांगलें असतें काय? ओकारी येत असेल तर बर्फाने ती थांबणें शक्य असतें ही गोष्ट वेगळी. येथे आपल्याला निरोगी माणसांचा विचार करायचा आहे. त्यांना आजारी पडायची इच्छा नसते, पण सुख शक्य तितकें मिळावें असें वाटतें, आणि त्यांत कांही वावगेंहि नाही. तेव्हां अर्थातच उन्हाळ्यांत त्यांना थंड पेयें प्यावींशीं वाटतात, व त्यांनी तात्पुरतें बरें वाटतें यांत शंका नाही. पण त्यांचा खरोखर उपयोग होतो काय? याचा विचार करूं.

समजा आपण घरीं किंवा बाहेर सावलींत स्वस्थ बसलों आहोंत आणि उष्मा अतिशय होतो आहे. अशा वेळीं जर आपण गरम पाणी प्यालों तर आपल्याला थोडा घाम येतो आणि या घामाची वाफ होऊन जाते, परंतु वाफ होण्याकरता त्याला ज्या उष्णतेची जरूर असते ती आपल्या त्वचेंतून गेल्यामुळे त्वचा थंड होते. म्हणजे गरम पेयाचा परिणाम थंड होतो हें उघड आहे.

नंतर अशी कल्पना करूं की खूप व्यायाम केल्याने किंवा उन्हांत उभें राहिल्याने आपण थकलों आहों व आपणांस खूप घाम आला आहे. अंगांतून

बरेंच पाणी कमी झाल्यामुळे शरीराला पाण्याची जरूरी आहे. हें पाणी जेव्हा शरीराला मिळेल तेव्हाच तहान भागेल. मग काय, एखादें गरम पेय तयार करी-पर्यंत वाट पाहून तें सावकाशपणें पीत बसायचें? त्यांत कांही मौजहि नाही, आणि तेंही शरीराशीं एकजीव व्हायला कांहीतरी वेळ लागणारच! इतका विचार करून वाट पहायला धीर किती लोकांना असतो? अशा वेळीं एखादें बर्फ घातलेलें पेय पिण्याचा मोह पुष्कळांना आवरत नाही. आणि तें पितांना घशाला काय सुख होतें आहे म्हणतां! पण काय? तें संपल्याबरोबर पुन्हां घशाची आग होऊं लागते, आणि तें शरीरांत भिनेपर्यंत तहान शांत होत नाही.

पण पाणी गरम असेल तर कितीतरी लवकर शरीरांत मुरतें! कितीतरी लवकर म्हणजे किती? १०४ डिग्रीचें गरम पाणी २० औंस प्याल्यास अन्नाशयांत ७–८ मिनिटांचे वर रहात नाही, आणि आणखी ७–८ मिनिटांत तें आंतड्यांतून शरीरांत शोषलें जातें. परंतु तेंच पाणी जर गार असेल तर १५ मिनिटें अन्नाशयाचे बाहेर पडत नाही, व तें शरीरात शोषलें जाण्यास आणखी १५ मिनिटें लागतात. हें सर्व प्रयोग करून ठरवलेलें आहे. यावरून गरम पेयांनीच तहान लवकर भागते हें उघड आहे.

गार पेयांविरुद्ध आणखी पुष्कळ मुद्दे आहेत. त्यांत घातलेल्या बर्फाला ज्याचे हात लागतील, तो निरोगी असून त्याचे हात अत्यंत स्वच्छ असल्यास गोष्ट वेगळी, परंतु पुष्कळ वेळा बर्फ घालणाराला शास्त्रीय स्वच्छतेची कल्पनाहि नसते, व कॉलरा, टायफॉइड् वगैरे आंतड्यांचे रोग या मार्गाने पसरतात, व ज्या पाण्याचें बर्फ करतात तेंहि जंतुरहित असल्यास नशीबच. कारण बर्फाने जंतु मरत नाहीत व पोटांतील उष्णतेने त्यांची झपाट्याने वाढ होते. जंतुरहित पाण्यापासुन बर्फ केलें पाहिजे व करतात ही गोष्ट खरी, पण बर्फाचे इतर पुष्कळ उपयोग असल्यामुळे सर्वच बर्फ अशा रीतीने करीत नाहीत व घाणेरडें बर्फ स्वस्त पडल्यामुळे नफ्याकडे दृष्टी देवून तें पेयांत घालण्यास कांही लोक कमी करीत नाहीत. आणि तें कारखान्यांतून कितीहि स्वच्छ बाहेर पडलें तरी पेयांत पडेपर्यंत तें स्वच्छ

राहण्याचा संभव फारच कमी असतो.

कोणी म्हणेल की पाणी गार करण्याकरता त्यांत बर्फच घातला पाहिजे असें नाही त्यास बाहेरून वर्फ लावला म्हणजे झालें. आईसक्रीम नाही का असेंच तयार करीत ? मग तसें करायला काय हरकत आहे ? बर्फ घालण्यापेक्षा हें वरें खरें, परंतु एकंदरींत गार पेयांपासून कधी कधी मोठा धोका असतो यांत शंका नाही, व विशेषतः पोट रिकामें असतां आणि शरीर घामाने भिजलें असतां एकदम पुष्कळ गार पाणी ढोसण्यांत विशेष धोका आहे. तो इतका की यामुळे लोक मेल्याची उदाहरणें आहेत.

आमचा हायकोर्टांत अर्ज

—*o*—

आमच्या खटल्याची फेरतपासणी करण्याकरता आम्ही जूनचे ६ तारखेस हायकोर्टाकडे अर्ज दिला होता, त्याचा विचार व्हावा की नाही हें ठरवण्याकरतां तो जून १३ तारखेस बार्ली आणि वाडिया या जज्जांसमोर सुनावणीस निघाला होता. या अर्जासंबंधीं हायकोर्टाची अशी पद्धत आहे की मॅजिस्ट्रेटाचा निकाल बरोबर आहे की नाही हें हायकोर्ट पहात नाही, तो कायदेशीर रीतीने दिला की नाही हें पाहतें. यामुळे जर एखादा चुकीचा निकाल कायदेशीर रीतीने दिलेला असला तर तो वज्रलेप होतो व त्याविरुद्ध कांही करतां येत नाही. आमचे खटल्याचा निकाल आमचे मतें चुकीचा होता, परंतु हायकोर्टाचे मतें त्यांत कायद्याचे दृष्टीने चुक नव्हती असें ठरल्यामुळे त्यांनी अर्ज विचारांत घेण्याचें नाकारलें. या पद्धतीने न्याय मिळतो असें आम्हास वाटत नाही, परंतु चालू पद्धत अशी आहे.

वरील अर्ज देण्यापूर्वी आम्हास एक बॅरिस्टर भेटले होते, तेव्हा ते म्हणाले, 'आपण हायकोर्टाकडे अर्ज करतां आहांत, पण संभाळा, हायकोर्ट जज्ज बहुधा म्हातारे असतात, त्यांना नवीन मतें पटणें शक्य नसतें, शिवाय त्यांनाहि

बायकामुलें असतात, लग्नाच्या मुलीही असतात, त्यांनी जर तुमच्या बाजूने निकाल दिला तर त्यांच्या मुलींचीं लग्नें कशीं होतील ? माझ्या मतें तुम्हांला थोडा दंड झाला आहे, तेव्हां आपण होऊन अंगावर संकट कां ओढून घेतां ? एखादा हायकोर्ट जज्ज तुमची शिक्षा वाढवील, निदान वाढवण्याचा चांगलाच संभव आहे.' हायकोर्टाने आमचा अर्जच काढून टाकल्यामुळे सदरहू बॅरिस्टरचें म्हणणें खोटें ठरलें.

निकालासंबंधी दोन शब्द

—*०*—

गेल्या मेच्या अंकांत मॅजिस्ट्रेटचा निकाल दिलाच आहे, तो वाचून कित्येकांचा कांही बाबतींत गैरसमज होण्याचा संभव आहे, याकरता थोडें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. इंग्लंदांत कॉकबर्नने जी अश्लीलतेची कसोटी दिली, त्यामुळे अश्लीलता या शब्दाचा अर्थच बदलून गेलेला आहे आणि हल्ली मॅजिस्ट्रेटास पसंत नसलेलीं मतें म्हणजेच अश्लीलता, असाच अर्थ झाला आहे. ही कसोटी इतकी विक्षिप्त आहे की तींतून आगगाडीच्या वेळापत्रकासारखीं कांही पुस्तकें कदाचित सुटतील, परंतु इतर कोणताहि लेख त्यांत सापडेल. यामुळे जें मॅजिस्ट्रेटांस पसंत नसेल तें त्यांस खुशाल अश्लील म्हणतां येतें. तथापि निकाला-संबंधी पुढील गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत.

१. कांही शब्दप्रयोग खेरीज करून लेखांत अश्लील शब्द नाहीत, असें फिर्यादीचें मत निकालांत मोघम सांगितलें आहे यावरून आम्हीं कांहीं अश्लील शब्द वापरलेले आहेत असा गैरसमज होण्याचा संभव आहे. फिर्यादीने अश्लील म्हटलेले शब्द म्हणजे 'वापरलेला माल' व 'स्वैरिणी हे होत. 'वापरलेला माल' यांत अश्लील काय आहे हें आम्हांस अजून समजत नाहीं, व 'स्वैरिणी' या शब्दाचा अर्थ आम्ही 'स्वतःच्या मनाप्रमाणे वागणारी' असा दिला आहे,

त्यांतहि आम्हांस कांही अश्लील दिसत नाही. **हॅवलॉक् एलिस्** यांनी एके ठिकाणी असें म्हटलें आहे की एकदा नेसलेलें वस्त्र ज्याप्रमाणे 'वापरलेला माल' होतो, त्याचप्रमाणे कौमार्याचा भंग झाल्यास स्त्रीहि 'वापरलेला माल' होते. 'स्वैरिणी' हा शब्द अश्लील म्हणण्याचें कारण तो शब्द उच्चारल्याबरोबर सरकारी वकील रा. मानकर यांच्या मनांत अत्यंत अश्लील कल्पना आल्याचें त्यांनी सांगितलें. याला आमचा काय इलाज ?

२. लेखाची भाषा सभ्य असल्याचें आमचे साक्षीदार रा. सरदेसाई यांनी सांगितलें, त्यावर विद्वान मॅजिस्ट्रेट म्हणतात की श्रीकृष्ण, कुंती, पांडव यांच्यासारख्या पूज्य व्यक्तींची निंदा करण्यांत सभ्यता नाही, आणि वात्स्यायनाचे ग्रंथांतून स्त्रियांस कशा वश कराव्या हा भाग उद्धृत करण्यांतहि सभ्यता नाही. आमचे मतें कोणाचीहि निंदा अत्यंत सभ्य भाषेंत करतां येईल ही एक गोष्ट, आणि आम्ही या व्यक्तींची निंदा केलीच नाही हा दुसरी गोष्ट. त्या व्यक्तींची वागणूक अनुकरणीय आहे असें म्हणणें, ही निंदा कशी होते ? वात्स्यायनाचे ग्रंथांत वश करण्याची पद्धत सांगितली आहे इतकेंच आम्हीं म्हटलें आहे, ती पद्धत आम्हीं दिलेली नाही, हें वात्स्यायनाचा ग्रंथ वाचणारांस समजेल.

३. सॉव्हिएट रशियासंबंधी कोर्टांची माहिती चुकीची आहे हें आम्हीं पूर्वीच सांगितलें आहे. एकत्र राहणारें जोडपें विवाहित असो किंवा अविवाहित असो, त्यांत कायद्याने बिलकुल फरक नाही, असें रशियांतील कायदा स्पष्ट म्हणतो. **नॉर्मन् हेअर** हे तर अविवाहित स्त्रीपुरुषांच्या समागमाचा पुरस्कार करतात असें निकालांतच सांगितलें आहे, तेव्हा यासंबंधी जास्त लिहिण्याचें कारण दिसत नाही. **बरट्रँड रसेल**चीं मतें या अंकांत दिलीं आहेत त्यावरून तीं आमचेपेक्षा कमी क्रांतिकारक आहेत असें दिसत नाही.

४. वरील दोन्ही लेखकांनी विवाहासंबंधी लिहून त्यांत संबंध येईल तेवढ्यापुरताच व्यभिचार वगैरेचा विचार केला आहे, व आम्हीं मुख्यतः व्यभिचाराचा विचार करून विवाहाचा केला नाही, हा आमचा दोष कसा होतो तें

आम्हांस अजूनहि समजत नाही. आम्ही कोणत्या विषयावर लिहावयाचें ही आमच्या मर्जीची गोष्ट आहे, व त्यांच्या मतांनीहि आम्ही बांधलेले नाही.

५. 'कृष्ण, राधा आणि गोपी यांच्या शृंगारचेष्टा अश्लील नाहीत, कारण या व्यक्ति दैवी आहेत.' गोपी देखील देवता होत्या हें आम्ही आजच ऐकतों. मग आम्हीच काय पाप केलें आहे? प्रत्येकाच्या अंगीं ईश्वरी अंश असतोच, तो आमचे मधेहि असला पाहिजे!

६. वात्स्यायनांतील परस्त्रीवशीकरणासंबंधी माहिती आम्ही दिलेली नाही, कामसूत्रांत अमूक माहिती आहे इतकेंच सांगितलें आहे. तरी देखील आमचा हा लेख लिहिण्यांत वाईट हेतु असला पाहिजे, असें मॅजिस्ट्रेट ठरवतात. ते मॅजिस्ट्रेट असल्यामुळे त्यांस पाहिजे तें बोलण्याचा अधिकारच आहे, परंतु आम्हांस येथे पुन्हा सांगणें जरूर वाटतें की सर्वत्र बेकारी पसरली असतांहि जो मनुष्य स्वमतप्रचारार्थ प्रोफेसराची सुखाची नोकरी सोडून देतो व कांही दिवस बेकार राहून नंतर एक भिकारडी नोकरी मिळाल्याबरोबर पुन्हा मतप्रचार सुरू करतो, त्याचा हेतु वाईट आहे असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाही.

७. आमचे लेखांत स्वैरसमागमाचा पुरस्कार केलेला होता हें खरें, परंतु त्याचा अर्थ त्याच लेखांत स्पष्ट सांगितला आहे. सर्वांत उच्च प्रकारचा समागम म्हणजे तो प्रेममूलक असला पाहिजे, व कांही झालें तरी तो दोघांच्या संमतीने झालेला असावा, असें अनेक वेळां सांगितल्यावरहि त्याचा अर्थ पाहिजे त्याचा पाहिजे त्याशीं समागम असा निकालांत केला आहे. विवाहित स्त्रीवर बळजबरी करण्याचा हक्क पतीस धर्माने व कायद्याने मिळतो, ही आमचे मतें अत्यंत किळसवाणी गोष्ट आहे, व अश्लील जर कांही असेल तर हें आहे, असें आमचें मत अजूनहि कायम आहे.

८. आमचे लेखांत केवळ तात्त्विक चर्चा आहे, समाजाचा दृष्टिकोण या बाबतींत बदलल्यास त्यापासून कसे फायदे होतील तें त्यांत सांगितलें आहे. व्यभिचार करावा असें सांगितलेलें नाही, इतकेंच नाही तर 'ज्या स्त्रियांस पतिव्रता

राहणें असेल त्यांस कोणीही नको म्हणत नाही, ' असें स्पष्ट वाक्य आहे. शिवाय लेखांतील युक्तिवाद जरी कोणास पटला तरीहि सामाजिक निर्बंधांचा परिणाम अशा लेखाने नाहीसा होणें शक्य आहे काय ? समाजांत सर्वत्र व्यभिचार अगोदरच पसलेला आहे, तेव्हा या लेखाने तो वाढणें जवळजवळ अशक्यच आहे, व चालू असलेला व्याभिचार आमचे लेखामुळे लोक उघड कबूल करतील हेंहि अशक्य आहे. वास्तविक पाहतां आम्हीं व्यभिचाराची व्याख्या दिली आहे, त्यांतील बहुतेक भाग हल्ली हिंदु व मुसलमान धर्मांस व कायद्यास मान्यच आहे. कारण विवाहित स्त्रीशीं संबंध नसेल तर व्यभिचारास परवानगीच आहे. विवाहित पुरुषाने रखेली ठेवणें म्हणजे आमचे व्याख्येप्रमाणे व्याभिचार आहे, परंतु त्याला कायद्याची किंवा धर्माची हरकत नाही. आम्ही जी व्यभिचाराची व्यापक व्याख्या दिली आहे, त्यांतील फक्त एकाच प्रकाराला गुन्हा कां समजावा व बाकीच्यांस परवानगी कां असावी हें आमच्या कोत्या बुद्धीला अजूनहि कळत नाही, मग त्यांत कायद्याचें काय गूढ तत्त्व असेल तें असो !

९. हा कायदा म्हणजे अेरेावी आहे हें आम्हीं पूर्वीच म्हटलें आहे. ' अश्लील म्हणजे काय हें आम्ही अगोदर सांगणार नाही, व आमची लहर लागेल तेव्हा आम्ही तुम्हांला अश्लील म्हणूं आणि शिक्षा करूं, ' असा हा कायदा आहे यामुळे मॅजिस्ट्रेटांस पसंत नसलेलीं कोणतीहि मतें त्यांस अश्लील ठरवतां येतात. यावरून हें सहज दिसतें की आम्हांस जी शिक्षा झाली ती आमचीं मतें मॅजिस्ट्रेटांस पसंत नसल्यामुळे झाली, **म्हणजे त्यांचीं मतें आमचेपेक्षा भिन्न असल्यामुळे आम्हांस शिक्षा झाली, आमचे चुकीमुळे नव्हे,** कारण आमचीं मतें मॅजिस्ट्रेटचे मतांपेक्षा भिन्न असतां कामा नये, असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार नाही, व आमचे मताचा एखादा मॅजिस्ट्रेट असता तर त्याने लेख अश्लील ठरवला नसता.

१०. ही मॅजिस्ट्रेटची चूक आहे असें आम्ही म्हणत नाही, कारण काय-

द्यानें मूर्खपणाने दिलेला हक्क त्यांनी गाजविला इतकेंच. समंजस लोकांस इतकेंच पाहिलें पाहिजे की **मॅजिस्ट्रेटचे मतांमुळे इतरांस शिक्षा होणें इष्ट आहे की काय ?** व ज्या कायद्याने अशी शिक्षा होऊं शकते, तो कायदा समंजस आहे की काय ? असे कायदे सर्व जगांत आहेत, व 'लैंगिक सुधारणेचा जगत्संघ' हे कायदे रद्द करण्याचा प्रयत्न सर्व देशांत करीत आहे.

अश्लीलतेचे कायदे

—*०*—

या विषयावर ६ डिसेंबर १९३१ रोजी येथील **रॅशनालिस्ट ॲसोसिएशन् ऑफ इंडिया** चे आश्रयाखाली आम्हीं एक व्याख्यान दिलें होतें, त्याचा सारांश पुढें दिला आहे. मध्यंतरी आमचेवर अश्लीलतेसंबंधी खटला झाल्यामुळे तो आतापर्यंत देतां आला नाहीः—

सर्व देशांतील अश्लीलतेचे कायदे अत्यंत अन्यायाचे आहेत, त्या कायद्यांचा दुरुपयोग होण्याचा संभव फार असतो आणि त्यांनी कोणासहि उपयोग होत नसून नुकसान मात्र होतें.

लिंगसुधारणेच्या जगत्संघानें १९२९ सालीं लंडन येथे भरलेल्या परिषदेंत पुढील ठराव पास केला आहेः—'**लिंग आणि नियंत्रण.** अश्लीलता आणि अनौचित्य या कल्पना इतक्या वैयक्तिक आहेत की त्यांवर कायद्याची उभारणी करणें योग्य नाही. मनुष्याला असें शिक्षण दिलें पाहिजे की त्याला सर्व प्रकारचें ज्ञान मिळवतां यावें आणि कोणते विषय अश्लील म्हणून सोडून द्यायचे हें त्यास व्यक्तिशः ठरवतां यावें. वाङ्मयाच्या व कलेच्या बाबतींत मतांतर अतिशय असतें आणि नियंत्रणाच्या किंवा खटले करण्याच्या कोणत्याहि पद्धतीने, कलेच्या किंवा ज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाच्या कृति अश्लील ठरतात. या मुद्द्यावर वाङ्मय, शास्त्रीय ग्रंथ, चित्रें किंवा इतर बाबतींत लिंगसंबंधी नियंत्रणात्मक कोणत्याहि कायद्यास

आम्ही विरोध करतों. या दिशेने पहिलें पाऊल म्हणून आमची अशी मागणी आहे की नियंत्रणाचा अधिकार केवळ मॅजिस्ट्रेटांसच असूं नये. वैद्यक, मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि कला, यांतील तज्ज्ञांची साक्ष आपले तर्फे आणण्याचा हक्क आरोपीस असावा (असा हक्क कांही देशांत नाही), आणि वरिष्ठ कोर्टाकडे अपील करण्याचा व जूरीचा हक्कही असावा

वरील संघांत आर्नोल्ड बेनेट, डॉ. हॅवलॉक एलिस, डॉ. फॉरेल, प्रो. फ्रॉइड, प्रो. पॅट्रिक गेडिस, डॉ. मॅग्नुस हिर्शफेल्ड, जज्ज बेन लिंडसे, व्हिक्टर मार्गारित, डॉ. रॉबिनसन, बरट्रँड रसेल, बर्नार्ड शॉ, एच. जी. वेल्स, प्रो. वेस्टरमार्क वैगेरेसारखे जगन्मान्य विद्वान् आहेत हें लक्षांत घेतां वरील ठरावाचें महत्व दिसून येईल.

अश्लीलतेची स्पष्ट व्याख्या अजुनपर्यंत कोणींहि दिलेली नाही, आणि तरीहि कायद्याने तो गुन्हा आहे. हा कायद्याच्या मूलतत्त्वाचा खून आहे. ज्या व्याख्या निरनिराळ्या लोकांनी दिलेल्या आहेत त्या इतक्या हास्यास्पद आहेत की त्यांचा विचारहि करण्यांत अर्थ नाहीं. याचा परिणाम असा होतो की मॅजिस्ट्रेटास एखाद्याचा चेहरा आवडला नाही म्हणून देखील त्याने त्याला खुशाल अश्लील म्हणावें, अर्थात हें कारण सांगितलें नाही म्हणजे झालें. वरिष्ट कोर्टाकडे अपील केलें तर तेथेहि त्याच कारणाने शिक्षा कायम होण्याचा किंवा वाढण्याचा संभव.

असे बेअकली कायदे करणाऱ्या देशांचेच प्रतिनिधि राष्ट्रसंघांत असल्यामुळे त्यांनीहि तेंच केलें आहे आणि अश्लील वाङ्मय आणि चित्रांचा प्रसार थांबवण्याचें काम निरनिराळ्या देशांतील कस्टमच्या अधिकाऱ्यांवर सोंपवलें आहे. झोला, व्हॉलटेअर, रूसो, व्हिक्टर ह्यूगो यांसारख्या जगद्विख्यात लेखकांना ज्या मॅजिस्ट्रेटांनी अश्लील ठरवलें त्यांचें नांवहि कधी कोणाला ऐकूं येत नाहीं. अमेरिकेंत व आयर्लंदांत संततिनियमनावरील पुस्तकें अश्लील समजतात आणि फ्रान्समधे तर या विषयावर व्याख्यानाचीं हस्तपत्रकें वांटणाराला अश्लीतेबद्दल शिक्षा झाली होती.

अश्लीलता याचा अर्थ तरी काय ? नग्नता अश्लील आहे काय ? मनुष्य हा

एकच प्राणी अश्लील असतो असें दिसतें, कारण इतर प्राणी नागवे हिंडतात व त्याचें कोणाला कांही वाटत नाही. सेंट क्लेमंट् नांवाचा ख्रिस्ती साधू एकदा म्हणाला की शरीराचे जे भाग उत्पन्न करायला ईश्वराला लाज वाटली नाही, त्यांच्या नांवांची मला कां लाज वाटावी ? साधूंच्या मानाने त्याला बरीच अक्कल होती.

ब्रिटिश अंमलाप्रमाणेंच अश्लीलतेची कल्पना हिंदुस्थानांत परदेशांतून आलेली आहे. जेथें नग्न साधूंच्या मिरवणुकी निघतात तेथील ही कल्पना मूळची असणें शक्य नाही. अलीकडे मात्र या विलायती नखऱ्यांत भूषण मानणारा एक सुशिक्षितांचा वर्ग हिंदुस्थानांत तयार झालेला आहे. यामुळेच **ओलेती**च्या चित्रावर वाद माजला; यामुळेच मुंबईंतील कांही डॉक्टरणी पुरुषांस औषध देत नाहीत; यामुळेच पुण्यांतील कांही नर्सा पुरुष रोग्यांची सर्व शुश्रूषा करीत नाहीत; यामुळेच स्वतःस शिष्ट समजणारीं वर्तमानपत्रें व मासिकें संततिनियमनासंबंधी जाहिराती घेत नाहीत.

फ्रेंच लोक विषयासक्त आहेत असा एक समज इंग्रजांनी पसरलेला आहे. इंग्रज व अमेरिकन लोक ज्यांनी पॅरिसमधे पाहिले आहेत त्यांचें मत असें होणार नाही. फ्रेंच लेखक इंग्रज लेखकांपेक्षा अधिक पुढारलेले आहेत व त्यांस खोटी लज्जा कमी आहे. हें लक्षांत घेतां 'अश्लीलता' या नवीन गुन्ह्याचा शोध प्रथम फ्रान्समधे लागला याचें आश्चर्य वाटतें. ज्या राज्यक्रांतीमुळे फ्रेंच लोकांना स्वातंत्र्य मिळालें असा समज आहे, तीनंतर लवकरच अश्लीलतेचा पहिला कायदा झाला. त्यापूर्वी फ्रेंच कायदा प्राचीन रोमन कायद्यावर रचिला असल्यामुळे त्यांत हा गुन्हा नव्हता आणि धर्माविरुद्ध किंवा सरकारविरुद्ध न लिहिल्यास पाहिजे तें लिहिण्याची मुभा होती. यानंतर फ्रेंचांचें अनुकरण इतर लोकांनीहि केलें. फ्रान्समधे पहिला कायदा १७९१सालीं झाला. त्यांतहि या सर्व कायद्यांचा मुख्य दोष म्हणजे व्याख्येचा अभाव होताच, यामुळे रॉबेस्प्येरसारख्या लोकांनी त्याला विरोध केला होता, परंतु तो पास झाला आणि तो पुढे अधिकाधिक कडक होत गेला. या

कायद्याखाली पोलीसकोर्टाला अधिकार असे व त्यावर अपील नसे. हल्ली पुष्कळ देशांत कोणतेहि लेख किंवा वस्तु अश्लीलतेच्या सबबीवर पोलिसाला जप्त करतां येतात आणि या वस्तु पुष्कळ वेळां त्यांच्या खाजगी पेटींत जातात.

हे कायदे करणारे व त्यांचा अर्थ करणारे लोक स्वतः कशा प्रकारचे होते? फ्रान्समध्ये १९०४ सालीं रुव्हिए नांवाच्या मंत्र्याने अशा एका कायद्याचा पुरस्कार केला, परंतु त्याच मनुष्यावर १८७६ साली अश्लील वाग्णुकीबद्दल खटला झालेला होता आणि केवळ वजनदार वशिल्यामुळे त्याला जज्जाने संशयाचा फायदा दिला होता. इंग्लंडांत व येथेहि आज कायद्याचा जो अर्थ केला जातो, तो चीफ जस्टिज् कॉकबर्न यांनी प्रथम सांगितला, व हा गृहस्थ जरी मोठमोठ्या हुद्याच्या जागांवर नेमला गेला, तरी त्याची खासगी वर्तणूक त्यांस साजेशी नव्हती. अर्थात खाजगी वर्तणूक लपवण्याकरता त्याला नीतिबाजी करावी लागत असे व वरील कायद्याचा अर्थ हा त्याचाच एक भाग आहे. हा अर्थ खरोखर कोणीच लावीत नाही, परंतु तो लावल्यास सर्व नांवाजलेल्या कवींचीं काव्यें तर अश्लील ठरतीलच, परंतु टेलिफोन डायरेक्टरीखेरीज करून कोणताहि ग्रंथ अश्लील ठरवतां येईल, असें रूबेन्स्टाइन यांनी लिहिलें आहे.

अश्लीलतेची व्याख्या देण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केलेला आहे व त्या सर्व एकापेक्षा एक हास्यास्पद आहेत. एका फ्रेंच मॅजिस्ट्रेटाने म्हटलें आहे की अश्लीलता म्हणजे कानांवर व डोळ्यांवर बळजबरी आहे. परंतु लोकांना ज्यांत आनंद वाटतो व जें विकत घेऊन लोक वाचतात, असें पुस्तक प्रसिद्ध करणे ही बळजबरी कशी होते? आणखी एक नांवाजलेला लेखक म्हणतो की अश्लीलतेने नैसर्गिक व अंतस्थ विनयाला धक्का बसतो. परंतु याचा फारसा अर्थ होत नाही असें पाहून तोच पुढे म्हणतो. 'अश्लीलतेंत नेहमी नफ्याचा नीच हेतु असतो. उच्च कला किंवा वाङ्मय जरी लहान मुलांस योग्य नसेल तरीहि त्याला अश्लील म्हणतां येणार नाही, कारण अशा तऱ्हेने लहान मुलांचें हित पाहूं लागल्यास कला अशक्य होईल. कला किंवा शास्त्रीय वाङ्मय आणि अश्लीलता यांत फरक करण्याचा एकच मार्ग आहे. शास्त्रज्ञ किंवा शिल्पज्ञ पैशाकरता काम करीत

नाहीत.' हें सर्व अर्थातच खोटें आहे. शास्त्रज्ञांस व शिल्पज्ञांसहि कामाबद्दल पैसा मिळतो, आणि तो कां मिळूं नये ? उलटपक्षी बरेंच अश्लील समजलेलें सर्वोत्कृष्ट वाङ्मय हें नांवाजलेल्या लेखकांची निनांवी कृति आहे व तें श्रीमंत व षोकी लोकांनी नफ्याची बिलकुल आशा नसतां पदरचे पैसे खर्चून प्रसिद्ध केलेलें आहे.

अश्लीलतेचा व्याख्या करतां येणार नाही अशी कबुली मोठमोठ्या कायदे-पंडितांनी दिली आहे. फ्रान्समधील १८८२ च्या कायद्याच्या पुरस्कर्त्यांने म्हटलें आहे की व्याख्या देण्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यामुळे गुन्हा कशा रीतीने करतां येतो इतकेंच आम्ही सांगितलें आहे. ही कायदे करण्याची पद्धत हास्यास्पद आहे. समजा एखाद्याने असें सांगितलें की एक गुन्हा सुरीने, टाइपरायटरने, बंदुकीने किंवा लेखणीने करतां येण्यासारखा आहे व यांपैकी कोणतें साधन वापरावें त्याप्रमाणे अमुकअमुक शिक्षा होईल. पण तो गुन्हा कोणता? तें आम्ही सांगणार नाही, पण तो केल्यास शिक्षा मात्र होईल. तसेंच हें आहे.

प्रत्येक देशांतील नैतिक कल्पना वेगवेगळ्या असतात, तेव्हा राष्ट्रसंघाने अश्लील वाङ्मयाचा प्रसार बंद करण्याचा जो उपाय योजला आहे त्याचा अर्थ इतकाच होतो की ठिकठिकाणच्या कस्टमखात्याच्या अधिकाऱ्यांनी खुशाल पाहिजे त्या वस्तू अश्लील म्हणून जप्त कराव्या, आणि कोणी गडबड केल्यास त्यास दंड करावा. मुंबईतील कस्टमचे अधिकारी अत्यंत प्रामाणिक आहेत हें आपणांस माहीतच आहे, पण त्यांना स्वतःला जीं चित्रें वगैरे विशेष आवडतील तीं अश्लील समजून जप्त करण्याचा त्यांस पूर्ण हक्क आहे. कायद्यांत जरी असें स्पष्ट सांगितलें आहे की नग्नता म्हणजे अश्लील नव्हे, तरी देखील तसें समज-ण्याचा हक्क त्यांस आहे. आणि युरोपांतील नग्नसंघांवरील कांही पुस्तकांत नग्न चित्रें असल्यामुळे त्यांनी तीं जप्त केलेलीं आहेत. अशा लोकांजवळ हुजत घाल-ण्यापेक्षा काय नुकसान होईल तें सोसणेंच अधिक शहाणपणाचें आहे.

अश्लीलतेच्या खटल्यांत नेहमी हास्यरस विपुल असतो. पॅरिसमधे रस्त्यांत एकदा दोन माणसें एका कार्डाकडे पाहून हंसत आहेत असें पाहून पोलिसाने तें

कार्ड पाहून त्यांस पकडून नेलें. कोर्टांत असें ठरलें की ते वर्तमानपत्राचे बातमीदार असून तें कार्ड म्हणजे कायदेमंडळांत जाण्याचा सरकारी परवाना होता. त्यावर एका नग्न स्त्रीचें चित्र असल्यामुळे पोलिसास तें अश्लील वाटलें.

जें चित्र एका ठिकाणी अश्लील असतें, तें दुसऱ्या ठिकाणीं नसतें. उदाहरणार्थ चित्रकलेच्या प्रदर्शनांत सर्वांस पाहण्यास ठेवलेलीं चित्रें पुस्तकांत छापल्यास अश्लील होतात. एका मॅजिस्ट्रेटाने तर असेंहि सांगितलें की बायबलमधील कांही उतारे काढून ते छापण्याचें धैर्य कोणास झालें तर त्याला अश्लीलतेबद्दल खात्रीने शिक्षा होईल, परंतु बायबल मात्र लहान मुलाच्याहि हातांत देतात!

पॅरिसमधील एका प्रकाशकाने एका पुस्तकांतील कांही अश्लील वाटण्यासारखा भाग वेगळा छापला, आणि तो कोणीं मागितल्यास फुकट मिळेल असें जाहीर केलें. बेल्जिअम्मधील एका वाचकाने तीं पानें मागवून नंतर आपल्या विनयाला धक्का बसल्याबद्दल तक्रार केली. बेल्जिअन अधिकाऱ्यांनी फ्रेंच अधिकाऱ्यांस लिहिले आणि त्या प्रकाशकास शिक्षा होऊन पुस्तकांचा नाश झाला. इतका उपद्व्याप त्याने केला नसता आणि सर्वच एकत्र छापलें असतें तर कदाचित तें कोणाच्या लक्षांतहि आलें नसतें.

पुस्तकाने वाचकांच्या विनयावर हल्ला कसा होतो तें कोणास सांगतां येणार नाही, असें एक फ्रेंच वकील म्हणतो. एखाद्याला एखादें पुस्तक जबरीने वाचावयास लावलें तर त्याची तक्रार बरोबर होईल, पण त्याच्यावर जबरी कोण करतो? उलट अश्लीलतेच्या खटल्यामुळेच पुस्तकाची अधिक प्रसिद्धि होऊन कोणाची तें वाचण्याकडे प्रवृत्ति होईल. तेव्हा अश्लीलतेची जबाबदारी खटला करणारावरच येते.

कायद्याची लीला विचित्र असते. उदाहरणार्थ पॅरिसमधे कलाशिक्षणाची जी सरकारी संस्था आहे तेथे सर्व शिकणाऊ विद्यार्थी जातात, व तेथे त्यांना जिवंत नग्न स्त्रीवरून तिचें चित्र काढावें लागतें. ती कांही फुटांवर नग्न असते आणि इतरत्र अश्लील समजलेल्या शरीराची त्यांना हुबेहुब नक्कल करावी लागते.

समजा नीतिबाज लोकांच्या म्हणण्याप्रमाणे तेथील एखाद्या विद्यार्थ्याला नग्न शरीर अश्लील वाटून त्याने ते काढण्याचें नाकारलें. तर काय होईल? त्याला एकदम तेथून निघून जावें लागेल. तेथे सर्वांच्या देखत नग्न होण्याकरता स्त्रियांस सरकारकडून पैसे मिळतात. परंतु एखाद्या नटीने रंगभूमीवर कपडे काढल्यास तिला तुरुंगांत जावें लागतें हा समंजसपणा आहे काय, आणि असे कायदे करणारांची डोकीं ठिकाणावर असतात असें समजायचें काय?

अश्लीलतेच्या कायद्यांचा एकंदर परिणाम तरी काय होतो? ब्रॅडलॉ व मिसेस बेझंट यांवर जेव्हा अश्लीलतेबद्दल खटला झाला तेव्हा तो चालू असतां एका आठवड्यांत त्यांच्या पुस्तकाच्या लाखों प्रती खपल्या. इंग्लंदांत 'वेल ऑफ लोनलीनेस' ही कादंबरी अश्लील ठरल्याबरोबर ती परिसमधे छापून अश्रुतपूर्व किंमतीस विकली गेली, आणि वास्तविक पाहतां त्यांत अश्लील कांहीच नसल्यामुळे लोकांची निराशा झाली. यावरून असें दिसतें की हे कायदे मूर्खपणाचे आहेत, त्यांनी नुकसान मात्र होतें आणि ते न्याय्य रीतीने लावणें अशक्य आहे, तेव्हा ते रद्द करणेंच श्रेयस्कर आहे. यांत नीतीचा आणि धर्माचा घोटाळा झालेला आहे, सर्वत्र लागू पडणारा असा नीतीचा एकच नियम आहे, तो हा की दुसऱ्याचें नुकसान करूं नये व तें होत नसल्यास पाहिजे तें करण्याची मुभा असावी. अर्थात पुस्तक, नाटक वगैरे कशा प्रकारचें आहे तें जाहिरातींत स्पष्ट केलें पाहिजे, म्हणजे ज्यांस तसें नको असेल त्यांस तें वाचावें किंवा पहावें लागणार नाही.

हा कायदा बदलणें इष्ट आहे हें उघड आहे, पण तो बदलणार कसा? कायदेमंडळांत कांहीहि करण्यापूर्वी लोकमत तयार झालें पाहिजे. लिंगसुधारणा संघाचा हा एक उद्देश आहे, परंतु मीं हें काम संघ स्थापन होण्यापूर्वीच सुरू केलें आहे. मी **समाजस्वास्थ्य** मासिक चालवीत आहें व पुण्याच्या सनातन्यांच्या त्याविरुद्ध तक्रारी सरकारकडे गेल्या आहेत, कारण त्यांस माझे क्रांतिकारक विचार खपत नाहीत. परंतु क्रांतिकारक विचार (राजकीय बाबत नसेल तर) प्रसिद्ध करूं नये असा कायदा नाही, तेव्हा सरकारला माझे विरुद्ध कांही करणें

असेल तर अश्लीलतेकरता खटला करणें एवढाच एक मार्ग आहे. अर्थात पारंपारिक मॅजिस्ट्रेट भेटल्यास मला शिक्षा होऊन सनातन्यांचें समाधान होईल (हें भविष्य आता खरें झालें आहे). परंतु हा केवळ वैयक्तिक प्रश्न नाही. हा अकलेचा प्रश्न आहे. कायदे करणारांच्या बेअकलीपणाचें प्रदर्शन असा हा कायदा आपण मुकाट्याने सहन करायचा काय ? करायचा असेल तर आपल्याला माणसें म्हणण्यापेक्षा एका फ्रेंच लेखकाने म्हटल्याप्रमाणे ' उभे चालणारी प्राणी ' असेंच म्हणणें ज्यास्त शोभेल.

बुरशीचे पुरस्कर्ते

—:*०*:—

कांही वैद्यकीय कूपमंडूकांचें संपादकमंडळ ' भिषग्विलास ' नांवाचें एक मासिक चालवीत असतें आणि स्वतःच्या लंगड्या बाजूचें समर्थन करण्याकरता सोयीस येतील तशीं खोटीं विधानें करण्याची त्यांस संवय आहे हें आमच्या वाचकांस पूर्वी एकदा दाखवलेंच आहे. जुनें तेंच खरें आणि नवीन तें सर्व खोटें समजण्याची खोड या लोकांना असल्यामुळे जुन्या ग्रंथांत कितीहि अविश्वसनीय विधानें असलीं तरी तीं खरीं, आणि त्यांचे विरुद्ध सप्रमाण सिद्ध झालेल्या गोष्टीहि खोट्या असें त्यांस दाखवावें लागतें, यामुळे खोटें बोलण्याचा प्रसंग त्यांचेवर वारंवार येतो आणि त्यांस ती एक प्रकारची संवयच जडलेली आहे. यांचें आणखी एक उदाहरण म्हणून त्यांनी आमचे विरुद्ध लिहिलेल्या लेखाची नक्कल एका वाचकाने आमचेकडे पाठविली आहे.

आम्हास शिक्षा झाल्याबद्दल जे लोक आनंदाने नाचूं लागले त्यांपैकी वरील संपादकमंडळ आहे, परंतु त्यांस नृत्यकला अवगत नसल्यामुळे लोकांस तें हास्यास्पद वाटतें. लेख सयुक्तिक दिसावयास पाहिजे असल्यास त्यांत कांही संगति असावी लागते व एकदा एक विधान करून लगेच त्याचे उलट विधान करणें

हास्यास्पद होतें, हेंहि धोरण त्यांस राहिलेलें नाहीं, आणि प्रामाणिक टीका करण्याची इच्छा नसल्यामुळे आमचा आक्षेपित लेख न वाचतांच मनास येतील तीं विधानें आमचेवर लादून त्यांचें मोठ्या शौर्याने खंडन केलें आहे. 'सुशिक्षित' हा शब्द त्यांस न रुचल्यामुळे आम्हास त्यांनी 'शिक्षित' म्हटलें आहे, तेव्हां त्यांचीच पद्धत घेऊन आपण त्यांस अशिक्षित म्हणूं.

ते म्हणतात, 'नवकल्पना निघून त्या जुन्यापुराण्या, शिळ्या, सोडण्या-इतपत झाल्यानंतर आमची शिक्षित मंडळी त्या कल्पनेच्या मागें लागते. संततिनियमनाच्या संबंधी व तज्जन्य इतर बाबीसंबंधी असेंच झालें आहे. बहुप्रजा केव्हाहि झाले तरी देशाला काय किंवा समाज, कुटुंब यांना काय, जाचकच. ह्या तत्त्वावद्दल आमचा व या वावदूकांचा मुळीच मतभेद नाही. परंतु या प्रश्नाचा उहापोह करतांना वापरण्यांत येणारी भाषा, संततिनियमन करतांना वापरावयाचीं साधनें, एतद्विषयक प्रसिद्ध होणारें वाङ्मय यांबद्दल खरोखरच आम्हास या शिक्षितांची कींव येते. आणि गंभीर शास्त्रीय विषयाला शिमगापुराणाचें स्वरूप दिलेलें पाहून हे दंडनीय लोक राजदंडकाच्या रोषापासून कसे बचावतात, हेंच नवल वाटतें. परंतु उशीरां कां होईना, शासनसंस्थेने लक्ष घातलें, हें त्यांतल्या-त्यांत समाधानाचेंच समजलें पाहिजे.'

संततिनियमनाची कल्पना जुनीपुराणी, सोडण्याइतकी शिळी झाली आहे असें म्हणणारा मनुष्य केवळ आंधळाच नव्हे तर आणखी बहिराहि असला पाहिजे, किंवा खोटें बोलत असला पाहिजे. हे गृहस्थ स्वतः संततिनियमनाचें तत्त्व कबूल करतात, तरमग ती कल्पना सोडण्यासारखी कशी? आमची भाषा एकतर यांनी कधी वाचलेली नाही, किंवा ते जाणून बुजून खोटें बोलतात. प्रति-पक्ष्यांस शिक्षा झालेली पाहून आनंद होणें साहजिक आहे, परंतु त्याचे भरांत शिव्या देण्याचें कारण दिसत नाही. कारण आमचे भाषेस कोर्टानेहि अश्लील म्हटलेलें नाही. आमचे मतें कोर्टाने अश्लील ठरवलीं. वास्तविक मतें अश्लील असूं शकतच नाहीत, भाषाच अश्लील असूं शकते, आणि मतें अश्लील म्हणणें हा

कायद्याचा मूर्खपणा आहे, परंतु इतरांनी कायद्याइतकें मूर्ख होण्याचे कारण नाही. पुणें येथें वसंतव्याख्यानमालेंत अश्लीलतेवर जी चर्चा नुकतीच झाली तींत **श्री. न. चिं. केळकर,** यांनी असें मत दिलें की अश्लीलतेंत नीति किंवा अनीतीचा संबंध नाही, तो केवळ भाषेचा प्रश्न आहे, तेव्हा मतांस अश्लील म्हणणें हा त्यांचे मतेंहि मूर्खपणाच आहे, आणि श्री. केळकर तर आमचे बाजुचे नाहीत (किंवा ते कोणत्याच बाजुचे नसतात असें म्हटलें तरी चालेल), तेव्हा त्यांचें मत ग्राह्य समजण्यास हरकत असूं नये. त्याच वसंतव्याख्यानमालेंत आम्ही कित्येक वर्षांपूर्वी संततिनियमनावर व्याख्यान दिलें होतें. तेव्हा अशा विषयावर देखील बिलकुल अश्लीलता येऊं न देतां एक तासाचे वर भाषण केल्याबद्दल **श्री. दादासाहेब करंदीकरांनी** आमचे आभार मानले होते. आमचेवर नुकताच अश्लीलतेबद्दल खटला झाला त्यांत पोलिस इन्स्पेक्टर आचरेकर यांस, **आमचे विरुद्ध साक्ष देतांनाही आमची भाषा प्रौढ असते असें कबूल करावें लागलें.** प्रसिद्ध रियासतकार **श्री. गो. स. सरदेसाई** यांनीहि आमची भाषा भारदस्त असल्याबद्दल साक्ष दिली. या सर्व विद्वानांपेक्षा भिषग्विलासांतील लेखकांस मराठी भाषेचें ज्यास्त ज्ञान आहे असें त्यांचे लेखनशैलीवरून दिसत नाही. तेव्हा त्यांनी किंवा त्यांच्यासारख्याच इतर अशिक्षित बुरसटांनी आमची भाषा शिमगापुराण म्हटल्यास ते स्वपक्षसमर्थनार्थ खोटें बोलतात असें आम्ही त्यांस स्पष्ट सांगतों. कारण त्यांस आमची भाषा खरोखरच अश्लील वाटत असल्यास त्याचा अर्थ असा होईल की त्यांचीं मनेंच अश्लील आहेत व यामुळे त्यांस कोठेही अश्लीलतेंचा भास होईल. पण आपण असें कशाला म्हणा ? वस्तुस्थिति तशी असल्यास तें त्यांनी सांगावें. ते खोटें बोलतात, असेंच म्हणणें आम्हांस संयुक्तिक दिसतें.

नंतर हे गृहस्थ **बर्ट्रॅंड् रसेल, हॅवलॉक् एलिस्** वगैरे जगन्मान्य विद्वानांवर घसरतात. यामुळे त्यांचीच फजिति होते हेंहि त्यांस समजत नाही. काजव्याने सूर्याचे प्रकाशास पाहिजे तर नांवें ठेवावीं, परंतु माणसांस ज्यास्त अक्कल असावी की नाही ? ते म्हणतात ' विषयसुख मनसोक्त मिळावें, जबाबदारी

नको,' हें सर्वांच्या लिखाणाचें सार आहे. हे लिखाण यांनी वाचलेलें नाही हें स्पष्ट असल्यामुळे या बरळण्याकडे लक्ष देण्याचें कारण नाही.

'केवळ विषयसुख हेंच काय तें सुखसंज्ञेस पात्र नाहीं. प्रत्येक व्यक्तीची सुखसंवेदना निराळी. विषयसुख हें सुद्धा कित्येकांना भयंकर त्रासदायक होतें. ब्रह्मचर्य सुखसाधन होऊं शकतें. निर्विकार ब्रह्मचर्याची मातब्बरी काय वर्णावी? नैष्ठिक ब्रह्मचर्य राखूनहि अत्यंत सुखी असलेले लोक आपल्याकडे पहावयास मिळतात...' ज्यांस विषयसुखापासून त्रास होतो त्यांचेवर तें लादावें, किंवा ज्यांस ब्रह्मचर्यापासून सुख होत असेल त्यांनी तें पाळूं नये, असें आम्हीं कधींहि म्हटलेलें नाही. निर्विकार ब्रम्हचर्य हें ईश्वराइतकेंच काल्पनिक असल्यामुळे त्याची मातब्बरी पाहिजे तितकी वर्णावी, ती ऐकण्यास आम्हास वेळ नाही. नैष्ठिक ब्रह्मचर्य राखूनही सुखी असलेले लोक म्हणाल तर आपल्याकडेच कां, सर्वत्र पहावयास मिळतात, कारण हिंदुस्थानास नपुंसकत्वाचा मक्ता दिलेला नाही.

'आरोग्यशास्त्राच्या दृष्टीने व्यभिचारापासून कसा फायदा होणार? खरोखर त्यापासून झाला तर भयंकर तोटा मात्र होईल...' अन्नांत वैचित्र्यापासून जसा फायदा होतो, तसाच समागमांत वैचित्र्यापासून कां होणार नाही? नैतिक दृष्ट्या व्यभिचार करावा की नाही याबद्दल मतभेद होईल, परंतु त्यापासून आरोग्याचे दृष्टीने फायदा होणें शक्य आहे, हें निदान वैद्य म्हणवणारांस तरी कळलें पाहिजे, नपेक्षा त्यांची वैद्यकी म्हणजे नुसतें ढोंग आहे.

'सर्व सृष्टींत मनुष्यप्राणी हाच एक प्राणी असा आहे की तो स्त्रीपुरुषसंयोग केवळ सुखाकरता मानतो व त्याकरता धडपडतो...'

'प्रजायै गृहमेधिनां' हें वर्णन मनुष्यास न लागतां इतर प्राण्यसांच लागतें हा अजब शोध आहे! वस्तुतः इतर प्राण्यांस समागमापासून प्रजोत्पत्ति होते अशी कल्पनाच नसल्यामुळे त्यांचा समागम केवळ सुखार्थच असतो. अर्थातच मनुष्याचाहि तसाच असतो, पण ढोंगी लोक हें कबूल करीत नाहीत. पशूंस ढोंग साधत नाहीं, ते उघडपणे सुखाचे मार्गे असतात. लेखकाने स्वतःचे अज्ञा-

नाचें प्रदर्शन कमी केलें असतें तरी चाललें असतें. पण शिव्या देण्याचा मोह आवरेना, आणि हे आत्मसंयमनाचा पुरस्कार करतात ! ब्रह्मचर्याबद्दल शेंकडों वर्षें चालत आलेली खोटी शिकवणचं लेखकाने पुन्हा दिली आहे, परंतु ती अज्ञान-मूलक आहे. जे परिणाम अब्रह्मचर्याचे म्हणून ते सांगतात ते सर्व वास्तविक ब्रह्मचर्याचे आहेत असें आधुनिक मत सप्रमाण सिद्ध झालेलें आहे हें आमचे वाचकांस माहीत आहेच तेव्हा ब्रह्मचर्याच्या प्रयत्नांनी आजपर्यंत सर्वांचें जें भयंकर नुकसान झालेलें आहे तें यापुढे होण्याचें कारण नाही. अर्थात अन्नाचे बाबतींत जसा मनोनिग्रह उपयोगी पडतो तसा समागमाचे बाबतींत पडेल, कारण अतिरेक कोठेहि वाईटच, परंतु या पलीकडे ब्रह्मचर्याची किंमत नाही हें आता कूपमंडूकांशिवाय इतरांस कळलेलें आहे.

पशूंत आणि मनुष्यांत वास्तविक जो भेद आहे तो हा की पशूंस मुलें होणें न होणें त्यांचे मर्जीवर अवलंबत नाही, परंतु मनुष्याने आपल्या अकलेचा उपयोग केल्यास त्याला हें आपल्या मर्जीवर ठेवतां येतें, आणि अकलेचा ज्याला उपयोग करतां येत नाहीः किंवा करणें म्हणजे पाप वाटत असेल, त्याला अक्कल नसल्या-सारखीच आहे, त्यांत आणि पशूंत फरक नाही. संततिनियमनाचें तत्त्व मान्य केल्यानंतर त्याकरता उपाय कोणते योजावयाचे, हें ठरवण्यास देखील अक्कल लागते. ब्रह्मचर्य फक्त नपुंसकांसच साध्य असतें, आणि लोक सामान्यतः नपुंसक नसतात. तेव्हा अक्कल जर वापरायची असेल आणि उपाय यशस्वी व्हावे अशी इच्छा असेल तर संततिनियमनाकरता कृत्रिम उपायच वापरणें जरूर आहे. आणि धर्मबाज व नीतिबाज लोक वगळल्यास इतर सर्वांस हें सहज कळेल. अशा स्थितींत ब्रह्मचर्याचेंच ढोलकें पिटणें म्हणजे अकलेचें प्रदर्शन करणें आहे.

स्वराज्य मिळाल्याबरोबर आमचे मतांबद्दल आम्हांस फांशी देण्याचीहि कित्येक बुरसटांनी आम्हांस उघड धमकी दिली आहे. अर्थात बुरसटांचे हातांत सत्ता गेल्यास बुरशीचा अमुक इंचांचा थर प्रत्येकावर असलाच पाहिजे असा कायदा होऊन त्याअन्वयें आम्हांस फांशीहि जावें लागेल. एखाद्या बैलाने शिंग

मारल्यामुळे मनुष्य मरणें शक्य आहे, परंतु तरी देखील वैल श्रेष्ठ ठरणार नाही, तद्वतच आम्ही फांशी गेलों तरी बुरसटांचीं मतें ग्राह्य होणार नाहीत. परंतु फांशी गेल्यानंतर आम्हांस कांहीच लिहितां येणार नाही, तेव्हा तेथपर्यंतच शक्य तितका मतप्रचार करणें जरूर आहे, आणि म्हणूनच नुकसान सोसूनहि आम्ही त्याची सुरवात केली आणि नाइलाज होईपर्यंत लेखन बंद करण्याचा आमचा विचार नाही. तेव्हा आमचें मासिक बंद पडल्यावर बुरसटांस जो आनंद होणार आहे, त्याकरता त्यांस बरीच वाट पहावी लागेल याबद्दल दिलगिरी वाटते.

पित्ताशयाचे विकार

पित्ताशयांत पित्त तयार होऊन तें आंतड्यांत येतें हें पुष्कळांस माहीत असेल. यांत जर कांही कारणाने अडथळा आला तर तें पित्त रक्तांत शिरतें, त्वचेला आणि डोळ्यांतील पांढऱ्या भागाला पिंवळा रंग येतो, आणि यालाच कावीळ म्हणतात. कदाचित हा अडथळा म्हणजे आंत बनलेला एखादा खडा पित्ताच्या मार्गांतून जात असेल आणि त्याच्या कडा लागल्यामुळे भयंकर पीडा होईल. स्त्रियांस प्रसूतीच्या वेळीं देखील इतका त्रास होत नाही असें म्हणतात. हें खरें की काय तें स्त्रियांसच सांगतां येईल, किंवा कदाचित तें खरें असलें तरी त्या कबूलहि करणार नाहीत, कारण प्रसूतीइतका त्रास पुरुषांस देखील कधीकधी होतो असा त्याचा अर्थ होईल.

याचा अर्थ असा नव्हे, की जे लोक पिंवळे दिसत नाहीत त्या सर्वांचा पित्ताशय सुस्थितींत असतो. कारण पित्त उत्पन्न करणें एवढेंच त्याचें काम नसतें. उदाहरणार्थ अन्नशयांतून अन्न बाहेर पडल्यावर त्यांतील जो निरुपयोगी भाग असेल तो आपोआप किंवा निदान सारक औषधांच्या किंवा इतर युक्त्यांच्या

साहाय्याने बाहेर जातो व उपयुक्त भाग पित्ताशयांत जातो. या भागांत कांही भाग ताबडतोब उपयोगांत आणण्यासारखा असतो, तो पित्ताशयाच्या दुसऱ्या तोंडाने एकदम बाहेर पडून रक्तांत मिसळल्यास या वेळीं रक्तास त्याचें अजीर्ण होईल, व दोन जेवणांचे मधल्या वेळांत उपासमार होईल. परंतु पित्ताशयास साखर, तेलकट भाग आणि 'आल्ब्युमेन' जमा करून ठेवतां येतात, आणि या पदार्थांची जसजशी जरूर लागेल तसतसे ते बाहेर सोडतां येतात.

परंतु अन्नाचा कांही भाग अजून एकदम उपयोगांत आणण्यासारख्या स्थितींत नसतो. त्याचें परिवर्तन पित्ताशयांत होतें आणि त्यांतील टाकाऊ भाग 'यूरिआ' आणि 'यूरिक' ॲसिदचे रूपाने बाहेर पडतो, आणि प्रकृति निरोगी असल्यास हा भाग आपोआप शरीराचे बाहेर जातो.

अन्नाचा कांही भाग असा असतो की त्याचा उपयोग नसतो, किंवा त्यापासून त्रासहि होतो. शरीराशीं एकजीव होणें शक्य नाही असा भाग, रोगजंतु आणि त्यांचे पासून उत्पन्न झालेलें विष किंवा इतर कांही अपायकारक पदार्थ अडवण्याचें व त्यांचें परिवर्तन करून त्यांपासुन शक्य तितका कमी त्रास होईल अशी व्यवस्था करण्याचें काम पित्ताशयाचेंच असतें. याशिवायहि त्याचीं अनेक कामें असतात. उदाहरणार्थ रक्तांत जो गोठण्याचा गुण आहे तो कायम ठेवण्याचें काम. (यामुळे कोठे कापल्यास रक्त एकसारखें वहात न राहतां तें गोठून जखम बंद होते). लोहाचा संचय होऊन रक्तगोलकांस लागेल त्याप्रमाणे त्याचा पुरवठा पित्तशयांतूनच होतो आणि शरीराच्या उष्णतेपैकी जवळजवळ एक तृतीयांश पित्ताशयांतच उत्पन्न होते. आपल्या शरीरांत ज्या ग्रंथि आहेत त्यांपैकी पित्ताशय सर्वांत मोठी ग्रंथि आहे. त्याचें वजन तीन पौंडांचे वर असतें, पण त्याचें कामहि तसेंच महत्वाचें असतें. याचें काम नीट झाल्यास प्रकृति उत्तम राहील हें उघड आहे परंतु अशी स्थिति फार लोकांची नसते.

कांही लोकांना योग्य प्रकारचें अन्न खाण्याची ऐपत असते आणि त्याचें पचनहि उत्तम रीतीने होत असतें. परंतु हेंच अन्न फाजील प्रमाणांत खाल्ल्यास

त्याचा संचय करून तें जरूर तसें वांटणें पित्ताशयास जड जातें. कांही प्राण्यांस खाण्याकरता म्हणून जेव्हा फाजील लठ्ठ करतात, तेव्हा त्यांस जास्त खाऊं घालतात आणि याचा परिणाम असा होतो की त्यांचा पित्ताशय फाजील मोठा होतो. त्याचप्रमाणे क्षय झालेल्या माणसांसही कधी कधी चुकीच्या समजुतीने फाजील खाऊं घालतात, त्यांचीही हीच स्थिती होते.

इतर कांही लोकांचें अन्न चांगलें असतें आणि ते फार खातहि नाहीत परंतु जें खातात तें घाईनें खातात. त्याचें नीट चर्वण झाल्याशिवाय तें गिळल्यामुळे त्यांत पाचक रस योग्य प्रमाणांत मिसळत नाहीत, यामुळे त्याचें परिवर्तन करण्याचें काम पित्ताशयावर फाजील प्रमाणांत पडतें. अर्थात घाईने खाणारे लोक शिवाय अधाशी असल्यास दुप्पट त्रास होतो.

कांही लोक निरनिराळ्या प्रकारचें विष विनाकारण घेत असतात, कारण नेहमी घेण्यांत येणारीं बरींच औषधें विषारी असतात व त्यांचा फारसा उपयोगहि नसतो. थकल्यासारखें वाटतें, घ्या औषध; किंचित डोकें दुखतें आहे, घ्या औषध; झोंप लवकर आली नाही, घ्या औषध; असें केल्याने हीं सर्व विषें बाहेर टाकण्याचें काम पित्ताशयावर पडतें. शिवाय मद्यार्क (व्हिस्की, ब्रँडी वगैरे) पिणारे लोक बहुधा जेवण्यापूर्वी पितात. मद्यार्क हें विष जेवणानंतर घेतल्यास त्यापासून फारसा त्रास होत नाही, परंतु जेवणापूर्वी घेतल्यास ज्यास्त त्रास होतो. पित्ताशयाचें काम कांही अंशीं पोलिसाचें असतें, परंतु पुष्कळ गुन्हेगार एकदम पकडुन ठेवणें झाल्यास अशक्य होतें.

आरोग्याचे सामान्य नियम पुष्कळ लोक पाळीत नाहीत. ज्यांस बसून काम करावें लागतें, त्यांचा पुरेसा वेळ मोकळ्या हवेंत जात नाही व त्यांस पुरेसा ' ऑक्सिजन ' मिळत नाही. शहरांत राहणारे लोक पुरेसें चालत नाहीत, शक्य तितक्या वेळा ट्रॅम, बस्, आगगाडी, टॅक्सी वगैरेंत बसतात, यामुळे शरीराच्या स्नायूंना काम मिळत नाही, आणि यामुळे पित्ताशयाचें कामहि मंदावतें. अर्थात प्रारंभी यापासुन विशेष त्रास होणार नाही, परंतु हा त्रास वाढत जातो.

पित्ताशयाचे विकार

तुमचा डॉक्टर चांगला असल्यास तो तुम्हाला वेळेवर सावध करील, पण पुष्कळ लोक त्याकडे लक्ष देत नाहीत. मला काय झालें आहे, आजारी पडल्यावर पाहतां येईल, असेंच बहुतेक लोक म्हणतात. परंतु दृश्य रीतीने आजारी पडेपर्यंत पित्ताशयास कायमची इजा होते, आणि मग उपाय चालत नाही. एखादेवेळी क्षुल्लक कारणावरून हें उघडकीस येतें, पण तें देखील ज्याला समजेल त्याला! एखादे वेळीं अंग गार पडतें, कदाचित श्लेष्मल त्वचेंतून कारणाशिवाय रक्त येतें, कधी अंगावर तांबूस डाग दिसतात, कधी तोंड कडू होतें, डोकें दुखतें, थकवा येतो, झोंप फार येते किंवा येत नाहीशी होते, कधी जीभ पांढरी होते. समजा तुम्ही एखाद्या मित्रावरोबर कोणाकडे जेवायला गेलांत. जेवणानंतर त्याचें एकदम डोकें दुखूं लागलें, किंवा श्वास लागला, किंवा एकदम अंगाला असह्य कंडु उठूं लागली. तुम्हीहि तेंच अन्न खाल्लें, तेव्हां त्यांत कांही विष असेल हें संभवत नाही, परंतु ज्या अन्नाची तुमच्या पित्ताशयाला योग्य व्यवस्था लावतां आली, तेंच तुमच्या मित्राला बाधलें, म्हणजे त्याच्या पित्ताशयाचें काम बरोबर झालें नाही.

पित्ताशय बिघडला म्हणजे त्याचीं सर्वच कामें योग्य रीतीने होत नाहीत असें नाही. कांही कामें जवळजवळ नेहमीसारखींच होतात, व कांही मात्र कमी प्रमाणांत होतात, यामुळे पित्ताशय बिघडलेल्या सर्वच रोग्यांस सारख्या प्रकारचीं चिन्हें होत नाहीत. तो कशा रीतीने बिघडला आहे हें आता तपासून समजतें व त्याला योग्य उपचारहि करतां येतात. परंतु तो बिघडला नाही तोंच सावध होऊन त्याची सुस्थिति राखणेंच श्रेयस्कर आहे.

सौंदर्याची काळजी घेणाऱ्या स्त्रियांस हेंहि सांगणें जरूर आहे की पित्ताशयाच्या सुस्थितीवर अंगकांति अवलंबून असते.

गरोदरपणांतील वांति. पुढील उपाय बऱ्याच स्त्रियांचे बाबतींत यशस्वी झालेला आहे व तो पुष्कळ डॉक्टरांसहि माहीत नसतो. जलशोषक

कापसाच्या एका रुंद तुकड्यावर एक मोठा चमचाभर शुद्ध ग्लिसरीन घालून त्याची वळकटी करून ती योनिमार्गांत जाईल तितकी खोल घालून ठेवावी, व दररोज बदलून नवी घालावी. सुरवातीपासूनच गुण वाटतो, व असें दोनतीन दिवस केल्याने काम भागतें. पुन्हा कांही दिवसांनी जरूर वाटल्यास तोच उपाय पुन्हा करावा.

शास्त्रीबुवांशीं संवाद

आम्ही मागें शाळेंत शिक्षक असतां त्याच शाळेंत एक शास्त्रीहि असत. त्यांना थोडेबहुत इंग्रजी शब्द येत असल्यामुळे शास्त्री असूनहि आमच्या आधुनिक ज्ञान आहे, अशी त्यांस थोडीबहुत घमेंड होती. शास्त्री लोकांच्या पद्धतीने वाद करण्याची त्यांना मोठी हौस. परंतु मी आप्तवाक्य मानीत नाही, श्रुतींत, स्मृतींत, वेदांत, पुराणांत, गीतेंत वगैरे कांहीहि सांगितलें असलें तरी मी त्याला मुळीच किंमत देत नाही, असें म्हणणारा तेथपर्यंत त्यांस कोणीच भेटला नव्हता, यामुळे त्यांची बरीच त्रेधा उडत असे. तेव्हापासून आमचें अनेक विषयावर बोलणें झालें व अजुनही तोंडी किंवा पत्रोपत्री होतें. त्यापैकी कांही भाग संवादरूपाने देण्याचें योजिलें आहे.

— कसें काय, शास्त्रिणः ! आज काय नवलविशेष ?

—अहो, काय विचारतां ? जें जें ऐकावें तो चमत्कारच. अमेरिकेंत म्हणे एक यंत्र निघालें आहे, त्यांत डोकें घातलें की दाढीबिढी होऊन केंस फॅशनेबल विंचरून निघतात म्हणे, खरें का ?

— हो हो, त्यांत कठिण काय आहे ? आणखी असेंहि एक यंत्र निघालें आहे की त्यांत ब्राह्मण घातला की स्नानसंध्या होऊन बाहेर पडतो. पण तो ब्राह्मण असला तरच हां ! जर का त्यांत ब्राह्मणेतर शिरला, तर तो तस्सा बाहेर फेकला जातो. खरा ब्राह्मण कोण हें समजायला ही छान युक्ति झाली आहे !

—अहो, तुम्हाला एक स्नानसंध्या नाही, म्हणून त्याची चेष्टा करणें बरोबर नाही.

—हां जरा थांबा, आम्हाला स्नानसंध्या नाही म्हणजे काय ? स्नान आम्हीही करतों इतकेंच नाहीं, तर तुमच्यापेक्षाहि जास्त स्वच्छ करतों, कारण केवळ अंगावर पाणी ओतून वस्त्र भिजलें म्हणजे स्नान झालें अशी आमची व्याख्या नाही. पण संध्या कशाकरता करायची ?

—शरीर स्वच्छ ठेवण्याकरता जसें स्नान करायचें, तसा आत्मा स्वच्छ ठेवण्याकरता संध्या करायची, यांत कठिण काय आहे ?

—आत्मा हें काय प्रकरण आहे ?

—आत्मा नसला तरमग पुनर्जन्म कसा होईल ?

—म्हणतो कोण पुनर्जन्म होतो- म्हणून ? याचा तुमच्याजवळ कांहीं पुरावा आहे ?

– माझ्याजवळ म्हणजे काय ? गीतेंत श्रीकृष्णाने अर्जुनाला स्पष्ट सांगितलें आहे की तुला पुनर्जन्माचें स्मरण नाही, परंतु मला आहे. आणि कठोपनिषदांत देखील पुनर्जन्माचा उल्लेख आहे.

—हें पहा, गीतेंत असो नाहीतर आणखी कशांत असो, माझ्याजवळ त्याची किंमत नाही. मला युक्तिवादाने जें दिसेल तेंच मी कबूल करीन. बावा-वाक्य कबूल करणार नाही.

—पण पूनर्जन्माची स्मृति हें प्रमाण नाही का ? ती स्मृति ज्याला असेल त्यालाच समजेल, तें सिद्ध कसें करणार ?

—तो तुमचा प्रश्न आहे, केवळ अमुक मनुष्य म्हणतो एवढ्यावर मी आणार नाही. पाहिजे त्या थापा देवून फसवणारे लोक पुष्कळ असतात, पण ते जरी सोडून दिले तरी अत्यंत प्रामाणिक मनुष्य देखील नेहमी खरेंच बोलतो असें नाही. तो जाणूनबुजून खोटें बोलणार नाही, स्वतःच्या समजुतीप्रमाणें बोलेल, पण त्याची समजुत खरी कशावरून ? विशेषतः जेथे कोणत्याही प्रकारचा पुरावा

नाही अशा प्रसंगी मनुष्याच्या मनःप्रवृत्तीप्रमाणे त्याची समजूत होणें कठिण नसतें. ज्याच्या मनांत ईश्वराच्या अस्तित्वाविषयी ठाम विश्वास असतो, आणि त्याचें दर्शन व्हावें अशी उत्कट इच्छा असते, अशा मनुष्याला स्वप्नांत किंवा जागेपणींहि ईश्वर दिसणें शक्य आहे. साक्षात्कार झाला असें त्याने सांगितलें तर तो खोटें बोलला नाही, पण त्यावरून ईश्वराचें अस्तित्व मात्र खरें होत नाही. तशीच पूर्वजन्मस्मृतीची गोष्ट आहे. अशा प्रकारचा एक स्मृतीचा रोगच असतो. नवीन वस्तु दिसली तरी ती पूर्वी पाहिल्यासारखी वाटते. असा मनुष्य इतर सर्व बाबतींत इतरांप्रमाणेच वागत असल्यामुळे त्याला किंवा इतरांनाहि हा रोग कळण्याचा मार्ग सामान्यतः नसतो. स्वतःच्या पूर्वजन्माच्या हकीकतीही कित्येक लोकांनी लिहिलेल्या आहेत, परंतु त्या कल्पने-नेहि लिहितां येतात, तेव्हां त्यांवर विश्वास ठेवणें म्हणजे मूर्खपणा आहे.

—पण कोणतीहि गोष्ट सिद्ध करायला प्रत्यक्ष प्रमाणच लागतें असें नाही. अलीकडे ईथर म्हणून जो सर्वव्यापी पदार्थ आहे असें मानतात, त्याला प्रत्यक्ष प्रमाण काय आहे? तो अनुमानानेच मानतात की नाही? सूर्यापासून आपल्या-पर्यंत उजेड पोंचण्याला कांही तरी साधन पाहिजे म्हणूनच तो मानतात. तसाच पुनर्जन्म कां मानूं नये?

—तसें अनुमान निघेल तर माझी हरकत नाही, पण हें मात्र लक्षांत ठेवा की हल्लीचीं शास्त्रीय अनुमानें केवळ सोईकरता केलेलीं असतात आणि त्यापेक्षा अधिक सोईचें अनुमान सांपडल्यास पहिलें सोडून तें धरण्याची आमची तयारी असते, त्याला आम्ही त्रिकालाबाधित सत्य म्हणून पुकारीत नाही.

—नका पुकारूं, पण कबूल तर कराल? पुनर्जन्माचें अनुमान करावें लागतें तें अशाकरता, की एरवी जगांत जी विषमता दिसते ती कशी आली? कांही लोक दुःखी आणि कांही सुखी असें कां?

—कोणत्याहि दोन वस्तु सारख्या स्थितींत नसतात हा जगाचा सामान्य नियम आहे. सोनें पिवळें कां आणि चांदी पांढरी कां, हा फरक कशामुळे झाला?

चिखलाचे आणि कस्तुरीचे गुण सारखे कां नाही ? एक दगड चौकोनी कां, दुसरा वाटोळा कां ? त्याचप्रमाणे माणसांचेहि गुण आणि परिस्थिति वेगळी असतात, त्यांत पुनर्जन्म कशाला येतो ? किंवा तुमच्या जुन्या पद्धतीचें उत्तर पाहिजे असल्यास असें म्हणा की वस्तुतः सर्व एकच आहे, फरक दिसतो ही केवळ माया आहे, तरीही पुनर्जन्माचें कारण नाहीं. बरें पुनर्जन्म घटकाभर मानला तरी हा प्रश्न सुटत नाही. या जन्मांतील विषमता म्हणजे मागील जन्मांतील कर्माचें फळ असेंच तुम्ही म्हणणार, की नाही ? ज्याने मागील जन्मीं सत्कर्म केलें तो या जन्मीं सुखी होतो, दुष्कर्म केलें तो दुःखी होतो असें समजलें तरी मागील जन्मीं तरी एकाने पाप केलें आणि दुसऱ्याने पुण्य, असा फरक कां ? कितीहि जन्म मागें गेलांत तरी हा प्रश्न राहणारच. त्याचें उत्तर काय ?

—ही परमेश्वराची लीला आहे, त्यांत आम्हाला काय कळणार ?

—आतां परमेश्वराच्या मागें लपतां काय ? ही लटपट नाही चालायची. परमेश्वराची लीला अगाध आहे असें म्हणणें असेल तर आपलें अज्ञान कबूल करा. मग परमेश्वर सर्वशक्तिमान आणि दयाळू आहे असें म्हणूं देणार नाही. शिवाय हे गुण एकमेकांशीं जुळत नाहीत. तो दयाळू असेल तर जगांतील बारीकसारीक दुःखहि दूर करणें त्याचें काम आहे. तसें त्याला करतां येत नसेल तर तो सर्वशक्तिमान नाही, करण्याची इच्छा नसेल तर दयाळू नाही. पाप केल्याने जर पुढच्या जन्मीं दुःख होत असेल तर पाप करूं न देणें ईश्वराच्या हातांत आहे.

—बरें तें जाऊं द्या. पुनर्जन्माला आणखीहि प्रमाणें सांपडतात. उदाहरणार्थ, मृत्यु म्हणजे काय हें माहीत नसलेल्या अगदी लहान मुलाला देखील मृत्यूचें भय वाटतें तें कां ? स्तनांत दूध सांपडेल हें लहान मुलाला कसें कळते ? मागील जन्मांत शिकलेल्या गोष्टी आपल्याला या जन्मांत सहज येतात.

—याकरता पुनर्जन्मच कल्पिला पाहिजे असें नाही, या गोष्टी आनुवंशिक संस्कारांमुळे येतात असें म्हणतां येतें. शिवाय असें पहा की मनुष्याला पुन्हा मनुष्यजन्मच येईल असें तुम्हीहि म्हणत नाही. तर मग वानराच्या पोराला

झाडावर चढावेंसें वाटतें आणि चढतां येतें हें मागील जन्मींचें ज्ञान कसें म्हणतां येईल ? कारण तो मागील जन्मीं वानरच असेलसें नाही. तेव्हा याला आनुवंशिक संस्कारच म्हणणें जास्त सयुक्तिक आहे.

—पण आत्म्याच्या अस्तित्वाला आणखी पुरावे आहेत. आपल्या नेहमींच्या बोलण्याच्या भाषेंतहि एक पुरावा आहे. माझें मन, माझें शरीर, असे शब्दप्रयोग जेव्हा आपण करतों तेव्हा आपल्याला हें मानलेंच पाहिजे की शरीर म्हणजे मी नव्हे, आणि मन म्हणजेहि मी नव्हे, तेव्हां मी या शब्दाने आपण जें दर्शवितों तो आत्मा असें म्हणायला काय हरकत आहे ?

—हरकत इतकीच आहे की तें खरें होणार नाही. असल्या पोरकटपणाने एखादें लहान मूल फसेल कदाचित. मी कसा फसेन ? अहो आपण ज्याप्रमाणे माझें मन, माझें शरीर, म्हणतों, त्याचप्रमाणे 'माझा आत्मा' असेंहि म्हणतात, यावरून आत्मा म्हणजे मी नव्हे, मी म्हणजे कोणी आणखी निराळाच आहें, असें कां म्हणूं नये ? आणि भाषेवरूनच पुरावा मानूं लागल्यास आपण शशशृंग, खपुष्प, वंध्यापुत्र, वगैरेचाहि उल्लेख पाहतों, यावरून या सर्वांचें अस्तित्वहि सिद्ध होईल.

—हें पहा, तुम्हाला या गोष्टी कळायच्या नाहीत. त्याला तपस्या करावी लागते. प्राण, देह, मन वगैरे आत्म्याचीं आवरणें आहेत, त्यांचा भेद करून आंतील आत्मा पाहण्याकरता इंद्राला देखील १०१ वर्षें तपश्चर्या करावी लागली, आणि तुम्ही तर स्नानसंध्या देखील करीत नाही. तो तुम्हाला कसा दिसणार ?

—हां, हां, शास्त्रीबुवा, शिव्या नका देऊं. मी मघाच सांगितलें की मी स्नान करतों, संध्येचा माझे मतें उपयोग नाही आणि वाक्यावाक्य मी मानीत नाही. तेव्हां वेद प्रमाण मानल्याशिवाय जर आत्मा सिद्ध होत नसेल तर तुम्ही माझी खात्री करूं शकणार नाही.

—पण युक्तिवादवाले देखील आप्तवाक्य प्रमाण मानतात. ज्या शास्त्रांत तुम्ही पारंगत नाही, त्याची माहिती पाहिजे असल्यास तुम्ही तज्ज्ञांच्या शब्दावर विश्वास ठेवतांच कीं नाही ? तसाच येथे ठेवला पाहिजे.

—एक शास्त्रज्ञ जेव्हा दुसऱ्यावर विश्वास ठेवतो, तेव्हा तो तें कर्तव्य म्हणून करीत नाही. वैज्ञानिक सत्य ताडून पाहतां येतें. सर्वच लोक तसें करीत नाहींत हें खरें, पण तें केवळ वेळ फुकट जाऊं नये म्हणून. परंतु जर एखादा शास्त्रज्ञ एखादी प्रथमदर्शनी अशक्य वाटणारी गोष्ट सांगूं लागला तर ती ताडून पाहिल्याशिवाय विश्वास ठेऊं नयेच, परंतु धार्मिक आणि शास्त्रीय लोकांचीं मनेंच वेगवेगळ्या प्रकारचीं असतात. हवा हा एकच पदार्थ आहे अशी पूर्वी कल्पना होती, परंतु नंतर ती अनेक पदार्थांचें मिश्रण होऊन झालेली आहे असा शोध लागला. परंतु ईश्वर नाही म्हटल्याबरोबर धार्मिक लोक जसे चिडतात, तसे याबद्दल शास्त्रज्ञ चिडले नाहीत. तें खरें आहे अशी त्यांनी आपली खात्री करून घेतली आणि तें खरें मानूं लागले. पण तुमच्या ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणें हेंच जर पाप होतें, तरमग तुमच्याजवळ खऱ्याखोट्याचा प्रश्नच नाही. तुम्ही म्हणाल तें खरे मानावें नाहीतर नरकांत जावें. याचा अर्थ असा की तुम्हाला अरेरावी करायला पाहिजे आहे. सत्याची परवा नाही. कोणी खोटेंच म्हणूं लागला तर तुम्ही त्याला १०१ वर्षें तपश्चर्या करायला सांगणार! असल्या गप्पा या युगांत लोकांना खऱ्या वाटणार नाहीत. मी जर तुम्हाला सांगूं लागलों की माझेंच म्हणणें खरें आहे, पण २५ भागांचा इंग्रजी ज्ञानकोश ७७ वेळां वाचून काढलात तरच तें तुम्हाला कळेल, तर तुम्ही तें खरें मानाल? तशाच या तपश्चर्येच्या गप्पा आम्ही खऱ्या मानीत नाही. त्यांतून ज्ञानकोश वाचल्याने तुम्हाला कांही ज्ञान तरी मिळेल, पण एक हात वर करून एका पायावर कितीहि वेळ उभें राहिलें तरी शरीराचे हाल होण्यापलीकडे कांहीएक होणार नाही. तेव्हा असल्या पोकळ गप्पा सांगण्याऐवजी असे कबूल करा की आत्मा, ईश्वर, पुनर्जन्म वगैरे युक्तिवादांत टिकत नाहीत.

—बरें आतां उशीर झाला, नाही? आता पुन्हा कधीतरी बोलुं. माझें म्हणणें अजून संपलें नाहीं.

—ठीक आहे, म्हणाल तेव्हा माझी तयारीच आहे.

हातपाय कशाने फुटतात ?

—*०*—

हातपाय थंडीने फुटतात अशी सामान्य कल्पना आहे, परंतु ती सर्वथैव खरी नांही. उन्हाळ्यांतहि हा प्रकार कधी कधी दिसतो. आणि शिवाय कितीहि थंडी पडली तरी तिचा परिणाम कांही लोकांवरच तसा होतो, बाकीच्यांना कांही होत नाही तेव्हा अंग फुटण्याचें एक कारण जरी थंडी हें असलें तरी प्रकृतिदोष हें दुसरें कारण हजर असेल तरच पहिल्या कारणाचा परिणाम होतो. शिवाय थंडी एवढेंच जर कारण असतें तर अंग शेकल्याने भागलें असतें, परंतु तसें भागत नाही. ज्यांचें अंग फुटत असेल त्यांचें शेकल्याने अधिकच फुटतें. कारण ज्यांना थंडी सोसत नाही त्यांना उष्णताहि सोसत नाही हा प्रकृतीचा दोष आहे, केवळ थंडीचा नव्हे. मग यावर उपाय काय ?

लुई शॅराँ नांवाच्या एका फ्रेंच डॉक्टराने यावर एक उपाय सुचवला आहे, तो बराच चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. तो म्हणतो की ज्यांचें अंग फुटत असेल त्यांनी लग्न करावें. केवळ असें मत देवूनच तो थांबत नाही, त्याने अशीं उदाहरणें दिलीं आहेत. याला एक पुरावा म्हणजे ज्यांचें लहानपणी अंग फुटतें असे मुलगे किंवा मुली तारुण्याच्या भरांत आल्यावर तें एकदम फुटेनासें होतें, कारण तारुण्यामुळे शरीरांत अधिक जोम येतो आणि थंडी आणि उष्णता सहन करण्याची शक्ति येते. परंतु याला पुष्कळ अपवाद असतात आणि विशीच्या पुढच्या लोकांचेंहि अंग. कधी कधी फुटतें. परंतु अशीं उदाहरणें, विशेषतः मुलींचे बाबतींत, होतात की मुलीचें लग्न झाल्याबरोबर अंग फुटत नाहीसें होतें ती विधवा झाल्यास पुन्हा फुटूं लागतें, पुन्हा लग्न केल्यास पुन्हा थांबतें. तेव्हा विवाहित स्थिति हा अंग फुटण्यावर एक उपाय आहे. ब्रह्मचर्याच्या पुरस्कर्त्यांनी हें जरूर लक्षांत घ्यावें.

विवाह करण्याचा उपदेश डॉक्टर निरनिराळ्या कारणांकरता करीत असतात. समजा एक तरुण विधवा आहे. तिचे मज्जातंतु विशेष संवेदनाशील आहेत,

मूळचा चांगला स्वभाव तिरसट झाला आहे, झोंप येत नाही, आणि तिच्या डॉक्टराने पुष्कळ उपचार करूनही त्याला यश येत नाही. शेवटीं तो कंटाळून जातो आणि तिलकें धैर्य असल्यास म्हणतो, तुमचें जीवन नैसर्गिक नाही म्हणून हें सगळें होत आहे, लग्न केल्यास सगळें ठीक होईल. अर्थात ती विधवा जर म्हणाली की ' लग्न करूं ? पण कोणाशीं ? तुम्ही करतां ? ' तर डॉक्टराची पंचाईत होईल खरी.

कांही असो, पण लग्न करण्याचा उपदेश डॉक्टर पुरातन काळापासून करीत आले आहेत, आणि कधीकधी हा उपाय यशस्वी होतोहि. परंतु कधीकधी मुलें फार वाहियात होऊं लागलीं म्हणून त्यांना ताळ्यावर आणण्याकरता आईबाप लग्न करून देतात आणि त्याचा बिलकुल उपयोग होत नाही. तेव्हा वर सांगितलेला डॉक्टरहि लग्नापूर्वी इतर उपाय करून पहावे असे सांगतोच, कारण विवाह नेहमीच सुखी होतो असें नाही. आणि शिवाय विवाहाला दोन माणसें लागतात, ही अडचण आहेच. बहुतेक देशांत स्त्रियांची व पुरुषांची संख्या सारखी नसल्यामुळे हा उपाय सर्वांनी करूं म्हटल्यास जरूरीप्रमाणे एकापेक्षा अधिक बायका किंवा नवरे करण्याची परवानगी द्यावी लागेल. कांही असलें तरी अंग फुटण्यावर उपाय म्हणून सर्वांसच लग्न करतां येईल असें नाही. त्यांत पैसा, प्रेम वगैरे पुष्कळ अडचणी येण्याचा संभव असतो. तेव्हा इतर काय उपाय करतां येतील तें पाहिलें पाहिजे.

अंग फुटण्याचें मुख्य कारण म्हणजे त्वचेपाशी रक्ताभिसरण बरोबर होत नाही. हृदयांतून शुद्ध रक्त निघून सर्व शरीरांत खेळून अशुद्ध होतें व परत हृदयाकडे जातें. हृदयांतून निघणाऱ्या शुद्धरक्तवाहिन्या आणि परत जाणाऱ्या अशुद्धरक्तवाहिन्या यांना जोडणाऱ्या वाहिन्या केंसासारख्या बारीक असतात व त्या कधी आकुंचन व कधी प्रसरण पावतात. त्या आकुंचन पावल्यास रक्त त्यांत जाऊं शकत नाही, यामुळे ती जागा फिकी पडते आणि तेथे सुरया येतात. कधीं कधी यामुळेच रक्त एका जागीं सांठून राहतें आणि तेथील जागा लाल

होते. अशा रीतीने रक्ताच्या प्रवाहास अडचण झाल्यास तेथील त्वचा सुस्थितींत रहात नाही आणि फुटते. रुधिराभिसरणांतील हा दोष कधी आरोग्याचे नियम न पाळल्यामुळे येतो, परंतु कधी मानसिक कारणांनीहि येतो. यासंबंधी डाक्टर योग्य उपदेश देऊं शकेल. परंतु त्याप्रमाणे वागलें मात्र पाहिजे.

याशिवाय आणखी एक दोष म्हणजे शारीरिक उष्णतेच्या उत्पत्तींत असूं शकेल. शरीरांतील अंतःस्रावग्रंथि, विशेषतः, थायरॉइड ग्लँड, सुप्रारेनल ग्लँड, पित्ताशय व बीजकोश, यांचें कार्य जर नियमितपणे होत असेल तर शरीरास उष्णतेची कमजास्त जरूर लागेल त्याप्रमाणे ती उत्पन्न होते. परंतु ज्यांचें अंग फुटतें त्यांचा पित्ताशय बहुधा सुस्थितींत नसतो या ग्रंथींतील स्राव योग्य प्रकारचा व योग्य प्रमाणांत रक्तांत मिसळावा म्हणून स्रावयुक्त औषधें डॉक्टर देईल तीं घ्यावीं. कदाचित स्त्रियांस पुंबीजकोशाचा अर्क दिल्यास त्यांतहि आश्चर्य करण्यासारखें कांही नाही, कारण त्याचा उपयोग होतो.

सारांश तुमच्या प्रकृतीचा दोष रुधिराभिसरणांत, उष्णतेचे उत्पत्तींत आणि अंतःस्रावांत आहे. अर्थात अंग फुटण्यास थंडीचें निमित्त मात्र होतें, परंतु त्यावरहि योग्य उपाय करतां येतील. याकरता हात व पाय गरम राखावे असें सांगतात तें योग्यच आहे, परंतु त्याचा अर्थ विस्तवाजवळ शेकत बसावें असा मात्र नव्हे. सर्वांत उत्तम उष्णता म्हणजे जी आपल्या शरीरांत आपण उत्पन्न करतों ती. ही कशी उत्पन्न होते ? स्नायूंच्या आकुंचनामुळे ती मुख्यतः उत्पन्न होते, तेव्हा थंडी न वाजण्यास उत्तम उपाय म्हणजे मोकळ्या हवेंत व्यायाम करणें, आणि वर सांगितलेल्या ग्रंथि बरोबर काम करीत असल्यास ही उष्णता सर्व शरीरभर योग्य प्रमाणांत वांटली जाते. कांही कारणाने ती हातांपायांच्या टोकांपर्यंत पोंचत नसेल तर बोटांच्या हालचाली केल्याने ती तेथल्या तेथे उत्पन्न करतां येते. हालचालींने तेथे रक्त येतें आणि त्याबरोबरच उष्णता येते.

आर्यसंस्कृतिवाल्यांचें ढोंग

—*०*—

गेल्या जुलैच्या अंकांतील पत्रांत शारदाबाईनी आर्यसंस्कृतीसंबंधी प्रत्युत्तरादाखल जो मजकूर लिहिला आहे, त्यामुळे गोव्यांतील श्री. **व्यं. अ. पै. रायकर** नांवाचे एक गृहस्थ अत्यंत खवळून तेथील **भारत** पत्रांत त्यांनी आमचे विरुद्ध दोन शिमगावजा लेख लिहिले आहेत. आपण बावळट आहों हें समजण्याइतकी अक्कल बावळट मनुष्याला साहजिकच नसते व शारदाबाईनी त्यांना बावळट म्हटल्यामुळे ते इतके खवळले आहेत असें दिसतें. '**समाजस्वास्थ्यां**तील लिखाण निलाजरेपणाचें असतें व त्यास उत्तर देणें सभ्य माणसाच्या जिवावर येत असल्यामुळेंच श्री. पै हे आम्हांस उत्तर देण्यास सिद्ध झाले आहेत, असें तेच म्हणतात. स्वतः सभ्य नसल्याबद्दल त्यांनी जरी हा कबूली जबाब दिला नसता तरी देखील त्यांच्या भाषेवरून तें कोणासही सहज दिसण्यासारखे आहे. गोव्यांत वेश्यांचें पीक बरेंच आहे हें सर्वांस माहीतच आहे, त्यांच्या परिवारापासून रा. पैंनी आपली हलकट भाषा उचललेली दिसते. अशा लोकांशी आमचें संघट्टन नसल्यामुळे आम्हांस त्यांची भाषा वापरतांहि येणार नाही आणि वापरण्याची इच्छाहि नाही, तेव्हा आम्हास आमची नेहमीची सभ्य भाषाच वापरणें भाग आहे. वास्तविक आमचे नांवाने शिमगा करणारांस आम्ही उत्तर तें काय देणार ? आमची भाषा समजण्याची ताकत त्यांचेमधे दिसत नाही, परंतु इतर वाचकांकरता कांही विचार येथें मांडतों.

आर्यसंस्कृतिवाले आमचेवर इतके खवळतात कां, याची थोडी मीमांसा करणें जरूर आहे. कोणच्याही **मतांस** अश्लील म्हणणें म्हणजे शिवी देणें आहे, मग ती शिवी कायदेशीर असली तरी ती शिवीच. भाषाच अश्लील असूं शकते आणि या दृष्टीने रा. पैंनाच अश्लील म्हणावें लागेल. तथापि त्यांना जी भाषा येते ती ते लिहितात, तेव्हां त्यांनाहि दोष देण्याची आमची इच्छा नाही. येथे इतकेंच पहायचें आहे की हे लोक आम्हाला शिव्या कां देतात ?

वास्तविक 'आर्यसंस्कृति' या शब्दाचा फारसा अर्थच होत नाही. आमच्या चालू चालरीति म्हणजेच आर्यसंस्कृति, असा अर्थ एका विद्वानाने ओलेंतीचे वादाचे वेळीं दिला होता. पण याचाही कांही अर्थ होत नाही. आमच्या म्हणजे कोणाच्या? बंगाल्यांतील ब्राह्मण मासे खातात, तेव्हा ती पद्धत आर्यसंस्कृतींतच येणार. परंतु महाराष्ट्रीय ब्राह्मण त्याला आर्यसंस्कृति म्हणणार नाहीत. बंगाली ब्राह्मण आर्यच आहेत, मग असें कां? की आर्यसंस्कृति म्हणजे आमच्या (म्हणजे कोणाच्या?) प्रांतांत, शहरांत, पेठेंत किंवा घरांत चालू असलेल्या गोष्टी समजायच्या? आर्यसंस्कृति हा शब्द किती हास्यास्पद रीतीने वापरला जातो हें यावरून दिसून येईल तो तसा कां वापरला जातो? याचें कारण इतकेंच की कोणत्याही कारणाने बहुजनसमाजाला खूष करण्याची ज्याला गरज. पडते, त्याला या शब्दाचा अत्यंत उपयोग असतो कारण याने लोकांच्या डोळ्यांत सहज धूळ टाकतां येते. पारंपारिकांना स्वतःचें विचारदौर्बल्य कबूल न करण्यासही याचा चांगला उपयोग होतो. यावर भार टाकल्याने **न स्त्री स्वातंत्र्यमर्हति** वगैरे उदात्त तत्त्वांचा फायदा पुरुषांस पूर्णपणें घेतां येतो. वास्तविक पाहतां आर्य केवळ महाराष्ट्रांत, किंवा बंगालांत किंवा हिंदुस्थानांतच असतात असें नाही, तर युरोपांतील रहिवासीहि आर्य आहेत. त्यांच्या चालीरीतींना आर्यसंस्कृति कां म्हणूं नये? पण इतका विचार केल्यावर मग आर्यसंस्कृतीसंबंधी जोरदार भाषेचा प्रकाश कसा पडणार? ज्यांत फायदा नाही असा विचार करा कशाला! आर्यसंस्कृति ही झांकली मूठच असलेली बरी, ती उघडून पाहूं लागल्यास त्यांत भलभलत्या गोष्टी सांपडण्याचा संभव आहे. आपले पूर्वज आपल्यापेक्षां शहाणे होते असें सामान्यतः प्रतिपादन करण्यांत येतें, कारण पूर्वजांना आपण मोठे म्हटलें नाही तर दुसरें कोण म्हणणार? पण मग पूर्वज गोमांस खात होते तेव्हा आपण कां खाऊं नये? पातिव्रत्याचा नियम श्वेतकेतूने केला, त्यापूर्वी व्यभिचाराची परवानगी स्त्रियांसहि होती, मग ती आता कां असूं नये? श्वेतकेतूच्या मागचे आमचे पूर्वज मूर्ख होते की काय? नियोगाची शास्त्राज्ञा होती, ती आर्यसंस्कृति नव्हे काय? आमच्या प्रति-

पक्ष्यांचे म्हणणें इतकेंच दिसतें की ते म्हणतील ती आर्यसंस्कृति, आणि जास्त चिकित्सा करणें अश्लील आहे. ही अरेरावी आम्हांस कबूल नाही, आणि आर्यसंस्कृति याचा वास्तविक कांही अर्थच नसल्यामुळे, किंवा तींत व्यभिचार, गोमांसाहार वैगेरे हल्ली निषिद्ध समजलेल्या गोष्टी मुबलक सांपडत असल्यामुळे पारंपरिक लोक आर्यसंस्कृतीच्या पडद्यांत लपूं लागल्यास त्याच्या आम्ही शतशः चिंध्या करण्यास सज्ज आहों. व्यभिचारास नांवें ठेवणें म्हणजेहि आर्यसंस्कृतीलाच नांवें ठेवणें आहे, तेव्हां पारंपरिक लोकांस जर व्यभिचाराला नांवें ठेवण्याचा हक्क पोंचत असेल तर आर्यसंस्कृतीचे नांवावर विकणाऱ्या कोणत्याहि गोष्टीला नांवें ठेवण्याचा हक्क आम्हांसहि पोंचतो. युक्तिवाद करण्याची ताकद असेल तर दोन हात करण्याची आमचीं तयारी आहे. शिमगाच करायचा असेल तर खुशाल करा. ती कला आम्हास साध्य नाही.

व्यभिचारावर आम्ही लेख लिहिला त्यावेळी व्यभिचाराची हिंदुस्थानांतिल अजब कायदेशीर व्याख्या आम्हास माहीत नव्हती, आणि स्वतःच्या मताप्रमाणे, समतेच्या तत्त्वावर उभारलेली एक व्याख्या आम्ही त्याच लेखांत दिली होती, ती म्हणजे 'ज्याशीं आपला विवाह झाला नाही अशा व्यक्तीशीं विवाहित व्यक्तीचा समागम.' हिंदुस्थानांतील अजब व्याख्या आम्हास खटल्याचे वेळीं समजली ती अशी की, '**विवाहित स्त्रीचा** पतीशिवाय इतर पुरुषाशीं समागम.' येथील कायद्याने इतर कोणत्याहि प्रकारचा समागम व्यभिचाराचे सदरांत घातलेला नाही. या दृष्टीने स्वैर वागणाऱ्या कुमारिकेला किंवा विधवेला व्यभिचारी म्हणतां येणार नाही हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तेव्हा शारदाबाईना व्यभिचारी म्हणणें योग्य नाही.

खोट्या विधानांचे ढीग रचले तरी त्यांस एकाहि खऱ्या विधानाची किंमत येत नाही, शून्याला कोणत्याहि आंकड्याने गुणलें तरी शून्यच, ही गोष्ट रा. पैंच्या लक्षांत राहिली नाही असें दिसतें. ते म्हणतात, 'आजवर हिंदुस्थानांत अहर्निश प्रयत्न करणारे जे जे स्वातंत्र्यवादी देशभक्त होऊन गेले ते सर्व

आपल्या संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान वाळगणारेच होते. आणि आजहि हयात असणारे एकूंन एक देशभक्त स्वसंस्कृतीचेच एकनिष्ठ उपासकच आहेत.' याहून अधिक हास्यास्पद विधान क्वचितच सांपडेल. पहिला बाजीराव देशभक्त होता हें रा. पैहि कदाचित कबूल करतील, परंतु तोहि आर्यसंस्कृतीला कवटाळीत होता असें म्हणायचें असेल तर मस्तानीला आर्यसंस्कृति म्हणावें लागेल पेशवाईंतील सर्व वड्याबड्या देशभक्तांना आपआपल्या ऐपतीप्रमाणे अनेक बायका होत्या इतकेंच नव्हे तर रखेल्याहि होत्या. पेशवाई सोडून अलीकडील देशभक्त घेतले तर त्यांत व्यभिचार करणारांचीं अनेक नांवें सांगतां येतील. या बाबतींत विद्याभूषण तांबेशास्त्री म्हणतात, ' परस्त्रीस आपले गाडींत घेवून मिरवत जाणाऱ्या पाजी देशभक्ताने लक्ष्मणापासून नीतिमत्ता शिकावी ' (सरहस्य रामायण भाग २ रा, पान ६७). तेव्हा देशभक्तांच्या आर्यसंस्कृतीच्या गप्पा रा. पैच्या गप्पांपेक्षा जास्त किंमतीच्या नाहीत.

आम्हास प्रसिद्धीसच यायचें होतें तर पित्याची पुण्याई लाभलीच होती, तेव्हा स्वतः कांही न करतां पित्याचेच नांवावर आम्ही विकावयास पाहिजे होतें असें पैचें म्हणणें आहे रा पैंच्या इतका नेभळटपणा आमच्या अंगीं असता तर तसेंहि केलें असते, परंतु आम्हास त्याचें कारण पडलें नाही.

आमच्या दुष्कृत्यांबद्दल आम्हांस सरकारी नोकरींतून खो मिळाला, असें पै म्हणतात खोटें बोलण्याचा त्यांचा अट्टाहासच दिसतो, तेव्हा त्यांना खरें सांगण्यांत अर्थच नाही. परंतु आम्हीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला त्या वेळीं तो ' बॉंबे क्रॉनिकल् ' पत्रांत सविस्तर छापलेला होता (१९२१) व त्यांत सरकारचा दोष सिद्ध केलेला होता, हें इतरांचे माहितीकरता सांगतों.

दुसऱ्यावर खोटे आरोप करून व शिव्या देवून आपल्या बाजूचें समर्थन करणाऱ्यां रा. पैंना काय किंमत द्यायची हें वाचकांस समजेलच.

आम्ही पूर्वी म्हटलेंच आहे की असे लोक आमचे विरुद्ध लिहितात हें आम्हास भूषणच आहे. नोबेल प्राइझ मिळवलेला प्रसिद्ध फ्रेंच लेखक **ॲनॅटॉल**

फ्रांस एके ठिकाणीं म्हणतो की 'पोक्त टीकाकार एखाद्या लेखावर तुटून पडले तर तें सुचिन्ह समजावें. त्यांस पसंत पडलेल्या लेखांत कांहीच अर्थ नसतो, पण ते जर एखाद्या लेखाने खूप चिडले तर नक्की समजावें की तो खरोखरच वाचनीय असून त्यांत कांही तरी नाविन्य आहे.'

अश्लीलतेचें आणखी एक दालन

———*०*———

लेखकः—**प्रो. वा. वा. सांवर्डेकर.**

ओलेतीच्या चित्रावरून मागे अश्लीलतेचा कडाक्याचा वाद माजला होता. यंदाच्या व्याख्यानमालेंत त्याचा प्रतिध्वनि उमटून प्रो. मा. दा. आळतेकर यांनी पूर्वपक्ष व श्री. तात्यासाहेब केळकर यांनी उत्तरपक्ष केला. दरम्यानच्या काळांत अश्लीलतेच्या व्याख्याहि भरपूर झाल्या व मुलें आणि स्त्रिया यांच्यासह वाचतां किंवा पाहतां येत नाही तें अश्लील समजावें असेंहि पुष्कळ साहित्यसेवकांनी सुचविलें.

आम्हाला या वादांत मुळीच तथ्य दिसत नाही. कारण तो संवयीचा प्रश्न आहे. पण ज्यांना ही अश्लीलता दिसते त्या पारंपरिक लोकांनी धार्मिक संस्थां-सभोंवती अश्लील दृश्यें व नंग्या बैराग्यांच्या मिरवणुका मारे जाहिराती लावून कां काढाव्या या प्रश्नाचा थोडासा उलगडा झाला तर पहावा याच हेतूने प्रस्तुत ओळी लिहीत आहें.

सिंहस्थाच्या प्रसंगीं जेथे नंग्या बैराग्यांच्या मिरवणुकी खास सरकारी परवानगीने व केसरीसारख्या पुराणमतपुरस्कर्त्या वर्तमानपत्रांतून जाहिराती फडकवून काढण्यांत आल्या, त्याच त्र्यंबकेश्वरची गोष्ट. १९३० च्या एप्रिल महिन्यांत आम्ही त्र्यंबकेश्वर येथे गेलों होतो. तेथे गोदावरीच्या कुंडाच्या उजव्या

हातासच अगदी कोंपऱ्यावर गौडसारस्वत ब्राह्मणांचे उपाध्ये आहेत. त्यांच्याकडे उतरलों होतो. माडीवर ढेकणांचा भयंकर त्रास होत होता. भरदुपारीं ते रुधिर-प्रिय प्राणी मुंग्यांच्या थव्याप्रमाणे आमच्यावर चाल करून येत होते. त्यांचा त्रास चुकवण्याकरता आम्हाला बराच वेळ माडींत उभ्याने काढावा लागला. अर्थातच खिडकींत उभे राहून तो वेळ आम्ही, घराला अगदी लागूनच, कुंडाच्या उजव्या कोपऱ्यावर असलेल्या, श्री गोदावरीच्या मंदिराच्या निरीक्षणांत घालविला. हें मंदिर उपाध्यांच्या घराच्या डाव्या बाजूस पांच सहा फुटांच्या अंतरावर आहे. मंदिराचा जो भाग घरासमोर आला आहे त्याच्या मधोमधच कोनाड्यांत एक देवाची मूर्ति आहे व कोनाड्याच्या डाव्या उजव्या बाजुस समांतर अशा बऱ्याच मूर्ति आहेत. त्यांत एका बाजूला सुमारें फूट दीडफूट उंचीची नग्न स्त्रीची मूर्ति व दुसरीकडे तेवढीच नग्न पुरुषाची मूर्ति आहे व विशेष कौतुकाची गोष्ट ही की कोनाड्याच्या वरच्या बाजूसच दुसरा एक लहान कोनाडा आहे त्यांत मैथुनांत असलेल्या विवस्त्र जोडप्याचें लहानसेंच, सुमारें एक फूट लांबीचें, कोरीव चित्र आहे. आणि तें देवीच्या मूर्तीच्या अगदी मस्तकावरच आहे.

याचा उलगडा व्हावा म्हणून मुंबईत आमचे एक आर्टिस्ट मित्र आहेत त्यांना प्रश्न केला, तेव्हा त्यांनी याविषयी आणखीही बरीच माहिती दिली, तिचा पडताळा पहाण्यासाठी आम्ही गोमांतकांत बहुतेक सारीं देवळें हिंडलों. गोमांतकांत प्रत्येक देवळाचा रथोत्सव होत असतो. प्रत्येक देवाच्या सांपत्तिक स्थितीप्रमाणे हे रथ देखील १५ ते ३० फूट उंचीचे असतात. त्यांचीं चक्रेंच जवळजवळ सहा फूट उंचीचीं असतात. या रथांवर नारळ मारून फोडण्याचा प्रघात असतो. रथाच्या ज्या तुळईवर हे नारळ मारतात, ती तुळई व तिला जोडलेल्या इतर तीनहि बाजूंच्या तुळया मिळून होणारी सारी चौकट कोरीव चित्रांनीं भरलेली आहे. हीं सर्व चित्रें विवस्त्र तर आहेतच, पण तीं कामशास्त्रांतील एकंदर आसनांचींच नव्हेत, तर लैंगिक दुष्प्रवृत्तींचीं, म्हणजे अश्लील भागांचीं चुंबनें, मुष्टिमैथून, समसंभोग, पशुसंभोग अशा विषयांवर देखील आहेत.

म्हाडदोळ–गोवा येथे असलेल्या म्हाळशेच्या देवालयाचें शिल्पकाम जुन्या भारतीय धर्तीचें आहे. पावणेतीन फूट व्यासाच्या कोरींव लांकडी खांबावर-देवळाचें छप्पर आधारलेलें आहे व वरचीं तुळवंडें व बाजूचे भागहि कोरींव लांकडाचेच आहेत. देवळाच्या बाजूचे सोपे लांकडी फळ्यांचे असून ते आडव्या तुळयांवर खिळ्यांनीं पक्के बसवलेले आहेत. ह्या एकंदर कोरींव कामांत ठिकठिकाणी वर सांगितल्याप्रमाणे विवस्त्र व कामशास्त्रांतील चित्रें आहेत. विशेषतः सोप्यांचे फळे ज्या आडव्या तुळयांवर पक्के बसवलेले आहेत, त्या तुळयांचा फूट दीड फूट लांबीचा तुकडा देवळाबाहेर सोडला आहे, त्यांवर हीं चित्रें दरोबस्त आहेत.

या चित्रांचें रहस्य काय असावें हा मात्र विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हा प्रश्न इतिहाससंशोधकांपुढे ठेवण्यासारखाच आहे. 'समाजस्वास्थ्य' हें अशा प्रश्नांच्या उलगड्यास वाहिलेलें नाही. परंतु इतर मासिकांकडे पाठवावें तर पारंपरिक पूर्वग्रहांमुळे ज्यांची मतें दूषित झालीं आहेत असे त्यांचे संपादक हा लेखच दडपून टाकून प्रसिद्ध करणार नाहीत, याचसाठी तो आपणाकडे पाठवीत आहे.

शास्त्रीबुवांशीं संवाद-२.

—*०*—

—कांहो, धार्मिक लोक सगळेच मूर्ख असतात असें तुमचें म्हणणे आहे की काय? धार्मिक लोकांतहि अनेक विद्वान्, तत्त्वज्ञ आणि युक्तिवादांत पारंगत लोक होऊन गेलेले आहेत आणि अजूनहि आहेत.

—धार्मिक लोक सगळे मूर्ख असतात असें मी कधीहि म्हटलेलें नाहीं. परंतु तुमचें म्हणणें काय, की अमुक विद्वान मनुष्य धार्मिक आहे म्हणून त्याचा धर्म खरा मानावा? तसें असेल तर सर्वच धर्म खरे मानावे लागतील, कारण सर्व धर्मांत विद्वान लोक आहेत.

—कां होईना ? पण ईश्वर तर सर्व धर्मांत आहेच की नाही ? तेव्हा पुष्कळ विद्वानांना ईश्वराचें अस्तित्व मान्य आहे, असें नाही का होत ?

—बौद्ध धर्मात ईश्वर नाही, पण समजा पुष्कळ विद्वानांना ईश्वराचें अस्तित्व मान्य आहे, तरी त्यावरून काय होतें ? मनुष्य विद्वान असला म्हणजे तो म्हणेल तें सर्व खरें असतें असें थोडेंच आहे ? ज्यांना खरोखर युक्तिवाद करतां येतो, असे लोक देखील नेहमी युक्तिवाद करतातच असें नाही. विद्वान मनुष्याने जर युक्तिवादाने ईश्वर सिद्ध केला, तर तो युक्तिवाद मी तपासून पाहीन आणि तो मला पटला तरच स्वीकारीन, एरवी नाही. उदाहरणार्थ इंग्लंदांत ग्लॅडस्टनसारख्या मनुष्याने असें प्रतिपादन केलें की बायबलांत सांगितल्याप्रमाणे ईश्वराने जग सहा दिवसांत उत्पन्न केलें आणि थकल्यामुळे सातव्या दिवशीं विश्रांति घेतली. ग्लॅडस्टनच्या विद्वत्तेवर हा मूर्खपणा खरा मानायचा की काय ? यावरून इतकेंच दिसतें की विद्वान लोकहि धर्मामुळे मूर्ख होतात. बायबलांत सांगितलें आहे की ईश्वराने अगोदर उजेड उत्पन्न केला आणि नंतर दिवस आणि रात्र उत्पन्न करून दिवसा प्रकाशण्याकरता सूर्य आणि रात्री प्रकाशण्याकरता चंद्र उत्पन्न केला ! हा तुमचा धर्म नसल्यामुळे याला तुम्ही हंसतां. पण तुमच्या धर्मांतहि इतकाच वावळटपणा आहे. कित्येक आधुनिक शास्त्रज्ञहि धार्मिक असतात हें खरें, परंतु धर्म युक्तिवादास धरून आहे असें तेहि म्हणत नाहीत. एक प्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ म्हणत असे की ' जेव्हा मी अभ्यासाच्या खोलींत जातों, तेव्हा धर्म दरवाजाबाहेर ठेवतों '. धर्माने शास्त्रीय ज्ञान संपादन करण्यास अडथळा होतो अशी स्पष्ट कबुली या शब्दांत आहे.

—ते ख्रिस्ती लोक सोडून द्या हो ! पण आपल्यांत न्यायमूर्ति रानड्यांसारखे विद्वान लोक धार्मिक होते की नाही ? केरोपंत छत्रे दररोज विष्णुसहस्रनाम म्हणत होते की नाही ? ते काय मूर्ख समजायचे ?

—ते मूर्ख नसतील. पण मनुष्य धर्मावर विश्वास ठेवूं लागला म्हणजे त्याची विचार करण्याची शक्ति तेवढ्यापुरती तरी नाहीशी झाली. कारण विचार

करून धर्माविरुद्ध अनुमानें निघाल्यास तें पाप होईल. म्यामुळे धार्मिक गोष्टींबद्दल चर्चाच बंद होते. या बाबतींत पोपने जें कॅथोलिक धर्मासंबंधी गेल्या शतकाच्या शेवटी सांगितलें तेंच धार्मिक दृष्टीने योग्य आहे. तो म्हणाला ' श्रद्धा ही युक्तिवादापेक्षा श्रेष्ठ आहे. वास्तविक श्रद्धा आणि युक्तिवाद यांत विरोध असणें शक्यच नाही, कारण एकाच ईश्वराने दोन्ही उत्पन्न केलीं. तेव्हा प्रत्यक्ष ईश्वरप्रणीत जें धार्मिक सत्य, त्याविरुद्ध कोणी कोणतेंहि विधान केल्यास तें खोटेंच असलें पाहिजें. तेव्हा मी सर्व कॅथोलिक लोकांस हुकूम करतों की त्यांनी शास्त्राच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या सबबीवर धर्माविरुद्ध कोणतेंहि विधान करतां कामा नये व अशा विधानावर विश्वास ठेवतां कामा नये. ' खरें पाहिलें असतां धार्मिक लोकांना असें म्हटल्याशिवाय गत्यंतरच नाही. कांही आधुनिक शास्त्रज्ञ धर्मावर विश्वास ठेवतात, पण ते आपल्या डोक्यांत विज्ञानाची व धर्माची भेट होऊं देत नाहीत. धार्मिक गोष्टी खऱ्या की खोट्या याचा विचारच करायचा नाही, तर मग त्यांच्या धार्मिक मताला इतरांपेक्षा जास्त किंमत कां द्यावी ?

—पण निदान ज्यांनी धर्मासंबंधी खोल विचार केलेला आहे अशा विद्वानांचें मत घ्यायला काय हरकत आहे ?

—तरीदेखील केवळ ते म्हणतात म्हणून कोणतीहि गोष्ट कबूल करतां कामा नये. विशेषतः ती जर असंभवनीय वाटणारी गोष्ट असेल तर ती बारकाइने तपासली पाहिजे. आणि धार्मिक गोष्टी नेहमीच अशा असतात.

—धार्मिक लोक खोटें बोलतात असें तुमचें म्हणणें आहे की काय ?

—तसें नव्हे, पण त्यांची विचार करण्याची पद्धतच कांही वेगळी असते. त्यांचें तर्कशास्त्रच वेगळें. आम्हाला ज्या गोष्टी स्पष्ट परस्परविरोधी दिसतात त्यांचें त्यांना कांहीच वाटत नाही उदाहरणार्थ ईश्वराला सर्वशक्तिमान आणि दयाळू म्हणणें. आणि इतर धर्मातील ज्या गोष्टींना ते हंसतात, तसल्याच गोष्टी स्वतःच्या धर्मांत मात्र त्यांना पसंत असतात ! बायबलांतल्या विचित्र गोष्टी ऐकून तुम्हांला

हंसूं येतें, पण पुराणांतल्या गोष्टी मात्र तुम्ही खऱ्या मानतां ! मग अरबी भाषेंतील सुरस गोष्टी कां खऱ्या नाहीत ?

शिंकेचा शकुन

—:•:—

ज्या वेळीं धार्मिक वेडगळपणाचें जिकडे तिकडे साम्राज्य होतें, त्यावेळीं शिंकेचें महत्त्व फार असे, व अमुक वेळीं इतक्या शिंका आल्यास तें कशाचें चिन्ह असेल याविषयीं अनेक तर्क चालत. युरोपांत इतर लोकांच्या देखत कोणी शिंकल्यास 'ईश्वर तुझें कल्याण करो' असे म्हणण्याची चाल असे, यामुळे मंडळींत बसलें असतां शिंक आल्यास नीट शेजाऱ्याच्या तोंडावर शिंकावें, म्हणजे तो वरीलप्रमाणे ईश्वराची प्रार्थना करील आणि आपलें कल्याण होईल, असें १७व्या शतकांतील एका इंग्रजी पुस्तकांत सांगितलेलें आहे. आणि असा आशीर्वाद देण्यास जवळ कोणी असावें हा विवाहाचा एक उपयोग समजत. ही चाल आता हळूहळू नाहीशी होत चालली आहे, तरीपण कोणी शिंकल्यास वरीलप्रमाणे म्हणावें असें शिष्टाचारांच्या पुस्तकांत अजूनहि आढळतें.

परंतु रोगजंतूंचा शोध लागल्यापासून एक नवीन भीति उत्पन्न झाली, आणि आता शिंकणाराला जरी कोणी आशीर्वाद दिलाच तरी मनांतून तो शिव्याच देणार. कारण शिंकतांना तोंडांतून जी हवा जोरानें बाहेर जाते, तीबरोबर नाकांतील आणि तोंडांतील ओलाव्याचे असंख्य कण बाहेर उडतात आणि जर त्यांत रोगजंतु असतील तर ते इतरांच्या नाकातोंडांत हवेबरोबर जातील, तेव्हा लोकांनी शिव्या कां देऊं नये ? कोणी म्हणेल की हवेंत अगोदरच काय थोडे जंतु असतात, आणि शिंकल्याने त्यांत कितीसा फरक पडणार आहे ? परंतु त्यांत फरक आहे, हवेंत जे धुळीचे कण उडत असतात त्यांना चिकटलेले रोगजंतु असणें शक्य आहे, परंतु ओलाव्याशिवाय फारसे जंतु जगतच नाहीत

शिंकेचा शकुन

ही एक गोष्ट आणि ते जोराने फेंकले जात नाहीत ही दुसरी. शिंकतांना ताजे जिवंत ओले जंतु जोराने फेंकले जातात, तेव्हां ते कोठपर्यंत पोंचतील हें सांगणें कठीण आहे. तेव्हा आता चारचौघरांत बसलें असतां होतां होईल तों शिंकूं नये. आणि नच राहवल्यास निदान तोंड एका बाजूला फिरवावें व शक्य अस-ल्यास तोंडावर रुमाल धरावा हें नीतिमान मनुष्याचे काम आहे.

भलत्याच वेळीं शिंक येऊं लागल्यास ती न येऊं देण्यास काय करावें असें साहजिकच मनांत येईल आणि याकरता अनेक रीति अनेकांनी सुचवलेल्या आहेत. एक म्हणतो, पायाला गुदगुल्या कराव्या. हो, पण पायांत बूट असल्यास हें शक्य नसतें आणि चारचौघांत बरेंहि दिसणार नाही. कोणी म्हणतो की जांभई द्यावी, आणि थोडा प्रयत्न केल्यास पाहिजे तेव्हा जांभई देतां येते. पण दुसरा कोणी बोलत असतां जांभई दिली तर त्याला काय वाटेल? कोणी म्हणतो शीळ घालावी, तरीपण लोक काय म्हणतील हा प्रश्न आहेच. याकरता एकाने असा उपाय सुचवला आहे की गाल शक्य तितके फुगवून तोंडाला अगदी बारिक भोंक ठेवून त्यांतून जोराने हवा सोडावी, म्हणजे शीळ घालण्याचें काम होईल. पण कोणीं पाहिलें तर तें कसें दिसेल? एका डाक्टराने यावर असेंहि म्हटलें आहे की हें जरी वाईट दिसेल तरी शिंक येऊं लागल्यास असें करण्याची चाल पडल्यास सर्वच तसें करतील आणि त्याचा अर्थ लोकांना समजेल.

वाईट दिसो की चांगलें दिसो, या मार्गांनी शिंक जाते हें खरें, कारण शिंक येतांना एकदम पुष्कळ हवा आंत जाऊन ती एकदम बाहेर पडते, त्याऐ-वजी वरील कोणत्याहि रीतीने ती सावकाश आंत जाऊन सावकाश सोडली जाते. शिंक येण्याचें कारण म्हणजे हवेंतील कोणत्यातरी प्रकारचे कण नाकांत शिरून त्रास झाल्यामुळे ते एकदम बाहेर फेंकण्याची व्यवस्था होते. अर्थात नाकाचे आंतील त्वचेची सुस्थिति नसल्यास क्षुल्लक कारणाने शिंका येतात. हवेच्या उष्ण-तेंत किंचित फरक पडल्याने किंवा उन्हांतून सावलींत किंवा सावलींतून उन्हांत गेल्यानेही शिंका येतात, किंवा एकदम उजेड पडल्यानेहि येतात. नाकांत कांही

शिरण्याचा संभव असेल तेव्हा नाक दाबून धरणें हा एक उपाय आहे, परंतु हल्ली पुष्कळ स्त्रिया पावडर किंवा सेंट लावतात, त्याच्या वासानेहि शिंक येणें शक्य असतें. अशी एखादी स्त्री जवळ आल्याबरोबर नाक दाबून धरल्यास तें फारच वाईट दिसेल. तेव्हा दुसरा कांही उपाय काढला पाहिजे. स्वतःला चिमटा घेतल्याने किंवा नखाने तळहातावर दुखेपर्यंत दाबल्यानेहि काम होतें, कारण तिकडे लक्ष लागल्याने श्वासांत फरक पडतो. परंतु इतकाहि त्रास करण्याचें कारण नाही. ॲरिस्टॉटल म्हणतो की नाक किंवा डोळे चोळावे, कोणी म्हणतो एक डोळा दाबून धरावा, किंवा दांत घट्ट आवळावे किंवा मान लांब करावी, वगैरे. ऐकून हंसूं येईल, परंतु याने काम होते खरें. तें कसें होते ? त्याचें कारण इतकेंच की यापैकी कोणतीहि गोष्ट मनःपूर्वक केल्यास तिकडे लक्ष लागल्याने श्वास बंद होतो, आणि शिंकेला पुरेशी हवा आंत जात नाही. मग इतकें सगळें करण्यापेक्षा श्वासच बंद केला तर ? तरीही काम होईल, कारण वरील सर्व रीतींत हीच मुख्य गोष्ट आहे. पण शिंक येत असतांना ती बंद करणें हितावह आहे काय, हा प्रश्न आहेच.

रंगभूमीवर मुख्य पात्रांना जर भलत्याच वेळीं शिंक येईल तर प्रेक्षकांत भलत्याच वेळीं हास्यरस उत्पन्न होऊन नाटकाचा बेरंग होईल एखाद्या नटाला कपाटांत लपून राहण्याचा प्रसंग आल्यास तेथे शिंक येऊन चालणार नाही. शत्रूच्या गोटांत टेहळणीस जाणाराला शिंक आली म्हणजे कामच भागलें. अशा वेळीं शिंक येतांच कामा नये, मग काय पाहिजे तें होवो. पण सामान्यतः मनुष्य अशा स्थितींतच असतो असें नाही. घरांत एकटें बसलें असतां खूप जोराने शिंकण्यांत इतकी मजा असते की ॲरिस्टॉटलच्या म्हणण्याप्रमाणे त्याने शरीराच्या प्रत्येक भागास आल्हाद होतो, आणि येऊं घातलेली शिंक न आल्याने किती त्रास होतो याचा सर्वांना अनुभव आहेच. चार चौघांत शिंकून सर्वांवर तुषार उडविणें बरें नाही हें खरें, तथापि जवळ हातरुमाल बाळगून शिंक आल्यास तोंड बाजूला करून, तोंडापुढे रुमाल धरून शिंकल्यास त्यापासून लोकांस त्रास

होण्याचें कारण नाही. असें केल्यास विशेष कारणाशिवाय शिंक थांबवणेंही इष्ट नाही.

शास्त्रीबुवांशीं संवाद-२

—विद्वान लोक धार्मिक बाबतींत कधी कधी किती मूर्ख असतात याची तुम्हांला बरोबर कल्पना आलेली दिसत नाही, मी तुम्हाला कांही उदाहरणें देतों. **स्ट्राउस** नांवाच्या एका प्रसिद्ध टीकाकाराने लिहिलें आहे की येशू ख्रिस्ताचा कुमारीपासून जन्म, त्याने केलेले चमत्कार, त्याचें पुनरुज्जीवन आणि सदेह स्वर्गारोहण वगैरे गोष्टी ऐतिहासिक दृष्ट्या कितीहि संशयात्मक असल्या, तरी पारमार्थिक दृष्टीने खऱ्याच आहेत.' **न्यूटन** नांवाचा जो प्रसिद्ध गणिती इंग्लंदांत होऊन गेला, तो एकदा असें म्हणाला की 'धर्मेतर विषयांवरील कोणत्याहि ग्रंथापेक्षा बायबलाच्या सत्यतेबद्दल मला जास्त पुरावे दिसतात.' या बाबतींत न्यूटनने अक्कल गहाण ठेवली होती असें आम्ही कां म्हणूं नये ? **पॅस्कल** नांवाच्या फ्रेंच विद्वानाने लिहिलें आहे की 'ईश्वरप्रणीत गोष्टी खऱ्याच असल्या पाहिजेत. त्या सरळ खोट्या दिसत असल्या तरी त्या आध्यात्मिक दृष्टीने खऱ्या आहेत.....कांही लोकांनी कल्पनेने खोटेच चमत्कार लिहून ठेवले असतील, पण कांहीतरी खरे चमत्कार झाले असले पाहिजेत, म्हणूनच खोट्यांची कल्पना करतां आली...एखादा तरी धर्म खरा असला पाहिजे, म्हणूनच इतके खोटे धर्म उत्पन्न झाले.' **टर्टुलिअन** नांवाच्या एका विद्वानाने लिहिलें आहे की 'येशू ख्रिस्त हा ईश्वराचा मुलगा असूनहि मेला. हें हास्यास्पद आहे, परंतु म्हणूनच त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. तो पुन्हा जिवंत झाला, हें अशक्य दिसतें, म्हणून तें खरेंच असलें पाहिजे.'

—पण याचा कांही अर्थ होतो का ?

—पुढे ऐका. **गिय्यो** नांवाच्या एका लेखकाने लिहिलें आहे की कारण नसतां जी श्रद्धा बसेल तीच खरी श्रद्धा. कारण जितकें कमी, तितकी श्रद्धेची दृढता अधिक लागेल.

—पण असें पहा, तुम्ही युक्तिवाद, युक्तिवाद एकसारखें म्हणत असतां. तुमची अशी कल्पना आहे का, की युक्तिवादाने सर्वच गोष्टी कळतात ?

—मी तसें म्हणत नाही, पण ज्या गोष्टी निरीक्षणाने आणि तर्कवादाने कळत नाहीत, त्या कशानेहि कळणें शक्य नाहीं.

—कां बरें नाही ? श्रद्धेने पुष्कळ गोष्टी कळतात. ईश्वरावर श्रद्धा ठेवली म्हणजे अंतर्ज्ञान प्राप्त होतें.

—अहो, श्रद्धा ठेवणें याचा अर्थ तुम्हाला कळतो का ? जी गोष्ट आपल्याला तर्कवादाने खरी दिसते त्यावर श्रद्धा ठेवण्याचें कारण नसतें. परंतु ज्या गोष्टी आपल्याला खोट्या दिसतात त्या जर आपण खऱ्या मानल्या तर ती श्रद्धा झाली. हा कागदाचा तुकडा चौकोनी आहे हें आपल्याला दिसतेंच आहे, त्याला चौकोनी म्हणणें म्हणजे खरें बोलणें आहे, ती कांही श्रद्धा नव्हे. पण तो चौकोनी दिसत असतां जर आपण तो वाटोळा मानला, तर ती खरी श्रद्धा ! हें खरें की नाही ?

—नाही. धडधडीत खोट्या गोष्टींना खऱ्या म्हणायला तुम्हाला कोणी सांगत नाहीं. पण ज्या गोष्टी तुम्हाला युक्तिवादाने कळणें शक्य नाही, अशा गोष्टींत श्रद्धा ठेवायला काय हरकत आहे ?

—हरकत आहे. आम्हांला हल्ली सर्व गोष्टी कळत नाहीत हें खरें, आणि असेंहि पाहिजे तर म्हणूं की कांही गोष्टी कदाचित कधीहि न कळण्यासारख्या असतील. पण त्यासंबंधी अमुक प्रकारची श्रद्धा ठेवा असें तुम्ही कोण मला सांगणार ? ज्या गोष्टी अज्ञात आहेत, त्यांसंबंधी मला वाटेल ती कल्पना करण्याची मुभा आहे, तेथे श्रद्धा ठेवणें हा मूर्खपणा आहे. आत्मज्ञान वगैरे गप्पा मी ऐकणार नाही. तुम्ही ज्याला आत्मज्ञान म्हणतां ती आत्मवंचना

कशावरून नाही ? कितीहि मोठा विद्वान असला तरी त्याचे बाबतींत आत्मवंचना शक्य असते, आणि हें ज्याचें त्याला कधीहि कळत नाही, हें वर सांगितलेल्या विद्वानांच्या उदाहरणांवरून दिसतें. तेव्हा श्रद्धा म्हणजे बेअकलीपणा आहे. तुमच्याजवळ पुरावा असल्यास पुढे आणा. आम्ही तो तपासून पाहूं आणि काय तें ठरवूं. तेथपर्यंत नुसत्या गप्पांचा आमचेजवळ कांही उपयोग नाही. उद्या तुम्ही म्हणालांत की चंद्रावर एक मनुष्य आहे, त्याला तीन मैल लांब दाढी आहे. आम्ही म्हणूं पुरावा आणा, तेथपर्यंत तुमच्या म्हणण्याचा विचार करण्याचें कारण नाही.

ब्रह्मचर्याचें खूळ

पुस्तकपरीक्षण

ब्रह्मचर्याश्रम, लेखकः स्वर्गीय कृ. ना. आठल्ये व डॉ. अ. वि. केतकर. प्रकाशक, श्री. ना. बा. चव्हाण, ज्ञानमित्रपुस्तकमाला, पृष्ठसंख्या ७६, किं. ८ आ.

कोणीहि लेखक खरोखर धार्मिक असो किंवा धर्माचें ढोंग करीत असो, त्याला वेड लागल्याप्रमाणेच विधानें करावीं लागतात, आणि तसेंच प्रस्तुतच्या दोन्ही लेखकांनी केलेलें आहे. यांपैकी पहिल्या लेखकास आधुनिक ज्ञानाचा गंधहि दिसत नाही, आणि दुसऱ्यास तो थोडासा असल्यामुळे त्याने पारंपारिक मतांवर शास्त्रीय मुलामा चढवण्याचा प्रयत्न केला आहे, यामुळे दुसरा भाग बेगड लावलेल्या शेणाच्या नारळाप्रमाणे झाला आहे, आणि पहिल्या भागाला ती बेगड देखील नाही.

पहिल्या लेखकाने विचार न करण्याची प्रतिज्ञाच जाहीर रीतीने केलेली आहे, तेव्हा त्यासंबंधी विशेष लिहिण्याचेंच प्रयोजन नाही. ते म्हणतात, 'पाश्चिमात्य लोक म्हणा, किंवा त्यांच्या वाङ्मयांत तल्लीन झालेले आमचे लोक म्हणा, ह्यांनी कांही जरी म्हटलें तरी, आमच्या प्राचीन श्रुतिस्मृतिकार पूर्वजांनी आचारविचारासंबंधाने सामाजिक बाबतींत जे नियम घालून दिले आहेत, ते

ह्ली सुधारलेल्या म्हणविणाऱ्या राष्ट्रांच्या अगदी तंतोतंत तोडीचे किंबहुना अधिकच दूरदर्शीपणाचे आहेत, यांत आम्हांला तर तिळमात्र संशय वाटत नाही. ' **तातस्य कूपोऽयं** म्हणून खारें पाणी पिणाऱ्या या कापुरुषाचीं मतें हास्यास्पद असल्यास नवल नाही. तीं किती हास्यास्पद आहेत याचीं कांही उदाहरणें देतों. पुस्तकाच्या प्रारंभीं लेखकाने किंवा प्रकाशकाने महात्मा गांधींचीं कांही मूर्खपणाचीं वाक्यें दिलीं आहेत. ' अनत्याचाराच्या उपासकाने विवाहित होऊं नये...तर मग विवाहित मनुष्यास सत्याचा साक्षात्कार कधीच होणार नाही काय ? विवाहितांनी अविवाहितांप्रमाणें वर्तन ठेवावें...' महात्मा विवाहित असून त्यांनी अविवाहितांप्रमाणे वर्तनहि ठेवलेलें नाही हें सर्वांस माहीतच आहे. म्हातारपणीं लोकांस उपदेश करणें सोपें असतें.

या पुस्तकाच्या दोन्ही लेखकांनी, अज्ञानाने म्हणा, किंवा असत्यानेहि ब्रह्मचर्याचा पुरस्कार करणें श्रेयस्कर वाटल्यामुळे म्हणा, खोट्या विधानांची रेलचेल केलेली आहे, आणि दुसऱ्या लेखकानेच पहिल्याचीं कांही विधानें खोटीं ठरवलीं आहेत. प्राचीन लोकांबद्दल सोयीस पडेल तशीं खोटीं विधानें पाहिजे त्यास करतां येतात, कारण त्यासंबंधी कोणासच माहिती नसते, परंतु वस्तुतः प्राचीन लोक जरी आमचे पूर्वज असले तरी ते कोणत्याहि बाबतींत आमचेपेक्षा श्रेष्ठ होते असें मानण्यास कोणत्याहि प्रकारचा आधार नाही, तेव्हा ' सर्वांपेक्षा विद्यार्थी वर्गाने ब्रह्मचर्यव्रत पाळणें अत्यंत अवश्य आहे, हें प्राचीन धर्मकारांनी ठरवलेलें तत्त्व सांप्रतहि सर्वांस मान्यच आहे, पण पूर्वी तें विशेष कडक रीतीने पाळीत असत आणि सांप्रत तें तितक्या कडक रीतीने पाळलें जात नाही ' हें १९ पानावरील विधान प्रथमपासून अखेरपर्यंत खोटें आहे. पुरुषाच्या अंगांत वीर्याचा सांठा असून तें रक्तांत खेळत असतें, हें विधान दुसऱ्या लेखकानेच खोडलेलें आहे.

पान २१. शरीरांत वयोमानाप्रमाणें वीर्योत्पत्ति पुरती झाली न झाली, तोंच कामविकाराचा प्रादुर्भाव होऊं लागतो. ह्याकरता त्याचवेळीं तो न होऊं

देण्याविषयी फार खबरदारी घेतली पाहिजे.' मलेरिआचा ताप अंगांत चढूं लागला म्हणजे तो न चढूं देण्याची खबरदारी घेणेंहि एकवेळ सोपें होईल परंतु, मनांत उत्पन्न होणारी इच्छा न होऊं देण्याची रीत आजतागायत कोणासहि माहीत नाही, तेव्हा असा निरर्थक उपदेश करण्यांत पुण्य लागतें म्हणून करायचा काय ?

पान ३४-३५. धार्मिक लोक वेड लागल्यासारखें लिहितात असें जें आम्हीं म्हटलें आहे, त्याचें उत्कृष्ट उदाहरण पहा. 'जेवणाचा मुख्य नियम हा की अन्नांत आवडनिवड असूं नये, जें पानावर पडेल तें खावें. म्हणजे त्यांत सर्व कांही आलें. नेहमी सात्विक आहार ठेवावा. तळकट, तेलकट, आंबट पदार्थ वर्ज्य करावेत. जेवणांत तूप, दूध, दही बाताबेताचें खावें. जास्त खाल्ल्यास अंगी जडत्व येण्याचा संभव असतो. जेवणांत पालेभाज्या विशेष खाव्या.' आपल्या लिहिण्याचा कांही अर्थ होतो की नाही, किंवा परस्परविरोधी विधानें एकमेकांच्या फार जवळ येतात की काय, हेंहि पाहण्याचें यांस सुचलें नाही. पानावर पडेल तें जर खायचें, तरमग वाकीचा उपदेश कसा पाळतां येईल ? हें बरळणें आहे, समंजस लेखन नव्हे. कामविकार ताब्यांत ठेवण्याकरता लंगोट. गच्च आवळून निजण्याचाहि उपदेश ४२ पानावर आहे. लंगोटाचा इष्ट परिणाम तर होत नाहीच, पण कोणतेंहि वस्त्र गच्च आवळून नेसणें हें आरोग्याच्या दृष्टीने अनिष्ट आहे.

असल्या लेखांवर टीका करणें म्हणजेहि वेळाचा अपव्ययच आहे, तेव्हा मूर्खपणाचा कळस म्हणून शेवटीं ब्रह्मचाऱ्यांकरता २१ सूत्रें दिलीं आहेत त्यांकडे ओझरती नजर टाकून दुसऱ्या भागाकडे वळूं. '३. विवाहित असेल त्याने स्वपत्नीला मित्र समजून तिच्याशी व्यवहार ठेवावा..... ५. शृंगारिक काव्यें, नाटकांचीं व कादंबऱ्यांचीं पुस्तकें हातांत सुद्धा धरूं नयेत.' अर्थात ज्यांना ती परीक्षेकरता वाचायचीं असतील त्यांनी तीं पायांत धरण्याची कांही युक्ति काढली पाहिजे ! याने पायांची कार्यक्षमता वाढेल यांत शंका नाहीं. '८. ज्या रस्त्याने

वेश्यांचीं घरें असतील तिकडून कधीहि फिरकूं नये.' अर्थात अशीं घरें ट्रॅमच्या रस्त्यावर असल्यास ट्रॅम वर्ज्य करावी. आणि मुंबईसारख्या शहरांत सामान्यतः कोणत्याहि रस्त्याने जाऊंच नये! '१७. विषयेच्छा वाढण्याची किंवा वीर्यपात होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच थंड पाण्याचें स्नान करावें. निदान जननेंद्रियावर गार पाण्याची धार धरावी.' म्हणजे दिवसभर गार पाण्याच्या सांठ्याजवळ बसून काढावा! '१८, १९. मादक व उत्तेजक खाद्यपेयांचें सेवन वर्ज्य करावें. रोज ताजीं फळें खाण्याचा परिपाठ ठेवावा.' अज्ञानाचा मासला. कामविकार नैसर्गिक आहे, आणि तो उत्तम अन्नाने उत्तेजितच होणार, विशेषतः फळें आरोग्याच्या दृष्टीने उत्तम असतात, आणि कामविकारहि आरोग्यापैकीच एक भाग आहे. तेव्हा वरील दोन वाक्यें संगत नाहींत. '२१. परमेश्वराचें अखंड चिंतन करावें.' मग व्यायाम, अभ्यास वगैरे गोष्टी केव्हा कराव्या? कीं 'अखंड' या शब्दाला कांही अर्थच नसतो?

हे गृहस्थ किती मागसलेले होते हें पुढील वाक्यावरून समजेल. 'स्त्रियांचा सर्व जन्म गृहकृत्यांत, संसाराच्या कामांत आणि मुलांबाळांच्या जोपासनेंत जावा असा ईश्वराचा स्पष्ट हेतु दिसतो.' शाबास आहे परमेश्वराची! पण परमेश्वराच्या हेतूविरुद्ध आपणांस वागतां येतें असें दिसतें, एरवी त्यासंबंधी उपदेशाचें कारण नव्हतें. आमची कल्पना होती की ईश्वर सर्वशक्तिमान् असल्यामुळे त्याचा हेतु आपोआपच तडीस गेला असता, पण त्याचा हेतु आम्ही हाणून पाडूं शकतों, तेव्हा आमची शक्ति जास्त आहे की लेखकाने स्वतःची मतें परमेश्वरावर लादलीं आहेत, हें वाचकांनी ठरवावें.

दुसऱ्या भागांत पहिल्या भागावर थोडेंसें पाणी ओतून डॉ. अ. वि. केतकर यांनी पारंपरिक कल्पनांस शास्त्रीय ज्ञानाचा टेंकू देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ज्याचा पायाच शुद्ध नाही, तें टेंकू देऊन कसें उभें राहणार? रेताचा एक थेंब रक्ताच्या ४० थेंबांइतका किंवा ५०० थेंबांइतका महत्त्वाचा असतो, किंवा वीर्य रक्तांत मिसळून सर्व शरीरभर पसरतें ही गोष्ट अशक्य आहे, असें ते कबूल करतात (पान ५७–५८). मग तेच पुढे विचारतात, 'असें

असेल तर वीर्यरक्षणाचा उपयोग काय ? ' येथपर्यंत ठीक आहे, परंतु तो उपयोग आहे असें दाखवण्याकरता त्यांनी जी स्वतःच्या डोक्यांतून शक्कल काढली आहे, ती मात्र अत्यंत हास्यास्पद आहे. प्रथम ते म्हणतात, " ब्रह्मचर्य हेंच जीवन व वीर्यनाश हाच मृत्यु ' हें म्हणणें खोटें काय ? आणि ब्रह्मचारी मनुष्यांत जें एक प्रकारचें तेज, तडफ, पौरुष वगैरे गुण दिसतात, ते पाहून सुद्धा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास ठेवायचा नाही काय ? " ही काय ती डॉ. साहेबांची अडचण आहे. या प्रश्नांचें खरें उत्तर म्हणजे हीं सर्व विधानें खोटीं आहेत, आणि अशा प्रकारचा अनुभव कोणालाहीं नाही. आजपर्यंत इतिहासप्रसिद्ध जितके तेजस्वी पुरुष होऊन गेले, त्यांपैकी कोणीहि ब्रह्मचारी नव्हता इतकेंच नव्हे तर ते एका पत्नीवरहि भागवणारे नव्हते. खरें ब्रह्मचर्य नपुंसकासच शक्य असतें आणि ब्रह्मचारी मनुष्यांत तेज वगैरे बिलकुल नसतें. पण डॉ. साहेबांस हें सर्व खरें तर ठरवायचें आहे. तेव्हा त्याला प्रत्यक्ष पुरावा बिलकुल नसल्यामुळे ते तें युक्तिवादाने ठरवूं पाहतात. परंतु जें मुळांतच खोटें, तें युक्तिवादाने ठरणार कसें ? या युक्तिवादांतील वकिली तपासून पाहिल्यास तो किती फोल आहे हें तावडतोब लक्षांत येईल. ते म्हणतातः—

अंडकोशांत दोन भाग असून त्यांपैकी एकांतून अंतःस्राव व दुसऱ्यांतून बहिःस्राव होत असतो व बहिःस्रावापेक्षा अंतःस्राव जास्त महत्त्वाचा असतो. ' ह्या दोन्हीहि म्हणजे अंतःस्रावी आणि बहिःस्रावी भागांकडे एकच रक्तवाहिनी रक्त नेते व त्यांच्या अगदी जवळ गेल्यानंतर मग तिचे दोन भाग होऊन एक भाग एकीकडे व एक भाग दुसरीकडे जातो. अशा तऱ्हेने या दोन्ही भागांना मिळून नियमित रक्ताचा पुरवठा आहे, म्हणजे ठराविक रक्ताच्या पुरवठ्यावर दोघांना आपलीं कामें भागवावीं लागतात. म्हणजे एकाने जास्त रक्त संपविलें तर दुसऱ्याला कमी रक्त घेऊन समाधान मानावें लागतें. एखाद्या घरांत दोन बिऱ्हाडें असलीं आणि एकच नळ असून तो नियमित वेळेवर सुटत असला तर त्या दोन्ही बिऱ्हाडांना एकमेकांच्या सोयीने पाणी घ्यावें लागतें. एका बिऱ्हाडा-

कडे पाहुणे आले किंवा घरी कांही कार्य असलें तर त्याला त्या दिवशीं पाणी जास्त लागतें व दुसऱ्या बिऱ्हाडाला अर्थात कमी पाणी मिळतें.....अगदी हुबेहुब तीच स्थिति अंडकोशाबद्दल आहे. या एकाच कोशांत दोन निरनिराळीं इंद्रियें आहेत व तीं रक्ताच्या पुरवठ्याकरिता एकाच रक्तवाहिनीवर अवलंबून आहेत. ह्या रक्तवाहिनींतून जितकें रक्त येईल तितक्यावर दोन्ही भागांना आपली गरज भागवावी लागते. ह्यावरून हें उघड होतें की दोन्ही भागांपैकी महत्त्वाच्या भागाकडे आपण जास्त रक्ताचा पुरवठा जाईल अशी व्यवस्था केली पाहिजे व ह्याचाच अर्थ ब्रम्हचर्य पाळलें पाहिजे, तें कसें तें पाहूं.'

डॉ. साहेबांनी तर्कशास्त्राचा फारसा अभ्यास केलेला दिसत नाही, यामुळे त्यांस हें माहीत नसेल की केवळ सादृश्याने कोणतीही गोष्ट सिद्ध होत नाही, आणि त्यांनी दाखवलेलें सादृश्य देखील खोटें आहे. तें सादृश्य जर खरोखर दाखवायचें असेल तर रक्तवाहिनीचे जसे दोन भाग होतात असें डॉ. म्हणतात, तसेच एका नळाचे दोन भाग होतात आणि दोन बिऱ्हाडांत जातात असेंच धरलें पाहिजे. पण त्यांत डॉ. ची सोय होत नाही. आता असेंहि पाहिजे तर म्हणतां येईल की एका बिऱ्हाडास जास्त पाणी पाहिजे असल्यास तें देण्याकरता दुसऱ्यास आपली तोटी बंद ठेवतां येईल, पण ही तोट्यांची व्यवस्था शरीरांत नाही. डॉ. साहेबांनी दिलेलें उदाहरण अगदी कुचकामाचें आहे, हें यावरून उघड होईल. जें रक्त रक्तवाहिनींतून येतें तें दोन्ही भागांकडे आपोआप गेलेंच पाहिजे, कारण तिचे दोन भाग होतात आणि तें एकाच भागांत जाण्याची कोणतीहि योजना नाही. ब्रह्मचर्यामुळे पुष्कळ लोक नपुंसक होतात याचें कारण हेंच आहे. डॉ. साहेब स्वतःच पुढे म्हणतात, 'निसर्गाचा असा नियमच आहे की शरीरांत कोणताहि भाग निरुपयोगी ठेवायचा नाही. एखादा भाग निरुपयोगी ठरला तर तो आपोआप हळूहळू झडत जातो.' आणि तरीदेखील ब्रह्मचर्य आचरून एक भाग निरुपयोगी ठेवण्याचा ते आग्रह धरतात! त्यांचींच विधानें त्यांच्याच गळ्यांत येतात हेंही त्यांस

धर्मांधतेमुळे दिसत नाही. शस्त्रक्रियेने बीजवाहक नलिका कापल्यास मग पुंबीजच उत्पन्न होत नाही आणि अंतःस्राव वाढतो. हा गौण मार्ग आहे आणि ब्रह्मचर्याने हाच परिणाम घडवून आणतां येतो असें त्यांचें म्हणणें आहे. हा परिणाम एका भागाचें कार्य अशक्य झाल्यामुळे होतो, परंतु ब्रह्मचर्याने तें कार्य अशक्य होत नाही हें ते विसरतात. रक्तवाहिनींतून रक्त आल्यास तें आपोआप दोन्ही भागांस मिळालेंच पाहिजे आणि त्याचें कार्य शक्य असल्यास झालेंच पाहिजे व होतें आणि म्हणूनच ब्रह्मचाऱ्यांच्या शरीरांतहि पुंबीजें उत्पन्न होतात आणि तीं वेळोवेळीं नैसर्गिक रीतीने शरीराबाहेर न पडल्यास त्यांस अनेक प्रकारचे शारीरिक क्लेश भोगावे लागतात.

ज्या विषयावर डॉ. केतकर लिहितात त्याचा त्यांनी जर थोडा अभ्यास केला असता तर त्यांना हें समजलें असतें की ज्याप्रमाणे धैर्यशौर्यादि गुण अंतःस्रावावर अवलंबून असतात असें ते सांगतात, त्याचप्रमाणे कामवासनाहि अंतःस्रावावरच अवलंबून असते, आणि ब्रह्मचर्याने अंतःस्राव वाढतो हें त्यांचें खोटें विधान घटकाभर खरें धरून चाललें तर त्यावरून असे सिद्ध होईल की ब्रह्मचर्याने कामवासना वाढते आणि ब्रह्मचर्य पाळणें अधिकाधिक कठीण होत जातें. परंतु असें होत नाही. उपोषण करणाऱ्या मनुष्यास ज्याप्रमाणे कांही कालपर्यंत जास्त भूक लागत जाते, परंतु पुढे भूक कमी होते, त्याचप्रमाणे ब्रह्मचर्य पाळणाऱ्या मनुष्यास प्रथम कामवासना जास्त होऊन ब्रह्मचर्य अत्यंत कठिण होईल, परंतु पुढे ती कमी होऊन तो पूर्ण नपुंसक होण्याच्या मार्गाला लागतो, म्हणजे अंडकोशाकडे जाणारा रक्ताचा प्रवाह संपुष्टांत येऊन अंडकोश लहान होतात आणि अंतःस्रावहि कमी होतो, असा जगन्मान्य तज्ज्ञांचा अनुभव आहे.

स्त्रियांच्या ब्रह्मचर्याविषयींहि डॉ. साहेबांनी हास्यास्पद विधानें केलीं आहेत. 'बीजमार्ग व गर्भाशय या दोन अवयवांच्या दृष्टीनेहि तें (नैष्ठिक ब्रह्मचर्य) अत्यंत जरूरीचें आहे. ज्यांची उपजीविका गायनावर किंवा सौंदर्यावर अवलंबून आहे, अशा स्त्रियांना तर नैष्ठिक ब्रह्मचर्याची महति किती वाटते हें

त्यांच्याच उद्गारांवरून कळून येतें. पाश्चिमात्य देशांतील सिनेमामध्ये प्रामुख्याने भाग घेणाऱ्या नटी व इतर नायिका ह्यांच्या मुलाखती नेहमी प्रसिद्ध होत असतात. ह्या वाचल्या असतां वरील विधानाचें सत्यत्व पटेल.' गायनावर व सौंदर्यावर निर्वाह करणाऱ्या गणिका व नटी नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळतात, हा शोध अजब आहे ! बीजमार्गाकडे जास्त रक्त गेल्यामुळे स्त्रियांना ' सालपिंजाइटिस् ' वगैरे रोग होतात हें खोटें आहे. कामोत्तेजन होऊन नंतर समाधान न झाल्यास तसें होईल, परंतु समाधान झाल्यास होणार नाही. ब्रह्मचर्य व अतिरेक हीं दोन टोंकें आहेत; त्यांचेमधे एक समजंस मार्ग असतो, हें सामान्यतः कोणासहि कळलें पाहिजे, परंतु डॉ. साहेबांस तें कळत नाही असें दिसतें. ब्रह्मचर्य पाळलें नाही म्हणजे अतिरेक केलाच पाहिजे असें नाही, आणि तो न केल्यास कोणताहि अनिष्ट परिणाम होणें शक्य नाही. पूर्वीच्या स्त्रिया व पुरुष काय करीत होते याबद्दल पुरावा नसल्यामुळे पाहिजे तीं विधानें करावीं, व त्याचे उलट विधानें आम्हांसहि करतां येतील इतकेंच नव्हे तर ' प्राचीन चरित्रकोशांत ' आमचे बाजूने विपुल पुरावा सांपडतो.

डॉ. साहेबांचा युक्तिवाद किती फोल आहे हें येथपर्यंत पाहिलें. आता डॉक्टर म्हणूनच कोणावर विश्वास ठेवायचा असल्यास कोठल्या तरी डॉक्टरावर ठेवण्यांत अर्थ नाही, जगन्मान्य विद्वानांवरच ठेवणें श्रेयस्कर होईल. अशांचीं मतें आम्हीं पूर्वीच दिलीं आहेत (' संततिनियमन ' व ' आधुनिक कामशास्त्र '). अर्थात् नपुंसकत्व हेंच ध्येय असल्यास ब्रह्मचर्य हा त्याचा उत्तम मार्ग आहे, यांत शंका नाहीं.

अंडकोश

—:*०*:—

अंडयुग्म गर्भावस्थेंत पोटांत असतें व नंतर सामान्यतः तें खालीं उतरतें परंतु कधीकधी तें तसेंच पोटांत राहतें, आणि अशा रीतीने तें आंतच राहिल्यास

ल्यांत शुक्रजंतूंची उत्पत्ति होत नाही, असा शोध इतर प्राण्यांवरील कांही प्रयोगांनी लागला, परंतु याचें कारण काय असावें याचा उलगडा झाला नव्हता. नंतर **क्रयू** नांवाच्या एका डॉक्टराचें असें मत पडलें की पोटांत उष्णता जास्त असल्यामुळे असें होत असावें, आणि यासंबंधी शोध करून इतर कांही डाक्टरांनीहि त्यास दुजोरा दिला. प्रयोगांनी असे सिद्ध केलें की अंडकोशास कृत्रिम उष्णता लावल्यास बीजकोशाचा क्षय होऊं लागतो. ही कृत्रिम उष्णता १०४ डिग्री असल्यास २०० तासांत असा क्षय झालेला दिसतो, आणि ११० अस-ल्यास ३२ तासांतच दिसूं लागतो. उष्णता ११८ पर्यंत वाढवल्यास वीस मिनिटांतच असा परिणाम घडवून आणतां येतो. हे परिणाम होण्यास कृत्रिम उष्णताच लावावी लागते असें नाही, तर अंडकोशाच्या त्वचेंतून उष्णता बाहेर जाऊं नये म्हणून त्याभोंवती एक रबराच्या कापडाचें वेष्टण घातल्यास काम होतें. असें केल्यास कांही आठवड्यांत बीजकोशाचा नाश होतो. यावरून असें दिसतें की अंडकोशाची त्वचा विशेष प्रसरणशील असल्याचा उपयोग असा असतो की उष्णता फाजील झाल्यास ती त्वचा प्रसरण पावते आणि तींतून जास्त उष्णता बाहेर जाण्यास वाव मिळतो. पोटांतील उष्णता आणि अंडकोशाची उष्णता यांं दोहोंत सस्तन प्राण्यांत ५ पासून १८ डिग्रीपर्यंत फरक आढळतो.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट दिसतें की अंडकोशास फाजील उष्णता लागल्यास किंवा त्यांतील उष्णता लवकर बाहेर जाण्याच्या नैसर्गिक क्रमास कोणत्याहि रीतीने अडथळा झाल्यास बीजकोश निरुपयोगी होऊं लागतो. इतर प्राण्यांत नपुंसकत्व नसतें आणि मनुष्यांत त्याचा बराच फैलाव झालेला दिसतो, आणि तोहि जेथे जास्त वस्त्रें वापरण्याची चाल आहे तेथे अधिक दिसतो, यांचें कारण हेंच आहे. **डॉ. रॉबिनसन** म्हणतात की गोऱ्या लोकांत नपुंसकत्वाचें (यांत शीघ्रपतनहि येतें) प्रमाण शेंकडा ७५ आहे. लंगोट घट्ट आवळून नेस-ण्याची ब्रह्मचर्यवाल्यांची अजब युक्ति किती घातक आहे हेंहि यावरून दिसतें, आणि नम्रतेचा हा एक महत्वाचा फायदा आहे. शरीराच्या सर्व त्वचेस तर ढिलेची जरूर असतेच, परंतु अंडकोशास त्याची विशेष जरूर असते, तेव्हा

दिवसांतून कांही वेळ तरी नग्न राहिल्यास वस्त्रांनी होणारें नुकसान अंशतः तरी भरून येईल.

अन्नाची विविधता

—=:o*o:=—

अन्न विविध असावें, तसे असल्याने प्रकृति चांगली राहते, हें पुष्कळांनी ऐकलेलें असतें, पण हें तत्त्व अमलांत कसें आणावें हें मात्र त्यांस माहीत नसतें. अन्नांत केवळ दिखाऊ वैचित्र्य असून भागत नाही, तें रसायनिक दृष्ट्या वेगवेगळ्या प्रकारचें असलें पाहिजे असा याचा खरा अर्थ आहे. समजा एखाद्या मनुष्याने भात, तांदुळांची भाकरी, पोहे व चुरमुरे असे चार प्रकार खाल्ले, तर दृष्टीला किंवा चवीलाहि त्यांत पुष्कळ वैचित्र्य आहे, परंतु शास्त्रीय दृष्ट्या नाही, कारण सर्वच तांदुळांपासून केलेले, शरीरपोषणाच्या दृष्टीने त्यांत फारच थोडा फरक आहे. आजारी माणसाला कधीकधी एकाच प्रकारच्या अन्नावर कांही काळ ठेवावें लागतें, परंतु हा अपवाद आहे. निरोगी मनुष्याची प्रकृति अशाने चांगली राहणार नाही.

प्रकृतीच्या दृष्टीने अन्नांत पांच प्रकारचे पदार्थ असावे लागतात. १. आल्ब्युमेन्, म्हणजे अंड्याच्या बलकासारखे पदार्थ; २. कार्बोहाइड्रेट्, म्हणजे पिठूळ पदार्थ; ३. स्निग्ध पदार्थ, म्हणजे तेल, तूप वगैरे, ४. क्षार, आणि ५. व्हिटॅमीन्. पहिल्या प्रकारचे पदार्थ मास, अंडीं, दूध किंवा धान्यांतून मिळतात. तथापि शाकाहाराच्या पुरस्कर्त्यांनी हें लक्षांत ठेवलें पाहिजे की अन्नांत रासायनिक दृष्ट्या कोणते पदार्थ आहेत इतकेंच पाहून चालत नाही, पचनाच्या दृष्टीने सुलभ कोणते आहेत हें पहावें लागतें. मनुष्याच्या शरीरासारखी ज्याची घटना असेल ते अन्न शरीराशीं लवकर एकजीव होईल. यावर कोणी असें म्हणेल की या दृष्टीने मनुष्याने मनुष्याचेंच मांस खाणें सर्वांत जास्त हितावह होईल!

हें खरें आहे, पण आजकालच्या सुधारलेल्या युगांत माणसांनी माणसांची कत्तल करणें हें जरी अत्यंत उच्च प्रकारचें शौर्य समजतात, तरी मनुष्याचें मांस खाणें मात्र रानटी समजतात, यामुळे त्याचा विचार करण्याचें कारण नाही. परंतु इतकें मात्र खरें की घटनेच्या दृष्टीने वनस्पतीपेक्षा प्राण्यांचीं शरीरें आपल्या शरीराच्या अधिक जवळचीं असल्यामुळे शाकाहारापेक्षा मांसाहार पचण्यास अधिक सोपा असतो. तरमग मांसाहारच पसंत करावा आणि शाकाहार वर्ज्य समजावा काय ? त्यांत एकच अडचण आहे, ती ही की मांसाहाराचा अवशेष पोटांत राहिल्यास तो लवकर कुजतो आणि शाकाहाराचा तितक्या लवकर कुजत नाही. तेव्हा कोणता आहार पसंत करावा हें आपल्या पोटाच्या स्थितीवर अवलंबेल. सर्वांत शहाणपणाचा मार्ग म्हणजे दोन्हीहि योग्य प्रमाणांत खाणें, म्हणजे प्रत्येकाचा दोष दुसऱ्याने मारणें. विशेषतः मांसाहारांत कांही विशिष्ट प्रकारचे आम्ल पदार्थ असतात आणि त्यांचा शरीरास अत्यंत जरूर असते असें आधुनिक शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे.

आता चरबीचा, म्हणजे स्निग्ध पदार्थांचा, विचार केल्यास असें दिसतें कीं कोणत्याहि प्रकारच्या अन्नांत थोडीबहुत चरबी असतेच, तेव्हा आपल्या अन्नांत पुरेशी चरबी आपोआप असते आणि तेल, तूप, लोणी वेगळीं खाण्याचें किंवा अन्नांत घालण्याचें कारण नसतें. जिभेला या पदार्थांची चटक लागली नसल्यास त्यांची जरूरीहि भासत नाही आणि इतर प्राण्यांप्रमाणेच मनुष्यालेंहि पोषण या पदार्थांशिवाय उत्तम रीतीने होऊं शकेल. शिवाय चरबी जास्त खाल्ल्यास अन्नाच्या पचनांत अडथळा येतो. विशेष थंड प्रदेशांत राहणाऱ्यांस चरबीचा बराच उपयोग होतो, परंतु उष्ण प्रदेशातील लोकांस तिची जरूर नसते. ज्यांना शारीरिक काम फार पडत असेल, त्यांनीहि चरबीऐवजी पिठाचे पदार्थ खावे, म्हणजे कामास जोर पुरेसा येईल आणि पचनांत अडथळाहि येणार नाही. कार्बोहाइड्रेट् मुख्यतः सर्व धान्यांत आणि बटाटा, गाजर वगैरे कंदमुळांत सांपडतें. पचनानंतर त्याची पोटांत एक प्रकारची साखर होते आणि

शारीरिक कामाला साखरेची अत्यंत जरूरी असते. उंसाची किंवा 'बीटरूट' ची साखर जशीच्या तशीच शरीरांत मिळते, तिला पचनाची जरूर नसते. अर्थात हे पदार्थ आपल्या जरूरीच्या मानानेच खाल्ले पाहिजेत, जास्त खाल्ल्यास मेद वाढेल. वर साखरेविषयी जें सांगितले तें सर्व गोड पदार्थांस लागू आहे असें मात्र नाही. गोड पक्वान्नें पुष्कळ वेळा पचनास जड असतात आणि पुष्कळ लोकांना तीं खाल्ल्याशिवाय राहवत नाही, तेव्हा हा इशारा देणें जरूर आहे.

शरीराला क्षारांची देखील अत्यंत जरूर असते. वाफ करून शुद्ध केलेल्या पाण्यांत मासे जगणार नाहीत. अन्नांत वैचित्र्य असल्यास सामान्यतः आपल्या शरीरास जरूर तितके क्षार मिळतात. तरीहि धान्यें, कंदमुळें आणि मांस खाऊनहि आपणांस कांही क्षार पुरेसे मिळत नाहीत. मिठाने हा दोष भरून निघतो, याकरता लहान मुलांच्या अन्नांत साखरेप्रमाणे मिठाचीहि जरूर असते. मोठ्या माणसांनीहि मीठ खावें, पण फार खाऊं नये. इतकें करूनहि कॅलशिअम् पुरेसा मिळत नाही. तो मिळण्याकरता दूध, अंजीर, द्राक्षें, खारीक, बदाम वगैरे खाणें वरें. पालेभाज्यांत क्षार असतात, तेव्हा त्या शिजवतांना त्यांतील पाणी कधीहि फेकून देऊं नये.

व्हिटॅमीनबद्दल महत्त्वाची माहिती पुर्वी एकदा दिलीच आहे, तीं पुरेशी मिळण्याकरता मुख्य पदार्थ म्हणजे, १. दूध, लोणी, अंडीं, भाज्यांची हिरवीं पानें; २. अक्रोड, बदाम, 'चेस्टनट्,' द्विदळ धान्यें; या धान्यांची साल मात्र काढूं नये व त्यांस १२० पेक्षा जास्त उष्णता लावूं नये, किंवा त्यांत सोडा वगैरे सारखा क्षार घालूं नये, नाहीतर त्यांतील व्हिटॅमीनचा नाश होतो. बटाट्यांतील व्हिटॅमीन सालीजवळ असतें, तेव्हा शिजवण्यापूर्वी कधीहि त्याची साल काढतां कामा नये; ३. लिंबें, संत्रीं, वगैरेसारखीं फळें, कांदे, टोमाटो, वगैरे; पण हे पदार्थ कधीहि शिजवून खाऊं नये, हिरवे खावे.

जेथे आणि जेव्हा ताजीं फळें मिळणें शक्य नसतें, तेथे धान्यांना मोड आणून तीं खावीं, म्हणजे लिंबाचेंच काम होतें.

मलावरोध

—*०*—

निरोगी मनुष्याचे पोटांत अन्न गेल्यावर त्याचीं अनेक रूपांतरें होऊन त्यांतील उपयुक्त भागाचें रक्तांत शोषण होऊन रक्ताचे द्वारें शरीराचें पोषण होतें आणि अनुपयुक्त भाग सामान्यतः मलद्वारांतून शरीराबाहेर जातो, परंतु कांहीं लोकांचे बाबतींत हा अनुपयुक्त भाग नियमितपणे बाहेर न जातां आंतड्यांतच कित्येक दिवस, आठवडे किंवा महिने देखील राहतो. ज्याला सहा सहा महिने शौचाला होत नसे अशा एका रोग्याचें उदाहरण एका डॉक्टरने दिलें आहे. सहा महिन्यांनी होऊं लागलें म्हणजे चार दिवस होत असे आणि या चार दिवसांत त्याचें वजन अजमासें ४० पौंड कमी होत असे. एकदा एक फ्रेंच व्यापारी अमेरिकेंतील क्यूबा बेटांत जावयास निघाला, आणि तो तेथील काम संपवून परत येईपर्यंत त्याला शौचाला झालें नाहीं. तेव्हा दोन चार दिवस मलावरोध होण्यांत मोठेंसें आश्चर्य वाटणार नाही. आणि पुष्कळ वेळा त्यापासून त्रासहि होत नाही आणि एकंदर प्रकृतिहि ठीक असते. मग कोणी म्हणेल, पोटांत अन्नाच्या अवशेषापासून विष तयार होतें असें म्हणतात, त्याचें काय ? हें थोडें. बहुत खरें आहे, पण आंतडें जोपर्यंत सुस्थितींत आहे तोपर्यंत तें विष आंतड्यांतून रक्तास मिळूं शकत नाही. इतकेंच नव्हे तर कांही डाक्टरांनी प्रयोगाकरता कॉलिबॅसिलस् नांवाचे जिवंत जंतु मुद्दाम आंतड्यांत घातले तरीही त्यांनी इजा झाली नाही. पण असें नेहमी होऊं लागलें तर आंतडें सुस्थितींत राहील काय ? नाहीं. नेहमी असें झाल्यास अन्नाचा अवशेष आंत कुजून त्याची क्रिया आंतड्यावर होऊन त्याची भिंत सुरक्षित राहणार नाही आणि कांहीं कारणाने आंत रोगजंतु गेल्यास त्यांस रक्तांत मिसळण्यास वाट सांपडेल. यामुळेच मलावरोधाची एकदा संवय लागली म्हणजे त्यापासून अप्रत्यक्ष रीतीने कोणते रोग होतील हें सांगतां येणार नाही.

एका डाक्टराने असें लिहिलें आहे की प्रकृति उत्तम ठेवायची असेल तर डोकं थंड, पाय गरम आणि पोट साफ ठेवीत जा. डॉक्टरी ज्ञानाचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. कित्येक लोकांस पोट साफ ठेवण्याकरता दररोज सारक औषधें घ्यावीं लागतात. आणि निदान कांही दिवस तरी अशा रीतीने पोट नियमितपणे साफ होतें खरें. पण एखाद्या नोकराने वेळेवर काम न केलें तर तुम्ही त्याला असें सांगाल काय, की कांही हरकत नाही, तुझ्या हातून काम न झालें तर करूं नको, खुशाल झोपा घे, मी दररोज दुसऱ्या कोणाकडून तरी काम करून घेत जाईन. दररोज औषध घेणें म्हणजे पोटाला असें सांगण्या-सारखेंच आहे. असें केल्यास आंतड्याची आकुंचनशक्ति हळूहळू कमी होत जाते आणि शरीराचा तो एक जीवंत भाग असण्याऐवजी तें कापडाच्या पिशवीसारखें निर्जीव होत जातें. पण कोणी म्हणेल की औषधाने काम होत असेल तर हरकत काय आहे ? उपाय सोपा आहे. मग उगाच जास्त खटपट कशाला ?

पण औषधांचा परिणाम शेवटी वाईट झाल्याशिवाय रहात नाही. आंत-ड्यास कोठे इजा झालेली असेल तर ती बरी होत नाही, एखादेच ठिकाणी आंतडें आकुंचित होऊन तेथे वाट अगदीच अरुंद होते आणि शस्त्रक्रियेची वेळ येते. पण मलावरोध केवळ शस्त्रक्रियेने कधी बरा होत नाही. अनेक उपचारांनी आंतड्याला पूर्ववत शक्ति येईल असें करावें लागतें. आणि हें अत्यंत कठिण आणि लांबणीचें असतें. तेव्हा प्रथमच असे उपचार केल्यास बरें नव्हे काय ?

हे उपाय म्हणजे, अन्नाकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे, आंतड्याला इजा झालेली असल्यास अन्न मऊ असावें, त्यांत मसाला फार असूं नये, मांसा-हार कमी करावा. याशिवाय हल्ली अनेक प्रकारच्या हितकारक जंतूंचा, तोंडा-वाटे किंवा रक्तांत टोंचून, उपयोग करतात. परंतु मुख्य गोष्ट म्हणजे आंत-ड्याला स्वतःचे प्रयत्नाने साफ रहावयास शिकवणें, म्हणजे आंतड्यांतील स्नायूंना शिक्षण देणें, झोंपेंतून जागें करणें, आकुंचनाची संवय करणें. इतक्या-

नेहि भागत नाही. ओल्या स्पंजांतील पाणी काढायचें असल्यास ज्याप्रमाणे आपण तो दोन्ही हातांनी दाबतों, त्याचप्रमाणे आंतडेंहि दाबलें पाहिजे. पण तें कसें ? छातीच्या व पोटाच्या मधे जो पडदा असतो, तो श्वासोच्छ्वासाचे वेळीं वर खाली होतो आणि पोटाचे स्नायूंनीहि त्याला मदत केल्यास हें काम होतें. श्वासोच्छवास जोराने होण्याकरता व्यायाम केला पाहिजे. आणि त्यानेच पोटाचे स्नायूंचीहि शक्ति वाढते. हा व्यायाम कंटाळवाणाच असला पाहिजे असें नाही, आपल्या आवडीचा कोणताहि शारीरिक खेळ खेळल्यास चालेल. घोड्यावर बसणें, होडी वल्हवणें, पोहणें हे उत्तम व्यायाम आहेत, दोरीवरून उड्या मारणें, पळणें हेहि चांगले आहेत. उघड्या हवेंतील व्यायामच चांगले, पण ते करण्यास सवड नसेल तर स्वतःच्या खोलींत, खिडकी उघडी ठेवून, शक्य असल्यास नग्न होऊन, व्यायाम करावा. उताणें निजून पाय शक्य तितके वर करावे, उभें राहून खाली वाकावें, आणि विशेषतः सरपटण्याचा व्यायाम करावा. म्हणजे, जमिनीवर एखादी बैठक टाकून तीवर उपडें पडावें, डोकें वर उचलावें, पाय व गुडघे देखील शक्य तितके वर उचलावे, हात मानेचे मागे किंवा पाठीवर ठेवावे. असा शरीराचा तिरकमठा झाला म्हणजे पुढे सरकण्याचा प्रयत्न करावा. याकरता वाऱ्यांत बोट जशी डाव्या उजव्या बाजुला डुलते तसें शरीर हलवून प्रत्येक वेळीं किंचित पुढे सरकलें पाहिजे. प्रथमतः हें कठीण जाईल. परंतु प्रयत्नाने हळूहळू सोपें होईल. हा व्यायाम सकाळीं पांच मिनिटें व संध्याकाळीं पांच मिनिटें केल्यास अत्यंत उपयोगी होईल आणि मलावरोधाकरता दुसऱ्या कोणत्याहि व्यायामाची गरज राहणार नाही.

तर मग रेचक औषधें कधीहि घेऊं नये की काय ? असा नियम करता येणार नाही. कित्येक वेळी त्यांचा उपयोग असतो, पण तो तात्पुरता, त्यांची संवय होता कामा नये, आणि एक नियम लक्षांत ठेवावा की रेचक व उपोषण यांची जोडी ठेवली पाहिजे, म्हणजे रेचकाशिवाय उपोषण करूं नये, आणि उपोषणाशिवाय रेचक घेऊं नये.

परंतु रेचकांनी पुष्कळ वेळा त्रास होतो, याकरता सौम्य, सारक औषधांवरच होतां होईल तों भागवावें आणि तीं देखील डिंकाच्या किंवा 'अगर अगर'च्या जातीचीं असावीं, म्हणजे पोटाला कोणत्याहि प्रकारचा त्रास होणार नाही.

गोरक्षणाचें ढोंग

—:*०*:—

हिंदु धर्मांत जो अनेक प्रकारचा बावळटपणा भरलेला आहे, त्यांत गोरक्षणाची गणना प्रामुख्याने केली पाहिजे. वास्तविक मनुष्याने अत्यंत स्वार्थी बुद्धीने इतर प्राण्यांचा उपयोग करून घेतलेला आहे आणि गाय हो अशा प्राण्यांपैकीच एक आहे. तिला विशेष महत्त्व देण्याचें बिलकुल कारण नाही, किंवा तिला गोमाता म्हणण्याचेंहि कारण नाही. तिचें दूध आपण पितों म्हणून तिला जर माता म्हणायचें असेल तर म्हैस, शेळी वगैरेहि आपल्या माताच असें म्हणावें लागले. शिवाय माता आपण होऊन मुलाना दूध पाजीत असते, आणि गाईचें दूध आपण जबरदस्तीने काढून घेतों, आणि तिने नाखुषी दर्शवण्याकरतां लाथ मारल्यास तिला चोप देण्यासहि कमी करीत नाही. गाय मनुष्याकडे येऊन माझे दूध काढा असें कधीहि म्हणालेली नाही इतकेंच नव्हे तर स्वच्छंदाने रानांत हिंडण्याच्या तिच्या जन्मसिद्ध हक्काची आपण पायमल्ली करून तिला गोठ्यांत बांधून ठेवतों व आपल्या मर्जीशिवाय तिला बाहेर हिंडतां येत नाही ही मातेला वागवण्याची पद्धत कांही और आहे! इतकें केल्यावर तिला अत्यंत पवित्र समजण्याचें ढोंग कशाला? आणि या ढोंगाने कोण फसणार? ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानचा उपयोग दुभत्या गाईसारखा करून शिवाय हिंदी संस्कृतीला व त्यामुळे हिंदुस्थानला अत्यंत पूज्य समजण्याचें ढोंग केल्यास तें जितकें हास्यास्पद दिसेल तितकेंच हेंहि आहे. वासरांच्या मालकीचें दूध लुबा-

ड्डन घेऊन वर हा साळसूदपणा करणारे सनातनी, मूर्ख तरी किंवा सोदे तरी असले पाहिजेत. आमचे मतें ते मूर्खच असले पाहिजेत, कारण लुच्चा मनुष्य एकवेळ गाईच्या गळ्यांत दांव्याबरोबर फुकटचें पावित्र्य बांधण्यास मागेपुढे पाहणार नाही, परंतु तो तिचें मलमूत्र खास खाणार नाही खऱ्या मातेच्या वांटणीस देखील इतकें पावित्र्य येत नाही ! तें गाईला देणारा ब्राह्मण मूर्ख तर खराच, पण हा गलिच्छपणा करूनहि तो आपणास इतरांपेक्षा स्वच्छ समजतो. गाय मनुष्याचें मलमूत्र खाते, तेव्हा याची फेड करण्याचा तर सनातन्यांचा उद्देश नसेल ? गाय ज्याची माता झाली त्याला अक्कल बैलापेक्षा जास्त कशी असावी ? गाईच्या व ब्राह्मणांच्या या परस्पर प्रेमामुळे ' गोब्राह्मण ' असा एक कायमचा समास होऊन बसला आहे, आणि अर्थात् मूर्खांचें संरक्षण लोकांनाच करावें लागत असल्यामुळे राजेलोकांच्या नांवाला ' गोब्राह्मणप्रतिपालक ' असें एक विशेषण चिकटवीत असतात.

सगळाच मूर्खांचा बाजार, तरीपण मूर्खाला स्वतःचीच अक्कल जास्त वाटत असते, यामुळे गोमांस खाणाराला हे सनातनी अभक्ष्यभक्षक म्हणतात: वैदिक-काळीं ब्राह्मण गोमांस खात होते त्याऐवजी आता हे त्यांचे सनातनी वंशज गोमूत्र व गोमय खातात. गोमांस जगांतील इतर देशांतील लोकहि खातात, पण: गोमयाचे षौकी कोणी सांपडतील असें वाटत नाही, तेव्हा गोमांस अभक्ष्य की गोमय व गोमूत्र अभक्ष्य ?

गोरक्षणाचा प्रचार करणारांचें पोट कदाचित त्यावर निघत असेल, एरवी त्याचा कोणत्याहि प्रकारचा उपयोग नाही इतकेंच नाही तर त्याने अनेक प्रकारचें नुकसान होतें. ज्या देशांत गोवध सर्रास चालू आहे अशा देशांत: केवळ गोमांसच चांगलें मिळतें असें नाही तर गाईचें दूधहि उत्तम मिळतें. उदाहरणार्थ यूरोपांत म्हशी नसल्यामुळे सर्वच लोक गाईचें दूध वापरतात आणि तें तेथे हिंदुस्थानापेक्षा चांगल्या प्रतीचें मिळतें गेल्या महायुद्धांत युरोपांत इतकी गडबड असतांही पॅरिसमधे दूध मुंबईपेक्षा स्वस्त मिळत असे. गोरक्षणा-

मुळे असा फरक पडतो हें प्रथमदर्शनीं कदाचित कोणास खरें वाटणार नाही परंतु विचार करणारांस हें सहज समजेल. गोरक्षणाचा अर्थ पुष्कळ वेळा मरतुकड्या गाईंस जगवण्याकरता निष्फळ खर्च करणें असाच होतो, आणि यामुळे सर्वच गुरांचे हाल होतात. गाईपासून फायदा काय असतो हें फक्त हिंदूंसच कळते आणि इतरांस कळत नाही असें समजणें हा मूर्खपणाचा कळस आहे. गोरक्षण करण्यांत व्यापारी दृष्टीने फायदा असता तर तें इतरांनीहि केलें असतें, कारण इतर लोक हिंदूंपेक्षा व्यापारांत मागसलेले खास नाहींत. पण गोरक्षण हा हिंदूंचा धार्मिक अचरटपणा आहे, त्यांत वास्तविक फायदा मुळीच नाही, म्हणूनच इतर लोक तें करीत नाहीत. गोमांस खाणारे लोक देखील दुभत्या गाई मारून खात नाहीत, आणि स्वित्झर्लंडसारख्या देशांत इतकें दूध होतें की ते सर्व जगाशीं दुधाचा व्यापार करतात. हिंदुस्थानांत गोरक्षणामुळे दूध चांगलें तर मिळत नाहीच, पण वाईट दुधाचीही टंचाई असते आणि ती या अतिशहाण्या गोरक्षणवाल्यामुळेच. धार्मिक लोकांचा प्रश्न वेगळा, कारण ते आंधळेच असतात, परंतु ज्या समंजस लोकांना दूध चांगलें मिळावें अशी इच्छा असेल, त्यांनी गोरक्षणास मदत करतां कामा नये. गोरक्षणाचा धंदा लोकहिताचा नाही, स्वहिताचा आहे, किंवा वेडगळपणा आहे. अशा प्रकारचा वेडगळपणा सोडल्याशिवाय हिंदुस्थानची कोणत्याहि दिशेने उन्नति होणे शक्य नाही. गोरक्षणांत गाईचेंहि हित नाही आणि मनुष्याचेंहि नाही, केवळ गोरक्षणावर पोट भरणारांचें आहे, त्यांनी लोकांचें अशा रीतीने नुकसान करण्यापेक्षा पोटाचा दुसरा कांही धंदा करणें श्रेयस्कर आहे. भीक मागणारा मनुष्य भीक घालणारांचेंच नुकसान करतो, गोरक्षणवाले लोक सर्व जनतेचें नुकसान करतात, हें लक्षांत घेतल्यास समंजस मनुष्य त्यांस मदत करणार नाही.

शारदेचीं पत्रें

१.

आपण एकमेकींना लांबलचक पत्रें लिहिण्याचें वचन दिलें खरें, पण आज-पर्यंत आपण दोघींनीही तें पाळलें नाही व त्याला कारणेंही पण तशींच होत गेलीं. आता तूं त्याची पुन्हा आठवण देतेस आणि आता मला थोडा वेळही सांपडतो, तेव्हा म्हटलें आतां लिहायला बसावेंच पण तूंही उलट तितक्याच लांबीचीं पत्रें लिहीलीं पाहिजेस हां? लांबी मोजून पाहीन आणि त्या मानाने मी लिहीन. अमुकच लिहिले पाहिजे असें कांही आपलें ठरलेलें नाही. आपण भेटलों म्हणजे बोलत नाही का बसत हवा तितका वेळ? तें जें आपण बोललों असतों तेंच पत्रांत लिहायचें, दुसरें काय? शिवाय पत्रांत आणखी एक फायदा असतो. बोलतांना तुला आणि मला एकदम कांहीतरी सांगावेंसें वाटतें आणि मग तूं काय बोलतेस इकेड माझें लक्ष नसतें आणि मी काय म्हणतें तिकडे तुझें नसतें, तसें लिहितांना होणार नाही. लिहिलेलें असतें तें फुरसुतीने केव्हाही वाचतां येतें. आता जे काय माझ्या मनांत येईल तें मी लिहीन, तें तुला वाचावेंसें वाटेलच अशी कांही मी हमी घेत नाही.

कायग, विधवांनी कुंकू लावण्याबद्दल तुझें काय मत आहे? विधवांची इतरांप्रमाणे मलाही दया येते, आणि इतरांपेक्षा त्यांना कोणत्याही बाबतींत कमी हक्क असूं नयेत असें मलाही वाटतें. पण कुंकू लावणें हा हक्क का आहे? मी तरी बाई त्याला हक्क म्हणायला तयार नाही. 'स्त्री' मासिकांतली विधवा अगदी केविलवाणें तोंड करून विचारते की विधवांनी कुंकू लावावें असा कोठें शास्त्राधार नाही का सांपडत? तिची मला खरोखरच दया येते. बिचारीला इतकें हेखील. कळत नाही की आता शास्त्राधार पाहण्याचे दिवस नाही राहिले कुंकू लावावेंसें. वाटतेंना? खुशाल लाव, कोणी कांही म्हणत नाही. भटांची पर्वा करण्याचें आतां कारण नाही. तुला लग्नच करायचें असेल तर जो पुनर्विवाहाला तयार होईल तो रजिस्टर लग्नही करील, आता भटांशिवाय कोठेंही अडायचें नाही.

पण मी म्हणतें कुंकवांत आहे काय ? त्याने सौंदर्य येतें किंवा असलेलें वाढतें असें मला तर वाटत नाही. कुंकवाचा खरा अर्थ मी सांगूं का ? कुंकू हा नवऱ्याच्या मालकीचा छाप आहे. पत्र कोणी उघडूं नये म्हणून त्यावर मोहोर करतात ना ? तोच या कुंकवाचा उपयोग. आता तूं म्हणशील की अविवाहित मुली कुंकूं लावतात त्या कां ? माझे मतें तो खेळ आहे. कांही पुरुष लहान मुलाच्या तोंडांत विडी नाही का देत ? तसेंच आई कुंकू लावीत असतां मुलगी जवळ असली की ती म्हणते मला पाहिजे. म्हणून लहान मुलींनी कुंकू लावण्याची पद्धत पडली (कांही पुरुष कुंकू लावतात तेही आईमुळेच). यामुळे विधवांचा हक्क हिरावून घेतल्याचा भास होतो. वास्तविक कुंकू हा गुलामगिरीची निशाणी आहे व त्याने सौंदर्यास निःसंशय बाध येतो असें माझें मत आहे. मीं तें कधीच सोडून दिलें आहे. मी सुंदर नाही हें खरें, पण कुंकूं लावून अधिक कुरूप दिसण्याची माझी इच्छा नाही. विधवांचें कपाळ अधिक सुंदर दिसतें यांत शंकाच नाही, व पुरुषांचें विधवांकडे जास्त लक्ष जातें तें यामुळेच. आयती कुंकवाची कटकट जाऊन त्याबरोबर गुलामगिरीचा छापही जातो व चेहरा अधिक सुंदर दिसतो, तें बाजूलाच राहिलें आणि म्हणे विधवांनी कुंकूं लावावें असा शास्त्राधार काढा ! आहे की नाही अक्कल ? बाकी ज्याला पाहिजे त्याने (पुरुषांनी सुद्धा पाहिजे तर) कुंकूं लावावें असें मी म्हणतेंच. पोषाखाचे बाबतींत शक्य तितकी स्वतंत्रता सर्वांस मिळाली पाहिजे असें माझें ठाम मत आहे. मग कोणाला कुरूप दिसावेंसें वाटलें तर तो त्यांचा प्रश्न आहे. आता नथ घातली तरी सुद्धा काही बायका जशा सुरेख दिसतात, तशा कांही कुंकूं लावूनही दिसतील हें खरें, पण त्यांनी कांहीहि अंगावर घातलें किंवा न घातलें तरीही त्या जातीच्याच सुंदर, त्यांना कांहीहि चालतें. जुन्यापुराण्या चालींचा पुरस्कार करणाऱ्यांना मुकट्यांत जशी वीज टेंचून भरलेली दिसूं लागली आहे, तसेंच कुंकवांत सौंदर्य दिसतें, यापलीकडे कांही नाही.

या जुन्यापुराणेवाल्यांचीं डोकींच कांही चमत्कारिक असतात. परवा एक वैद्यकीय हिंदी मासिक पाहिलें, त्यांत ब्रह्मचर्यावर एक ठराविक सांच्याचा लेख

आहे. अर्थात तो पुरुषांच्या करतां आहे, कारण बायकांना तसें कांही नसतेंच हें तुला माहीतच आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं पुरुषांच्या शरीरांत १५-१६ व्या वर्षीं वीर्य म्हणून एक पदार्थ उत्पन्न होतो, परंतु तो हिरवा असतो, आणि तो पिकायला चांगलीं दहा वर्षे लागतात म्हणे आणि झाडावरच्या अंब्यांचें जसें पांखरांपासून रक्षण करावें लागतें तसेंच त्याचेंही लागतें, आणि तीं पांखरें म्हणजे स्त्रिया असें लेखकाचें म्हणणें दिसतें. तें रक्षण कसें करावें याचे त्याने कांही नियम दिले आहेत, ते मोठे मौजेचे आहेत. १. कोणत्याही युवतीबरोबर हंसूं खेळूं नये. २. कोणत्याही युवतीचें वारंवार स्मरण करूं नये. ३. कोणत्याही युवतीच्या लावण्याची प्रशंसा आपण करूं नये, दुसऱ्याने केलेली ऐकूं नये, व जो करीत असेल त्याची संगत सोडावी. ज्या पुस्तकांत अशी प्रशंसा केली असेल अशीं पुस्तकें वाचूं नये. ४. कोणत्याही युवतीकडे वारंवार पाहूं नये. ५. कोणत्याही युवतीशीं एकांतांत बोलूं नये, वगैरे वगैरे. याप्रमाणे चालायचें म्हणजे परीक्षांना नाटकें, कादंबऱ्या नेमलेल्या असतात त्या वाचतां कामा नये, आणि पुरुषांना रहायला वेगळ्याच जागा बांधल्या पाहिजेत. आणि हें १५ व्या वर्षापासून १० वर्षें चालायचें. या लेखकाबद्दल तुझें काय मत आहे? पण आपला त्यांत संबंधच नाही म्हणा, पुरुष काय तें पाहून घेतील. तरी पण हा लेखक स्वतः अशा रीतीने राहिला असला, तर त्याला अकल आली नाही यांत नवल नाही.

तुझी **शारदा.**

२.

तूं तरी बरीच आहेस की ग! मी 'समाजस्वास्थ्या' चा जुलैचा अंक उघडून पाहतें तों त्यांत आपलें माझें पत्र! मला विचारायचें तरी होतेंस! मी कांही तें प्रसिद्ध करण्याकरता लिहिलें नव्हतें! आणि मी कांहीतरी म्हणेन म्हणून माझी बरीचशी स्तुति केलीस तरी ती काय मला खरी वाटेल वाटतें? पण काय मनुष्यस्वभाव आहे पहा! तूं स्तुति करतेस ती खरी नाही हें घडघडीत माहीत असून सुद्धा मनांत गुदगुल्या होतातच! बरें, तूं म्हणतेसच, तेव्हा मी तुला

परवानगी देतें, जा. पण तूं माझें सगळें नांव नाही ना बाहेर फोडलेंस ? नाहीतर माझी फजीति व्हायची ! तेवढें मात्र करूं नकोस.

तूं म्हणशील माझीं विक्षिप्त मतें उघड सांगायला मी भितें, आणि त्यांत थोडेंसें तथ्यही आहे. पण फारच थोडें. मी थोडी भिते याचें कारण असें की एखाद्या बाईने स्वैरसमागमासारख्या पुढारलेल्या कल्पनांचा पुरस्कार केला की कांही हलकट पुरुष तिच्या मागें लागायचे हें ठरलेलेंच. त्या विचाऱ्यांना इतके समजण्याची अक्कलच नसते की स्वैर वागणाऱ्या बाईने सुद्धा म्हणेल त्याचें आव्हान स्वीकारलेच पाहिजे असें नाही. स्वैर म्हणजे स्वतांच्या मनाप्रमाणें, दुसऱ्याच्या नव्हे. दुसऱ्याच्या मनाप्रमाणे वागायचें असलें तर मग लग्नच करावे की ! मग स्वातंत्र्याचा अर्थच काय ? पण पुरुषांना इतकी अक्कल कोठली ?

मी एक बायकोमाणूस म्हणून भितें, पण परवा केसरींत ज्याने अक्कलेचें प्रदर्शन केलें आहे तो पुरुषासारखा पुरुष असून त्याला टोपणनांवाच्या पडद्याची कां जरूर वाटते ? कारण मला तर वाटतें की तो पुरुषच असला पाहिजे. त्या खेडवळाला जगांत काय चाललें आहे याची काय कल्पना ? आणि त्याला वाटतें समाजाची सुस्थिति आपल्यावर अवलंबते, आपण जर आरडाओरडा केला नाही तर समाजाची धडगत नाही. बिचाऱ्याने कांही पाहिलें नाही, कांही वाचलें नाही, असे लोक घमेंडखोर असायचेच. ओलेतीच्या चित्राला बीभत्स म्हणणारे लोक नग्नतेला घाबरले तर कांही मोठेंसें नवल नाही. पण हें निवळ ढोंग आहे. आम्ही नुकतीच नदीवर पोहायला गेलों होतों, तेथे पुष्कळ स्त्रीपुरुष एकत्र स्नान करीत होते, आणि पूर्ण नग्नतेपर्यंत सगळे प्रकार तेथे दृष्टीस पडत होते, आणि त्यामुळे कोणीहि घाबरल्यासारखें दिसलें नाही. या गोष्टी रोजच्या पाहण्यांतल्या आहेत. तो कांही पर्वणीचा दिवस नव्हता, दररोज तेंच. या पडद्यांतल्या पुरुषाच्या कल्पनाच कांही विलक्षण आहेत त्याला असें वाटतें की कुत्र्यामांजरांना सुद्धा नग्नतेची लाज वाटावी, कारण तो म्हणतो ' सर्व समाज कुत्र्यामांजरांसारखा लाज सोडून हिंडत....' लाज असेल तेव्हा सोडतां येईल ना ? पण त्यांत लाजण्यासारखे आहे काय ? अर्थात

एकट्यादुकट्या माणसाला नागवें हिंडायला लाज वाटेल पण तसे सुद्धा जैनमुनि हिंडतातच की नाही? का धार्मिक लोकांना लाजच नसते? पण समजा नदींत नागवेंच उतरायचें असें सगळ्यांनीच ठरवलें असतें, तर मग त्यांत काय लाज वाटायची आहे? श्रीकृष्णाच्या गोपी तर तशाच उतरत असत की नाही? एरवी त्याला त्यांचीं वस्त्रें कशीं गोळा करतां आलीं? तसेंच हल्ली युरोपांत कांही ठिकाणी करतात, त्यांत काय बिघडलें? वास्तविक ज्यांच्या शरीरांत कांही व्यंग नाही आणि ज्यांना स्वच्छ रहायची संवय आहे, त्यांची नग्नतेला हरकत असूं नये. घरांत शक्य तितका वेळ नागवें राहिल्याने किती बरें वाटतें म्हणून सांगूं! त्यांतून मी आहें थोडीशी एकलकोंडी, त्यामुळे माझ्याकडे कोणी फारसें पहात नाही. मी पाहिजे तितका वेळ नागवी राहिलें तरी मला कोणी बोलायला नाही आणि जागा उंचावर असल्यामुळे खिडक्या उघड्या असल्या तरी कोणाला दिसतहि नाही. माझी चैन आहे की नाही?

पडद्यांतून अप्रामाणिक टीका करावयाची, मनास येतील तीं मतें बळेंच दुसऱ्यावर लादायचीं, स्वतः 'नार' सारखे तमाशेवजा शब्द (मी नव्हतें तमाशाला गेलें हो, दादा म्हणत होता) वापरूनही दुसऱ्याच्या भाषेंत सभ्यता आणि शिष्टाचार नाही म्हणून नांवें ठेवायचीं, ही ज्याची संभावितपणाची कल्पना, तो दुसऱ्याला संभावितपणा शिकवणार! शिष्टाचार शिकायची कोणाला जरूर असेल तर ती या पडदानशीन पुरुषालाच आहे.

कर्वे म्हणे व्यभिचाराचा उपदेश करतात! हिंदुधर्मांत तर व्यभिचाराला मोकळीकच आहे. नवऱ्याकडून संतति न झाल्यास दुसऱ्याकडून करून घेणें हा आर्यस्त्रीचा धर्म आहे. पुरुषांना हव्या तितक्या बायका करायची मोकळीक आहे, द्रौपदीला राजरोस पांच नवरे होते, मग आणखी व्यभिचार तो कसा असतो? जेथे निदान कायद्याने तरी एकापेक्षा अधिक बायका किंवा नवरे करतां येत नाहीत, अशा युरोपसारख्या ठिकाणी व्यभिचाराला पाप म्हटलें तर शोभेल तरी. अनेकांशीं शरीरसंबंध ठेवण्यांत पाप आहे असें म्हटलें तर त्याचा कांही अर्थ तरी होतो पण

तें पाप भटाच्या बडबडीने नाहींसें होतें हें विसाव्या शतकांत कोणी कबूल करणार नाही नाहीतरी पुरुषांच्या व्यभिचाराला कांही महत्वच नसतें, तो बायकांनी केला तर मात्र भयंकर पाप होतें. कां ? तर बायकांच्या शरीरावर पुरुषांची मालकी असते म्हणून. मोठे शहाणे आले पुरुष ! मी लग्न करीत नाही तें उगीच नाही. कायदेशीर गुलामगिरींत मान अडकवायला माझें कांही अडलें आहे ? मला पोटापुरते पैसे मिळताहेत, पुष्कळ झाले.

स्वराज्य मिळालें तर हे खेडवळ लोक काय करतील हे कांही सांगतां येत नाही, कारण अशिक्षित बहुजनसमाज असाच असणार का नाही ? हा सुशिक्षित लोकांना मोठा धोका आहे. कितीही धोका असला तरी स्वराज्य मिळूं नये असें मी म्हणत नाही, पण हें लक्षांत ठेवून अशा लोकांना शिक्षण मात्र शक्य तितक्या लवकर दिलें पाहिजे. नाहीतर आयर्लंडांत जसें हेकेखोर, धार्मिक लोकांचें राज्य सुरू झालें आहे, तसेंच येथेही व्हायचें. तेथे म्हणे संततिनियमनावरचीं पुस्तकें सुद्धा अश्लील समजतात आणि आंत येऊं देत नाहीत. पण तेही शहाणे होतील, थोडा वेळ लागेल इतकेंच.

३.

परवा युनिव्हर्सिटींत धार्मिक शिक्षणवाल्यांची कशी फजीती झाली पाहिलीस की नाही ? झाली म्हणून झाली, नाहीतर बिचाऱ्या कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांचे हाल. ईश्वराचें अस्तित्व कबूल करणें म्हणजे अकलेचा अभाव कबूल करण्यासारखें आहे. बुद्धीने म्हणजे तर्कशास्त्राने तें सिद्ध होत नाही, बुद्धीने त्याचें आकलन होत नाही, हें धार्मिक लोक देखील कबूल करतात. तरीपण तें आम्हाला कळतें असें जर ते म्हणूं लागले, तर त्याचा अर्थ एकतर ते जाणूनबुजून खोटें बोलतात, किंवा आपल्यामधे बुद्धीच्या पलीकडची कांही विलक्षण शक्ति आहे या घमेंडीने ते स्वतांची फसवणूक करून घेतात. यांपैकी कांहीही असलें तरी समंजस लोकांनी त्यांचेवर विश्वास कां ठेवावा ? जन्मभर केलेल्या पापामुळे नरकांत जावें लागेल या भीतीने कांही लोक म्हातारपणीं धार्मिक होतात, त्यांची दया येते, व कांही

इतर लोक त्यांच्या पिकलेल्या केंसांना मान देऊन त्यांचे अनुयायी बनतात, ते तर मूर्खच. परंतु ज्यांना थोडीतरी अक्कल आहे त्यांना हें स्पष्ट कळलें पाहिजे की जें बुद्धीला समजत नाही तें जर खरें आहे असें कोणी सांगूं लागला तर त्यावर विश्वास ठेवणें मूर्णपणा आहे. तात्त्विक दृष्ट्या फारतर इतकें कबूल करावें लागेल की मनुष्याच्या बुद्धीला समजणार नाहीत अशा कांही गोष्टी असूं शकतील. परंतु याचा अर्थ असा खास नव्हे की याचा फायदा घेऊन कोणी कांहीही सांगितलें तरी त्यावर विश्वास ठेवला पाहिजे. उद्या ऋषि म्हणतील, भुताटकीवर विश्वास ठेवावा असा उपदेश करण्याकरता कॉलेजांत एक तास ठेवावा व त्याला सर्वांनी आलेंच पाहिजे असा नियम करावा, तर त्यांना गोखल्यांच्या इतकेच शहाणे कां समजूं नये ? हे ईश्वरवाले लोक, ज्योतिषी, भुताटकीवाले, मंतरलेले ताईत विकणारे, सर्व एकाच माळेचे मणी. मंतरलेल्या ताईताने जर इच्छित कार्य होतें, तर तूं रे गाढवा, जाहिराती देवून लोकांच्याकडून पांचपांच दहादहा रुपये कां गोळा करीत बसलास ? हातांत ताईत बांध आणि कोट रुपये मिळावे अशी इच्छा कर म्हणजे जन्माची दधात संपली; पाहिजे तर दररोज कोट मिळावे असें म्हण. पण कांही लोकांना फसायलाच पाहिजे असतें, दुसरें कांही नाही. ज्याचा मुलगा मेला त्याला, तो मेला नाही, फक्त त्याचें शरीर नष्ट झालें, पण तो येथे शिकत होता त्याच्या पुढच्या यत्तेंत त्याचा आत्मा बसला आहे, वगैरे गोष्टी सांगून जर समाधान वाटत असलें, तर ऋषींनी तसें कां सांगूं नये ? हा तरी एक प्रकारचा परोपकारच नव्हे का ? तें कांही असो, पण परवांच्या युनिव्हर्सिटीतल्या वादांत कांही बुद्धिमान समजलेल्या लोकांनी गोखल्यांच्या ठरावाला टेंकू दिला, निदान त्यांच्या मताला टेंकू दिला हें पाहून वाईट वाटतें. यांत तुमचे विद्वान प्रिन्सिपल महाजनी होते. तूं म्हणशील, महाजनींना देखील तूं बुद्धिमान समजत नाहीस की काय ? तर तसें नव्हे, पण माझ्या मताने बुद्धिमत्तेची व्याख्याच निराळी आहे. बुद्धीच्या पलीकडच्या कांही गोष्टी असल्या तर त्या आपल्याप्रमाणेच दुसऱ्यालाही कळत नाहीत हें बुद्धिमान् मनुष्याला स्पष्ट दिसतें, यामुळे लोकांनी ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल कांहीही थापा मारल्या तरी तो त्या खऱ्या मानीत नाही. तो आपल्या

बुद्धीचा उपयोग करायला नेहमी तयार असतो व अमूक विषयांत बुद्धीचा उपयोग करतां कामा नये असें म्हणत नाही. ईश्वराचें आकलन बुद्धीला होत नाही ना, तर मग गप्प बसा, तो असा आहे आणि तसा आहे, किंवा निदान तो आहे असें तरी तुम्ही कोण सांगणार ? असा रोखठोक जवाब तो ईश्वरवाल्यांस देतो. अमूक विषयांत बुद्धीचा उपयोग करूं नये असें जो म्हणेल त्याला त्या विषयांत तरी बुद्धि नाही असेंच नव्हे का? तो माझे मतें खरा बुद्धिमान नव्हे. ज्या बुद्धीला आत्मविश्वास नाही ती बुद्धि कसची? या कसोटीला जो उतरत नाही त्याला गणितासारखा कठिण विषय आला तरी तो खरा बुद्धिमान नव्हे, त्याची बुद्धि गणितांत चालते इतकेंच मी म्हणेन.

तुमच्या प्रिन्सिपलसाहेबांनी फर्ग्युसन कॉलेज उघडतांना तोडलेले तारे ऐकून, त्यांच्या डोक्यांत जळमटें वाढलीं आहेत अशी माझी खात्री झाली. आहेत की नाही प्रिन्सिपल ? हे लोकांना शिक्षण देणार !

४

खरें बोलणारे लोक कोणी असतात की नाही हा एक प्रश्नच आहे, पण निदान खरें बोलावें असें सर्वच म्हणतात असें कदाचित् कोणाला वाटेल. पण नाही, त्यालाही अपवाद आहेत. पहिला बाजीराव मांस खात असे असा पुरावा कागदपत्रीं सांपडतो असें सरदेसायांनी प्रसिद्ध केलें, पण तें पोतदारांना पसंत नाही. का, तर तें खोटें वाटलें म्हणून नव्हे, कारण तो मस्तानीचा दोस्त असल्यामुळे त्यांत खोटें वाटण्यासारखें कांहीच नाही हें त्यांनाही कबूल आहे, पण पहिल्या बाजीरावासारख्या थोर मनुष्यावर मांस खाण्याचा आरोप, खरा असला तरी, करूं नये असें त्यांचें म्हणणें ! पण मी म्हणतें हा आरोप नव्हेच, हा त्याच्या शहाणपणाचा पुरावा आहे. मांसाहाराचा उपयोग निर्विवाद आहे, प्रश्न इतकाच की गाईचें देखील मांस खाणाऱ्या जुन्या काळच्या ब्राह्मणांचें अनुकरण करायचें, की जैनांना शरण गेलेल्या पोतदारांसारख्या ब्राह्मणांचें अनुकरण करायचें ? अर्थात् हाही प्रश्न धार्मिक लोकांचा आहे, समंजस लोकांना प्रकृतीचा विचार केला म्हणजे पुरतो.

हीं सुशिक्षित लोकांचीं गोष्ट झाली. ते जाणून बुजूनच वेडांत शिरल्यावर त्यांना काय सांगायचें ? अशिक्षितांची मौज कांहीं औरच आहे, आणि ते जेव्हा दुसऱ्याला उपदेश करायचा आव आणतात तेव्हा हंसूं आवरत नाहीं. जो अगदीच अशिक्षित आहे त्याला शिक्षणाचे परिणाम नेहमीं वाईटच दिसत असतात. जो अर्धवट शिकलेला आहे, त्याला वाटतें कीं आपलें शिक्षण मात्र योग्य, बेताचें झालेलें आहे. आपल्यापेक्षा कमी शिकलेल्या लोकांना कांहीं कळत नाहीं आणि आपल्यापेक्षा जास्त शिक्षण म्हणजे फार होतें, त्याने मनुष्य बिघडतें. हे दोन्ही प्रकारचे लोक हव्या त्या सामाजिक प्रश्नांवर मतें ठोकून देत असतात. परवा लायब्ररींत कांहीं मासिकें चाळीत होतें, तेव्हा 'दूत' मासिकाचा एक अंक पाहिला. त्यांत कांचेच्या बाटल्या कोठे मिळतात, मद्रासी सार करण्याची रीत, वैगरे माहिती बरी होती, पण इतर लोक सामाजिक प्रश्नांसंबंधी लिहीत असतात, तेव्हा आपणही कां लिहूं नये, असें वाटून संपादक महाशयांनी दहा बारा पानें सामाजिक प्रश्नांवर खरडलीं ! आणि त्यांच्या विचारसरणीचें वर्णन करावें तितकें थोडें आहे ! आणि काय, भराभर निकाल ! जातिभेद पाहिजे, कारण धंद्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग आहे, पिढीजाद असलेला धंदा जास्त चांगला होतो, आणि अमेरिकेचें उदाहरण ठेवलेलेंच, मग अमेरिकेंत जातिभेद नसेना कां ? तरुणांस बिचार करतां येत नाहीं, याकरता त्यांचीं लग्नें आईबापांनीच करून दिलीं पाहिजेत, नाहींतर काय परिणाम होतात तें दाखवण्याकरता एका बी. ए. झालेल्या सुस्वरूप कुमारिकेला तिच्या मानाने वाजवीपेक्षा जास्त काळा नवरा मिळाला, आणि तिला अर्थातच त्याचा रंग आवडणार नाहीं, असें उदाहरण दिलें आहे. काळेपणा वाजवी कसा असतो आणि वाजवीपेक्षा जास्त केव्हा होतो ? आणि आईबापांनी लग्न करून दिलेल्या कितीतरी गोऱ्या पुरुषांना काळ्या बायका आणि गोऱ्या बायकांना काळे नवरे मिळालेले मी प्रत्यक्ष पाहिले आहेत, त्यांची काय वाट ? आईबाप पैसा पाहतात, रंग कोणी पाहिलाच तर मुलीच पाहतील, आणि या बी. ए. ची वडील बहिण म्हणे शीक शीक शिकली आणि तिला असा नवरा मिळाला की तिलाच त्याचें पोषण करावें

लागतें. पण ती शिकली म्हणूनच तिला पोषण करतां येतें, नाहीतर दोघेही भिकेस लागलीं असतीं हें या वेडगळाला समजत नाही. पतिपत्नींमध्ये समता असूं नये. कारण पति पत्नीपेक्षा थोडा मोठा असावा असें म्हणतात, आणि अर्थात वय जास्त असलें म्हणजे जास्त मान मिळालाच पाहिजे. नुसत्या पांढऱ्या केंसांलाच जास्त मान द्यायचा असें नाही हां ! मान नेहमी वयावर ठरवावयाचा, म्हणजे १५ वर्षें वयाच्या सगळ्या माणसांनी १६ वर्षांच्यांना मान दिला पाहिजे. २६ ने २७ ला पाहिजे. असें हें चालायचें ! उदाहरणार्थ जवाहिरलाल नेहरूपेक्षा जे वयाने अधिक असतील, त्या सर्वांना त्यापेक्षा जास्त मान मिळायचा, असें हें कोष्टक आहे. नाहीतर आर्यसंस्कृतींत सांगितलेल्या मर्यादेचें उल्लंघन होतें ! याला सबळ पुरावा म्हणजे मुलगा शिकलेला असला तरी बापाला नमस्कार लिहितो आणि बाप त्याला आशीर्वाद लिहितो, तेव्हा प्रत्येक बाप प्रत्येक मुलापेक्षा श्रेष्ठ समजला पाहिजे की नाही, तूंच सांग. मग नवरा वयाने जास्त असतांना बायकांनी समता कां बरें मागावी ? विधवांनी पुनर्विवाह करूं नये. ब्राह्मणेतर जातींत तो चालूच आहे, पण ब्राह्मण हे उच्च आहेत, त्यांच्या उच्च विचारसरणींत असें मानलेलें आहे की विवाहाचे वेळीं स्त्री नवऱ्यास देहदान करते, त्यामुळे तिची स्वतांवर मालकीच रहात नाही, तेव्हा ती तोच देह दुसऱ्या नवऱ्याला कसा देणार ? वाहवा ! काय उच्च विचारसरणी आहे ! बरें याप्रमाणें नवऱ्याच्या मालकीचा देह झाला, म्हणजे मरतांना इतर इस्टेटीची जशी मृत्युपत्राने वासलात लावतां येते, तशी बायकोचीही लावावी ! आणि तशी लावायची म्हणजे ती एखाद्या मित्राला बक्षिस द्यायला काय हरकत आहे? "माझे मित्र रा. अमुक यांना माझी बायको फार आवडत असे, तेव्हा मेल्यावर मला तिचा उपयोग नसल्यामुळे मी ती त्यांस प्रेमपूर्वक अर्पण करतों, व ती त्यांजकडे सुरक्षित रवाना करण्याची जबाबदारी माझ्या वारसावर आहे." असें लिहून ठेवावें, आणि असें केलेलेंच बरें, नाहीतर बापाची इस्टेट मुलाला जावून अनर्थ व्हायचा ! अशा ब्राह्मणांच्या सारख्याच उच्च कल्पना आफ्रिकेंतल्या कांही नीग्रो जातींत आहेत, त्यांच्यांत तर अशीच पद्धत आहे. बाप मेला की त्याच्या सगळ्या बायका इस्टेट म्हणून

मुलाच्या ताब्यांत जातात. त्यांत मुलाची स्वतांचीच आई त्याची बायको होते की नाही हें माहीत नाही, कदाचित तिला तो दुसऱ्या कोणाला तरी देऊन टाकीत असेल किंवा विकीत असेल, पण त्यांना सुद्धा ब्राह्मणांसारखेच उच्च समजायला काय हरकत आहे? हे बहादर येथेच थांबले नाहीत, त्यांनी पुनर्विवाहाविरुद्ध एकापेक्षा एक सबळ प्रमाणें दिलीं आहेत. दुसरा मुद्दा असा को सुख हें मानण्यावर आहे, तेव्हा वैधव्यामुळे आपल्यास अत्यंत सुख होतें असें मानलें म्हणजे मग पुनर्विवाहाचें कारण नाही! तिसरा मुद्दा असा की आपल्या नशिबांत सुख असेल तरच तें मिळेल, पुनर्विवाहाने थोडेंच मिळणार आहे? नशिबांत वैधव्य लिहिलें असेल तर दुसरा नवरा मरेल, पुन्हा लग्न केलें तर तिसराही मरेल, कारण कितीही लोक मरावे लागले तरी विधवेचें नशिब खरें झालेंच पाहिजे! ल्या इतर लोकांच्या नशिबाला कोण विचारतो? याला उदाहरण सेवासदनाच्या कृष्णाबाई कानिटकर यांनी परदेशांत शिकून येऊन ग्वालेरच्या डॉ. फाटकांशीं पुनर्विवाह केला, पण त्यांना मोटारीचा अपघात होऊन कृष्णाबाई पुनः विधवाच! बिनतोड आहे की नाही? याला आहे कांही उत्तर? पुनर्विवाह केल्यावर नवरा पुष्कळ जगल्याचें एकही उदाहरण या अकलेच्या कांद्याला माहीत नाही! आता तूं म्हणशील मग पुरुषांनी तरी पुन्हा लग्न कां करावें? त्याचें कारण मी सांगतें. पुरुषांच्या नशिबांत सुख नेहमीच लिहिलेलें असतें, तेव्हा तें मिळेपर्यंत पाहिजे तितक्या बायका करायला हरकत नसते, कारण नशिबांत लिहिलेलें सुख तर मिळालें पाहिजे? हा संपादक अशिक्षित आणि शिवाय अडाणी असला पाहिजे की नाही?

५

काय ग, तुझें काय मत आहे, पुरुषांना खरोखरच अक्कल नसते की ते नसल्याचें ढोंग करतात? बडोद्याच्या कांही शहाण्यानी घटस्फोटाचा कायदा पुढे आणला, महाराजांनी त्याच्याकरता एक कमिटी नेमली आणि तो पास होऊन महाराजांनीहि आपली संमति दिली. महाराजांनी जी कमिटी नेमली, ती संस्थानांतल्या शहाण्या लोकांचीच नेमली असेल की नाही? मग त्यांनी

आपली अक्कल काय गहाण ठेवली होती ? नाही म्हणायला या कायद्यांत एकच चांगली गोष्ट दिसते, की घटस्फोटाकरता पुरुषांना आणि बायकांना सारख्याच अटी लागू केल्या आहेत. त्यांत एक अट अशी आहे की नवराबायकोपैकी एक दुसऱ्याला सतत तीन वर्षेंपर्यंत क्रूरतेने वागवील तर घटस्फोट मागतां येतो. यांतली खुबी तुझ्या लक्षांत आली का ? बायको नवऱ्याला क्रूरतेने वागवते असें उदाहरण क्वचितच सांपडेल, बहुतेक उलटच सांपडायचीं. तेव्हा या कायद्याप्रमाणे नवऱ्याने बायकोला दोन वर्षें आणि ३६४ दिवस दररोज झोडपून काढायला मुळीच हरकत नाही, व नंतर एक दिवस ममतेचें ढोंग करून पुन्हा सुरवात करायला हरकत नाही ! हा कायदा करणारे पुरुष असले पाहिजेत हें कोणीही सांगेल. बाकी अशा नवऱ्यापासून बायको पळून न गेल्यास तिला मारलेलें आवडतें असेंच मी म्हणेन.

आणि तूं मला म्हणतेस लग्न का करीत नाहीस ? बडोद्यांत आता कांही कारणाने तरी घटस्फोट मिळेल, इतर ठिकाणीं मुळीच मिळणार नाही, आणि नवरा कसा निघेल हें कोणीं सांगावें ? दारू पिवून बायकोला झोडपणारे नवरे सुशिक्षित मुलींना देखील मिळालेले तुला माहीत नाहींत का ? तूं म्हणशील आपल्या ओळखीचा, चांगल्या स्वभावाचा पाहून लग्न करावें. पण मी म्हणतें तरीसुद्धा आपल्याला झोडपायचा कायदेशीर हक्क त्याला कां द्यावा ? चांगला मनुष्य असला तर त्याच्याशीं मैत्री करावी, शारीरिक गरजा ह्मणशील तर त्या देखील पाहिजे तर भागवाव्या. मला पुरेसे पैसे मला मिळवतां येतात, मग मी दुसऱ्याच्या ताब्यांत कां जावें ? मला चित्रकलेचा नाद लागला हें एक बरेंच झालें, कारण त्याच्यावर माझें पोट भरतें, आणि चित्राची किंमत ठरवतांना त्यांत चित्रकाराच्या नीतीचा विचार येत नाही, तेव्हा मी आपल्या मनासारखें कां वागूं नये ? असें पहा, एखाद्या पुरुषावर आपलें मन बसलें, तर त्याच्याशीं संबंध ठेवायला अडचण म्हणजे लोकमताचीच की नाही ? वास्तविक त्यांत कांही पाप आहे असें तुला मनापासून वाटतें का ? नाही ना, मग येऊन जाऊन भीति कसली तर लोक म्हणतील, ही वाईट चालीची बाई आहे. ह्मटलें तरी मला

परवा नाही, कारण मी दुसऱ्यावर अवलंबून नाही. मला मूल झालें तरी, तेंही मी पोशीन, आणि मला नको असलें तर होगारही नाहीं. तुला माहीतच आहे की हल्ली अशी व्यवस्था करतां येते. नवरा म्हणजे एक का त्रास आहे? प्रेम म्हणून नवऱ्याकरता जें बायको करील तें मित्राकरताही कां करूं नये? तेव्हा सर्व प्रकारच्या सोयी होऊन जर आपलें स्वातंत्र्य राखतां येतें तर तें कां राखूं नये? दोघांनी आपआपले उद्योग करावे, वाटलें तर एकत्र रहावें, वाटलें तर वेगळें रहावें, पाहिजे तेव्हा भेटावें, म्हणजे दोवांचीही सोय झाली. समज मीं लग्न करायचें ठरवलें आणि मला मनाजोगा उत्तम स्वभावाचा नवरा मिळला, तरी देखील जन्मभर तो मला आवडेल हें कोणीं सांगावें? एकदा तो चिकटला की चिकटला, जन्मभर सुटका नाही. समज लग्न केल्यावर कांही वर्षांनी माझें दुसऱ्यावर कोणावर प्रेम बसलें, तर मला त्याच्याशीं बोलायची देखील चोरी, मग बाकी राहोच. हें समजत असून स्वतांला असें जखडून घ्यायला सांगितलें आहे कोणी? मी स्वतंत्र असलें म्हणजे मला पाहिजे त्या पुरुषाशीं बोलायची किंवा वाटेल तें करायची मोकळीक राहील. आणि सच्छील स्त्रीचें प्रेम सुद्धा निदान पांच पुरुषांवर असायला हरकत नाही, असें द्रौपदीच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसतें. शिवाय तिला एकदा कर्णासंबंधी सुद्धा इच्छा झाली होती हें मी विसरलेंच. माझें हल्लीं इतक्या लोकांवर प्रेम आहे असें माझें म्हणणें नाही, पण पुढे काय होईल कोणीं सांगावें? माझें जर अनेक पुरुषांवर प्रेम बसूं लागलें तर मी सर्वांशीं संबंध ठेवून स्वतांला द्रौपदीसारखी समजेन, कारण प्रेम मानसिक असतें, तें भटांवर अवलंबत नाही.

आजपर्यंत पुरुषांनी बायकांना कशा रीतीने वागवलें आहे, आणि अजून सुद्धा कसकसे हक्क त्यांनी आपल्याकडे ठेवले आहेत, हें पाहिलें म्हणजे अंगावर शहारे येतात. बायकांना गुलामासारखें वागवल्यावर त्यांच्यावर विश्वास ठेवणें शक्यच नव्हतें, तेव्हा रोमन लोकांच्या वेळीं पुरुष प्रवासाला जाऊं लागले म्हणजे बायकांनी दुसऱ्या कोणाशीं संबंध ठेवूं नये म्हणून त्यांना कुलुप लावून जात असत! अग म्हणजे खोलींत कोंडून नव्हे, त्यांना हिंडायला तर मोकळीक होती, पण तेवढ्या-

पुरतेच कुलूप होतें. सांगितल्याशिवाय तुझ्या लक्षांत नाही येणार कसें तें. हें पहा, एक प्रकारचा कमरपट्टा असे आणि त्याला पुढे, मध्यभागी एक पत्रा जोडलेला असे, तो खालपर्यंत लोंबत असे, आणि नेहमीच्या गरजेकरिता त्याला एक फट असे. त्या पट्ट्याला असे कुलूप. पण टाळाचावीवाल्याला कोणतेंही कुलूप उघडतां येईल हेंही बिचाऱ्यांना कळत नव्हतें ! मला हें प्रथम खरें सुद्धा वाटलें नाही पण असलीं कुलपें पॅरिसमधल्या संग्रहालयांत ठेवलेलीं आहेत असें दादा सांगत होता. तो स्वतः पाहून आला. खरें, दादा तुला माहीतच नाहीं, मी विसरलेंच. तो एक माझा मानलेला भाऊ आहे. त्याची माझी कांही महिन्यापूर्वी जरा चमत्कारिक रीतीने ओळख झाली. मी आपली कसला तरी विचार करीत जात होतें, इतक्यांत मागून गाडी आली आणि दादाने जर मला ओढली नसती तर मी मरतच होतें. तेव्हापासून तो येतो कधी कधी गप्पा मारायला.

६.

मरायच्या अगोदर लोक नोटीस देत नाहीत हें मोठें वाईट आहे, नाही ? मला जर कोणीं एखाद्याचा मृत्युलेख लिहायला सांगितला तर मी निदान एक महिन्याची नोटीस मागेन. हो, एखाद्याला खोटें बोलायची मुळीच सवय नसली तर मृत्युलेख कसा लिहिता येणार ? एक महिनाभर शक्य तितकें खोटें बोलायची चांगली संवय केली तर मग कदाचित साधलें तर साधायचें. अच्युतरावांवरचें मृत्युलेख वाचलेस का तूं ? त्यांना आपल्या बायकोबद्दल इतका आदर वाटत असे की ते नुसत्या साध्या बहुवचनावर भागवीत नसत, ते त्यांना 'आपण' म्हणत असत म्हणे ! तुझा नवरा तुला एकेरीच हांक मारतो ना ? काय तुझी फजिती ही ! तुझी कांही किंमत नाही नवऱ्याजवळ ! त्याला आपल्याबद्दल प्रेम वाटावें असें कदाचित तुला वाटत असेल, पण ती तुझी चूक आहे, त्याला आदर वाटला पाहिजे ! तूं एकदा रुसून बस, आणि तो ' आपण ' म्हणेपर्यंत त्याच्याशीं बोलूंच नको...

परवा काय झालें, दादा नी मी गेलों होतों सिनेमाला. आम्ही बाहेर पडलों तेव्हा बरीच गर्दी होती, आणि दोन बायका फूटपाथवर उभ्या राहून

गाडी ठरवीत होत्या, इतक्यांत एक म्हातारा पारशी मागून आला आणि त्यांपैकी एकीच्या ढुंगणावर चापट मारून पुढे निघून गेला ! ती मागे वळते तों तेथे कोण आहे ? आणि तो जरी उभा राहिला असता तरी पांढऱ्या केसांमुळे तो इतका भव्य दिसत होता की त्याची कोणाला शंका सुद्धा आली नसती, पण मी डोळ्यांनी पाहिलें. असे लोक असतात !

तुला अलीकडे माझ्या लग्नाची फारच काळजी लागलेली दिसते. मी आज बरेच दिवस विचार करीत होतें की तुला सांगावे की नाही, पण आता सांगतेंच. मी तरी तुला नाहीतर कोणाला सांगणार ? तुला सांगायला तशी हरकत कांहीच नव्हती, कारण आपल्याला शारीरिक गरजा असतात हें आपण एकमेकींजवळ कबूल केलेलेंच आहे. दादाची आणि माझी ओळख कशी झाली हें तुला सांगितलेंच आहे, तेव्हापासून तो बऱ्याच वेळां मला भेटायला कांही तरी निमित्त काढून येऊं लागला. शेवटीं मी त्याला सांगितलें की दर वेळेला निराळी सबब काढायचें कारण नाही, नुसतें मला भेटायला म्हणून यायला हरकत नाही तोही बिचारा माझ्यासारखाच एकलकोंडा आहे, तेव्हा आम्हाला मोकळेपणाने बोलायला सांपडतें असें आम्ही दोघें भेटलों म्हणजेच. मनुष्य कितीही एकलकोंडा असला तरी त्याला बोलायला नको असतें असें नाही. पण आपण कोणाशीं बोललो तर त्याला काय वाटेल, ही भीति मनांतून जात नाही. हा एक प्रकारचा भित्रेपणा तर खराच, पण एका दृष्टीने गर्वही आहे. आपण कोणाशीं बोललों आणि त्याने धड उत्तर दिलें नाही किंवा धुडकावून लावलें तर आपला अपमान होईल, तेव्हा न बोललेलेंच बरें, असें वाटतें. कांही असो, आमची बरीच गट्टी जमली आणि त्याच्या घरीं इतर मंडळी असल्यामुळे मी जरी त्याच्याकडे गेलें नाही, तरी तो माझ्याकडे पाहिजे तेव्हा बिलकूल संकोच घरल्याशिवाय येऊं लागला.

एक दिवस मी एक चित्रांचें पुस्तक चाळीत बसलें होतें आणि तो मला नकळत माझ्या मागे येऊन किती वेळ उभा राहिला होता कोणाला ठाऊक. पण

त्याने एकदम माझ्या गळ्यांत हात घालून माझा मुका घेतला. मला तंबाखूची अशी घाण आली की मी त्याला एक जोराने चपराक दिली. तो सिगारेट ओढतो हें मला माहीत नव्हतें, कारण माझ्यासमोर तो ओढीत नसे. तो वरमला आणि गाल चोळीत उभा राहिला. मला त्याची दया आली, पण मीं हसतच विचारलें, 'लागलें वाटतें ?' तो म्हणतो, 'शारदे, मला नाही वाटलें तूं इतकी द्वाड असशील म्हणून ! मी कांही तुझा गाल चोरून नेत होतों, की झालें काय ?' मी म्हटलें, 'मी द्वाड नाहीच मुळी, मीं तोंडांत कां मारली तें समजलें नाहा तुला.' 'त्यांत काय समजायचें आहे ? मी मुका घेतला तें तुला आवडलें नाही, म्हणून.' 'नाही, तुला नाहीच समजलें. ती अशाकरता मारली, की तंबाखूची घाण मला पसंत नाही. तूं तंबाखूबाज आहेस हें मला माहीतच नव्हतें. मला घाण येईल म्हणूनच तूं माझ्यासमोर विडी ओढली नाहीस, खरें की नाही ? मग आता मात्र तें कसें विसरलास ?' 'अग प्रेमाच्या भरांत भान राहिलें नाही.' 'बरें, आतां समजलें ? एकतर तंबाखू सोडून दिला पाहिजे, नाहीतर दोन हात लांब राहिलें पाहिजे.' 'चमत्कार आहे बुवा ! लग्न झालेले पुष्कळ लोक विड्या ओढतात, पण त्यांच्या बायका त्यांच्या तोंडांत मारतात असें कोठे ऐकलें नाहीं.' 'साहजिकच आहे, त्यांनी नवऱ्याच्या तोंडांत मारली तर पुढे त्यांची गति काय होईल ? माझी गोष्ट निराळी, मी कांही तुझी बायको आहें, म्हणून घाण सोसूं ? मी स्वतंत्र आहें.' 'पण असें काय बरें करतेस तूं ? इतक्या दिवसांची संवय सोडायला मला जडच नाही का ? त्यापेक्षा तूंच ओढायला लाग ना ? अगदी सोपें आहे, संवय लागायला मुळीच वेळ लागत नाही. दोहोंपैकी सोपा मार्ग असेल तोच बरा नाही का ? समाजांत रहायचें म्हणजे एकमेकांकरता थोडीशी अडचण सोसली पाहिजे.' 'वाः वाः ! यांत एकमेकांची अडचण नाही, अडचण होते मला. काय म्हणे, घाणीची संवय करावी ! मग म्युनिसिपालिटीची गरजच नाही. शहरांत घाण झाली तर झाली, संवय केली म्हणजे झालें. म्हणजे सगळ्यांची सोय होईल, लोकांना कर द्यायला नको, उमेदवारांना निवडणुकीला पैसे खर्चायला नको, सगळेंच जमलें.' 'पण मग त्यांच्या पैशाचा उपयोग काय ? पैसे असून मोठेपणा नाही तो

नाहीच!' 'बरें चेष्टा राहूं दे, मूळ मुद्दा तुला समजला म्हणजे झालें. मला तंबाखूचें विषही नको आणि घाणही नको, आणि दुसऱ्याला त्रास देणें म्हणजे अनीति आहे.' 'बरें तुझें लेक्चर पुरे झालें! आता उद्यापासून नाही ओढणार, बस? पण आता एक देशील की नाही?' 'तें काही चालायचें नाही' 'पण हात तरी कर इकडे.' 'नाही, माझ्या हाताला घाण लागेल.' तो हंसला, पण हिरमुसला होऊन गेला. त्याचें मला वाईट वाटलें, पण म्हटलें आता सैल सोडलें की सगळेंच फसायचें. तात्पर्य काय, त्याने त्या दिवसापासून तंबाखू सोडला, पण मग आमचें कांही चुंबनावरच नाही थांबलें. माझीं मतें तुला माहीतच आहेत, आपण कांही वाईट करतों आहों असें मला वाटलेंच नाही मुळी. विवाहाशिवाय संबंध ठेवणें हें पाप आहे असें वाटून ज्या तसें करतात, त्यांना तें सारखें खात असतें. मला त्यांत पापच वाटत नाही, तेव्हा माझे मन स्वस्थ आहे आणि मी अगदी आनंदांत असतें. नवराबायकोप्रमाणे आम्ही एकमेकांवर ताबाही चालवीत नाही आणि पहाराही ठेवीत नाही. आम्ही एकत्र रहातच नाही, त्यामुळे तें शक्यही नाही. तो म्हणतो आपण लग्न करूं म्हणून, पण मी तें कधी कबूल करणार नाही. मी आहें अशी सुखी आहें आणि तुझी मैत्रीण सुखी झालेली पाहून तुला पण आनंदच होईल असें मी धरून चालतें. चालूं ना?

७

माझ्या पत्रांचा तुला कंटाळा तर येत नाही? नाही तर मी आपली कांही तरी लांबलचक भारूड लिहितें, आणि तुला वाटायचें, काय ही कटकट? तसें झालें तर मला सांग हो, म्हणजे मी बंद करीन. वास्तविक पत्राची गोष्ट अशी असते की कंटाळा आला तर फेंकून द्यावें, म्हणून भीहि मग मनास येईल ते लिहीत सुटतें. माझ्यासारख्या एकलकोंड्या माणसांचें असें फार होतें. मोकळेपणाने बोलायला कांही फारसें सांपडत नाहीं, तेव्हा पत्रांत तरी मन मोकळें करतां येतें. मला वाटतें तूं नसतीस तर मी एखाद्या काल्पनिक मनुष्यालाच पत्रें लिहिलीं असतीं.

समाजस्वास्थ्य मासिकांतील निवडक लेख

परवां 'स्त्री' मासिकांत बायकांच्या पोषाखावर एक लेख पाहिला. वास्तविक 'स्त्री' आणि 'किर्लोस्कर' हीं मासिकें मी होतां होईल तों वाचीत नाही, कारण त्यांतले बहुतेक लेख असे असातात की जणूं काय ८० वर्षांचे आजोबा ५ वर्षांच्या मुलाला उपदेश करताहेत. आपण स्वतः उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर आरूढ होऊन संपादक महाशय सामान्य जनतेवर उपदेशाचा अनुग्रह मोठ्या सौजन्याने करीत असतात. असा आव आणून कोणी बोलायला लागला की नाही, की मला तेथून उठून जावेंसें वाटतें. लहान मुलांना उपदेश ऐकून घ्यावाच लागतो, नाहीतर मार बसेल, पण त्यांनाहि येतो कंटाळाच, मग असा उपदेश प्रौढांना कसा वाटेल, याची कल्पना संपादकांस आलेली दिसत नाही आणि कधी येईलसें वाटत नाहीं. त्यांतल्या गोष्टी सुद्धा अशाच. सुंदर गोष्ट म्हणून वाचायला जावें आणि ती 'मेलिन्स् फूड' ची जाहिरात निघावी, तशी हीं मासिकें वाचतांना भीति वाटते. बरें उपदेश तरी कांही नवीन आहे, तर तेंही नाही. खरें बोलावें, खोटें बोलूं नये, सकाळीं उठोनी देवासि भजावें, उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी, वगैरेंची उजळणी असायची. उपदेशाच्या उद्देशाने लिहिलेल्या लघुकथा, नाटकें, कादंबऱ्या, फारशा यशस्वी होणें शक्य नाही, कारण त्यांत सद्गुणांचा नेहमी उत्कर्ष व्हावा लागतो, आणि व्यवहारांत तर तसा होत नाही, आणि पुष्कळ वेळा लफंगे लोकच यशस्वी झालेले दिसतात, यामुळे मनुष्यस्वभावाचें हुबेहुब चित्र अशा गोष्टींत नसतें आणि त्या बनावट वाटतात. त्यांत अगदी एकसुद्धा समजंस लेख नसतो असें नाही, परंतु त्यांत सुशिक्षित लोकांना वाचण्यासारखें फारसें नसतें हें खरें. मराठींत आधींच चांगलीं मासिकें थोडीं, आणि त्यांत संपादकांनीच असे लेख लिहिल्यावर इतर लेखकहि तेंच धोरण ठेवतात. सुशिक्षित संपादकांनी इकडे लक्ष दिलें नाही तर कोणी द्यायचें?

पोषाखाबद्दल मी आज बरेच दिवस विचार करतें आहें, म्हणून परवा माझें तिकडे लक्ष गेलें. या बाबतींत युरोपांत बायकांनी पुरुषांची अगदी फजीति करून टाकली आहे. बायकांच्या पोषाखांत तेथे हल्ली फार सुधारणा झाली आहे,

पण पुरुष आपले आहेत तसे मूर्ख आहेत ! तेहि तसा प्रयत्न करतात पण त्यांत अडचणी फार. परवा एकदा लंडनमधे दोन पुरुष फक्त रेशमी शर्ट आणि विजार असा पोषाख करून जेवायला एका बडचा रेस्टोरांत गेले. पण तेथे अमुकच प्रकारचा पोषाख केला पाहिजे असा नियम होता, तेव्हा त्यांना तसेंच परत जावें लागलें. तिकडे एकंदरींत हें पोषाखाचें बंडच फार आहे. पोषाखांत पहिली सुधारणा म्हणजे स्वातंत्र्य पाहिजे. ज्याने त्याने आपापल्या सोयीप्रमाणे पोषाख करावा. आता हिंदुस्थानाविषयी म्हटलें तर पुष्कळ ठिकाणीं अतिशय उष्मा होतो, येथे कपडे शक्य तितके कमी असलेलेच बरे. अर्थात थंडी वाजली तर मनुष्य कपडे जास्त घालीलच. तरी सुद्धा ज्यांना उन्हांत चालावें लागतें त्यांनी अंगभर पातळ कपडा घालावा असें मला वाटतें. हल्ली यूरोपांत बायकांनीं पायमोजे घालणें सोडलें आहे म्हणतात, तेव्हा येथेहि पूर्वी पायमोजे घालीत असलेल्या बायकांनी ते सोडून दिले. वास्तविक येथे अंगाला ऊन लागलें तर चटका बसतो, तेव्हा अंगाला ऊन लागूं देऊं नयेसें मला वाटतें, ऊन आहे तों मोजे घालावे, ऊन कमी झाल्यावर घालूं नये, हेंच मला वरें वाटतें. इतकेंच नाहीं तर मी म्हणतें उन्हांत जायचें असलें तर हातमोजे सुद्धा घालावे. कपडे शक्य तितके कमी असावे हें खरें, पण उन्हांत जायचें असलें तर ते अंगभर असावे. एरवी पोलक्याला बाह्यांची जरूर नाही, आणि पोलकें न घालता जुन्या पद्धतीची चोळी देखील घालावी. अंग दिसलें थोडेंसें म्हणून झालें काय ? पोषाखाच्या बाबतींत लोकमताला थोडेंसें महत्त्व द्यावेंच लागतें, निदान महात्मा किंवा जैन मुनि झालें नाहीं तोंपर्यंत द्यावें लागतें. पण त्यांत सुधारणा करायची असेल तर प्रत्येकाने शक्य तितकें स्वातंत्र्य घेतलें पाहिजे, एरवी तें होणार नाही.

पोषाखांत काय गूण असावेत असें पाहूं गेलें तर असें म्हणतां येईल की तो डोळ्यांस चांगला दिसूनहि त्याने शरिराचे हाल होतां कामा नये. कपडे घातल्यावर सुद्धा हवा आणि उजेड शरिरापर्यंत कांही प्रमाणांत पोंचले पाहिजेत, ते घालायला काढायला सोपे असले पाहिजेत आणि थोडे असले पाहिजेत. या दृष्टीने युरोपियन बायकांचा हल्लीचा पोषाख बरा वाटतो. अंगांत एक चोळीवजा

पातळ कपडा, वर ब्लाऊज, खाली आंतून चड्डी आणि वरून एक गुडघ्यापर्यंत स्कर्ट. ब्लाऊज आणि स्कर्ट मिळून एकच जोडलेला कपडा असला तर त्याहून उत्तम. कपडा रहावा म्हणून पोट घट्ट आवळून बांधणें बरें नव्हे, त्याने श्वासाला आणि पचनालाहि अडथळा होतो. वरचा आणि खालचा मिळून एकच कपडा असला म्हणजे आवळण्याचें कारण नाही. तो गुडघ्याचे खाली पोंचण्याचें कारण नाही, परंतु युरोपियन बायकांचे स्कर्टप्रमाणे तो वाऱ्याने वर उडूं नये म्हणून त्याला दोन्ही बाजूला आंतून फीत लावून त्यांतून पाय घालण्याची व्यवस्था करता येईल. ऊन असल्यासच पायमोजे घालावे. एरवी घालूं नये. उन्हाळ्यांत हे कपडे पांढऱ्या किंवा कोणत्याही उजळ रंगाचे घालावे, थंडी असल्यास गरम घालावे.

युरोपियन पद्धतीचे कपडे घातले म्हणजे फॅशनं करावी लागते ही कल्पना चुकीची आहे. विशेष प्रसंगी घालण्याकरता वेगळे कपडे असले म्हणजे झालें, आणि ते कोणत्याहि पद्धतींत लागतातच. साधे पांढरे कपडे असले म्हणजे ते नेहमी वापरतां येतात. युरोपियन लोक फॅशन करीत असले म्हणून आपण केली पाहिजे असें थोडेंच आहे ? आता तूं म्हणशील हें सगळें व्याख्यान झालें, पण यांतलें तूं काय करतेस ? मी हल्ली असाच पोषाख करते. तुझ्याकडे आलें म्हणजे पाहिजे तर पातळ नेसेन, पण येथे हाच बरा आहे. वरें मला कोणी हंसतहि नाही, कारण मी कुंकूं लावीतच नसल्यामुळे मी ख्रिस्ती असेन अशीच लोकांची कल्पना होते. होईना कां ? त्यांत माझें कांहीच नुकसान नाही. माझ्या ओळखीच्या लोकांना माझीं मतें माहीतच आहेत. उन्हाकरता हॅट घालावी असें मला वाटतें. वास्तविक हॅटची कल्पना हिंदुस्थानासारख्या उष्ण देशांतच निघायला पाहिजे होती, पण आमची अक्कल सगळी अध्यात्मांत खर्च झाल्यामुळे व्यवहाराला शिल्लकच राहिली नाही. बायकांना एक अनवाणी चालायची शिक्षा होती, पण पुरुषांनी स्वतःची तरी सोय पहायची होती की नाहीं ? हल्ली साहेबी टोप्या बंगाल्यांत तयार होतात तशा पूर्वी झाल्या नसत्या का ? पण तें नाहीच.

अर्थात पोषाख प्रसंगाला योग्य असला पाहिजे, म्हणजे जेथे कपड्याचा उपयोग नाही किंवा अडचण होईल तेथे नग्नतेची चाल पडली पाहिजे. उदाहरणार्थ घरांत धुणीं धुतांना अंगावर कपडे कशाला ? व्यायाम करतांना किंवा पोहतांना कपडे कशाला ? कपड्याचा मुख्य उपयोग म्हणजे थंडी किंवा उन्हापासून संरक्षण, आणि जेथे गर्दीत दुसऱ्याच्या अंगाला अंग लागण्याचा संभव असेल अशा ठिकाणीं संसर्गापासून संरक्षण. सौंदर्याच्या दृष्टीने म्हणशील तर कपडे कितीहि चांगले असले तरी नग्न शरीराचें सौंदर्य त्यापेक्षा अधिक आहे. यामुळे ज्या कपडयांनी शरीराचाच आकार स्पष्ट दिसेल तेच सुंदर.

८

पारंपरिक लोक आपल्या परस्परविरोधी कल्पनांचा मेळ कसा घालतात तें त्यांचें त्यांनाच माहीत. खरें म्हटलें तर ते तसा मेळ घालण्याचा प्रयत्नच करीत नाहीत असें म्हणावें लागतें, कारण एरवी त्या एकत्र टिकतील कशा ? आणि त्या तर त्यांच्या मताने टिकल्या पाहिजेत, कारण त्या जुन्यापुराण्या असल्यामुळे पवित्र झालेल्या असतात. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषांच्या शारीरिक संबंधाला घाणेरडा समजणें ही कल्पना रूढ आहे, व त्याला पशुवृत्ति म्हणण्याचा नीतिबाज लोकांचा प्रघात आहे. पण तेच लोक मातापितरांना अत्यंत पूज्य समजतात, तेव्हा मातापितरांचा परस्परांशीं संबंध काय असतो हें त्यांना माहीत नसतें का ? किंवा पूज्य लोकांतहि कांही दोष असायचेच, तसा हा एक मातापितरांचा दोष असें ते समजतात. ? परंतु हा दोष असल्याशिवाय तीं मातापितरेंच होऊं शकत नाहीत, म्हणजे पूज्य होऊं शकत नाहीत, हेंहि त्यांस कळूं नये का ?

अशा प्रकारचा मूर्खपणा नकळत झाल्यास गोष्ट वेगळी, पण जे विचारी लेखक म्हणून नांव मिळवूं पाहतात, त्यांनी याचा विचार करायला नको का ? 'यशवंत'च्या एका अंकांत 'पंकज' नांवाची एक गोष्ट आहे. लेखकाच्या नांवापुढे 'बी. ए. (ऑनर्स)' लिहिलें आहे, तेव्हा ते फारसे जुनेपुराणे नाहीत असें दिसतें, पण कल्पना ह्या अशा. तरुण स्त्रीपुरुषांचें प्रेम 'पंकज' आहे, म्हणजे शारीरिक

आकर्षणाच्या चिखलांत त्याचा जन्म आहे, असें गोष्टींतील सुमतिताई सांगतात व त्यांचा मित्र मान डोलावतो. ती सुंदर नव्हती, परंतु हुशार होती, आणि तिची एक मैत्रीण हुशार नव्हती पण सुंदर होती. त्या दोघींचें एकाच मास्तरावर प्रेम बसलें, व त्याला दोघींतील हा फरक माहीत असूनहि त्याने सुंदर मुलगीच पसंत केली, म्हणून तिला वाईट वाटणें साहजिक आहे. पण त्याने सुंदर मुलगी पसंत करणेंहि तितकेंच साहजिक आहे. यामुळे चिडून तिने एकंदर प्रेमाचें मूळ चिखल आहे असे पाहिजे तर म्हणावें, तें क्षम्य आहे. देखणेपणा अत्यंत फायदेशीर असतो व देखण्या स्त्रीपुरुषांना या गुणाचा पदोपदीं फायदा मिळून पुष्कळ वेळा तेवढ्याच गुणामुळे इतर बाबतींत निर्विवाद श्रेष्ठ असलेल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करतां येते, हें मला माहीत नाही का? मी स्वतः सुस्वरूप नाहीं यामुळे माझें पुष्कळ वेळा नुकसान झालें आहे, परंतु याबद्दल संतापणें म्हणजे, लोहचुंबकाला लोखंड तेवढेंच आवडतें, इतर धातु—सोनें देखील–आवडत नाही, म्हणून संतापण्यासारखेंच नव्हे का? शारीरिक आकर्षण हा नैसर्गिक नियम आहे व तो समजून चालण्यांतच शहाणपणा आहे. त्याला चिखल वगैरे शिव्या देण्यात अर्थ नाही. या बाबतींत केवळ हुशारी किंवा इतर मानसिक गुणांचा उपयोग नसतो इतकेंच नव्हे तर अत्यंत कुरूप लोकांस प्रेमाचा अनुभवच मिळणें अशक्य होतें. कुरूप लोकांची दया येणें साहजिक आहे, परंतु कांही लोक इतके कुरूप असतात की त्यांचेपासून लांब पळून जावेंसें वाटतें आणि अशा वेळी दयेलासुद्धां अवकाश नसतो. अशा लोकांत कितीहि चांगले गुण असले तरी त्यांचेबद्दल प्रेम कसें उत्पन्न होईल? अर्थात कुरूप लोकांची चेष्टा मी कधी करणार नाही, परंतु कधी कधी कुरूप लोक सुद्धा कुरूपतेची चेष्टा करतात, त्याचें मला नेहमी हसूं येतें. माझे मतें अशी चेष्टा करणारा मनुष्य जात्याच वाईट असला पाहिजे. गडकऱ्यांनी एका नाटकांत काळ्या मुलींची चेष्टा केली आहे, त्यांत त्यांनी कितीहि अक्कल खर्च केली असली तरी तो हीन दर्जाचा विनोद त्यांच्या लौकिकाला शोभत नाहीं. बरें, गडकरीहि स्वतः गोरे नव्हते म्हणतात, तेव्हा काळेपणाची कोणती पायरी आली म्हणजे हंसावें, हें त्यांनी सांगितलें असतें तर बरें झालें असतें.

पण मला मुख्य सांगायचें होतें त्या पंकजावद्दल. सौंदर्याची जी नैसर्गिक आवड अत्यंत सुशिक्षित आणि सुसंस्कृत लोकांत सांपडते, ज्या आवडीवर सर्वांत उच्च दर्जाच्या कला अवलंबून आहेत तिला चिखल म्हणून कसें चालेल? पुरुष कितीही सुशिक्षित असला तरी त्याला बायको सुशिक्षित पाहिजे असते असें नाही, परंतु सुंदर मात्र जरूर पाहिजे असते असें नेहमी दिसतें. हें स्वाभाविक आहे इतकेंच नव्हे तर मी म्हणतें तें समाजासहि हितावहच आहे, कारण या आवडीमुळेच मनुष्यजातीचे सौंदर्य वाढणार नाही का? अलबत वाढेल. श्रीमंतांस पैशाच्या जोरावर सुंदर बायका मिळवितां येतात, म्हणूनच ज्या घराण्यांत दोनतीन पिढ्या श्रीमंती टिकली, त्या घराण्यांत बहुधा सुंदर स्त्रीपुरुष निर्माण होतात. अर्थात् त्यांनी आरोग्यासंबंधी योग्य काळजी घेतली तर, नाहीतर गर्मीसारख्या रोगांनी त्यांना पछाडल्यास मग पहायलाच नको. सामान्यतः सौंदर्याबरोबर आरोग्यहि वाढतें, किंबहुना जें शरीर निरोगी नाही तें खरोखर सुंदर असणें शक्य नाही. तेव्हा या आवडीला चिखल म्हणण्यापेक्षा मी असेंच म्हणेन की मनुष्याला कुरूपतेच्या चिखलांतून बाहेर काढणारी ही शारिरिक सौंदर्याची आकर्षणशक्ति अत्यंत इष्ट आहे. पुरुषांना पैसे मिळविण्याची ताकत असते, म्हणून ते सौंदर्याला जास्त महत्त्व देऊं शकतात, बायकांना ती ताकत बहुधा नसते, म्हणून त्या पैशाला जास्त महत्त्व देतात. सौंदर्याच्या प्रेमापेक्षा पैशाचें प्रेम उच्च दर्जाचें आहे असें मला वाटत नाही. त्यांत इतकेंच दिसतें की लग्न करतांना त्याची शारीरिक बाजू पुरुषांना समजते आणि त्याप्रमाणे ते वागतात. आता त्या गोष्टींतल्या ज्या दोन मैत्रिणी आहेत, त्यांचें प्रेम त्या मास्तरावर होतें इतकेंच नव्हे तर त्याचें प्रेमही दोघींवर होतें असेंच दिसतें, पण त्यांत त्याला निवड करावी लागली, याला तो काय करणार? ही समाजाची चूक आहे. वास्तविक अशा वेळीं त्याने दोघींशीं संबंध ठेवायला माझ्या मताने मुळीच हरकत नाही, म्हणजे तिघांचेही समाधान झालें असतें, आणि दोन मैत्रिणींत विनाकारण वैरहि आलें नसतें. तुला कसें वाटतें?

९

विक्रमाच्या सिंहासनावर कोणीहि बसला तरी त्याच्या मनांत औदार्याच्या उकळ्या फुटत असत असें एकदा कोठेतरी वाचलेलें आठवतें. तसेंच केसरीच्या

संपादकीय तख्तावर जो कोणी बसेल तो आपोआप विलक्षण बुद्धिमान होऊन अत्यंत बिकट प्रश्न चुटकीसरसे सोडवण्याची शक्ति त्याच्या अंगांत येते अशी बऱ्याच लोकांची कल्पना दिसते. एरवी केसरीच्या प्रस्तुत संपादकाचा बेकारी-वरील भरमसाट लेख **उद्यमा**सारख्या 'शास्त्रीय' म्हणवणाऱ्या मासिकाने कां छापला असता? तो 'विनोदी लेख' म्हणून छापला असता तर एक असो, परंतु त्यांत खरोखरच सत्याचा कांही अंश आहे असें **उद्यमा**च्या संपादकांस वाटत असल्यास वाचकांचें दुर्दैव आहे. हल्ली सर्व जगाला बिकट सांपत्तिक स्थिति प्राप्त झाल्यामुळे गोंधळून जाऊन तज्ज्ञ समजलेले लोकहि एखादेवेळीं वेडगळ उपाय सुचवतात, मग अज्ञानांची गोष्ट काय! त्यांना हा अधिकार नेहमीच असतो.

ज्या वेळीं कोणताहि धंदा चालत नाही, कशाचीही विक्री न झाल्यामुळे बेकारी बोकाळली, अशा वेळी सर्वांस काटकसरीचा उपाय सुचवणें म्हणजे हास्यास्पद नाही का? कोणी कांही विकतच न घेतल्यास कोणताहि माल खपणार नाही आणि सर्व धंदे जास्त खालावतील आणि बेकारी जास्तच वाढेल, हें समजण्याइतकी अक्कल राजकीय पुढाऱ्यांस फार झालें तर नसेल, पण अर्थ-शास्त्रांत तज्ज्ञ म्हणवणारांस तरी असावी की नाही? पण सगळे एका माळेचे मणी! या वेळीं शक्य तितका जास्त पैसा खर्च करणें हा एकच उपाय आहे, असे कोणी समंजस तज्ज्ञाने सुचवल्यास लोक त्याच्यावर तुटून पडतात.

केसरीच्या संपादकाची विद्वत्ता याहीपेक्षा जास्त आहे. त्यांचें म्हणणें असें की बेकारी केवळ मानण्यावर आहे. यूरोपांत बेकारीचा बोभाटा कां? तर तेथे १२ वर्षापुढील मुलें व स्त्रियाहि काम शोधतात म्हणून. अर्थात यांनी जर कामच केलें नाही तर ते बेकार नाहीत. तेव्हां कामावर जाणाऱ्या मुलांस १२ वर्षांची वयोमर्यादा आहे ती २० वर्षांपर्यंत वाढवावी आणि म्हातारपणी अमुक वर्षापुढे कोणताहि धंदा करतां कामा नये असाहि नियम करावा. सारांश जितके लोक हल्ली बेकार असतील तितकी संख्या कमी होईपर्यंत या दोन्ही मर्यादा खेंचल्या

म्हणजे बेकारी संपली; सर्वांना अन्न वगैरे विपुल मिळणार आणि एकंदरींत चैन होणार, कारण बेकारी संपली. अर्थात स्त्रियांनी कधीच काम शोधतां कामा नये, आणि एका मिळवत्या पुरुषावर जितक्या अधिक माणसांचा भार पडेल तितकी बेकारी कमी ! मला वाटतें याला सर्वांत उत्तम उपाय म्हणजे कोणींच कोणत्याही वयांत कामच शोधतां कामा नये असा सरसकट कायदा केला म्हणजे बेकारी अशक्य होईल आणि कोणाची तक्रारहि राहण्याचें कारण नाही. कारण सर्वांना एकच कायदा ! इंग्रज सरकारला कांही अक्कलच नाहीं, नाहींतर त्यांची बेकारी केव्हाच नाहोशी झाली असती. निदान पुढच्या वर्षी **करंदीकरांना नोबेल प्राइझ** मिळाल्यावर तरी त्यांचे डोळे उघडोत आणि संपादक महाशयांना इंग्लंडांतील मुख्य प्रधानाची जागा मिळो.

अर्थशास्त्रांत सर्वच तज्ज्ञ, तेव्हा सौ. गिरिजाबाई केळकरांनीच काय पाप केलें आहे ? आणि त्याहि त्याच कंपूतल्या, तेव्हा त्यांच्याहि आर्थिक स्वातंत्र्यावरील लेखाला याच अंकांत स्थळ मिळालें आहे. त्या देव्हाऱ्यांत बसणाऱ्या, तेव्हा त्याच्या लेखाची मर्यादाहि आकुंचितच आहे. आम्ही देवता, असें स्वतःला म्हणवून घेण्याची त्यांना फार हौस, कारण दुसरा कोण म्हणायला बसला आहे ? त्या म्हणतात, आम्हाला देवता म्हणा, म्हणजे आमच्या मर्जीला आल्यास आम्ही स्वयंपाक वगैरे करूं, हुकूम केल्यास नाही करणार, आणि पैसे बैसे मिळवायला सांगाल तर खबरदार. समाजांत वावरून जगाचे टक्केटोणपे खायला आमचें काय अडलें आहे ? तें तुमचें तुम्ही पाहून घ्या. आता एखाद्या वेळेला एखाद्या सभेचें अध्यक्षस्थानच मला दिलेंत तर मी घेईन, पण ती आपली मीच म्हणुन, सगळ्या स्त्रियांना नाही तें साधायचें, त्यांनी आपलें मूल आणि चुल याच्याजवळी-कडे प्रवास नाही करतां कामास. अशा प्रकारचे लेख ' शास्त्रीय ' म्हणवणारीं मासिकें ' शास्त्रीय अंकांत ' छापतात हें आश्चर्य आहे.

सर्वच पुरुष गाढव असतात की काय असा मला अलीकडे जबरदस्त संशय येऊं लागला आहे. पण नाही, कांही पुरुष देखील चांगले असतात, तरीपण एकंदर पुरुष जातींत घमेंडखोर गद्धे फार यांत शंका नाही. त्यांना स्त्रियांचे दोन प्रकार

माहीत असतात, एक पतिव्रता किंवा पावित्र्याचें ढोंग करणारी, आणि दुसरी तसें ढोंग न करणारी. या दुसऱ्या प्रकारच्या स्त्रीने येईल त्या पुल्लिंगी मानवाचें आव्हान पैसे घेऊन किंवा फुकट स्वीकारलेंच पाहिजे, अशी त्यांची ठाम समजूत असते. बायकांना कसची आवड निवड ? माझीं पत्रें **स्वास्थ्यांत** येऊं लागल्यापासून यांपैकी कांही गाढवांनी मासिकाच्या पत्त्यावर मला पत्रें लिहिण्यास सुरवात केली आहे. मी किंवा माझ्यासारख्याच मतांच्या इतर स्त्रियांनी त्यांची कामवासना शमविणें हें आमचें कर्तव्य आहे अशीच त्यांची कल्पना. तुम्ही झकमारतां, असें उत्तर मी त्यापैकी एकाला दिलेंच आहे, तेंच सर्वांनी समजून, संपादकांस विनाकारण सतावूं नये, अशी माझी विनंति आहे, आणि संपादकांस मी कळवलें आहे की अशीं पत्रें फाडून टाकून त्यांबरोबर तिकिटें असल्यास तीं त्यांनी वापरावीं, म्हणजे मूर्खपणापासून कांही तरी फायदा होईल.

१०.

तर्कशास्त्र कशाशीं खातात हें ज्यांना माहित नाही असे लोक युक्तिवादाचा आव आणूं लागले म्हणजे मोठी गंमत उडते. अशा प्रकारच्या एका लेखकाने नागपूरच्या **महाराष्ट्र** पत्रांत बरेच रकाने भरून काढले आहेत. मी म्हणेन ती नीति आणि त्यावेगळें कोणी म्हटल्यास ती अनीति, अशी या गृहस्थांची नीतीची व्याख्या आहे, प्रेम आणि स्वैराचार यांमधील सीमारेषा एकदा नक्की ठरवली पाहिजे, असें त्यांचें कळकळीचें मागणें आहे. म्हणजे या रेषेच्या एका बाजूला प्रेम, आणि दुसऱ्या बाजूला स्वैराचार, आणि या दोहोंचा कांही संबंध नसतो, अशी त्यांची कल्पना ! इतकी हास्यास्पद कल्पना मी बऱ्याच दिवसांत ऐकिली नव्हती.

नीतीची व्याख्या आपल्या सोयीप्रमाणे करून घेतली म्हणजे या नीतिबाजींत न येणाऱ्या गोष्टींना शिव्या द्यायला मोकळीक झालीच. ते म्हणतात, पातिव्रत्य आणि एकपत्नीव्रत या उच्च कल्पनांवर नीतीची उभारणी आहे पण या कल्पना उच्च कधी झाल्या ? कोणत्याहि धर्मांत या कल्पनांना उच्च स्थान

नाही, बायबलांत नाही, हिंदुधर्मांत नाही, कुराणांत नाही. एका वेळीं एकच पत्नी असावी, हें पाश्चात्य देशांतील ढोंग आहे व तेथे या ढोंगाला कायद्याचें स्वरूप आहे इतकेंच. इतरत्र कायदा फक्त स्त्रियांस लागू आहे, यामुळे तो अन्याय आहे, मग त्याला पाहिजे तर 'उच्च' अन्याय म्हणावें. जुन्या किंवा नव्या समंजस लोकांस यांत कांही 'उच्च' दिसण्याजोगें नाही. जुने लोक एकपत्नीव्रताबद्दल रामाची स्तुति करतात हें खरें, परंतु त्याचें वास्तविक कारण एकपत्नीव्रत नसून 'स्तुती करावी परमेश्वराची' इतकेंच आहे. कारण कृष्णाच्या १६१०८ बायका होत्या म्हणून त्याची, किंवा द्रौपदीला पांच नवरे होते म्हणून तिची देखील कोणी निंदा करीत नाही. बरें, परिणामांवरून पहायचें असेल तर असल्या 'उच्च' तत्त्वांचा परिणाम लोकांना ढोंगी बनवण्यापलीकडे काय होणार?

हे गृहस्थ सुशिक्षित स्त्रियांच्या वागणुकीला नांवें ठेवतात, पण अशिक्षितांची वागणूक तरी काय असते? स्वयंपाकाच्या बाया तर सुशिक्षित नसतात ना? परंतु त्यांत घरचे मालकाशीं किंवा घरांतील इतर पुरुषांशीं संबंध ठेवणाऱ्या काय थोड्या असतात? तीच स्थिति मोलकरणींची. कोणी म्हणेल, या खालच्या दर्जाच्या बायका झाल्या. अर्थात वरच्या दर्जाच्या म्हणजे श्रीमंत बायका स्वयंपाकाला राहणार नाहीत, परंतु त्यांस आपल्या दर्जाचा पुरुष न मिळाल्यास त्या नोकरांशींहि संबंध ठेवतात. सुशिक्षित स्त्रिया आपल्या दर्जाच्या पुरुषांशींच बहुधा संबंध ठेवतील, मग त्यांत बिघडलें काय? ज्या शरीराच्या नैसर्गिक गरजा आहेत त्या शिक्षणाने वाढत नाहीत, उलट मानसिक श्रमांमुळे शरीराकडे थोडें दुर्लक्षच होतें, परंतु अशिक्षितांचे मनाला दुसरा उद्योगच नसल्यामुळे त्यांनाच शारीरिक गरजा विशेष तीव्रतेने भासतात व त्यांचा मनोनिग्रह सुशिक्षितांपेक्षा जास्त असणें शक्य नाही. उलट सुशिक्षितांसच आपलें हिताहित जास्त कळतें व त्याकरता जरूर ती काळजीहि घेतां येते.

ज्या नीतीच्या डोल्हाऱ्याला असत्याचा टेंकू द्यावा लागतो, तिचें महत्त्व समंजस लोकांस पटावें कसें? कोणी ब्रह्मचर्याचें बंड माजवतो, कोणी रोगांचें खापर व्यभिचाराचे डोक्यावर फोडतो, तर कोणी गुप्त रोगांना घाणेरडे रोग असें

नांव देऊन ते कधीच बरे होत नाहीत असा धडधडीत खोटा पुकारा करतो. यांपैकी कांही अज्ञानाने व कांही जाणून बुजून सोयीप्रमाणे पाहिजे तीं विधानें ठोकून देत असतात.

यशवंत मासिकांत अशा एका बहादरांनी लिहिलेल्या एका गोष्टीचा नायक बायकोला सोडून नायकिणीकडे जाऊन राहतो आणि त्याला गर्मी ('घाणेरडा रोग') होऊन डॉक्टर त्याला बायकोशीं संबंध ठेवतां कामा नये असें सांगतो, आणि तो घरीं येतो. गोष्टींतील पात्रें आपण सांगूं तशीं हटकून वागतात आणि यामुळे गोष्टी लिहून हवें तें सिद्ध करता येतें आधुनिक नायकिणींना रोग होण्याचेंहि कारण नाही, आणि त्यांना असला तरी त्यांचेपासून इतरांस लागण्याचेंहि कारण नाही. रोगांचा बागुलबोवा आता संपला, आणि गुप्त रोग बरे होत नाहीत हेंहि खोटें. शिवाय रोगांच्या भीतीनेच जे व्यभिचार करीत नसतील किंवा वेश्यांकडे जात नसतील, त्यांच्या त्या नीतीची किंमत तरी काय? आणि अशा गोष्टी लिहून लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा उद्देश काय? आता त्या लेखकास या गोष्टी कदाचित माहीत नसतील, पण आपण जें लिहितों त्याविषयी माहिती करून घेणें लेखकाचें काम नाही का? ती माहिती न घेणें हेंहि खोटें बोलण्याइतकेंच अक्षम्य आहे. तुला कसें वाटतें?

काव्यद्वारा उपदेश करूं पाहणारे आणखी एक विद्वान म्हणजे **गडकरी.** प्रि. ताटके यांची **रत्नाकरां**तील 'सिंधूची कैफियत' वाचून खरोखर हंसूं येतें. अमुक एक सिद्धांत सिद्ध करण्याकरता लिहिलेल्या नाटकांचा दर्जा नाटक या दृष्टीने कधीहि फारसा उच्च असणे शक्य नाही, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे गडकऱ्यांचा 'एकच प्याला' आहे. त्यांची शेक्सपिअरशीं तुलनाच करणें मुळी गैर आहे, कारण त्याचीं नाटकें उपदेशाच्या उद्देशाने लिहिलेलीं नसतात, व यामुळेच त्यांतील पात्रांचा स्वभावपरिपोष नैसर्गिक रीतीने होऊं शकतो, व यांतच त्याच्या कलेचें खरें इंगित आहे. नाहीतर गडकऱ्यांची स्थिति पहा! त्यांचा उद्देश तरी नाटकांत साधला आहे म्हणावें तर तेंहि नाही, कारण प्रि ताटकेच कबूल करतात की सुधाकराच्या अंगीं घमेंडखोरपणा नसता तर तो व्यसनापायी बुडाला

नसता, आणि भगीरथाच्या उदाहरणावरून हें स्पष्ट दिसतें. मग यांत दारूचे परिणाम फारसे दिसत नाहींत असेंच नाही का होत ? आणि सिंधु अशी बावळट कां ? तर म्हणे ती तशी नसती तर दारूमुळे नवऱ्याबरोबर तिचा नाश झाला नसता, आणि मग दारूचे दुष्परिणाम ते काय ? तेव्हा नाटककाराच्या उद्देशास धरूनच तिची वागणूक आहे. तेंच मी तरी म्हणतें. उद्देश डोळ्यांपुढे ठेवल्यावर पात्रांना नैसर्गिक वागणूकीची परवानगीच नाही. पण गडकऱ्यांचा खरा उद्देश आजपर्यंत कोणाला कळलाच नाही, आणि त्यांच्या भक्तांना तो कळणें शक्यहि नाही. तो मी तुला सांगतें. (हो, मी आहेंच तशी हुशार !) ' असे पति देवचि ललनांना ' या पुरातन बावळट कल्पनेमुळे तिचा नाश झालेला दाखवून ही कल्पना किती घातक आहे हें दाखवण्याचा त्यांचा मुख्य उद्देश होता. ही कल्पना जर तिच्या डोक्यांत खिळली नसती तर तिचा नाश होण्याचें कांहीच कारण नव्हतें, कारण एरवी नवरा पुरा बहकला असें पाहून ती बापाकडे निघून गेली असती. अर्थात अशा जुनाट कल्पनेच्या विरुद्ध फारसें जोराने त्यांना कसें लिहितां येणार ? कारण त्यांना नाटकांवर पैसे मिळवायचे होते ! परंतु त्यांच्या स्नेह्यांना त्यांचे नवीन विचार पूर्ण माहीत होते. देवळांतून देवाची मूर्ति फेंकून देण्याची कल्पना देखील त्यांनी रंगभूमीवर अमलांत आणली. अर्थात असा प्रकार नायकाकडून करवण्याचें धैर्य त्यांस झालें नाहीं, कारण पैसे मिळवायचे होते, आणि क्रांतिकारक विचारांनी पैसे कसे मिळणार ? तेव्हा पतिव्रत्याविरुद्ध त्यांना उघड कांही लिहिणें शक्य नव्हतें. तेव्हा वरवर पाहणारास त्यांचा उद्देश दारूविरुद्धच लिहिण्याचा दिसतो, परंतु वास्तविक तो पातिव्रत्याविरूद्ध आहे. दारूने सुधाकराचा नाश व्हायला घमेंडखोरपणाची मदत लागली पण पातिव्रत्याला कशाचीही मदत लागली नाही व या एकट्या बावळटपणामुळे सिंधूचा नाश झाला. अर्थात् प्रि. ताटके म्हणतात, पातिव्रत्यामुळे नाश झाला तरीहि तें चांगलेंच, असें दाखवण्याचा गडकऱ्यांचा उद्देश होता. तरमग, दारूमुळे नाश झाला तरीहि ती चांगलीच, असेंच त्यांचें म्हणणें नव्हतें कशावरून ? ते स्वतः दारू पीत असत, तेव्हा हेंच जास्त संयुक्तिक दिसतें. तुला कसें वाटतें ?

११

आर्यसंस्कृति हें काय बंड आहे हें तुला माहीत आहे का ग? मला तर अजून कांही उलगडा होत नाही. आर्यांचा आज कित्येक हजार वर्षांचा इतिहास जर कोणीं पाहिला, तर त्यांच्या रीतीभातींत कांहीच फरक पडला नाही असें दिसत नाही, आणि फरक न पडला तरच आश्चर्य. तेव्हा पुण्यांतले बुरसट ज्याला आर्यसंस्कृति म्हणतात, ती कोणती? विवाहाची पद्धत श्वेतकेतूने पाडली असें म्हणतात, तेव्हा त्यापूर्वीचे आर्य विवाहाशिवायच संबंध ठेवीत असत असें दिसतें कारण एरवी श्वेतकेतूची उत्पत्ति कशी झाली! दारू पिऊं नये असा नियम शुक्राचार्यांनी केला. तेव्हा त्यापूर्वीचे आर्य दारू पीत असत. ब्राह्मणांनी मांस न खाण्याची रीत तर अगदीच अलीकडची आहे. त्यापूर्वीचे ब्राह्मण मांस खात असत इतकेंच नाही तर गोमांस देखील खात असत यावद्दल पुरावा सांपडतो. तेव्हा हल्ली जर एखादा ब्राह्मण गोमांस खाऊं लागला आणि दारू पिऊं लागला, आणि तीच खरी आर्यसंस्कृति समजून तो जर पुणेरी बुरसटांना धर्मलंड म्हणूं लागला तर तें चूक कां? मला तर त्यांत कांही चूक दिसत नाही, कारण तोच खरा जुन्या मताचा, आणि जुन्या मतांत फरक करणाऱ्या लोकांनाच धर्मलंड म्हणायचें की नाही?

आणखी काय काय गोष्टी आर्यसंस्कृतींत आहेत, तुला माहीत आहे? इतिहासकार **राजवाड्यांनी राधामाधवविलासचंपू**च्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे की व्याकरणकार **पाणिनी**च्या वेळेपर्यंत कुमारिकांना मुलें झालेलीं समाजाला चालत असत, अनुलोम आणि प्रतिलोम विवाह चालू होते, आणि पुरुषांनी पुष्कळ बायका करण्याची चाल अजूनहि आहे, तशीच बायकांनीहि पुष्कळ नवरे करण्याची पद्धत होती. तेव्हा या सगळ्या गोष्टी आर्यसंस्कृतींतच येतात की नाही? पण पुणेरी सनातनी हें थोडेंच कबूल करणार आहेत! त्यांचें म्हणणें एकंदरींत असें दिसतें की, "मूळची उज्ज्वल आर्यसंस्कृति घेतली तर त्यांत या सगळ्या गोष्टी होत्या खऱ्या, पण तिचें हल्लींचें स्वरूप

तसें नाही. आज शेंकडों वर्षें तीवर बुरशी चढून तिची स्थिति पार बदलून गेलेली आहे आणि ती बुरशी सुद्धा आर्यसंस्कृतींतच मोडते, आणि ती बुरशी काढायचा जर कोणीं प्रयत्न केला, किंवा ती बुरशी आहे असें जरी म्हटलें, तर आम्ही त्याच्यावर तुटून पडूं. **शापादपि शरादपि** पैकी एकहि शक्ति आमच्यांत नाही, व युक्तिवाद करण्याची अक्कलहि नाही तेव्हा प्रथम आम्ही शिव्या देऊं, आणि त्यानेहि नाही भागलें तर सरकारच्या हातांपायां पडून कांही उपयोग झाला तर पाहूं. इतर कोणत्याहि कायद्यांत न सांपडणारे लोक देखील अश्लीलतेच्या कायद्यांत सांपडतील असा वकीली सल्ला आम्हाला मिळालेला आहे, कारण अश्लीलतेचा अर्थच कायद्यांत सांगितलेला नाही करून तर पाहूं, गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाहीतर मोडून खाल्ली, त्यांत टपालखर्चापलीकडे आपलें कांहीच नुकसान नाही. जीं मतें आम्हांला पसंत आहेत तीच आर्यसंस्कृति, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. आतां आमचींहि आपआपसांत भांडणें आहेत, पण याला तर आधी हाणूं, मग भांडायचें आहेच." त्यांतल्या एका बुरसटाला इंग्रजी सुद्धा येतें म्हणे आणि एकाने आपल्या मुलीला देखील इंग्रजी शिकवलें आहे आणि तिचें लग्नहि लवकर केलें नाही. तरी 'न वदेद्यावनीं भाषां' असें एक तत्व आर्यसंस्कृतींत आहेच पण जेथे मुळी तत्त्वच असें ठरलें की जें मी करीन ती आर्यसंस्कृति आणि निराळें कोणी कांही करील तर तो धर्मलंड, तेथे यांतला हास्यरस कसा लक्षांत यावा ? अर्थात बुरसट मतें हेंच ज्यांचें पोटाचें साधन आहे ते बुरशीची तरफदारी करणारच, आणि पोटावर पाय आला म्हणजे साधेल त्या मार्गाने आपला बचाव करायचा प्रयत्न करणार, आणि अकलेने बचाव न झाला तर इतर मार्ग पाहणार. मनुष्यस्वभाव आहे, पण अशा लोकांची दया येते.

परवा आम्ही गेलों होतों राणीच्या बागेंत. कांही वेळ बसतों तों एक मनुष्य घंटा वाजवीत आला. आमच्या मनांत आणखी बसायचें होते, पंण काय करणार? रात्री बाग बंद. ती बंद करून त्यांचा काय फायदा होत असेल याचा मी अजून विचार करतें आहें. या सार्वजनिक बागा लोकांकरता असतात, की लोक बागांकरता असतात ? बर्लिनला एक अशीच बाग आहे ती रात्रभर उघडी असते,

कारण तिला दरवाजेच नाहीत. पण आमच्या बागेला दरवाजे आहेत, तेव्हा ते लावले नाहीत तर त्यांचा उपयोग काय? इकडे सगळीकडे हीच रड आहे. आगगाडी घ्या, पोस्ट ऑफिस घ्या, लोकांची सोय करण्याची बुद्धीच नाही. आगगाडींत सगळ्या वर्गांत विजेचे पंखे ठेवले तर किती सोय होईल? पण नाही. पहिल्या आणि दुसऱ्या वर्गांत नुकसान सोसून सुद्धा पंखे ठेवतील, आणि तिसऱ्या वर्गाकडून सर्वांत जास्त फायदा होत असला तरी त्यांची सोय करायची नाही कारण ते भाडें कमी देतात ना? मग त्यांनाहि पंखा दिला तर फरक काय राहिला? हें मुख्य कारण, कारण पंखे लावायला असा काय खर्च येणार आहे?

१२.

स्वतःचे गोडवे गाण्याचा लोकांना वीट कसा येत नाही हें मला अजून समजत नाही. की पूर्वजांचे गोडवे गाण्यांत घमेंडखोरपणा भरलेला आहे हें त्यांच्या डोक्यांतच शिरत नाही? हो, आमचे पूर्वज मोठे कां? ते **आमचे** पूर्वज म्हणूनच की नाही? अर्थात हें कारण लोक कबूल करणार नाहीत, परंतु त्यामुळे ते अधिकच हास्यास्पद होतात.

या मालिकेपैकी एक शिष्ट **लोकमित्र** मासिकांत लिहितातः 'पाश्चिमात्य संस्कृतीचें संकुचित रूप सर्व जगाला आता ज्ञात झालें आहे.....भारतीय संस्कृतींत मानवजातीचें अखंड कल्याण करूं शकतील असे कांही विशेष आहेत.' त्यांनी पुष्कळच लांब चऱ्हाट वळलें आहे परंतु तें सर्व याचीच पुनरावृत्ति आहे. अशा चऱ्हाटाने कदाचित मूर्ख बहुजनसमाज बांधला जाईल, लोकप्रियता मिळेल, वर्गणीदार वाढतील वगैरे फायदे निःसंशय होतील, परंतु सबंध लेखांत एक समंजस वाक्य असेल तर शपथ. मला तर असे लेख वाचून किळस येतो. या भारतसंस्कृतीच्या कमकुवतपणामुळेच पाहिजे त्याने हिंदुस्थानाच्या उरावर बसावें अशी स्थिति आली आहे, तरी हे अकलेचे खंदक तिलाच उराशीं बाळगताहेत. परकीयांनी आमच्या धार्मिक मोठेपणाचें रसभरित वर्णन केलें व अजूनहि करीत आहेत, परंतु ते तें कां करतात हें कळण्याइतकी या नेभळटांना

अक्कल कोठे आहे ? त्यांना वाटतें लोक आपल्याला खरोखरच मोठे समजतात हिंदी लोकांनी इतर प्रश्नांचा विचारच न करतां मूर्खांचे राजे बनून आपल्या काल्पनिक धार्मिक मोठेपणावरच खूष होऊन रहावें, असा आमचा स्तुति करण्यांत परकीयांचा कावा आहे. पण परकीयांच्या स्तुतीने फुगून गेलेल्या धार्मिक बेडकांना हें कसें दिसणार ? आणि परकीयांचा उद्देश यांच्या मूर्खपणामुळे कसा सहज साध्य होतो पहा. त्याच लेखांत हे गृहस्थ लिहितातः 'भारतवर्षांतील भग्नावशेष, देवालयें, ऐतिहासिक व धार्मिक स्थानें, चित्रकला व शिल्पकला ह्याचे अनेक नमुने अवलोकन केले पाहिजेत.' मरा, प्राचीन मोठेपणांतच मरा, पण हल्ली जगांत काय चाललें आहे हें मात्र पाहूं नका, कारण तें पाहिल्यास स्वातंत्र्यासारख्या भलभलत्या कल्पना कदाचित सुचूं लागायच्या ! आजकाल देशाचे खरे शत्रु कोणी असतील तर हे धर्ममूढ, बावळट, घमेंडखोर लोकच आहेत. जाळा त्या आर्यसंस्कृतीला !

परवां मी राणीच्या बागेंतून घरीं येत होतें आणि ट्रॅममधे फारशा जागा मोकळ्या नव्हत्या. ज्या होत्या त्या पुरुषांच्या शेजारी होत्या, त्यांतलीच एक मी घेतली. आपण सभ्यपणाने वागलें की पुरुषहि बहुधा तसेच वागतात. अर्थात पुरुषांच्या जवळच्या जागेवर बसल्यावर अगदी कपड्यांचा सुद्धा एकमेकांना स्पर्श होतां कामा नये, असें कसें चालणार ? इतकें लिहायचें कारण म्हणजे माझ्याबरोबरच दुसरी एक बाई चढली, ती कांही केल्या पुरुषांजवळ बसेना, आणि एरवी जागा नव्हती. ती आपली तशीच जिन्याजवळ अडचणींत उभी राहिली. तिला कंडक्टरने बसायला सांगितलें, इतर कांही लोकांनीहि सांगितलें, पण तिचें तें खरें. आपल्यामुळे इतरांची गैरसोय होते हें तिच्या स्वप्नींहि नाही. पुरुषांजवळ बसायचें नाही या हट्टामुळे ती दर स्टेशनावर दहा माणसांचे धक्के खात होती, आणि अशा वेळीं एखादा पुरुष मुद्दामहि धक्का देऊन जाईल. शेवटीं बायकांच्या बांकावर बसणाऱ्या बायका सुद्धा हंसूं लागल्या पण तिने मी उतरेपर्यंत तरी आपला हट्ट चालवला होता. बरें तसें म्हटलें तर ती बुरखावालीहि नव्हती. तिला खरोखर अक्कलच कमीच होती, की दहा माणसांचे धक्के

खाण्याचें वैचित्र्यच पसंत होतें, असेंहि एकदा माझ्या मनांत आलें. याचा निकाल करणें कठिण आहे, कदाचित तिला स्वतःला नकळत देखील वैचित्र्यच पसंत असेल, कोणीं सांगावें ?

१३

उत्तरास प्रत्युत्तर (पत्रव्यवहार, नं. २३ पहा). आर्यसंस्कृतीचे बाबतींत जर साहेबांचें मत प्रमाण समजायचें असेल तर मिस्र मेयोचेंहि म्हणणें विचारांत घ्यावें लागेल. आणि **मॅक्समुलर**च्या म्हणण्यांतून तरी तथ्य काय निघतें ? संपत्ति पाहिली तर हिंदुस्थान व चीन हे सर्वांत गरीब देश आहेत हें सर्व जगाला माहीत आहे. शक्ति पाहिली तर पाहिजे त्याने येऊन हिंदुस्थानावर दरवडा घालावा अशी स्थिति आहे. मग साहेब म्हणतात म्हणून हिंदुस्थानांत संपत्ति व शक्ति आहे असे समजायचें काय ? आणि नैसर्गिक सौंदर्यहि आर्यसंस्कृतीचाच परिणाम आहे काय ? बुद्धीचा विकास तर हिंदुस्थानांत इतका झालेला आहे की आजकालच्या सर्वोपयोगी शास्त्रीय शोधांपैकी एकहि हिंदुस्थानांत लागलेला नाही. तरी साहेबमजकूर म्हणतात की हिंदुसंस्कृतीचें स्थान वरच्या दर्जाचें आहे. याचा अर्थ इतकाच दिसतो की साहेब धार्मिक असल्यामुळे त्यांस खऱ्या गोष्टींपेक्षा काल्पनिक गोष्टींचेंच महत्त्व जास्त वाटतें व धार्मिक कल्पनासृष्टीलाच ते संस्कृति समजतात. नाही म्हणायला कित्येक हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानदेश इतर देशांपेक्षा अधिक सुधारलेला होता, असें कदाचित म्हणतां येईल. परंतु इतर लोक मागसलेले असतां देखील आता सर्व बाबतींत ते हिंदुस्थानच्या पुढे गेले आहेत, हें आपणास अधिकच लाजिरवाणें आहे. मॅक्समुलर साहेबांना हिंदुस्थानापासून काय शिकायचें होतें नकळे. पुष्कळ बायका करायच्या होत्या, की रखेली घरीं आणुन बायकोकडून तिची सेवा करवायची होती की आपण मेल्यावर बायकोने सती जावें अशी इच्छा होती, की तिने आपणांस देव मानावें असें वाटत होतें ? तो तर बोलून चालून पुरुष, त्याला काय हिंदु संस्कृतींत वाईट दिसायचें आहे ? पुरुषांची हिंदुस्थानांत चैनच असते. जी बाई तावडींत सांपडेल तिला गुलामासारखी वागवण्याचा हक्क असल्यावर त्याचें काय बिघडलें ? न्यायाचा प्रसिद्ध गड्डा जो **मनु**, त्याने सांगितलेच आहे की कोणतीहि

स्त्री मरेपर्यंत कोणातरी पुरुषाच्या ताब्यांतच असली पाहिजे. तिला मालक नाही असें नाही. बाप, नवरा, भाऊ, मुलगा, कोणीतरी तिच्यावर सत्ता चालवायला आहेच. न्याय कशाशीं खातात हें तरी त्या मनूला समजत होतें ?

मी स्वतःला सर्वज्ञ आणि महाविद्वान समजतें असें या गृहस्थांचें म्हणणें आहे, तथापि ते पुरुष असल्यामुळे माझ्यापेक्षा श्रेष्ठ असलेच पाहिजेत असें गृहीत धरून ते मला मूर्ख ठरवूं पाहतात. पण तें वाटतें तितकें सोपें नाही. मी मनूच्या काळांतली नाही आणि त्याला प्रमाण मानणारीहि नाही. उत्तराला प्रत्युत्तर देण्याची माझ्या अंगांत ताकत आहे. माझी भाषा समजायला त्यांना जरा जड जातें असें दिसतें, करण 'कामविषयक स्वातंत्र्य' याचा अर्थ त्यांना अजून समजलेला नाही. पुन्हा सांगतें. स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्याची मुभा, इतरांच्या नव्हे. अर्थात स्वातंत्र्य मला प्रिय आहे आणि हें स्वातंत्र्य ज्यांना नाही त्यांपेक्षा मी आपला दर्जा उच्च समजतें. कामविषयक स्वातंत्र्य दोन प्रकारच्या स्त्रियांस नसतें. वेश्यांस पैशाकरता गिऱ्हाइकाचे मर्जीप्रमाणे वागावें लागतें, आणि विवाहित स्त्रियांस कायद्याने पतीचे मर्जीप्रमाणे वागावें लागतें. मला मनाशिवाय कोणतेंहि बंधन नाही, परंतु या बाबतींत मला पत्रें लिहिण्याचा हक्क पाहिजे त्याला पोंचतो असा त्याचा अर्थ नाही. अशीं पत्रें लिहिणें हा एक त्रास देण्याचा मार्ग आहे, म्हणजे अनीति आहे. मीं ग्राम्य शब्द वापरले हें खोटें. मी ते शिमग्यांतहि वापरीत नाही. ते वापरण्याचा हक्क पुरुषांचा आहे, तो काबीज करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. तो त्यांनाच लखलाभ होवो.

हे गृहस्थ आर्यसंस्कृतीवर एवढें व्याख्यान देतात, पण आर्यसंस्कृति म्हणजे काय हें कोठेच सांगत नाहीत. प्रचलित नीतिकल्पनांत फरक केल्यावरहि जर संस्कृति कायम रहात असेल, तरमग हल्ली जे लोक तसा फरक करूं पाहतात त्यांवर आपण कां तुटून पडतां ? फरक नेहमीच चांगला असला पाहिजे असें नाही, परंतु आपणांस जर एखादा फरक अनिष्ट वाटत असेल तर तसें सप्रमाण सिद्ध करा, नुसतें आर्यसंस्कृतीकडे बोट दाखवूं नका, कारण आर्यसंस्कृतीला फरक खपतो असें आपणच म्हणतां. श्वेतकेतूने विवाहपद्धति सुरू केली हा मूर्खपणा

नाही हें मलाहि कबूल आंहे. दुसऱ्याचा खिसा कापणें हा देखील मूर्खपणा नाही, तसेंच दुसऱ्याच्या हक्कांवर दरवडा घालणें हाहि नाही. त्याला फार झालें तर स्वार्थ किंवा मुत्सद्दीपणा म्हणतां येईल. शुक्राचार्यांनी दारूला बंदी कां केली हेंहि या जाड्या विद्वानांना माहीत नाही. ते काय आतांपर्यंत झोंप घेत होते? याची माहिती करून घेणें योग्य नव्हतें का? ज्याची आपणास माहिती नाही, त्यांत लेखणी चालवणें हा शहाणपणा आहे का? त्यांनी दारूला बंदी केली ती समाजावर होणारे दुष्परिणाम पाहून नव्हे तर राक्षसांनी कचाला जाळून त्याची राख शुक्राचार्यांना दारूंतून पाजली म्हणून. त्याच्या पायांत खिळा टोंचला असता, तर जगांत कोणींही खिळे वापरूं नये असा नियम त्यांनी केला असता. हा मूर्खपणा नव्हे तर काय? श्वेतकेतूने विवाहाची पद्धत कां सुरू केली हेंहि आपणांस माहीत नाही. मग कोणाला विचारलें कां नाही? मी सांगतें ऐका. एकदा श्वेतकेतूचा बाप हजर असतां त्याचे घरी एक ब्राम्हण येऊन त्याचे आईला ओढून नेऊं लागला, हें पाहून तो खूप संतापला. त्याचा बाप म्हणाला, अरे हें चालायचेंच, त्यांत संतापायला काय झालें? परंतु तें त्याला सहन न होऊन त्याने विवाहाची पद्धत पाडून स्त्रियांचें स्वातंत्र्य नष्ट केलें. अलीकडच्या फ्रॉइड वगैरे लिंगज्ञांच्या मताप्रमाणे श्वेतकेतूचें आपल्या आईवर नकळत कामुक प्रेम होतें असा याचा अर्थ होईल, पण मी तसें म्हणत नाही. परंतु इतकें मात्र खरें की समाजावर काय परिणाम होईल याचा विचार त्याने केलेला नव्हता. तेव्हा हे जे आपल्या मतें इष्ट फरक झाले ते विचारपूर्वक केलेले नव्हते, संतापाच्या भरांत केलेले होते. अमेरिकेंत दारूबंदीचे परिणाम भयंकर झाल्यामुळे कायदा बदलण्याचा संभव आहे हें थोडेंबहुत वाचन करणारांस कळेल. गडकऱ्यांच्या नाटकाबद्दल मी पूर्वीच लिहिलें आहे.

पाणिनीच्या वेळचा समाज जास्त सुज्ञ होता हें आपणांस कोणत्या कर्णपिशाच्चाने सांगितलें? एखादा इंग्रज मुलगा इंग्रजी बोलतांना पाहून, काय पहा, एवढासा मुलगा, पण कसें घडघडीत इंग्रजी बोलतो आहे, असें कौतुकाने म्हणणारांपैकी आपण दिसतां. त्या वेळचा समाज अधिक सुसंस्कृत होता असें मानण्यास

कोणत्याहि प्रकारचा आधार नाही. पाणिनीचें व्याकरण जर त्यावेळीं ज्यास्त लोकांस समजत असेल तर त्याचें एकच कारण संभवतें की त्यावेळीं लोक संस्कृत बोलत असतील. अशी आपली कल्पना दिसते, परंतु संस्कृत कधी सामान्य लोकांच्या प्रचारांतली भाषा होती असें दिसत नाही. ती केव्हाहि पंडितांचीच भाषा असली पाहिजे असें तज्ज्ञ म्हणतात, आणि तसें असल्यास पाणिनीचें व्याकरण त्यावेळींहि फारशा लोकांस कळणें संभवत नाही. एकंदरींत या विसाव्या शतकांतहि आपली अशीच कल्पना दिसते की ईश्वराने प्रथम त्रिकालज्ञ ऋषि उत्पन्न करून नंतर मनुष्यजातीची एकसारखी अवनति करीत आणून त्यांस हल्लीची निकृष्ट दशा आणली. आणि म्हणून त्यावेळच्या लोकांना मात्र नीतिनियम बदलण्याचा हक्क होता,आणि हल्लीच्या लोकांना नाही. आमचें म्हणणें असें आहे की आम्ही त्यांचेपेक्षा ज्ञानाने श्रेष्ठ आहोंत आणि म्हणून नीतिनियम बदलण्याचा अधिकार आम्हांसच जास्त आहे. माहिती मिळवण्याचा उपदेश आपण दुसऱ्यास करतां , तो स्वतः अंमलांत आणल्यास आपणासहि या गोष्टी कळणें शक्य आहे.

यूरोप अमेरिकेत विवाहसंस्था नाही म्हणून आपणांस कोणीं सांगितलें ? विवाहसंस्थेचा जर कांही अर्थ असेल तर त्यांची विवाहसंस्था आपल्यापेक्षा उच्च दर्जाची आहे हें कबूल करावें लागेल. तेथे स्त्रियांस जसा एकच नवरा, तशी पुरुषांसहि एकच बायको करतां येते. आर्यसंस्कृतीसारखा अन्याय नाही. मतें प्रतिपादणारे स्वार्थांधतेनें एकतर्फीच प्रतिपादन करतात, असें आपण म्हणतां. तरमग आपला आर्यसंस्कृतीचा पुरस्कारहि याच दृष्टीने केलेला असला पाहिजे ! त्यांत कांही विशेष आहे असेंहि नाही. सर्वच लोक स्वार्थी असतात. इंग्रज सरकारने हिंदुस्थानास स्वातंत्र्य द्यावें असें म्हणण्यांतहि हिंदुस्थानचा स्वार्थच नाही का ? मग पुरुषांनी स्त्रियांस स्वातंत्र्य द्यावें असें म्हणण्यांत स्त्रियांचा स्वार्थ असला तर कोठे बिघडले ?

आर्यसंस्कृतीची येऊन जाऊन घमेंड काय ती आध्यात्मिक ज्ञानाची. याला ज्ञान म्हणणें हीच पहिली चूक आहे. जें सर्व अंतर्निरीक्षणापासून म्हणजे कल्पने-

पासून निघालेलें आहे, आणि म्हणूनच ज्यांत खरें काय आहे हें कधीहि समजत नाही आणि म्हणून निष्कारण रणें माजून राहतात, त्याला ज्ञान म्हणणें म्हणजे विपर्यास आहे. जें एकमेव अद्वितीय असतें असें सत्य म्हणजे बाहिर्निरीक्षणाने मिळणारें आधुनिक शास्त्रीय ज्ञान, तें मिळवण्याचा प्रयत्न करा. आपली पुरुषी घमेंड सोडून द्या आणि वेळीं अवेळीं साहेबांकडे धांव घेऊं नका. साहेबांना त्यांत काय कळणार ? जोडा कोठे लागतो तें वापरणारालाच समजणार त्यांतून माझें असें मुळींच म्हणणें नाही की माझीं मतें इतरांनी अमलांत आणावीं. विवाहित स्त्रियांवर कायद्याने समागमाची सक्ती आहे, तो ज्यांस पसंत असेल त्यांनी खुशाल विवाह करावा, आणि स्वार्थी पुरुषांनी त्याचा फायदा घ्यावा. पण मी मात्र माझ्या मताप्रमाणे वागणार आणि पुरुषांचा स्वार्थ लोकांच्या नजरेस आणून देणार. स्वतःचा जन्मसिद्ध हक्क मिळवण्यांत माझा स्वार्थ आहे असें आपण खुशाल म्हणा. परंतु दुसऱ्याचे हक्क पायांखाली तुडवणें हा नीच प्रकारचा स्वार्थ आहे, आणि स्वतःचे न्याय्य हक्क प्रस्थापित करणें हा उच्च स्वार्थ आहे, आणि या स्वार्थाबद्दल मला अभिमान वाटतो.

शेवटीं एक गोष्ट लक्षांत ठेवा, तिचा या नव्या युगांत उपयोग होईल. माझ्यासारखी स्वतंत्र स्त्री स्वतःचे मनाप्रमाणे वागते. वेड्येला जशा प्रकारचे प्रश्न विचारण्याचा हक्क कोणाहि पुरुषाला पोंचतो, तसे माझ्यासारख्या स्त्रीला कोणीं विचारल्यास तो थप्पड खाईल. मग आपण ग्राम्य वगैरे शिव्या खुशाल द्या.

१४

पुण्याच्या लग्नसराईंत तुझी अगदी चैन झाली असेल नाही ! माझ्या मतें हल्लीची विवाहसंस्था बायकांना कमीपणा आणणारी आहे आणि बायकांनी कोणत्याहि लग्नसमारंभांत भिरवतां कामा नये आणि कामहि करतां कामा नये. पण मग कपडे आणि दागिने लोकांना कसे दिसतील ? यांत तर पुरुषांचा सगळा कावा आहे. सरकार जसें मवाळांना पदव्या देतें तसेंच पुरुष बायकांना कपडे आणि दागिने देतात. नथीची वेंसण घातल्यावर कोणती बाई नाक वर करील ?

काय म्हणे अमक्याची मुलगी तमक्याच्या मुलाला दिली. मुलगा मुलीला दिला असें कधी म्हणतो आहे का कोणी ?; आणि हा अपमान बायका सहन करतात ! जिला काडीइतका अभिमान असेल किंवा माणुसकी तरी असेल तिला स्वतः-संबंधी असली भाषा वापरलेली कधीही खपणार नाही. पण परावलंबी मुलींना अभिमान तरी कसा असावा ! आणि म्हणूनच तर स्त्रियांना पुरुषांसारखें शिक्षण देतां कामा नये असे आपमतलबी पुरुष म्हणत असतात आणि बावळट बायका त्यांची री ओढतात.

अशा प्रकारचीं मागासलेलीं मतें प्रतिपादणारे तुमच्या पुण्याचे गो. मा. चि. जरी वारले तरी त्यांनी बराच शिष्यवर्ग तयार करून ठेवला आहे असें दिसतें. काल 'सरस्वती' मासिकाचीं पानें चाळीत होतें. हें मासिक अर्थात स्त्रियांसाठी असल्यामुळे त्यांत बावळट मतांचा संग्रह असल्यास मोठेंसें नवल नाही, आणि म्हणुनच मी तें होतां होईल तों वाचीत नाही. गेल्या एप्रिलच्या अंकावरून माझी समजूत खरी ठरली. इंग्लंदांतल्या कोणत्याहि पुरुषाचें किंवा स्त्रीचें मत आपल्या बाजूला असलें म्हणजे तो पुरावाच झाला असें एका लेखिकेचें मत दिसतें मुलां-मुलींचे सहशिक्षण असूं नये असें सिद्ध करण्याकरता लिव्हरपूलच्या एका कुमारी अध्यापिकेचें मत दिलें आहे. तिचें म्हणणें की मुलींचा कौमार्यावस्थेंतील विनय जर कायम राखायचा असेल तर सतराव्या वर्षानंतर सहशिक्षण असतां कामा नये. या बाईचें वय काय आहे हें सांगितलें नाही. विवाहाशिवाय ज्या स्त्रियांस रहावें लागतें त्यांना दुसऱ्याचें सुख पाहवत नाही हें प्रसिद्धच आहे किंवा दुस-ऱ्यावर शिंतोडा टाकून स्वतःचा विनय अजून कायम आहे असें तिला प्रस्थापित करायचें असल्यास नकळे. इंग्लंड या बाबतींत मागासलेलें आहे, पण तें माहीत कोणाला ? 'आपल्याकडे अलीकडे कॉलेजांत शिकलेल्या मुलींच्या लग्नानंतर लव-करच त्यांच्या नवऱ्यांनी आत्महत्या केल्याची उदाहरणें घडलीं आहेत. त्याच्या बुडाशी काय असलें पाहिजे ! आमच्या मतें तें हेंच की वधूंचा कौमार्यभंग झालेला मागाहून प्रत्ययास आला. झाला म्हणून काय झालें ? असें मानण्याची आपली तयारी नाही व ती कधीहि होऊं नये असेंच आमचें मत आहे. बीज-

शुद्धीला जितकें महत्व आहे तितकेंच किंबहुना त्याहून क्षेत्रशुद्धीला आहे हें केव्हाही विसरता येणार नाही...' कौमार्यभंग झालेला समजून आला तर त्या मुलीला अक्कलच कमी, आणि तो समजून आला म्हणून आत्महत्या करणाराला त्यापेक्षाहि कमी. त्यांत आत्महत्या करण्यासारखें काय झालें ? त्याचा बोभाटा झाला नसता, तो आत्महत्या केल्याने होतो, इतकेंच. शिवाय आत्महत्येचें हें कारणच मला खरें वाटत नाही. यापेक्षा जास्त समर्पक कारण म्हणजे नवऱ्याच्या पूर्ण नपुंसकत्वामुळे त्याने आत्महत्या करणें अधिक संभवतें. आता हें कारण असलें तरी मुलीचा दोष होता असें म्हणणेंच पुरुषांच्या दृष्टीने श्रेयस्कर असतें, तेव्हा एवीतेवी अशा वेळीं तर्कानेच कारण ठरवायचें असल्यामुळे साहजिकच मुलीच्या शीलावर गदा येते. शिवाय 'क्षेत्रशुद्धि' याचा कांही अर्थच होत नाही. शेत अशुद्ध कसें होतें ? तेथे तर भटांचा कांही संबंध नसतो ! जोपर्यंत पुरुषास किंवा स्त्रीस रोग झालेला नाही, तोंपर्यंत बीज आणि क्षेत्र दोन्ही शुद्धच आहेत. पण धर्मशास्त्राच्या आधारावर 'ऋतुस्नात कन्या वृषली होते' असें म्हणणारांना कितीहि सांगितलें तरी समजणार कसें ?

नागपूरचे लोक थोडेबहुत पुढारलेले आहेत अशी आजपर्यंत माझी कल्पना होती, पण तेथल्या बायकांना पडद्याशिवाय शिकतां येत नाही असें दिसतें. पड-द्याची चाल उत्तर हिंदुस्थानांतच आहे, तेव्हा नागपूरला तिची थोडीशी बाधा होणारच, परंतु एकीकडे स्वातंत्र्याची ओरड करायची, आणि एकीकडे हिंदुमुसल-मानांचीं धार्मिक भांडणें तर आहेतच, आणि तेवढींहि पुरेशीं न वाटल्यामुळे स्त्रियांनीं पुरुषांना शत्रूप्रमाणे वागवायचें, अशाने कोठे स्वराज्य मिळत असतें ? ज्यांना शिक्षणाकरता पडदा लागतो त्या स्त्रिया म्हणे राजकीय चळवळींत भाग घेणार ! स्त्रीपुरुषांतील हें भांडण जोपर्यंत संपलें नाही, तोंपर्यंत देशाची उन्नति होणें शक्य नाही. ब्राह्मणांनी महारांना अस्पृश्य मानायचे, स्त्रियांनी पुरुषांना अस्पृश्य मानायचें, आणि एकी पाहिजे म्हणून ओरड करायची आणि काव्य करा-यचें. एकीकरता ओरडणारे लोक जर अशा प्रकारांना उचलून धरूं लागले तर ते निःसंशय ढोंगी आहेत जाणि त्यांच्या हातून कोणत्याहि प्रकारचें उपयुक्त कार्य

होणें शक्य नाही. मुलांच्या कालेजांत जाणाऱ्या बायका देखील थोडाबहुत पडदा पाळतातच. त्यांची बसायची खोली वेगळी इतकेंच नव्हे तर वर्गांत बांकें देखील वेगळीं, टेनिस खेळायचें असलें तर तें देखील पडद्यांत. अशाने होतें काय, की त्यांना कॉलेजांतील शिक्षणाचा फायदा कधीही मुलांचे इतका मिळत नाही. याला हिंदुस्थानांत सहशिक्षण म्हणतात, पण ही सहशिक्षणाची चेष्टा आहे युरोपांत मुलींकरता वेगळ्या खोल्याहि नसतात आणि वर्गांत बांकेंहि राखून ठेवलेलीं नसतात जो अगोदर येईल त्याने पुढे बसावें, आणि पुरुष असतील त्या बांकावर आपण कसें बसावें, असें तेथे कधी मुलींच्या मनांत देखील येत नाही, आणि त्यांत त्यांचें कांही बिघडतहि नाही. हा नुसता संवयीचा प्रश्न आहे, ज्या मुलांमुलींना एकमेकांशीं बोलण्याची संवयच नाही, ती एकमेकांना पाहून बिचकणारच, पण संवयीने तें नाहींसें होतें. स्त्रीपुरुषांनी एकमेकांना शत्रु समजणें हें नैसर्गिक नाही, हा आर्यसंस्कृतीचा परिणाम आहे, आणि म्हणूनच तर मी म्हणतें की आग लावा त्या आर्यसंस्कृतीला. त्याशिवाय स्त्रीपुरुषांना देशाचे उन्नतीकरता एकमेकांस मदत करणें शक्य नाही, आणि ईश्वराची प्रार्थना करून स्वातंत्र्य मिळत नसतें. खरें सहशिक्षण मुंबईंतहि नाही, पण तितक्यालाहि नागपूरचा तयारी नाही असें दिसतें. नागपूरच्या स्त्रिया जर मागसलेल्या नसतील तर नवीन पडदा कॉलेजांत मुली न गेल्यामुळे तें बंद करावें लागलें पाहिजे. पण स्त्रिया बोलून चालून परावलंबी, त्या तरी काय करणार बिचाऱ्या? वऱ्हाडांतल्या एका मासिकांत एका लेखिकेची तक्रार वाचली की हल्ली बायकांचा विनय पार नाहींसा झाल्यामुळे त्या नंग्या डोक्याने हिंडूं लागल्या आहेत. या बाईचें डोकें देखील अश्लील आहे असें दिसतें, तेव्हा तें झांकण्याची जरूर तिला भासते !

१७

बडी अफसोसकी बात है की जो राजकारणांत पडला किंवा कोणत्याहि कारणाने बहुजनसमाजाला खुष करण्याची ज्याला जरूर असते, त्याला विचार करण्याची परवानगी नसते, किंवा कदाचित त्याने विचार केलाच तरी लोकमताविरुद्ध मत देण्याची त्याची छाती नसते. 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं न करणीयं नाचरणीयं'

हें तत्त्व उपदेशून समाजाचीं डोकीं उडवण्याचा प्रयत्न एका विद्वानाने केलाच आहे. बहुजनसमाजाला अक्कल नसते आणि दुसऱ्या कोणाला असेल तर त्याने तिचा उपयोग करूं नये, यापेक्षा समाजाला अधोगतीला नेणारा उपदेश दुसरा कोणता असूं शकेल ? सुदैवाने सर्वच बुद्धिमान लोक इतके शिळपट नसतात म्हणूनच कांही तरणोपाय आहे. परंतु असे लोक फारच थोडे आणि वरील उपदेशाप्रमाणे वागणारेच लोक फार, हें येथील 'विविधवृत्त' नांवाच्या साप्ताहिकाने घटस्फोटासंबंधी विद्वानांचीं मतें मागवून उत्तम रीतीने सिद्ध केलें आहे. त्यांत एकेकाने काय काय तारे तोडले आहेत म्हणतेस !

त्यांतील कांही तर बोलून चालून बुरसटच आहेत. उदाहरणार्थ श्री. चिं. वि. वैद्य म्हणतात, 'अडचणी उर्फ निर्बंध हेच सुस्थितीचे पोषक असतात.' सर्वच लोकांना तुरंगांत ठेवल्यास समाज अत्यंत नीतिमान होईल असें यांचें मत दिसतें, पण तें कितीहि हास्यास्पद असलें तरी वयोमानामुळे त्यांना आधुनिक विचार न सुचणें शक्य आहे, तेव्हा त्यांचें मत प्रामाणिक आहे असें समजतां येईल. त्याचप्रमाणे सौ. गिरिजाबाई केळकरांनीहि बुरसट मतांचा पुरस्कार केल्यास नवल नाही त्यांचे मतें 'लग्न जुळवतांना वडील माणसांना अक्कल आहे असें धरून चालावें' (ती नसली तरी?). वडील माणसांना नेहमीच अक्कल असत नाही हें त्यांसहि कळलें पाहिजे, पण जाऊंदे. त्यांच्या मतांबद्दल शंका घ्यायची माझी इच्छा नाही, तरी पण हेंहि खरें की विवाहित किंवा विवाहेच्छु स्त्रियांना बुरसट मतांस चिकटणें भागच असतें. श्री. कामत यांचीं मतें राजकारणामुळे बनवलेलीं आहेत की खरीं आहेत हें मला कळत नाही. ते म्हणतात, 'आर्यस्त्रियांचें स्त्रीधर्माबाबत उच्च ध्येय समतेच्या तत्त्वावर नसून बहुमोल नीतितत्त्वावर स्थापिलेलें आहे.' म्हणजे समतेचें तत्व नीच, आणि 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें नीतितत्त्व बहुमोल ! वाहवा ! श्री. कामत थोडेबहुत आधुनिक आहेत अशी माझी कल्पना होती, परंतु त्यांस खरोखरच असें वाटत असल्यास माझें मत बदलणें भाग आहे. हीं बहुमोल तत्त्वें केराच्या टोपलींत टाकण्यासारखीं आहेत. कु. कुमुदिनी प्रभावळकर यांनी घटस्फोटाचे बाजूला मत देण्याचें धैर्य दाखवलें आहे, परंतु लगेच

घाबरून जाऊन हिंदुसंस्कृतीच्या बाजूने एक पॅरा जोडला आहे. पण मी म्हणतें कुमारिका असून त्यांनी इतकें धैर्य दाखवलें हेंच पुष्कळ आहे सर गोविंदराव प्रधानांनी तर आपल्या कर्मठपणाची जाहिरातच दिली आहे, तेव्हा त्यांचीं मतें काय विचारावीं ! ते म्हणतात, 'हिंदु विवाह हा कोणत्याहि करण्यासाठी मोडतां येईल असा एखादा करार नसून तो एक शास्त्रोक्त संस्कार आहे व म्हणून तो अनुल्लंघ्य आहे.' शास्त्रें झक मारतात, आणि हिंदु धर्मांचीच कांही शेखी नको, रोमन कॅथोलिक लोकांचेंहि असेंच मत आहे की लग्नें ईश्वर लावतो, तेव्हा तीं मनुष्याने मोडणें रास्त नाही. धार्मिक लोकांची विचारशक्ति कशी नष्ट होते ती पहा. आईबापांनी मुलींना जबरीने कोणाच्या तरी हवालीं करायच्या आणि ईश्वराला साक्ष ठेवून त्याला धार्मिक संस्कार म्हटलें की त्यांच्या नशीबीं जन्मभर हाल आले तरी हरकत नाही, कारण शास्त्रोक्त संस्कार अनुल्लंघ्य आहे ! आणि ईश्वर तरी बिचारा काय करणार ? भटांनी मंत्र म्हटल्याबरोबर त्याला झक-मारीत हजर व्हावें लागतें, हा नियम सर्व धर्मांच्या सर्व ईश्वरांना लागू आहे. धर्माच्या सबबीवर स्त्रियांवर जुलूम करण्याचा हा एक मार्ग आहे. सर्वांत समंजस (म्हणजे माझ्यासारखें !) मत कु. पिरोज आनंदकर यांनी दिलें आहे. त्यांचें मत वाचून खरोखरच आनंद झाला. सर गोविंदराव माडगांवकर हे आय्. सी.. एस्. जज्ज होते, त्यांचें मत वाचून मी थक्कच झालें. ते म्हणतात, 'घटस्फोटाच्या कायद्याची आत्यंतिक आवश्यकता वाटूं लागण्याजोगी परिस्थिति महाराष्ट्र व गुजराथ या प्रांतांमध्ये उत्पन्न झाली आहे असें मला वाटत नाही. स्त्रियांच्या मताधिकारार्चे प्रमाण वाढून कौन्सिलांतहि त्यांचें संख्याबल वाढूं लागेपर्यंत आणखी कांही वर्षें वाट पाहिल्यास हरकत नाही.' काय ही न्यायमूर्तींची न्यायाची कल्पना ! इंग्रज सरकारचेच ते नोकर, तेव्हा नाइलाज होईपर्यंत हिंदुस्थानावर राज्य करण्याचा जसा सरकारचा दृढनिश्चय आहे, तसाच नाइलाज होईपर्यंत स्त्रियांस गुलामगिरींत ठेवण्याचा यांचा बेत आहे. ते म्हणतात, आयत्या बायका कायद्याने आपल्या ताब्यांत दिलेल्या आहेत, त्यांत आनंद मानायचा सोडून हा नसता उपद्व्याप कोणीं सांगितला आहे ! नाइलाज होईल तेव्हा काय

होईल तें होईल. तुका म्हणे स्वस्थ रहावें, जें जें होईल तें तें पहावें, असें त्यांचें म्हणणें दिसतें. ठीकच आहे, म्हातारपणीं असें वाटायचेंच.

शिवाय बऱ्याच लोकांनी घटस्फोटाचे बाजूनेहि मत दिलें आहे, परंतु तो काय कारणाने द्यावा हें सांगतांना त्यांपैकीहि बहुतेक लोकांवर परंपरेचा पगडा आहे हें स्पष्ट दिसतें. विवाह हा करार नाही हें म्हणणें केवळ फसवणुकीचें आहे. आपण सांगूं तेव्हा ईश्वर हजर राहतो असें भटांचें ढोंग आहे. करारांत आणि विवाहांत इतकाच फरक आहे की इतर करारांना दोघांची संमति लागते, एरवी तो करार कायद्यांत टिकत नाही. परंतु विवाह मात्र केवळ आईबापांचे संमतीने होऊं शकतो, म्हणजे हा करार आईबापांनी मुलांवर लादलेला असतो, तेव्हा असा करार कायदेशीर आहे हेंच म्हणणें मूर्खपणाचें आहे. त्यामुळे पतिपत्नींपैकी एकाला जरी तो कबूल नसेल तर तो मोडण्यास हरकत असूं नये. परंतु आज जगांत कायद्याची स्थिति अशी आहे की एकाचे ऐवजी तो दोघांनाहि जरी मोडण्याची इच्छा झाली, तरीहि तो मोडतां येत नाही. रशियाखेरीज इतर देशांत घटस्फोट मिळवण्याची रीत अशी आहे की पतिपत्नींपैकी एकाने दुसऱ्यावर फिर्याद करून व्यभिचार किंवा इतर कांही गोष्टी कोर्टांत सिद्ध कराव्या लागतात. आपलें पटत नाही असें पाहून दोघांनी समंजसपणें वेगळें होण्याचा निश्चय करून जर कोर्टाकडे अर्ज केला तर घटस्फोट मिळत नाही, उलट कायद्याप्रमाणें फिर्याद करून देखील आंतून दोघांची संमति आहे अशा कोर्टास संशय आल्यास कोर्ट घटस्फोट देत नाही. हा शुद्ध रानटीपणा आहे. वास्तविक घटस्फोटाचे बाबतींत इतर करारांपेक्षा जास्त सवलती दिल्या पाहिजेत, कारण एकमेकांचें पटत नसतां एकत्र रहावयास लावणें हा असह्य जुलूम आहे. आणि शिवाय तशीच वेळ आली तर दोघांपैकी एकाच्या मनांत आल्यास दुसऱ्याला जीव नकोसा करतां येईल. अशा स्थितींत रशिआंतील कायद्याचेंच सर्वांनी अनुकरण करणें जरूर आहे आणि आर्यसंस्कृतीचे नांवावर स्त्रियांवर जुलूम करूं पाहणें हा अत्याचार आहे. तरीपण राजकारणी लोकांत कोणी इतका पुढारलेला असला तरी देखील त्याला खरें बोलण्याचें

धाडस कसें होणार? आणि हेंहि खरें की कायदेकौन्सिलांतहि मागसलेल्या लोकांचाच भरणा जास्त, आणि ते कोणत्याहि सुधारणेच्या नेहमी विरुद्ध असणार. शिवाय पैसा नेहमी वयातीत लोकांपाशींच जास्त असतो आणि कौन्सिलांतील जागा श्रीमंत लोकांशिवाय कोणासहि मिळणें शक्य नसतें, तेव्हां वयातीत लोकांचाच भरणा तेथे असणार. वयातीत लोक साहजिक कोणत्याहि सुधारणेस विरोध करणारच, अशा स्थितींत सुधारणा व्हावी कशी? निदान तरुणांनी तरी तरुणांसच मत देण्याचा निश्चय केल्यास कांहीतरी होईल, पण तरुण लोक पुष्कळ वेळां वृद्धांवर अवलंबून असतात. हें लक्षण कांहीं एकंदरींत ठीक नाहीं.

१६.

डॉ. जॉनसन हा इंग्लंदांत एक मोठा शहाणा मनुष्य होऊन गेला असें समजतात, पण त्यालाहि फारशी अक्कल होती असें दिसत नाही. मी डॉ. जॉनसनची देखील अक्कल काढतें म्हणून तूं कदाचित मला हंसशील, पण आता तूंच पहा. त्याने एके ठिकाणीं असें म्हटलें आहे की 'आपल्याला कितीतरी गोष्टी करतां आल्या असत्या, पण त्या मानाने आपल्या हातून कांहीच झालें नाही, असा विचार येऊन प्रत्येकाला लाज वाटली पाहिजे.' पण आपले न. चिं. केळकर पहा ना! त्यांना कोठे असें वाटतें आहे? ते म्हणतात, 'माझ्या गतायुष्याबद्दल मला पूर्ण समाधान वाटतें.....आळस कसा तो मला माहीतच नाही.....मी अष्टपैलु लेखक आहें.....माझें अमूक नाटक सर्वच दृष्टींनी सुंदर झालें आहे..... माझें टिळकांचें चरित्र तर काय अप्रतिम आहे, कांही दिवसांनी त्याला प्रमाण ग्रंथ समजतील.....मी नेहमी अभ्यास करून लेख लिहितों, हल्लींचे लेखक अभ्यास करीत नाहीत.....मला माहिती खूपच असल्यामुळे माझा लेख इतरांपेक्षां उठावदार दिसतो.....मीं हिंदी चिजांतील शृंगार काढून टाकून त्यांना सुंदर मराठी पेहराव दिला आहे आणि त्या प्रसिद्ध गायकांनी म्हटलेल्या आहेत, आणि ही माझी पद्धत अत्यंत अनुकरणीय आहे,' वगैरे वगैरे. यांत स्वतःच्या कृतीबद्दल कोठे असमाधान दिसतें आहे? आता केळकर कांही मूर्ख असणें शक्य

नाही, कारण इतक्या लेखकांनी त्यांचा गौरव केला आहे, त्यांना काय वेड लागलें आहे ? तेव्हा जॉनसनच मूर्ख असला पाहिजे की नाही ? त्याचप्रमाणे रामदासाने सुद्धा स्वतःची स्तुति करणाराला मूर्ख म्हटलें आहे. अक्कलच नव्हती बेट्याला !

हें सगळें वाचून तुला कदाचित असें वाटेल की उपरोधिक लिहून मी केळकरांना मूर्ख ठरवायचा प्रयत्न करतें आहे, पण तसें नाही. मला इतकच म्हणायचें आहे की जॉनसन किंवा रामदासाच्या वेळची परिस्थिति वेगळी होती. राजकारणांत हल्लीची पद्धत त्या वेळीं नव्हती. जाहिरातीच्या कलेची त्या वेळीं इतकी प्रगति झालेली नव्हती. फार काय, टिळक तर केळकरांपेक्षा श्रेष्ठ होते की नाही ? पण त्यांच्या वाढदिवसाला देखील इतकी बोंबाबोंब कोणी केली नाही. जाहिरातीची कला हल्ली वाढली आहे, त्या मानाने असें हें व्हायचेंच. मला कोणींतरी असेंहि सांगितलें की वाढदिवसाची ही सर्व व्यवस्था आणि जाहिरात केळकरांनींच स्वतः करवली म्हणून. पण मी म्हणतें हरकत काय आहे ? शिवाजीने अफजुलखानाला मारलें म्हणून त्याला ज्याप्रमाणे आपण खुनी समजत नाही, तसेंच हें आहे. सामान्य लोकांचे मानदंड राजकारणी लोकांना लावायचे नसतात, स्वतःची स्तुति करण्याची त्यांना परवानगी असते, आणि निवडणुकींतील प्रत्येक उमेदवार हेंच नाही का करीत ? केळकरांनी तर स्पष्टच सांगितलें आहे की राजकारणाच्या वारूवर स्वार होण्याची मी संधिच पहात आहें. आणि त्यांना जिकडे-तिकडे अध्यक्ष होण्याचें जें व्यसन लागलेलें आहे, त्यावरून पाहतां ही कदाचित असेंब्लीच्या अध्यक्षपदाकरता खटपट असावी असेंहि कोणीं अनुमान केल्यास वावगें होणार नाहीं. तेव्हा राजकारणांतील नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी स्वतःची स्तुति केली किंवा ती करण्याकरता भाट नेमले, हो, अगदी पैसे देवून नेमले, तरी हरकत काय आहे ? लोक त्यांना 'साहित्यसम्राट' ही पदवी देतात, मग सम्राटांच्या पदरीं भाट असल्यास त्यांत बिघडलें कोठे ? अर्थात त्यांचें स्तुति करण्याचें काम ते आपआपल्या अकलेप्रमाणें करतात. सूर्यचंद्रपृथ्वीतारे सामान्यतः वेगळे असतात, पण केळकरांच्यांत ते सगळेच एकवटले, सर्व प्रकारचीं पक्वान्नें, फुलें, फळें, रत्नें उपमांना पुरेनाशीं झालीं, तरीदेखील त्यांत कांही सामान्य

गोष्टी सांगायच्या राहिल्याच आहेत, उदाहरणार्थ त्यांचें गायनवादननर्तनांतील किंवा शिल्पकलेंतील नैपुण्य, वगैरे. आता तूं म्हणशील की हें खरें नाही, पण जें लिहिलें आहे तें तरी कोठे सगळेंच खरें आहे? ज्यांना लेख लिहायला सांगितले त्यांनी स्वतःला भाषा किती उत्तम लिहितां येते हें दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांत खऱ्याखोट्याचा काय संबंध? पण कल्पनाशक्ति सर्वांनाच नसते, त्यामुळे कांही गोष्टी राहिल्या आहेत. टिळकांनी किंवा रानड्यांनी नाटकें लिहिलीं नाहीत म्हणून त्यांचेपेक्षा जसे केळकर श्रेष्ठ, तसेंच त्या जगन्नियंत्या प्रभूने देखील नाटकें लिहिलेलीं नाहीत, तेव्हा त्याचेपेक्षाहि केळकर श्रेष्ठ आहेत हें तरी निदान सांगायला पाहिजे होतें की नाही? बिचाऱ्या ग. स. मराठ्यांचा वाढदिवस त्याच सुमाराला आल्यामुळे त्यांची खटपट मात्र फुकट गेली, नाइलाज आहे. प्रयत्न करणें मनुजाहातीं.

ता. क. पत्र बंद करणार होतें तों केळकरांना हिंदुमहासभेचे अध्यक्ष निवडल्याची बातमी आली. झाला की नाही जाहिरातीचा उपयोग? आणि सामाजिक सुधारणेबद्दल त्यांच्या मताचाहि उलगडा झाला ते म्हणतात की सुधारणा किंचित झाली न झाली, जवळजवळ नच झाली, अशी, कोणाच्या लक्षांत न येण्यासारखी असली पाहिजे. त्यांनी तसें न म्हटलें तर हिंदुमहासभेचें अध्यक्षपद कसें मिळणार?

पण त्यांनी कांही म्हटलें तरी सुधारणेचें पाऊल पुढे पडत आहे यांत शंका नाही. तूं यशवंतमधला 'शेगडीचा सौदा' वाचलास का? सहवासोत्तर विवाह पसंत आहे असें अर्थातच लेखिकेने सरळ सांगितलें नाही, पण पर्यायाने सांगितलें आहे. शेगडी घरीं आणून पेटवून पाहून ती न पेटली तर परत करतां आली पाहिजे, असें सांगून नंतर या सौद्याची विवाहाच्या सौद्याशीं तुलना केली आहे, तेव्हां यापेक्षा जास्त काय सांगणार? ठीक आहे, चालूंद्या असेंच. सहवासोत्तर विवाह आणि घटस्फोटाचा समंजस कायदा अंमलांत आला म्हणजे विवाहांतील बरेच दोष नाहींसे होतील.

१७

हल्लींच्या शास्त्रीय युगांत बऱ्याच लोकांना विचार करण्याचा आव आणावा लागतो, पण आव आणला म्हणजे शास्त्रीय विचार करतां येतोच असें मात्र नाही. प्रि. गोखल्यांसारखे लोक बळेंच शास्त्रीय ज्ञानाचें आणि धर्माचें लग्न लावून देत असतात. वास्तविक धर्म म्हणजे कल्पनासृष्टि आहे आणि विज्ञान म्हणजे सत्यसृष्टि आहे, परंतु कांही लोकांच्या डोक्यांत कप्पे पाडलेले असल्यामुळे ही दोन्ही शेजारीं राहूं शकतात इतकेंच. या दोहोंचें नातें म्हणजे शेजारीं राहणाऱ्या शत्रूंचें आहे.

कांही लोक परंपरेच्या पकडींत इतके पक्के सांपडलेले असतात की त्यांच्या शास्त्रीय विचाराचें ढोंग केवळ परंपरेला सांवरून धरण्यापुरतेच असतें. शास्त्रीय विचार सर्वांनाच करतां येईल असेंहि नाहीं. कारण तें कांही यंत्र नाही, की कळ दाबल्याबरोबर तें आपोआप काम करील. त्यालाहि थोडीबहुत अक्कल वापरावी लागतेच. एक वर्ग त्रैराशिक शिकत असतां मास्तराने प्रश्न विचारला की एका मुलाला एक मैल चालायला वीस मिनिटें लागतात, तर दोन मुलांना किती लागतील ? झालें, कांहींनी सम, कांहीनी व्यस्त करून ४० मिनिटें किंवा दहा मिनिटें उत्तर सांगितलें. परंतु येथे त्रैराशिकाची रीत लावतां येत नाही ही कल्पना एकदोघांच्याच मनांत आली, आणि तेच खरें शास्त्रीय विचार करायला योग्य, बाकीचे हमाली करणार. झाडावर दहा पक्षी बसले आहेत, पैकी एक बंदुकीने मारून खाली पाडला, तर झाडावर गणिताने नऊ पक्षी शिल्लक राहिले पाहिजेत, परंतु व्यवहारिक दृष्ट्या पाहिल्यास ते सर्वच घाबरून उडून जातील, आणि हेंच उत्तर खरें.

रत्नाकरांत एका लेखकाने शास्त्रीय पद्धतीचा आव आणून समाजसुधारकांवर हल्ला केला आंहे, तोहि अशाच जातीचा आहे. ते म्हणतात की समाजरचना हें शास्त्र आहे. तेव्हा त्यांचें म्हणणें असें की कोणतीहि सुधारणा करणें झाल्यास ती गणिती पद्धतीने जर श्रेष्ठ ठरेल तरच करावी. त्यांत एकच गोष्ट ते

विसरतात की परंपरेने चालत आलेले आचार गणिती पद्धतीने मुळीच ठरलेले नसतात, तेव्हां ते हितावह समजण्याचें कारणच नसतें. केवळ गणिती पद्धतीने बोलायचें झाल्यास असेंहि म्हणतां येईल की सतीची चाल बंद करण्यापूर्वी, ती बंद करण्यापासून कांही फायदा आहे असें गणिती पद्धतीने सिद्ध करा आणि मग काय तें बोला ! विधवाविवाह किंवा इतर कोणत्याहि सुधारणेबद्दल असेंच म्हणतां येईल. हे विद्वान जातिभेदाची देखील तरफदारी करतात. मनुष्याला हक्क म्हणून कांही असतात, किंवा स्वातंत्र्य म्हणून कांही इष्ट गोष्ट आहे, हें कबूल करायचें की नाही, हा मुख्य प्रश्न आहे. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानावर कायमचें राहण्यांतच हिंदुस्थानाचा फायदा आहे, असेंहि गणिती पद्धतीने कदाचित सिद्ध होईल, म्हणून स्वातंत्र्याची चळवळ करायची नाही की काय, असाहि प्रश्न निघेल. स्वदेशाभिमानी लोक केव्हाहि असेंच म्हणणार की गणिती पद्धत झक मारते, नुकसान झालें तरीहि आम्हांला स्वराज्य पाहिजे, आणि तेंच बरोबर आहे. स्वातंत्र्याचें तत्त्व कबूल केल्यास त्यावरून असेंहि निघतें की मनुष्याचे हक्क त्याच्या जातीवर अवलंबतां कामा नये, तेव्हा येथेहि गणिती पद्धतीचा उपयोग नाही.

नंतर हे विद्वान प्रीतिविवाहावर घसरले आहेत. ते **मेजर लेओनार्ड डार्विन** यांचें म्हणणें असें सांगतात की सुप्रजाजननाचे दृष्टीने विवाह जितका जास्त टिकेल तितका चांगला, तेव्हा ज्या पद्धतींत घटस्फोट कमी होतील किंवा ज्यास्त उशिरां होतील ती विवाहाची पद्धत चांगली. हें मेजर डार्विन म्हणत असले तरीहि अत्यंत हास्यापद आहे. सुप्रजाजननाला जर खरोखरच शास्त्रीय पद्धत लावायची असली तर उत्तम प्रतीच्या स्त्रीपुरुषांस एकत्र आणून त्यांपासून संतति निर्माण केली पाहिजे. हें तत्त्व सर्वमान्य आहे, कारण इतर प्राण्यांस आपण हेंच तत्त्व लावतों, आणि अशा तऱ्हेने उत्तम प्राणि पैदा होतात असा अनुभव आहे. अर्थात हें तत्त्व मनुष्यास लावावें असें मी म्हणत नाही, कारण प्राण्यांचे बाबतींत कोणी भावनांचा विचार करीत नाही, आणि मनुष्याचे बाबतींत तो केल्याशिवाय गत्यंतर नाही. तेव्हा **सुप्रजाजननाच्या दृष्टीने विवाहाची कोणतीहि**

पद्धत अयोग्यच आहे, मग हें शास्त्रीय पद्धतीचें ढोंग कशाला ? मेजर डार्विन यांचे म्हणण्यांत सत्याचा थोडासा अंश आहे हें खरें, कारण विवाह जितका अधिक टिकेल तितकें मुलांचें संगोपन अधिक चांगलें होण्याचा संभव राहील. परंतु हा प्रश्न रत्नाकरांतील लेखकास वाटतो त्यापेक्षाहि गुंतागुंतीचा आहे. एकतर आईबापांस शिशुसंगोपनाचें शास्त्रीय ज्ञान बहुधा नसतें, तेव्हा गणिती पद्धतीने पाहिल्यास ते त्या बाबतींत नालायक ठरतील. या ज्ञानाची जागा प्रेमाने भरून निघत नाही, परंतु एकंदरींत आईबापांजवळ असलेल्या मुलांचेंच संगोपन ज्यास्त चांगलें होतें असे सध्या गृहीत धरलें तरीहि सर्वच आईबापांचे बाबतींत असें म्हणतां येणार नाही, आणि हा प्रश्न केवळ घटस्फोट किती होतात व केव्हा होतात हें पाहून सोडवतां येणार नाही; कारण घटस्फोटाची परवानगीच न दिल्यास मुळीच घटस्फोट होणार नाहीत, आणि तींच पद्धत चांगली ठरवावी लागेल. परंतु आईबाप जर **संतोषाने** एकत्र रहात असतील तरच त्यांचे हातून मुलांचें योग्य संगोपन होईल. त्यांचींच आपसांत भांडणें झाल्यास, किंवा भांडणें न होतांही तीं असंतुष्ट असल्यास तें होणार नाही, कारण त्यांचें मुलांकडे तितकें लक्षच राहणार नाही. तीं संतुष्ट राहण्याचा संभव प्रीतिविवाहांतच अधिक असतो हें समंजस लोक कबूल करतील, आणि घटस्फोटाची परवानगी असल्यास यास मदतच होईल, कारण असंतोषाचें कारण राहणार नाही. आईबापांचें न पटल्यास तीं वेगळीं होऊन त्यांपैकी एकाजवळ राहण्यांतच मुलांचें हित अधिक आहे, तेव्हा मुलांचे दृष्टीनेहि प्रीतिविवाह आणि घटस्फोट हीं दोन्ही फायदेशीर आहेत. आणि वैयक्तिक सुखाच्या दृष्टीने तर आहेतच, तेव्हां गणिती पद्धतीचा टेंकू पारंपरिक पद्धतीला मुळीच मिळत नाही.

वैयक्तिक सुखावर मनुष्याचा निसर्गसिद्ध हक्क आहे, आणि जोंपर्यंत तें समाजहिताच्या किंवा दुसऱ्याच्या सुखाच्या आड येत नाही, तेथपर्यंत तें मिळवण्याचा प्रत्येकास हक्क आहे. अमुक सुधारणा गणिती पद्धतीने इष्ट ठरलेली नाही, म्हणून ती करूं नये हें म्हणणें फोल आहे. ज्या चाली उघड उघड रानटी आहेत, त्या बदलण्यास गणिती पद्धतीची जरूर नाही, व ज्या अन्याय्य आहेत त्यांसहि

नाहीं, जेथे भावनांचा प्रश्न येत नाही, तेथेच गणिती पद्धत लावता येईल, एरवी येणार नाही. आणि म्हणूनच सुप्रजाजननाची सर्वमान्य पद्धत मनुष्यास लावतां येत नाही, आणि केवळ संततिनियमनावरच भिस्त ठेवावी लागते. भावनांचा विचार न करतां गणिती पद्धत लावूं पाहणें पोरकट आहे, आणि परंपरेस टेकू देण्याकरतां गणिती पद्धत पुढे करणें हास्यास्पद आहे.

त्याच अंकांत महाराष्ट्र संगीताविषयीं निरर्थक वाद माजला आहे. एक विद्वान म्हणतात, मराठींत अक्षरसौष्ठव नसतें. मला वाटतें ही भाषेची चूक नसून चिजा रचणाराची आहे. भाषेवर प्रभुत्व असल्याबद्दल एकमेकांना सर्टिफिकिटें देणारे लेखक हें काम कां नाही करीत? कित्येक केळकरांसारखे लोक शृंगाराविरुद्ध ओरड करतात, जणू काय शृंगार हिंदी भाषेंतच असूं शकतो. निदान बायकांच्या समोर तरी हिंदी चिजा म्हणूं नका हो, म्हणून अगदी काकळुतीला येऊन ते सांगत असतात. संस्कृत कवि बेटे मूर्ख म्हणून त्यांनी नवरसांत शृंगाराला पहिला मान दिला आहे. या थंडगार लोकांना शांतरस सर्वांत पसंत असतो; परंतु शृंगारांत स्त्रीपुरुषांचा सारखाच संबंध असतो आणि सौभद्राला बायकांची गर्दी ज्यांनी पाहिली असेल त्यांना कबूल करावें लागेल की बायकांना शृंगार आवडतो. केळकरप्रभृति लोकांचें म्हणणें असें की त्यांना आवडत असेल, पण तो आवडतां कामा नये! ही अरेरावी आता चालणार नाही. तुम्ही मराठी चिजा खुशाल करा, पण त्या आम्हाला आवडल्या नाहीत तर आम्ही हिंदीच शिकूं. बरें आणखी अशीहि ओरड आहे की चिजांच्या अर्थाकडे गवयी लक्ष देत नाहीत, आणि एक विद्वान असेंहि म्हणतात की तेंच ठीक आहे, कारण अर्थ अश्लील असतो. ही गवयांची संवय मराठी चिजा केल्याने कशी मोडणार! मला वाटतें अर्थाकडे लक्ष जरूर दिलें पाहिजे. कारण एरवी चिजा रचतात तरी कशाला? तराणेच कां नाही म्हणत? किंवा नुसते आलापच कां नाहीं घेत? हिंदुस्थानी चिजा किंवा नाटकांतलीं पदें लोक मुद्दाम म्हणायला सांगतात तें कां?

धार्मिक लोकांमुळे जगाचें किती नुकसान होतें याची मोजदाद करणें कठिण. संगीत म्हणजे मनुष्याला निरतिशय आनंद देणारी गोष्ट आहे हें ओळखून धर्माचें

अवडंबर माजवण्याकरतां त्याचा त्यांनी दुरुपयोग केला, हें एक असो. परंतु भटाला ओसरी दिली की त्याने हातपाय पसरलेच, तसें शेवटीं या लोकांनी असें म्हणायला सुरवात केली की संगीताचा उपयोग केवळ ईश्वरभजनापुरताच करावा. बडोद्याचे मौलाबक्षखां तर म्हणे इतर कोणत्याहि प्रकारची चीजच म्हणत नसत, आणि त्यांचीच रीत पलुस्करांनीहि उचलली. पण हें तत्त्व मान्य करणारेहि शेवटीं कृष्णासंबंधी शृंगारिक चिजा गावून आपली शृंगाराचीहि हौस फेडून घेऊं लागले. आणि पुन्हा त्या अश्लील असल्या तरीहि कृष्णाचा शृंगार अध्यात्मिक, तेव्हा तो अश्लील नाही ! एकंदर सर्वच जमलें, शृंगार झाला आणि धर्महि झाला. पण तेंहि लोकांना पाहवत नाही, आणि कसेंहि करा पण शृंगार नको, असें म्हणणारे लोक मेटले. या अरसिकांना सांगणार काय आणि सांगून समजणार काय ? तुझें काय म्हणणें आहे यावर ?

प्रामाणिकपणा जरी पुस्तकांत सद्गुण असतो तरी तो कोणी वागणुकींत दाखवूं लागल्यास त्याला लोकं भयंकर दुर्गुण समजून त्याचा पिच्छा पुरवतात. अशा स्थितींत कांही लोक स्वार्थाकरता आणि काही विनाकारण खोटें बोलत असतात, याबद्दल त्यांना तरी दोष कां द्यावा ? पण याचा परिणाम मात्र असा होतो की जगांत मूर्खांचें राज्य चालतें. बहुजनसमाज मूर्ख असतो आणि त्यांना खूष ठेवून ज्यांना पोट भरायचें किंवा मोठेपणा मिळवायचा असतो, त्यांना त्या तंत्राने बाह्यतः तरी आपली वागणूक ठेवावी लागते. अर्थात अप्रामाणिकपणाच्या पुष्कळ पायऱ्या आहेत आणि लोक जसे कमजास्त निर्ढावलेले असतील त्या मानाने ते कमजास्त ढोंगी बनतात. समज एखाद्या डॉक्टराने नवीनच प्रॅक्टिसला सुरवात केली. त्याच्या अंगांत जर कांही विशेष कौशल्य असेल तर लोक त्याच्याकडे जातीलच. पण तसें नसेल तर त्याला शक्य त्या मार्गाने लोकप्रिय होण्याची खटपट करावी लागते. त्यांतल्या त्यांत जो प्रामाणिक असेल तो लोकांच्या विरुद्ध जाण्याचे प्रसंग टाळील, पण जो नसेल तो स्वतःची मतें बाजूला ठेवून पारंपरिक मतांचा पुरस्कार करील. लेखक म्हणून कोणाला पुढे

यायचें असेल तर अगोदर इतर नांवाजलेल्या लेखकांचो भरपूर स्तुति करून मोबदल्यांत ते आपली स्तुति करतील अशी योजना करून ठेवावी लागते. वर्तमानपत्रांचें व मासिकांचें धोरण तर ठरींवच असतें. पार्टीचीं मतें तीं त्यांचीं मतें. केळकरांच्या स्तुतीला केसरीने सुरवात केली की त्याच्या ४० अनुयायांनीहि स्तुति केलीच पाहिजे. एरवी संघशक्ति ती काय? शिवाय ग्राहकांची संख्या वाढवण्याकरता शक्य तितक्या पारंपरिक गोष्टींना पाठिंबा द्यावाच लागतो. अशा धोरणाने ज्यांना लिहितां येत असेल त्यांचेच लेख प्रसिद्ध व्हायचे, तेव्हा लेखक म्हणून ख्याति होईपर्यंत तरी सर्व लेखकांस पारंपरिकच व्हावें लागतें.

परवां मी **सरस्वती** मासिकाचा जूनजुलैचा जोड अंक चाळीत होतें. हें मासिक स्त्रियांसाठी आणि मुलींसाठी आहे, तेव्हा त्यांत पाहिजे त्या थापा दिल्या तरी पचतील अशी तर संपादिकाबाईची कल्पना नाही ना? या बाई सहशिक्षणाविरुद्ध जें लिहीत असतात त्यावरून त्यांस सहशिक्षणाचा अनुभव नाही हें स्पष्टच दिसतें. त्या म्हणातात की अमेरिकेंत १२ वर्षांच्या वयांत कांही मुली आया होतात आणि हें सहशिक्षणामुळे होतें. हिंदुस्थानांत सहशिक्षण नाहीं, तेथे यापेक्षाहि वाईट गोष्टी होतात हें सर्वांस माहीत आहे. सर्वांत गंमत म्हणजे यांनी 'रिव्होल्ट् ऑफ मॉडर्न यूथ' सारख्या कांही अमेरिकन पुस्तकांचीं नांवें ऐकलीं आहेत असें दिसतें, आणि त्यावरून त्या ठोकून देतात की त्यांत सहशिक्षणाचे भयंकर परिणाम दाखवलेले आहेत. जज्ज लिंडसे यांचें पुस्तक त्यांनी खरोखरच वाचलें असतें तर त्यांस सहज समजलें असतें की त्यांनी सांगितलेल्या गोष्टी सहशिक्षणाचे परिणाम नव्हत, तर आज सर्व जगांत जें नवीन चैतन्य उत्पन्न होऊन विचारांत क्रांति करीत आहे, त्याचे होत. आर्यसंस्कृतिवाल्या हिंदुस्थानांतहि १२ वर्षांच्या मुलींना मुलें होतात. विवाहसंस्था किती कुचकामाची आहे हें 'बँक्रप्ट्सी अ‌ाफ् मॅरेज' (विवाहसंस्थेचें दिवाळें) या पुस्तकांत दाखवलें आहे, त्याचाहि आपल्या म्हणण्यास आधार मिळतो अशी या बाईंची कल्पना आहे. त्यांनी तीं पुस्तकें वाचलेलीं नाहीत इतकेंच यावरून दिसतें. याच अंकांत एकपत्नीव्रतावर एक लेख

आहे. एकपत्नीव्रत हा पारंपरिक लोकांस अत्यंत मोठा सद्गुण प्रामाणिकपणे वाटणें शक्य आहे, पण त्याचें समर्थन करण्याकरता अजमास पंचे विधानें न केलीं तर निदान फजिती तरी होणार नाही. लेखिकेचें असें म्हणणें आहे की ' कडकडीत एकपत्नीव्रत पाळून आपल्या पवित्र देहास परस्त्रीचा स्पर्श न होऊं देणें हें त्यांचें (पुरुषांचें) आद्य कर्तव्य आहे.' येथे **स्पर्श** हा शब्द कांही विशेष अर्थाने योजलेला दिसतो. कारण मुंबईसारख्या शहरांत परस्त्रीचा स्पर्श टाळतां येणें एरवी शक्य दिसत नाही. लेखिकेला इतिहासाचें फारसें ज्ञान दिसत नाहीं. त्या म्हणतात, ' श्रीशिवाजीमहाराजांप्रमाणे किंवा साधुवर्य तुकाराम महाराजांप्रमाणे प्रत्येक मनुष्याने एकपत्नीव्रतस्थ रहावें.' मेलेल्या मोठ्या माणसांवर पाहिजे तितके खोटे सद्गुण लादावे, परंतु शिवाजीमहाराजांचें एकपत्नीव्रत म्हणजे द्रौपदीच्या पातिव्रत्याप्रमाणेच होतें. म्हणजे पांच नवऱ्यांमुळे द्रौपदी जशी पांचपट पतिव्रता होती, तसे शिवाजीमहाराज देखील पांचपट एकपत्नीव्रत होते. स्त्रियांना पतीच्या एकपत्नीव्रताची फारशी किंमत असते असें दिसत नाहीं. द्रौपदीच्या नवऱ्यांना इतर पुष्कळ बायका होत्याच आणि पांडव हे आर्यसंस्कृतींतले अत्यंत उच्च प्रकारचे लोक समजलेले आहेत आणि द्रौपदीलाहि पूज्य वाटत होते. शिवाय कृष्णाला १६१०८ बायका होत्याच, परंतु त्या आध्यात्मिक होत्या असें कांही लोक म्हणतात. पण हे प्राचीन लोक सोडून दिले तरी अलीकडे देखील ज्याची एक पत्नी जिवंत आहे अशा पुरुषाशीं लग्न करायला सुशिक्षित मुली देखील तयार होतात, अशीं कितीतरी उदाहरणें आपल्याला माहीत आहेत. यावरून इतकेंच दिसतें की बायका कांही एकपत्नीव्रताला विशेष महत्त्व देत नाहीत. दुसऱ्याचें कर्तव्य समजलेल्या एकपत्नीव्रताला देखील ज्या महत्त्व देत नाहीत, त्या स्वतःचें कर्तव्य समजलेल्या पातिव्रत्याला मनांतून किती महत्त्व देतील हें यावरूनच दिसतें, परंतु पुरुषांना खुष ठेवण्याकरता तसें कोणी बोलून दाखवीत नाहीं. या लेखांत खोटीं विधानें इतकीं खच्चून भरलीं आहेत की अशीं मीं आजपर्यंत कधीच पाहिलीं नव्हतीं. हें एक पहा. ' जसे स्त्रियांचें तसेंच पुरुषांचें. व्यभिचारिणी स्त्री

किंतीहि रूपवती असली, मोठी गुणवती असली, तरी एखाद्या साध्याभोळ्या पण पतिव्रता स्त्रीचें जसें एक प्रकारचें तेज पडतें, तसें तिचें मुळीच पडत नाही. हीच स्थिति पुरुषालाहि लागू होते.'.....हें निखालस खोटें आहे. जगाच्या इतिहासांत जे जे प्रख्यात, तेजस्वी स्त्रीपुरुष होऊन गेले, त्यांपैकी बहुतेकांची कामवासना अत्यंत प्रखर होती व ते प्रचलित नीतिनियमांना मुळीच जुमानीत नव्हते. **पहिला बाजीराव** तेजस्वी नव्हता काय? **नेपोलियन** तेजस्वी नव्हता? ते काय एकपत्नीव्रत होते? **तुळसाबाई होळकर** तेजस्वी नव्हती काय? आणखी एक पहा. 'जारकर्म करण्याचे बाबतींत स्त्रियांना दोष देण्यापेक्षा पुरुषांनाच दोष देणें अधिक श्रेयस्कर होय कारण स्त्रीजातीचे ठिकाणी ईश्वराने लज्जा ही एक अप्रतिम चीज ठेवली आहे.' लज्जा पुरुषांना दिली नसल्यास अर्थातच ती ईश्वराची चूक आहे, त्याबद्दल पुरुषांना दोष कां? आणि पुष्कळ वेळां स्त्रियाच पुरुषांना फुसलावतात हें कोणालाहि डोळे उघडे ठेवल्यास दिसेल. सर्वांत मला हंसूं आलें तें पुढच्या वाक्याने, 'खरोखर, स्वस्त्रीसारखें अनुपमेय सुख या जगांत कोणतेंच नसल्यामुळे, आपली स्त्री जरी कुरूप असली तरी तींस स्वर्गीय अप्सरा समजून, तिजवर निष्कपट प्रेम करावें. आपली स्त्री कुरूप अगर वर्णहीन असली तरी देखील परस्त्रीवर आपलें मन केव्हाहि जाऊं देवूं नये. कारण ईश्वराने जरी भिन्न भिन्न स्वरूपाच्या स्त्रिया निर्माण केल्या असल्या तरी त्यांना '**विषय**' सारखाच दिला आहे. त्यामुळे स्वस्त्री काय किंवा परस्त्री काय, सारखींच. परस्त्रीच्या ठायी जो रस असतो, तोच रस स्वस्त्रीजवळहि असतो. मात्र फरक एवढाच की, एकाद्या स्त्रीचे बाह्य अवयव बेढब असतात, तर एखाद्या स्त्रीचे अगदी आंखीव असतात, एकादी स्त्री गौरवर्ण असते, तर एखादी सांवळी असते.' काय समजलें? विवाहांत जीं उच्च तत्त्वें भरलेलीं आहेत तीं हीं! मनाचा संबंध नाही, शारीरिक सौंदर्याचा संबंध नाही. म्हटलेंच आहे की 'व्यतिषजति पदार्थानांतरः कोऽपि हेतुर्न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते,' मग प्रीतीचा आणि सौंदर्याचा काय संबंध? शरीराचा एक विशिष्ट भाग सर्व स्त्रियांना असतो, मग पाहिजे तितक्या

कुरूप स्त्रीवर प्रेम करायला काय हरकत आहे ? इच्छेनुरूप पाहिजे त्या माणसावर प्रेम करतां येतें असें म्हणणाराला महामूर्ख कां म्हणूं नये ? तूं म्हणशील, गरीब बिचारी, तिला प्रेमाचा अनुभव नाही म्हणून ती असें लिहिते. तिला प्रेमाचा अनुभव नसला तर त्या बिचारीची मला दया येईल, पण जिला अनुभव नाही तिने दुसऱ्याला उपदेश न केला तर नाही का चालणार ? इच्छेनुरूप जें करतां येतें तें प्रेमाचें ढोंग, प्रेम नव्हे, प्रेम आपोआप उत्पन्न होत असतें, तें इच्छेवर नसतें, हें सुद्धा कळूं नये ? पत्र लांबलें, पण आणखी एक वाक्य दिल्याशिवाय नाहीच राहवत. ' ह्याबद्दल एका पाश्चात्य विद्वानानें म्हटलें आहे की, परक्याची वस्तु आपणास जितकी आवडते, तितकीच, किंबहुना त्याहून ज्यास्त आपली वस्तु परक्यास अधिक आवडते. ' हा पाश्चात्य गाढव कोण ? या वाक्याचा तुला कांही अर्थ कळतो का ? नाही ना ? सोडून दे, झालें. पाश्चात्य आहे तें, तुला नाही कळायचें.

१९

ज्या विषयाची स्वतःला बिलकूल माहिती नाही त्यावर पाहिजे तितकीं पानें निरर्थक किंवा अनर्थकारक वाक्यांनी भरून काढणाऱ्या लेखकांचें अधिक कौतुक करावें की अशा लेखांना स्थळ देणाऱ्या मासिकांचें करावें ? **स्त्री** मासिकांत रा. किनऱ्यांनीं मातेवर—म्हणजे गाईवर नव्हे, खऱ्या मातेवर-लेख लिहिला आहे त्यांचा लेख म्हणजे वेडगळ धार्मिक समजुतींच्या खिचडींत उपयुक्त माहितीचे कांही कण चुकून पडलेले दिसतात. बाकी संपादकांनी हा लेख वाचकांच्या करमणुकीकरता छापला असल्यास तो उद्देश बराच सिद्धीस जातो, पण त्यांतील माहिती खरी आहे असा कांही बाचकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे, इतकेंच वाईट आहे.

एके ठिकाणीं लेखक म्हणतो, सुधारणेच्या ' गोड मोहजालांत गुंतून ज्यांनी सृष्टीच्या कल्याणकारी हाताचा आधार सोडला व स्वतंत्रपणें कृत्रिम राहणीचा सर्वस्वी आश्रय केला त्यांचें केवळ सृष्टीनियमाने उत्पत्ति स्थिति व लय यथाकालीं पावणारें शरीरयंत्र अकालीं बिघडलें....तर त्यांत आश्चर्य काय ? ' सृष्टीचा

हात कल्याणकारी असतो असें हे गृहस्थ येथें सांगतात, आणि तेंच कांहीं वेळाने उपवास, ब्रह्मचर्य वगैरे सृष्टिविरुद्ध गोष्टी करण्याचा उपदेश करतात. लिहिण्यांत कांहीं संगति असावी लागते हें यांच्या स्वप्नींहि नाहीं. किंवा कदाचित याबद्दल त्यांनी परमेश्वराचें मत घेतलें असेल, कारण हे गृहस्थ परमेश्वरावरहि विश्वास ठेवतात ! आपण पाहिजे तीं मतें खुशाल ठोकून द्यावीं आणि परमेश्वराचा हवाला द्यावा हा त्याचा मोठा उपयोग आहे. तो बिचारा कधी उलट बोलणें शक्यच नसतें. काय करणार, ज्यांना युक्तिवादाचा पाठिंबा नाहीं, त्यांना परमेश्वराचा घेणें भाग आहे ! किंचित विचार करणाराला हें सहज कळेल की सृष्टीचा हात कल्याणकारी असतो हें म्हणणें अत्यंत हास्यास्पद आहे. वाघ मनुष्याला मारून खातो, किंवा मांजर उंदीर खातें, हा सृष्टिक्रमच आहे, परंतु तो माणसाला आणि उंदराला कल्याणकारक नाहीं. सृष्टींत अनेक संकटें प्रत्येक प्राण्यावर येत असतात, त्यांत स्वतःचें रक्षण करण्याकरता मनुष्य आपली अक्कल चालवूं शकतो, आणि स्वतःच्या सुखाकरता अक्कल चालवणें, यालाच आपण सुधारणा म्हणतों की नाहीं?

लेखक म्हणतो, आपल्या भाषेंत लाखों शब्द आहेत, पण 'आई' या शब्दाला जें महत्त्व आहे, सामर्थ्य आहे, प्रभाव आहे, तें महत्त्व, तें सामर्थ्य, तो प्रभाव, ईश्वरवाचक शब्द वगळून (न वगळल्यास ईश्वर संतापेल !) दुसऱ्या कोणत्याहि शब्दाला नाहीं. वापरणारांच्या अकलेवर भाषेंतील शब्दांचें महत्त्व असतें हें त्यांच्या गांवींहि नाहीं. उघडच आहे, निरर्थक शब्दांचे ढीग रचणाराला हें कसें कळावें ? परमेश्वराविषयीं पाहिजे तें बरळलें तरी तें खरेंच असतें, त्याप्रमाणें हे दोन पानें बरळले आहेत. नंतर मनाची शांति ठेवण्याचे उपाय सांगितलेले आहेत. ' एकनाथ महाराज म्हणतात, मन म्हणेल जें सुख । तें सांडावें आवश्यक । मन म्हणेल जें दुःख । तेंहि निःशेष त्यजावें ॥.' रा. किन्ऱ्याचें म्हणणें कीं 'या मार्गाने आपलें मन उदास ठेवावें.' हें ऐकून एकनाथ महाराजांना देखील खात्रीने हंसूं आलें असतें. याचा सरळ अर्थ असा होतो की कोणतीहि सुखदायक किंवा दुःखदायक गोष्ट करूं नये. अन्न खाण्यापासून सुख होणें शक्य आहे, तेव्हा तें खाऊं नये, काम करण्यापासून त्रास होणें शक्य आहे, तेव्हा तें करूं नये, वगैरे. या उपदेशाने मनाचें व शरीराचें स्वास्थ्य राहतें असें

म्हणणें हा मूर्खपणाचा कळस आहे. नंतर हे गृहस्थ पोट साफ ठेवण्याकरता एरंडेल, गुलाबकळीचा काढा किंवा एनिमा घेण्याचा उपदेश करतात. हें सर्व सृष्टीला धरूनच आहे काय ? अशी ही एकंदर किनऱ्यांची रडकथा आहे. ब्रह्मचर्यावर किनऱ्यांचा जवळ जवळ उपवासाइतकाच भर दिसतो, तेव्हा तुला एक गंमत सांगतें. चित्राव शास्त्र्यांनी जो नवीन 'प्राचीन चरित्रकोश' प्रसिद्ध केला आहे, त्यांत अशी हकीकत दिली आहे की इंद्राने कांही ब्राह्मण मारल्यामुळे त्याला ब्रह्महत्येचें पातक लागलें, तेव्हा तें काढून टाकण्याकरता त्याचे चार भाग केले आणि ते भूमि, वृक्ष, जल, आणि स्त्री यांना वाटून दिले आणि त्यांची तक्रार राहूं नये म्हणून त्यांना एकेक वर दिला. त्यापैकी स्त्रीला जो वांटा मिळाला त्यामुळे रजोदर्शन होतें, परंतु वरामुळे स्त्रियांस गरोदर असतांहि प्रसूतिकालापर्यंत संभोग करतां येतो ! पण मग ब्रह्मचर्याची काय वाट ? ही आपली पुराणांतली गोष्ट आहे हो, तूं तसें कर असें माझें म्हणणें नाही. यावर किनऱ्यांचें काय म्हणणें आहे तें विचारलें पाहिजे.

याच माळेचे आणखी एक मणि म्हणजे नागपूरला भारतीय संस्कृतीवर व्याख्यान देणारे प्रो. हर्षे. हे कसले प्रोफेसर आहेत कोण जाणे, परंतु हे वाङ्मयविशारद आहेत असें दिसतें आणि आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा गंधहि नसतांन त्यासंबंधी वाहियात वटवट करण्याचें वाङ्मयविशारदांना व्यसनच असतें असें म्हटलें पाहिजे. त्यांची कदाचित अशी कल्पना असेल की कोणताहि विषय सांगण्याला भाषेची जरूर पडतेच, तेव्हा भाषा आली म्हणजे सर्व विषय आलेच ! या बाबतींत सर्वांत अजब म्हणजे संस्कृतज्ञ लोकांची घमेंड पहावी. जगांतील सर्व प्रकारचें ज्ञान संस्कृतांत आहे, मन्वादि ऋषींनी अतींद्रिय ज्ञानाचे जोरावर विश्वाच्या उत्पत्तीची मीमांसा केली, वगैरे बाष्कळ बडबड करून नंतर त्याला पुरावा म्हणून हें ज्ञान शास्त्रशुद्ध असल्याबद्दल ते एका गूढशास्त्रसंशोधकाची साक्ष देतात ! आपला धर्म सनातन आहे, इतर धर्मांप्रमाणे त्यांतील तत्त्वें केवळ श्रद्धेय नाहींत वगैरे गारुड्याचें भारूड नेहमीप्रमाणे त्यांचेजवळ आहेच. एकंदरींत केवळ भाषाविषय किंवा इतिहास वगैरे अशास्त्रीय विषय शिकलेल्या लोकांची या बाबतींत

दया येते. सत्याची आणि त्यांची कधी ओळखच होत नाही. काव्य, नाटक, कादंबरी आणे बहुतांशीं इतिहास देखील, हीं असत्यावरच रचलेलीं असतात. त्यामुळे सत्य कशाला म्हणावें हेच त्यांना कळत नाहीसें होतें. शिवाय लोकप्रियते-करता खोटें बोलणें, परंपरेला उचलून धरणें, धार्मिक वेडगळपणाला उत्तेजन देणें वगैरे गोष्टी इतरांप्रमाणे तेहि करतात व, यामुळे त्यांचेपैकी खरोखर मूर्ख कोण आणि धार्मिक ढोंग कोण करतो हे सांगणें कठिण आहे. प्रो. हर्षे कोणत्या वर्गांत येतात असें तुला वाटतें? अर्थात ते कसेहि असले तरी बहुजनसमाज या धूर्तांच्या व मूर्खांच्या मागे असल्यामुळे टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत अहोरूपमहोध्वनिः करून एकमेकांना हारतुरे आणि लांबलांब पदव्या देण्याचें काम हे निर्विघ्नपणें चालू ठेवतात. हें जाहिरातीचें युग आहे, प्रत्येकाने आपआपली टिमकी वाजव-लीच पाहिजे.

२०

ज्यांच्या डोक्यांत अश्लीलतेशिवाय कशाला थाराच नाही, अशा कांही पंडितंमन्यांनी कोल्हापूरच्या साहित्यसंमेलनांत अश्लील वाङ्मयाविरुद्ध ठराव आणला होता म्हणे, परंतु अश्लील म्हणजे काय हें त्यांनी कोठे सांगितलेलें दिसत नाही. आणि ते सांगणार तरी काय? आजपर्यंत जगांत कोणालाच ज्याची व्याख्या करतां आली नाही, त्याची हे पुणेरी सनातनी काय व्याख्या करणार? वास्तविक अश्लीलतेची व्याख्याच अशक्य आहे. कारण जात्या अश्लील असें कांही नसतेंच. अश्लील असतें कांही लोकांचें मन, तेव्हा त्यांच्या मनाप्रमाणें ती व्याख्या बदलते. शरीराचे कांही भाग अश्लील समजण्याचा कांही लोकांचा दुराग्रह असतो, परंतु मेडिकल कॉलेजांतील स्त्री व पुरुष विद्यार्थी एकत्र बसून त्याच भागांचें बारकाईने निरीक्षण करतात आणि त्यांत त्यांना कांही अश्लील वाटत नाही, असें माझ्या कांही मैत्रिणी सांगतात. यावरून हे भाग जात्या अश्लील नसतात, ते पाहणारांचें मन कधीकधी अश्लील असतें, असेंच नाही का सिद्ध होत!

१८३

अश्लीलतेसंबंधी पुण्यांत झालेल्या चर्चेंत हें स्पष्ट दिसून आलें. जे विद्वान अश्लीलतेविरुद्ध जोरजोराने बोलत होते, ते अश्लीलतेचीं उदाहरणें म्हणून संस्कृत कविता भराभर म्हणून दाखवीत होते, जणू काय त्या ओळींचीं ते नेहमी पारायणेंच करीत असतात ! त्या ओळी मींहि वाचलेल्या आहेत, पण मीं त्या पाठ नाही करून ठेवल्या. ज्यांचें मन अश्लील, त्यांच्या डोक्यांत तेंच नेहमी घोळत असतें, यामुळें त्यांना साहाजिकच तें पाठ होतें.

ढोंगी लोकांना थोडी अक्कल असली तरच तें ढोंग पचतें, पण ती नेहमी असतेच असें नाही. परवां एका सभेंत एक पंढरपूरला जाऊन आलेली विधवा देखील अश्लीलतेविरुद्ध बोलली म्हणे. तिची हकीकत बऱ्याच लोकांना माहीत असल्यामुळे यांत तिचें धाष्टर्य दिसलें, पण अक्कल मात्र दिसली नाही. तुला ती माहीत आहेच, तेव्हा नांव लिहीत नाही. अर्थात तिचें असें प्रामाणिक मत असणें शक्य आहे की विधवांनी संततिनियमनाचीं साधनें वापरणें अश्लील आहे, गर्भ राहिल्यास पंढरपूरला जावें. पंढरपूरचा अनुभव मला नाही, तेव्हा मला मत देतां येत नाही.

परवां ' रामकृष्णनिकेतन ' नांवाचें एक बावळट मासिक माझ्या पाहण्यांत आलें. किती बावळट आहे तें तूंच पहा. ' ज्याप्रमाणे दह्यानें मंथनानंतर तूप बनतें त्याप्रमाणे अन्नाचे सूक्ष्म अंशाचें मन बनतें. मन हें अन्नमय आहे ' पण मन हा घट्ट पदार्थ आहे की पातळ आहे की वायु आहे, यावर या विद्वानांनी मत दिलेले नाही. त्याचप्रमाणे ' एका पंगतीस बसलेल्या मंडळींनी एकदम भोजनास सुरवात करून त्यांनी एकदम उठावें कारण त्यांचेमध्ये समान विद्युत् उत्पन्न झालेली असते. ' त्यांनी बसतांनाहि एकदमच बसावें की काय, हें सांगितलेलें नाही. ' संध्यासमयीं भोजन करणे उचित नाही. त्यावेळी भूतप्रेताची दृष्टि अन्नावर असते ' (!). रक्ताच्या ४० थेंबांपासून एक थेंब वीर्य बनतें, वगैरे मूर्खपणा या लेखकाच्याहि डोक्यांत आहेच. आधुनिक ज्ञान पाश्चात्य आहे ना ! मग तें खरें कसें असेल ? आपले पूर्वज त्रिकालज्ञ असल्या-

मुळे त्यांना सर्वच माहीत होतें, हल्ली लोक विनाकारण शास्त्रीय ज्ञान मिळवण्याकरता प्रयोगशाळांवर पैसा आणि वेळ खर्च करतात. संस्कृत ग्रंथ वाचावे, त्यांचा येईल तसा वेडावांकडा अर्थ लावावा, की ज्ञानाचा पाऊस पडेल, असें या लेखकाचें मत दिसतें. स्वतंत्र विचार म्हणजे काय हें त्याला कसें कळावें ? अस्पृश्यांसंबंधी हे लिहितात, ' अस्पृश्यांचा उद्धार करण्यास सहभोजनें व बेटीव्यवहार याची आवश्यकता मुळीच नाही. यापासून वरिष्ट जातीचा निःसंशय अधःपात होईल. महात्मा गांधी व पंडीत मालवीय हीं माणसें या बाबतींत चुकत आहेत असें म्हणतां येणार नाही. तथापि या बाबतीत बहुजनसमाजाची दिशाभूल होत आहे असें मला वाटतें. ' सारांश काय, मोठीं माणसें चुकत नाहीत, पण लोकांनी त्यांचे मागें न जातां या शिष्टांच्या मताप्रमाणे वागावें. बावळटपणाला कांही सीमा !

ज्याला दुसऱ्याच्या मर्जीवर अवलंबावे लागतें तो साहजिकच ढोंगी बनतो आणि त्यांत त्याची विशेष चूकहि म्हणतां येत नाही. बायकांचें जीवन, अब्रू, सुख, सर्वच पुरुषांच्या मर्जीवर आज अनेक शतकें अवलंबून राहिल्यामुळे ढोंग त्यांच्या अंगवळणी पडलें आहे. आणि बायकांच्या लैंगिक वागणुकीला फाजील महत्व मिळाल्यामुळे या बाबतींत तर परावलंबी बायकांना ढोंग केल्याशिवाय गत्यंतरच नसतें. बायकांना शरीर असतें इतकें त्यांनी जेमतेम कबूल केलें तर नशीब, त्यांना कामवासना असणें हेंच भयंकर आहे, मग तिचें समाधान करण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. लांकडाच्या ओंडक्याप्रमाणे लोकमताच्या लाटेवर वहात जाण्याचा बायकांचा जन्मसिद्ध हक्क आहे, मग या अचेतन वृत्तीमुळे स्वतःला किंवा दुसऱ्याला कितीहि त्रास होवो. जुन्यालाच चिकटून राहण्याचा त्यांचा आग्रह असतो असें नाही, उदाहरणार्थ ज्या विधवांनी प्रथम धिटाइने केंस वाढवले त्यांना इतर विधवांनी, निदान उघडपणें तरी, शिव्याच दिल्या, तरीपण आता पुष्कळ विधवा या सुधारणेचा फायदा घेतात. पुनर्विवाहाचीही अशीच स्थिति झाली, तरीपण अजूनहि केंस वाढवलेल्या आणि

पुनर्विवाह केलेल्या विधवा देखील नवमतवाद्यांना अश्लील म्हणून शिवी देतातच. पुनर्विवाह नवीन होता तेव्हां रखेली म्हणून राहण्यास विधवांची तयारी असे, पण पुनर्विवाहास नसे. स्वैरसमागमाचा पुरस्कार कोणी केल्यास तें अश्लील, स्वतः त्या मताप्रमाणे वागून पंढरपुरास जावून त्याचे परिणाम लपवणें हें अश्लील नव्हे. फार काय, स्वैरसमागमाचा पुरस्कार केल्याबद्दल ज्या कोर्टाने **समाज-स्वास्थ्या**चे संपादकांस दंड केला, त्याच कोर्टाचे भितीला पंढरपूरचे अनाथ-बालकाश्रमाची धर्मार्थ पेटी लावलेली आहे. म्हणजे स्वैरसमागमाचे परिणाम लपवण्यास मदत करण्यास कोर्टाची हरकत नाहीं. नवमताचा पुरस्कार करणारां-विरुद्ध सकेशा विधवांनी तोंड चालवणें म्हणजे निवळ कृतघ्नपणा आहे.

असो. पण बायका स्वतंत्र झाल्यास त्यांचें ढोंगही बरेंच कमी होईल असें मानायला बरीच जागा आहे. हिंदुस्थानांतील बायका पतीला देव मानण्याचें ढोंग करून पातिव्रत्याचे गोडवे गावोत किंवा नवमतवाद्यांना अश्लील म्हणोत, त्यांत त्यांची चूक नाहीं, कारण पुरुष नाचवतील तसें नाचणें त्याना भाग आहे, त्यांची दया मात्र येते. पण ज्यांना आपल्या पायांवर उभें राहतां येतें अशा युरोप अमेरिकेंतील बायका मात्र खरें बोलूं लागल्या आहेत. एका स्त्रीचें दोन पुरुषांवर प्रेम असलेलें एका प्रख्यात इंग्रजी लेखिकेने बेधडक दाखवलें आहे, पण तसाच प्रकार एका मराठी लेखिकेला दाखवावासा वाटला, तेव्हा 'ती स्त्री मोठ्या वुचकळ्यांत पडली' असाच गोष्टीचा शेवट करावा लागला. लघुकथेच्या दृष्टीने असा शेवट म्हणजे बावळटच नव्हे का? पण ती तरी बिचारी काय करणार? या लेखिकेच्या गोष्टीचें परीक्षण दुसऱ्या एका लेखिकेने केलें आहे, त्यांत तिची मोठी प्रशंसा अशी केली आहे, की या सर्व गोष्टींत सात्त्विक प्रेम वर्णिलें आहे. नीतीच्या चालू कल्पनांच्या चौकटींत जें प्रेम बसेल त्यालाच ही लेखिका सात्विक प्रेम म्हणत असावी असें वाटतें. परंतु नीतीच्या कल्पना कृत्रिम आणि बदलणाऱ्या असतात आणि प्रेम नैसर्गिक असतें, तेव्हा या दोहोंचा बळेंच मेळ घालून देणाऱ्या लघुकथा सत्याच्या कसोटीला कशा उतराव्या? खरें सांगायचें म्हणजे मी त्या गोष्टी वाचल्याहि

नाहीत. नुसतें परीक्षणच वाचलें, तेव्हा त्यांवर मत देणें बरोबर नाही, पण मराठी मासिकांतील बहुतेक लघुकथालेखकांना लघुकथा कशाशीं खातात हेंच माहीत नसतें. त्यांना ना धड शेंडा ना बुडखा, कोठेतरी सुरू होतात, कोठेतरी संपतात, आणि मधेहि कांही वाचण्यासारखें नसतें, तेव्हा कांही उद्योग नसला तरच मी त्या वाचतें.

रामकृष्ण परमहंसाचे बरेच अनुयायी बावळट असतात यांत कांही शंका नाही. **पूर्णेंदु** मासिकांत 'एका दांपत्याला मूल होत नव्हतें आणि श्रद्धा उत्पन्न झाल्यावर तें एका वर्षांत झालें' असें लेखकाने लिहिलें आहे. कांही विधवांना मुलें होतात तीं श्रद्धेमुळेच होत असावीं.

२२

'स्त्री'च्या गेल्या अंकांतला डॉ. श्री. व्यं. केतकरांचा लेख तूं वाचलास का? एकंदरींत डॉ. चीं मतें स्त्रियांच्या उन्नतीला फारशीं अनुकूल नाहीत हें मीं आधीपासूनच ओळखलें होतें, पण आता तर माझी पक्कीच खात्री झाली डॉ. नी 'स्वाभाविक' हा शब्द 'नैसर्गिक' अशा अर्थानेच जर वापरला असेल तर त्यांनी त्याचा दुरुपयोग केला आहे असें म्हणावें लागतें. त्यांचें एकंदरींत असें म्हणणें दिसतें की स्त्रीस्वातंत्र्याला स्वाभाविक मर्यादा आहेत, त्यामुळे स्त्रीस्वातंत्र्यवादी समाजसुधारकांस फारसें कांही करतांच येणार नाही, मग ते वायफळ प्रयत्न करीतना बिचारे? त्याला इतकें घाबरायला कशाला पाहिजे, असा त्यांचा एकंदर समाजाला उपदेश आहे. **स्त्री** मासिकाला रुचतील असेच लेख त्यांत लिहिण्याचा डॉ. चा उद्देश असल्यास माझें कांही म्हणणें नाही. लेखकाचा धंदा ज्याला करायचा असेल, त्याला लोकमताचा कल थोडाबहुत संभाळलाच पाहिजे, पण ते जर प्रामाणिक युक्तिवाद म्हणून हा लेख लोकांपुढे मांडीत असतील, तर मात्र तो मला कबूल नाही. 'स्त्रीस्वातंत्र्याच्या स्वाभाविक मर्यादा' याचा अर्थ जर 'स्त्रियांच्या व पुरुषांच्या हल्लीच्या स्वभावामुळे उत्पन्न झालेल्या मर्यादा' असा करायचा असेल, तरीहि माझें कांही म्हणणें नाही. परंतु मग 'स्वाभाविक'

याचा अर्थ 'नैसर्गिक' मात्र नव्हे, आणि तसा नसेल तर त्या मर्यादा बदलणें शक्य आहे, कारण त्या निसर्गनियमांनी बांधलेल्या नाहीत.

डॉ. साहेबांनीं कांही ठिकाणीं मुद्दाम शाब्दिक हातचलाखी केली आहे की ते स्वतःच शब्दजालांत फसले आहेत हें सांगणें कठिण अ हे ते एका पॅऱ्यांत म्हणतात, 'वस्तूच्या किंवा गुणाच्या प्रत्येक वाढीला कांही स्वाभाविक मर्यादा असते.. तुळशीच्या रोपाला फोफावयास कितीही खत घातलें तरी त्याचें मोठें झाड होणार नाही. ही गोष्ट वस्तूसंबंधाने जशी खरी आहे तशीच गुणासंबंधाने खरी आहे. मनुष्यप्राण्याने कितीहि शक्ति प्रयत्नाने वाढविली तरी तिला देखील स्वाभाविक मर्यादा असल्याच पाहिजेत अशी अपेक्षा केली तर ती चूक होणार नाही.' वा ! डॉ. साहेब, वहार केलीत ! मनुष्यप्राण्याची शक्ति हा जसा त्याचे अंगचा गुण आहे, तसेच समता आणि स्वातंत्र्य हे त्याच्या अंगचे गुण आहेत, असें खरोखरच आपणांस वाटलें असलें तर लोक आपणास आजपर्यंत व्यर्थ मान देत आले, असेंच म्हटलें पाहिजे. समता किंवा स्वातंत्र्य हे सामाजिक किंवा राजकीय परिस्थितिवाचक शब्द आहेत आणि समंजस माणसाला हें समजलेंच पाहिजे की समता व स्वातंत्र्य हे कोणाच्याहि अंगचे गुण होऊं शकत नाहीत. नाहीतर तुरुंगवास हा गांधींच्या अंगचा गुण समजून त्याच्या मर्यादा कां शोधूं नयेत ? वास्तविक डॉ. साहेबहि इतके मूर्ख आहेत असें मी समजतच नाही, आणि हा मूर्खपणा त्यांच्या हातून कसा झाला असावा याचीहि मला अटकळ आहे. बहुधा त्यांना पैशाची नड असावी. 'स्त्री' मासिकाचे संपादक लेखास मोबदला देतात, तेव्हा दिला एक लेख झोंपेंत खरडून. डॉ. केतकरांचा लेख विशेष बारकाईने पाहणारा संपादक क्वचितच, तेव्हा साधारण त्यांना पचणारीं मतें असलीं म्हणजे झालें, विचार करायचें काय कारण आहे ? डॉ. ना कामाचा व्याप पुष्कळ असल्यामुळे झोंपेंत लिहिलेला लेख दिला तसाच पाठवून, झालें, आणि संपादक महाशयांनी त्याला साहजिकच अग्रस्थान दिलें ! स्त्रियांच्या मर्यादित अकलेला त्यांतील प्रमाद कसे ओळखणार, असा दोघांसहि साहजिक पणें विश्वास वाटला असल्यास नवल नाही. पण मी आहें ना ?

समतेला आणि स्वातंत्र्याला स्वाभाविक मर्यादा असते, ही भाषाच मुळी चूक आहे. निसर्गांत विषमता असते हें निर्विवाद आहे, पण ती स्त्रियांच्या वा पुरुषांच्या तुलनेंतच असते असें नाही. पुरुष सगळे सारखे असतात का, किंवा कोणत्याहि एका विशिष्ट वर्गांतले पुरुष तरी सारखे असतात का? परंतु रानटी समाजांत आणि सुधारलेल्या समाजांत हाच फरक असतो ना, की रानटी समाजांत दंडेलीने पाहिजे तो मनुष्य पाहिजे तें करूं शकतो, आणि सुधारलेल्या समाजांत तें चालत नाही, निदान तें चालूं न देण्याचा कायद्याचा आणि समाजाचा प्रयत्न असतो. एखाद्याच्या अंगांत शक्ति कमी असली तरी त्याला कोणी लुबाडून घेऊं नये, एवढ्याकरताच कायदे लागतात की नाही? तसेंच स्त्रियांची शक्ति कमी असली तरी त्यांना सुधारलेल्या समाजांत समान हक्क मिळाले पाहिजेत दंडेलीच करायची असेल तर गोष्ट वेगळी, पण मग सुधारणेच्या गप्पा मारूं नये.

डॉ. केतकर म्हणतात, स्त्रियांना मतदानाचा हक्क दिलेला असूनहि स्त्रीसमाज पुरुषाश्रयीच ठेवण्याचें त्यांचें ध्येय आहे. हें इंग्लंडांत खरें असेल, परंतु अमेरिकेंत आर्थिक स्वातंत्र्याचें ध्येय येत आहे. रशियांत तर स्त्रियांस समान हक्क मिळालेच आहेत, आणि तरीदेखील तेथेहि मुलें स्त्रियांनाच होतात, तेव्हा नैसर्गिक अडचण समान हक्कांच्या किंवा स्वातंत्र्याच्या आड येण्याचें कारण नाही. अर्थात समाजाला मुलांची गरज असल्यास मुलें ही एक उत्पादनाची महत्त्वाची बाब समजून तीं उत्पन्न करणाऱ्या स्त्रीला जरूर त्या सवलती दिल्या पाहिजेत, म्हणजे बाळंतपणाचे पूर्वी व नंतर योग्य ती भरपगारी रजा आणि जरूर पडल्यास मुलें वाढवण्याची सरकारी सोय करणें समाजाचें कर्तव्य आहे.

स्त्रियांना विवाहाची गरज भासते, ही हल्लीची स्थिति आहे खरी. परंतु त्याचें कारण समागमासंबंधी केलेले पुरुषी कायदे आहेत. हा नैसर्गिक नियम नाही, ही समाजव्यवस्थेची चूक आहे. रशियांत अविवाहित स्त्रियांस मुलें होण्यांत कमीपणा समजत नाहीत, आणि तेथे विवाहाची जरूरी स्त्रियांस नाही, कारण प्रेम आणि मुलें दोन्हीहि विवाहाशिवाय मिळूं शकतात.

एकंदरींत केतकरांनी जरी ज्ञानकोश केला असला आणि आपण माहिती मिळविण्यांतले तज्ज्ञ अशी जरी त्यांना घमेंड असली तरी या विषयावरचें एक महत्त्वाचें पुस्तक त्यांनी वाचलेलें दिसत नाही. 'डॉमिनंट् सेक्स' हें पुस्तक त्यांनी जरूर वाचावें अशी शिफारस तूं माझ्या वतीने त्यांना कर. त्यांत त्यांना असा पुरावा सांपडेल की पुरुषांच्या वर्चस्वांत नैसर्गिक असें कांहीहि नाही, आणि जेव्हा कोठेहि स्त्रियांचें वर्चस्व होतें, तेव्हा स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या हल्लीच्या स्थितीची बरोबर अदलाबदल होते. अर्थात मुलें बायकांनाच होतात, पण तरी देखील स्त्रिया वर्चस्व राखूं शकतात आणि त्यांना कमीपणाची भावना नसल्यामुळे त्यांची शारीरिक शक्तीहि वाढते, आणि नवऱ्याने कांही अपराध केल्यास मुस्कटांत देण्याचीहि ताकद त्यांना येते. तसें त्यांनी करावें, किंवा स्त्रियांचें वर्चस्व पुन्हा व्हावें, असें माझें म्हणणें नाही. मी समान हक्कांची तरफदारी करतें, आणि त्यांतच दोघांचें हित आहे असें माझें मत आहे. माझ्याप्रमाणेच डॉ. चें मत असावें असेंहि मी म्हणत नाही, पण म्हणावें मेहेरबानी करून हातचलाखी नका करूं.

२३

कोणतेंहि मासिक, साप्ताहिक किंवा दैनिक हातांत घेतलें तरी त्यांत एखादा तरी मागसलेला लेख नाही असें होतच नाही, म्हणजे **समाजस्वास्थ्य** खेरीज करून. उदाहरणार्थ ग्वाल्हेरच्या **हितचिंतकाचा** फेब्रुवारीचा अंक पहा. त्यांत एम्. ए., बी. टी. झालेले एक गृहस्थ सह-शिक्षणाची अनावश्यकता सिद्ध करूं पाहतात. वास्तविक पाहतां प्रचलित शिक्षणाचा व्हावा तसा उपयोग होत नाही हें त्यांचें म्हणणें खरें आहे, आणि त्याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हंणजे त्यांचा स्वतःचाच लेख. एम्. ए., बी. टी. होऊन देखील त्यांना युक्तिवाद कशाशीं खातात हें माहीत नाही. ते म्हणतात की वैदिक कालीं सहशिक्षणाचा प्रघात नव्हता. नसेल कदाचित. वैदिक कालीं काय होतें याचा व्यवहारांत बिलकूल उपयोग नाही. या सद्गृहस्थांचें आणखी असेंहि मत आहे की पाणी भरणें, दळण कांडण, धुणीं धुणें, वैगरे, हीं स्त्रियांच्या व्यायामाचीं साधनें आहेत, आणि

अर्थात् टेनिस वगैरे खेळ पुरुषांच्या व्यायामाचीं साधनें आहेत. या साधनांची अदलाबदल केली तरी दोघांसहि व्यायाम होईलच हें या विद्वानांच्या लक्षांत तरी आलें नाही किंवा त्यांनी स्वार्थाकरता वरील वांटणी सुचविली आहे. बहुधा हे गृहस्थ अविवाहित असावे आणि बायकोनेच नोकराचें काम करावें अशी त्यांची इच्छा असावी. तसें असल्यास असा लेख लिहिणें हा हल्लीच्या दिवसांत अविचार आहे, आणि ते विवाहित असल्यास त्यांच्या बायकोची दया येते. हे लोक स्त्रियांचे शत्रु आहेत आणि त्यांच्यापासून सावध राहणें जरूर आहे. एकत्र शिक्षणाने पैशाची देखील बचत होणार नाही हें दाखवण्याकरता त्यांनी अगदी बिनतोड पुरावा दिला आहे. तो हा की पंडित मालवीयजींनी बनारस युनिव्हर्सिटींत देखील बायकांना स्वतंत्र कालेज आणि स्त्रियाच अध्यापक, अशी व्यवस्था केली आहे. हें त्यांनी आर्थिक दृष्टीनेच केलें, हें बहुधा पंडितजींनी यांच्या कानांत सांगितलें असावें पंडितजी जुन्या मताचे आहेत इतकेंच नव्हे तर ज्या संस्थांना सार्वजनिक पैशावर अवलंबावें लागतें, त्यांना जुन्यामताप्रमाणेच वागावें लागतें, हें एम्. ए., बी. टी. झाल्याने कळत नाही असें दिसतें. प्रचलित शिक्षणाने मेंदूला चलना मिळत नाही असें ते म्हणतात, आणि म्हणूनच की काय, त्यांनी आपलें ब्रिंग शेवटीं बाहेर फोडलेंच आहे. ते म्हणतात शिकलेल्या बायका दळणकांडण करणार नाहीत, आणि आपल्या समाजांत सुखवस्तु कुटुंबें फारच थोडीं असल्यामुळे लग्न झाल्यावर त्यांचें कसें होईल? आणि शेवटीं हे स्थिर मेंदूचे गृहस्थ 'पतिरेव गुरुः स्त्रीणां' हें वाक्य देतात! आधुनिक शिक्षणपद्धतीच सदोष असल्यामुळे सहशिक्षणाची आवश्यकताच राहिली नाही असें हे प्रतिपादितात. हा कार्यकारणभाव डिकाने चिकटवून देखील राहणार नाही. हे दोन वेगळे प्रश्न आहेत, आणि आपण काय लिहिलें हें विसरून हेच गृहस्थ मुलींना प्राथमिक शिक्षण मुलांबरोबर द्यायला तयार होतात. प्रचलित शिक्षण सदोष आहे हे त्यानी स्वतःच्या उदाहरणावरून सिद्ध केलें आहे, पण तें नकळत! तें सिद्ध करायचें असतें तर तें बहुधा झालें नसतें.

तसेंच **संजीवनी**च्या ६ व्या अंकांत घटस्फोटासंबंधी एक पत्र आहे. तें लिहिणारी बाई देखील नकळत विनोद उत्पन्न करणारांपैकीच एक आहे. विनोदी लेखकांच्या डोक्याला त्रास पडतो, पण या बाईसारखे लेखक कांहीहि लिहोत, त्यांत विनोद आपला हजर आहे. ती म्हणते घटस्फोट नको, कारण निवड चुकली असल्यास स्वतःच्या चुकीचा परिणाम स्वतः भोगणें जरूर आहे, आणि पुनः निवड केल्यास पुनः चुकणार नाही कशावरून? म्हणजे असें की जास्त खाल्ल्यामुळे अजीर्ण झालें, तर त्यावर औषध घेतां कामा नये, कारण स्वतःच्या चुकीचा परिणाम स्वतः भोगला पाहिजे, आणि औषध घेतल्यावर तरी पुनः अजीर्ण होणार नाही कशावरून? ही बाई असें धरून चालते की लग्नापूर्वी दोघांना एकमेकांचे स्वभाव समजतात, ते एकमेकांना आवडतात, आणि ते स्वभाव जन्मभर कायम राहतात. तिला हेंहि कळत नाही की विवाहांतील सुख मनाप्रमाणेच शरीराच्याहि गुणधर्मांवर अवलंबतें आणि पुष्कळ ओळख झाल्यामुळे मनाची ओळख झाली असें समजलें तरी देखील शरीराच्या बाबतींत मात्र हात, पाय आणि डोकें कसें दिसतें इतकेंच स्त्रीच्या समाजांत समजतें आणि विवाहाच्या दृष्टीने ही माहिती अपुरी असते. तिचें म्हणणें आहे की बहुतेक स्त्रियांना घटस्फोट नको असतो, आणि आपणास मध्ययुगीन म्हणूं नये म्हणून कांही स्त्रिया गुळमुळीत मत देतात. वस्तुस्थिति याच्या उलट आहे. घटस्फोट असावा असें मत असून काय उपयोग? स्वतःच्या पायावर उभें राहण्याची ज्यांना ताकत नाही, त्यांची तसें मत देण्याची काय प्राज्ञा आहे? गुलामगिरी आवडणें हा गुलामगिरीचाच परिणाम आहे, आणि ज्यांना आवडत नसेल त्यांनाहि परिस्थितीमुळे गुळमुळीत मत द्यावें लागतें. ही बाई कायदेपंडितही असल्याचा आव आणते. म्हणे हिंदु-लॉमध्ये स्त्रियांना पोटगी घेऊन निराळें राहण्याची मुभा आहे! नवरा बाळगण्यास तयार असतां (मग गुलामासारखें वागवलें तरी हरकत नाही) स्त्री जर वेगळी राहील तर तिला बिलकुल पोटगी मिळणार नाही. एकंदरींत गुलामांना शृंखला इतक्या प्रिय असतात की, स्त्रियांना जास्त सवलती मागण्याऐवजी पुरुषांना असलेल्या सवलती कमी कराव्या

असें तिचें म्हणणें आहे. वास्तविक एक बायको असतांना पुरुषांनी दुसरी केल्यास ती त्याच्या संपत्तीला वांटेकरी होते, म्हणूनच त्याचो बंदी मागायची की नाही? पहिलीविषयी प्रेम असल्यास तो दुसरें लग्न करणारच नाही, तेव्हा घटस्फोटाने दोघांचीहि सुटका करण्यापेक्षा दोघांनाहि दुःखांत ठेवणेंच बरें, अशी समंजस युक्ति तिने काढली आहे. अशी बंदी बिलकूल करतां कामा येये. एकाला तरी सुखी होतां येईल तर त्याने कां होऊं नये!

२४

परवा न. चिं. केळकरांचे एक चाहते माझ्याकडे आले आणि त्यांची भरमसाट स्तुति करूं लागले. मीं त्यांना सांगितलें की त्यांना पाहिजे तसल्या सभांचे अध्यक्ष होण्याची वाईट संवय लोकांनी लावल्यामुळे, आपण सर्व विषयांत पारंगत आहों अशी त्यांची कल्पना झाली तर त्यांत मोठेसें नवल नाही, पण इतरांचीहि तशी कल्पना व्हावी हें जरा आश्चर्यच आहे. ते गृहस्थ बहिरे नव्हते, पण केळकरांप्रमाणेच त्यांनाहि संगीताचा कान नव्हता. हिंदी संगीतांत 'झमाझम्' हा शब्द जर चालतो तर त्याचें मराठीकरण करतांना 'तडातड्' हा शब्द घातला तर काय बिघडलें, हा केळकरांचा मुद्दा जेव्हा ते सांगूं लागले, तेव्हा मला हंसूं आवरणें कठिण झालें. संगीताच्या दृष्टीने या दोन शब्दांतला फरक ज्याच्या कानाला कळत नाही, त्याला तो सांगून कसा समजणार? केळकरांच्या मराठी चिजांवरून पाहिलें तर त्यांचें आदर्श काव्य म्हणजे वृत्तदर्पणांतील श्लोक असावेत, कारण त्यांत वृत्ताचें नांवहि असतें, व्याख्याहि असते, आणि ते पाहिजे त्या रागांत गातां येतील, हें आणखी वर. वृत्तदर्पण केळकरांनी लिहिलेलें नाही एवढा एकच दोष त्यांत होता, एरवी त्या गृहस्थांनी तेंहि कबुल केलें असतें. शेवटीं ते रागावून निघून गेले, झालें.

स्त्रीच्या गेल्या अंकांत शांताबाई मोडखोलकरांनी आपल्याकडून एक मार्मिक लेख लिहिला आहे, आणि एका दृष्टीने तो आहेच मार्मिक. पण त्यांची मानसिक गुलामगिरी अजून कायम आहे याची स्पष्ट साक्ष त्या लेखांत

आहे. त्यांनी जो मार्मिक मुद्दा काढला आहे तो असा की पुरुषवर्ग जो स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार आजकाल करीत असतो, तो केवळ स्वार्थबुद्धीने कुटुंबपोषणाचा स्वतःचा भार स्त्रियांनी हलका करावा म्हणून. मी म्हणतें पुरुषांनीच काय असें घोडें मारलें आहे की कुटुंबपोषणाचा त्यांनीच मक्ता घ्यावा? बायका त्यांच्याशीं लग्नें करतात हा काय मोठा उपकार करतात? मग बायकांचा तो उपजीविकेचा धंदा आहे असें सरळ कबूल कां नाही करीत? असे जर कबूल करायचें नसेल तर बायकांनी कुटुंबपोषणाला हातभार लावायला तयार असलें पाहिजे. म्हणे पुरुष स्वार्थी आहेत. आणि स्वार्थी नाही कोण? इतक्या खोलांत शिरूं लागलें तर असें म्हणावें लागेल की स्वार्थाशिवाय कोणींच कांही करीत नाही, आणि करणें शक्यच नाही, कारण कोणत्याहि कार्याचा अंतिम हेतु हाच असतो. आपण एखाद्या मनुष्यावर निःसीम, निरपेक्ष प्रेम करतों, त्याच्याकरता पाहिजे तें सोसायला, जीव द्यायला देखील तयार होतों, पण कशाकरता? स्वतःच्या मनाला समाधान वाटावें म्हणूनच ना? स्वतःच्या मनाला समाधान वाटले नाही तर कोणी कांही करणारच नाही. स्वतःच्या पत्नीवर निःसीम प्रेम असतांहि, तिचें आणि दुसऱ्या एखाद्या पुरुषाचें परस्पर प्रेम आहे असें आढळल्यास तिला व्यभिचाराची परवानगी देण्याइतका उदार अंतःकरणाचा पति देखील मी म्हणतें एखाद्या वेळीं भेटेल, पण तो हें कशाकरता करील? त्याला विचारल्यास तो कदाचित म्हणेल की पत्नीवर निरपेक्ष प्रेम असल्यामुळे तिला सुख व्हावें इतकीच इच्छा मुळाशीं आहे, पण हें अंतिम कारण नव्हे. तसें केल्याने स्वतःच्या मनाचें औदार्य सिद्ध होतें, आणि स्वतःच्या मनाला बरें वाटतें, हेंच अंतिम कारण.

कोणत्याहि स्वार्थत्यागाच्या मुळाशीं हेंच कारण असतें. **समाजस्वास्थ्या**च्या संपादकाने स्वार्थत्याग केला असें कांही लोक म्हणतात. वास्तविक यांत कसला स्वार्थत्याग आला आहे? त्यांच्या मनाला ज्यांत अधिक समाधान वाटलें तें त्यानी केलें. त्यांत विशेष काय केलें? पण कोणी म्हणेल की जग

ज्याला स्वार्थ म्हणतें, त्यांत आणि यांत कांहीच फरक नाही का ? फरक नाही कसा ? आहे. जनता ज्याला स्वार्थी म्हणते तो मनुष्य केवळ स्वतःचेंच हित पाहतो, त्याच्या हातून दुसऱ्याचे हित झालेंच तर चुकून होतें. आणि लोक ज्याला स्वार्थत्याग म्हणतात त्यांत दुसऱ्याचें हित करण्याचा उद्देश असतो, आणि म्हणूनच आपण एकाला चांगला आणि दुसऱ्याला वाईट म्हणतों. त्यांत तात्त्विक दृष्ट्या जरी फरक नसला तरी सामाजिक आणि व्यावहारिक दृष्ट्या असतो. तेव्हा पुरुष स्वार्थी दृष्टीने स्त्रियांस आर्थिक स्वातंत्र्य आणूं पाहतात, या म्हणण्यांत कांहीं जीव नाही. आर्थिक स्वातंत्र्य इष्ट आहे की नाही हें पाहिलें पाहिजे, आणि मला तें इष्ट वाटतें.

पुरुषांनी बायकांना पोसलें पाहिजे या कल्पनेवर पुरुषांना स्वार्थी म्हणणें, यांत तर मानसिक गुलामगिरी दिसतेच, पण तिचेंच आणखी एक ठळक उदाहरण या लेखांत आहे. सिनेमाच्या धंद्याविषयी त्या म्हणतात, "**स्त्रियाच्या बाबतींत तरी** लाभाच्या नैतिक बाजूचा विचार कसोशीने केला पाहिजे... धंद्याचें स्वरूपहि असें की, त्यांत केव्हा कोणत्या पुरुषाच्या गळ्याला 'प्रियकर' म्हणून मिठी मारण्याचा प्रसंग येईल हें सांगणे कठीण...सर्वच पुरुष नैतिक दृष्ट्या खंबीर भेटतील असें नाही." पुरुषच कशाला खंबीर हवेत ? जरूर वाटल्यास आपणच खंबीर रहावें म्हणजे झालें. मास्तरणीच्या व नर्सच्या धंद्यांतहि असे प्रसंग येतात हें त्यांना कबूल आहे. पण ते लोकांच्या दृष्टीस पडत नाहीत आणि हे पडतात, तेव्हा हा धंदा बरा नाही आणि ते बरे, असें त्यांचें म्हणणें दिसतें. वास्तविक स्त्रियांची नीति शरीराच्या एका विशिष्ट भागांत केंद्रीभूत मानावी, ही कल्पनाच रानटी आहे. एकीकडे शरीरापेक्षा मनाचें आणि आत्म्याचें महत्त्व जास्त म्हणायचें, आणि या बाबतींत मात्र शरीराला महत्त्व जास्त द्यायचें. मानसिक मिठ्या प्रेक्षकांनाहि मारतां येतात आणि त्यासंबंधी कांही नियमहि करणे शक्य नाही इतकेंच नव्हे तर अहल्या, द्रौपदी, तारा यांसारख्या गाजलेल्या पतिव्रता, मनानेच काय, पण शरीराने देखील एका पुरु-

शाला चिकटून राहिल्या नाहींत, मग इतरांची काय कथा ? 'स्त्रियांचे बाबतींत तरी' या शब्दांत गुलामगिरी स्पष्ट दिसते. म्हणजे पुरुषांचे बाबतींत नीति शरीराच्या विशिष्ट भागांत केंद्रीभूत नाही, आणि स्त्रियांचे बाबतींत आहे. खासा न्याय !

परंपरेचा पगडा झुगारून देणें कठिण आहे. त्या आणखी म्हणतात, "तसेंच जें आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठीं रोज सहा सात तास कष्ट करावे लागणार व अनेकांची मर्जी सांभाळावी लागणार, तें स्त्रीच्या व्यक्तिविकासाला कितपत पोषक होईल ? गृहसौख्याला विघातक न होईल अशा रीतीनेच आर्थिक स्वातंत्र्य मिळवतां आलें तर मिळवावें..." अनेकांची मर्जी पुरुषांसहि संभाळावी लागतेच आणि सहासात तास कामहि करावें लागतें. घरकाम करून फक्त नवऱ्याचीच मर्जी संभाळणाऱ्या स्त्रियांचा व्यक्तिविकास पुरुषांपेक्षा जास्त होत असतो काय ? मला तर असें वाटत नाही. आणि बायकोने स्वयंपाक केला तरच गृहसौख्य मिळतें, नाहीतर मिळत नाही, हें मला तर कबूल नाही. वास्तविक घरकाम करणाऱ्या बायकोची नवऱ्याजवळ किंमत, तेंच काम करणाऱ्या नोकराच्या निम्मे असते, कारण निम्मे काम ती स्वतःकरतांच करते आणि निम्मे नवऱ्याकरता. श्रम-विभाग अशी कांही चीज असते हें पुष्कळ लोकांच्या गांवींहि नसतें. दहा कुटुंबांनी वेगवेगळा स्वयंपाक करण्यांतच गृहसौख्य जास्त असतें आणि त्यांनी समाईक नोकर ठेवून व्यवस्था केल्यास गृहसौख्य लाभणार नाही असें मला वाटत नाही. ज्यांना स्वयंपाकाची हौस असेल त्यांनी तो खुशाल करावा, पण गृहसौख्याच्या नांवावर स्त्रीची नेमणूक स्वयंपाक घरांत करावी हें रास्त दिसत नाही. खेड्यापाड्यांत कदाचित अशी व्यवस्था करण्यास थोडीबहुत खटपट लागेल, परंतु केल्यास सर्वांचाच फायदा होईल. शहरांत तर अशा प्रकारची व्यवस्था हळूहळू अमलांत येणार यांत शंका नाही. मुंबईत हल्ली अशा प्रकारचे गाळे भाड्याने मिळतात (निदान साहेबांना तरी मिळतात) की एकदा भाडें भरलें की त्यांत सर्व कांही आलें. घरकाम,

जेवणखाण सर्व भाड्यांतच. नोकरांसंबंधीं वगैरे स्वतःला कोणत्याहि प्रकारचा त्रास नाही. सांगितल्या वेळेला जेवण किंवा इतर सर्व व्यवस्था आपोआप होतात. ही कल्पना अमेरिकेंतून यूरोपांत येऊन आता मुंबईंतील साहेबांपर्यंत पोंचली आहे. आणि ती आपणहि ताबडतोब उचलण्यासारखी आहे, म्हणजे स्वतंत्र गाळा असून इतर व्यवस्था मात्र उत्तम हाटेलाप्रमाणे राहिली पाहिजे. आणि याला एकंदर खर्चहि फारसा येण्याचें कारण नाही, आणि गृहसौख्यांत बिलकुल कमतरता येण्याचें कारण नाही.

पत्रव्यवहार

१ २०–५–३०

वि. वि...संभोगशक्ति व संभोगेच्छा जवळजवळ नाहीशी झाली आहे. एक दोन प्रसंग सोडून कित्येक महिने संभोग बंद आहे. डॉ.XXXX यांनी तपासल्यावेळी बाह्येंद्रियांत कांही कमीपणा दिसत नाही असें सांगितलें व मलाही तसेंच वाटतें. फेब्रुवारीचे अंकांतील पत्रलेखक म्हणतो, कोणतीही स्त्री पाहतांच इच्छा अनावर होते परंतु संभोगशक्ति नाही ! याचें मला आश्चर्य वाटतें. इच्छा आणि शक्ती व्यस्त कशीं असूं शकतात ? माझ्या तर दोन्ही गोष्टी सारख्याच प्रमाणांत कमी होत आल्या. थोड्या अतिशयोक्तीने बोलावयाचें तर स्वामी रामकृष्ण परमहंसाप्रमाणे नवयुवयुवतीचा संपूर्ण संयोग कोणतांही चलबिचल न होतां नितांत सौंदर्य म्हणून मी स्वस्थपणें पाहूं शकेन असें वाटतें. प्रथम घाई होऊं लागली, वीर्यपात लवकर होऊं लागला, नंतर त्याच प्रमाणांत इच्छाही कमी होत गेली. तेव्हां इच्छा आणि शक्ति व्यस्त कशीं असूं शकतात ! शक्ति नसेल तर इच्छा होणार नाही असें वाटतें. माझी तरी आधी शक्ति व नंतर इच्छा कमी झाली व आतांही ज्या प्रमाणांत इच्छा होते त्या प्रमाणांत शक्ति असते. सामान्य अशक्तता, निरुत्साह, चिंता वगैरे कांहीही नाही. आतां पुढे काय उपाय, असा प्रश्न आहे. ऑपरेशनने (Vasectomy) वीर्यांतील मुख्य व महत्त्वाचा घटक जे वीर्यजंतु ते वीर्यपात झाला तरी बाहेर न जातां परत शरीरांत शोषले गेल्यामुळे शरीराची झीज कमी होईल व त्यामुळे शक्ति व इच्छा वाढेल, निदान टिकून तरी राहील असें वाटतें. परंतु शास्त्र काय सांगेल तें खरें.

उ. इच्छा असून शक्ति नाही अशी पुष्कळांची स्थिति असते. आपली नसेल तर आपण सुखी आहांत असें म्हटलें पाहिजे. परंतु अशी स्थिति जर खरोखर नसेल तर मग ऑपरेशनची चौकशी कां ? आपली इच्छा आणि शक्ति

जर बरोबर कमी होत असतील व तीं कमी झाल्यापासून आपणास इतर कांहा त्रास होत नाही असे आपण म्हणतां, तर इच्छा आणि शक्ति हीं दोन्ही टिकून रहावीं असें तरी आपणास कां वाटतें ? इच्छा आणि शक्ति दोन्ही नाहींशीं झाल्यास आपलें काय बिघडलें ? ऑपरेशन केल्यावर वीर्यजंतु उत्पन्नच होत नाहीत, तेव्हा ते शरीरांत शोषले जाण्याचा संभवच नाही, व एरवी तरी वीर्य-पात न झाल्यास ते शरीरांत शोषले जातात ही कल्पनाच चुकीची ठरली आहे, व त्यावर उभारलेली ब्रह्मचर्याची सर्व इमारत कधीच कोसळून पडली आहे. अर्थात पारंपरिक लेखकांस याचा पत्ताच नसतो व ते अजूनही ब्रह्मचर्याचीं थोरवी वर्णन करीतच असतात. वीर्यजंतु तयार होऊन ते वीर्यपाताने बाहेर न पडतां शरीरांत सांचून राहिल्यास त्यापासून अनेक प्रकारचा त्रास सोसावा लागतो. हा अनुभव पुष्कळांस असतो परंतु हें कबूल करावयास लोक लाजतात. या ऑपरेशनने एकंदर प्रकृति सुधारते हें खरें व त्यामुळे आपणास उपयोग होण्याचा संभव आहे.—सं.

२

वि. वि. १. माझें लग्न करण्यापूर्वीच मी विवाहाच्या बाबतींत फार उदार मताचा होतों, परंतु हे विचार मनांतच राहून गेले. माझ्या इच्छेविरुद्ध जगरूढी-प्रमाणे माझ्या मात्यापित्यांनी गळ्यांत लोढणें अडकविलें. वृद्धांचा मान मोडूं नये म्हणून डोळे झांकून कृति करणें भाग पडलें. २ मुळापासून माझी पत्नी मला नाआवडी होती. ती पत्नी नको म्हणून तरी भागतें काय ? कशी तरी नांदवलीच पाहिजे हा धर्माचा करार. नाही तर जगापवाद. या भयास्तव पदरांत पडली पवित्र झाली या न्यायाने सहकारी करण्याचा प्रयत्न केला. ३. तारुण्याच्या भरांत शिवाय रूपगुणांनी उत्तम असल्यामुळे साहजिकच स्त्रियांची दृष्टी मजकडे वळे. मला परस्त्रीशीं बोलण्यांत वाईट वाटे, इच्छाहि होत नसे. परंतु एकदा योग चम-त्कारिक आला. एका पात्राने मला नेत्रकटाक्षाचा बाण व प्रेमाचें जाळें टाकलें. ज्या बाईने मला मोहांत गुरफटलें ती मजहून वयाने व शरीराने मोठी आहे. अशीं आज तीन वर्षें झालीं, वयाने मोठ्या स्त्रीशीं संग करण्याने माझ्या शरीरा-

वर परिणाम झाला आहे परंतु तिच्यावर बिलकुल दिसत नाही. असें कां ? म
तेव्हापासून तिचा अंकित झालों. तिला सोडून मला एक घटकाहि करमेना. र
रांडेपेक्षा माझी गृहपत्नी रूपाने, तारुण्याने अधिक उत्तम आहे ख
परंतु पतीस मोहित करण्याची कला तिच्या ठायी नाही, यामु
ती मला नकोशी वाटते. हल्ली दोन्हीहि व्यक्ती मजजवळच आहेत
परंतु अधिक प्रेम रांडेवरच करावेंसें वाटतें. हें कां ? एकाद्या बेळीं रांडेनें मजव
वक्रदृष्टि केली, अपशब्दांचा वर्षाव केला तरी तिचीच कांस धरावीशी वाटते
थट्टेवारी बोलणें न्यावेंसें होतें. ती सांगेल तें ऐकण्याची व करण्याची मनाच
नेहमी आनंदाने तयारी असते, परंतु बायकोचें कांहीच करावेंसें वाटत नाही
बरें प्रेम हें वयानें अधिक असलेल्या माणसाशीं कसें जडतें ? एके वेळीं मी प्रत्यक्ष
मातेशीं सुद्धा रांडेचा कैवार घेऊन भांडलों, हा न्याय झाला काय ? ४. य
दिवसापासून मला हा बाहेरख्यालीचा नाद लागला. माझें आज वय २६ वर्षांचे
आहे, परंतु या दोनतीन वर्षांचे अवधींत माझा सोळा सतरा स्त्रियांशीं संब
झाला. त्यांत कांही विधवा, बहुतेक सधवा आणि दोनतीन कुमारी लाभल्या
गोष्ट खोटी नाहीं. यांत मात्र मजा ही की मी कोणत्याहि रांडेवर आसक्त झालो
नाही किंवा मी होऊन मागें लागून प्रयत्न केला नाही, मग असें कां होतें
याचा कांहीच उलगडा होत नाही. या घडलेल्या थोड्या अवधीच्या लाभावरून
निदान निम्म्या आयुष्यांत तरी शतसंभोगवाला बनण्याची खात्रीने पाळी येईलशी
वाटते. परंतु तसा माझा मानस नाही. परंतु त्याबरोबर वेळ आल्यावर आत्म
संयमन नाही. बरें त्यांचींहि मनें दुखवणें रास्त नाही, पातक आहे, मनाच्
हिरमोड करणें अतिवाईट या तत्त्वावर मी वागतों. तरी असें करणें योग्य क
नाही ? बऱ्याचशा स्त्रियांचा लोट मजकडे ओढल्यामुळे मला खरें प्रेम कोणा
आहे हें कांहीच समजेना व कोणावर अधिक प्रेम करावें हें कळेना, तेव्हां
कसें ओळखावें ? निरनिराळ्या स्त्रिया निरनिराळ्या रीतीने प्रेमाचे पाझर फोड
तात. कांही निरिच्छ आहेत तर कांही स्वार्थी आहेत, कांही चोरट्या प्रेमाच्य
आहेत तर काही रस्त्याने हातांत हात घालून चालण्यास तयार आहेत, नव

चालूंहि लागत आहेत. ५. एकादे वेळीं मजकडे एकदम दोन तीन, कधी कधी अधिक रांडांचें संम्मेलन होतें. ती रात्र मला फार धोक्याची वाटते. कारण त्यांच्या त्यांच्यांत हेवा उत्पन्न होतो व भांडण थांबवतां पुरेवाट होते. असा त्यांच्यांत मतभेद कां? माझ्या सुखाकरता कां झटत नाहीत? ६. शेवटीं एवढीच विनंति की मीं घडत असलेली हकीकत मोकळ्या मनाने मांडली आहे; शंकांचें निरसन करावें. अज्ञानपणांत सुचत नाहीं. प्रेम करावें का नको, याचा खुलासा करून मला सुमार्ग दाखवाल अशी आशा आहे. असेच पुष्कळसे तरुण तारुण्याच्या मदाने बहकून सैरावैरा भटकतात तरी त्यांनाहि योग्य मार्ग लागेल. इत्यलम्.

वर्गणीदार, जि. सातारा.

उ. वरील हकीकतींत पुष्कळ मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. लग्नाचे बाबतींत मुलांवर जुलूम करण्याचे परिणाम आईबापांस उमजतील तर जगांतील पुष्कळ दुःख कमी होईल. कोणाचें कोणावर प्रेम कां बसतें हें सांगणें जवळ जवळ अशक्यच आहे. आईबापांचें देखील सर्व मुलांवर सारखें प्रेम नसतें व त्यांत सद्गुणी मुलांवर जास्त असतें असेंहि नाहीं, तथापि सुज्ञ आईबाप मुलांच्या नजरेस हा फरक येणार नाही अशा रीतीने वागण्याचा प्रयत्न करतात, परंतु तेंहि नेहमींच साधतें असें नाही. वरील हकीकतींतील नावडत्या बायकोची कोणत्याहि प्रकारची चूक दिसत नाही. तिचेंहि लग्न आईबापांनीच करून दिलें व तिच्या अंगांत नवऱ्यास इष्ट वाटणारे कांही गुण नाहीत, यांत तिची चूक कोठेंच दिसत नाही. तेव्हा याबद्दल तिला शिक्षा व्हावी हें रास्त नाही. प्रेम कोणाचाहि हुकूम ऐकत नाही. तेव्हा स्वतःचे स्त्रीवर प्रेम करावें व परस्त्रीवर करूं नये हें म्हणणें फोल आहे व तसा उपदेश आम्ही करणारहि नाही. परंतु इतर स्त्रियांवर प्रेम बसल्यामुळे बायकोला कोणत्याहि प्रकारचा त्रास होतां कामा नये व समाजाच्या सद्यःस्थितींत बहुतेक स्त्रिया नवऱ्यावर सर्वस्वी अवलंबून असल्यामुळे त्यांचो अन्नपाण्याची व्यवस्था त्याचे ऐपतीप्रमाणे लागली पाहिजे, इतकेंच आम्हांस सांगतां येईल. शिवाय प्रेमासंबंधी

वरील नियम सर्वांस सारखाच लागू असल्यामुळे तिचेंहि इतर कोणावर प्रेम बसल्यास त्यावद्दल तिला दोष न देण्याची नवऱ्याची तयारी पाहिजे.

खरें प्रेम कोणाचें आहे, हें सांगणें कठिण आहे, व प्रेम कशास म्हणावें यावर तें बरेंच अवलंबून आहे. वरील उदाहरणांत प्रेम म्हणजे समागमाची इच्छा इतकाच अर्थ घ्यावा लागेलसें वाटतें. केवळ प्रेमपात्राच्या सुखाचीचें इच्छा करणारें प्रेम फारच क्वचित दिसतें. बहुतेकांच्या प्रेमाचें ध्येय प्रेमपात्राशीं समागमांतच असतें, व यामुळेच हेवा उत्पन्न होतो. कांही असलें तरी, एखादी स्त्री केवळ शारीरिक सुखाकरता एखाद्या पुरुषाशीं समागमास सिद्ध झाली तरीहि तिला 'रांड' म्हणणें म्हणजे शिवी देणें आहे. शब्दांचा असा दुरुपयोग करण्यास आम्ही तयार नाही. रांड याचा अर्थ वेश्या, म्हणजे पैशाकरता समागम सोसणारी स्त्री, असा अर्थ आम्ही करतो. सुखाकरता समागम करणाऱ्या स्त्रीला जर रांड म्हणायचें असेल तर तशाच प्रकारची शिवी वरील लेखकाकरता तयार करावी लागेल ('रांड' या शब्दाचें पुल्लिंग होत नाही याला आमचा इलाज नाही.)

कामशास्त्रांतील मुख्य नीतितत्त्व झटलें म्हणजे दुसऱ्याच्या सुखाकरता झटणें हें होय व वात्स्यायनासारख्या कामशास्त्राच्या आचार्यांनी यावरच विशेष जोर दिला आहे. आता हें सुख केवळ शारीरिक दृष्टीनेच न पाहतां सर्व बाजूंनी याचा विचार करणें जरूर आहे. मन मोडणें बरोबर नाही या तत्वावर वरील लेखक कुमारी, विधवा, सधवा, येईल त्या स्त्रीशी सरसकट समागम करतात असें दिसतें. जोपर्यंत त्यांत कोणाचें नुकसान नाही तोपर्यंत आमचें कांही म्हणणें नाही, परंतु एखादी कुमारिका किंवा विधवा गरोदर झाल्यास तिची काय वाट होईल? एकंदरींत वरील हकीकतीवरून लेखकाने स्वतःवर शस्त्रक्रिया करून घ्यावी हें बरें दिसतें, म्हणजे अशा प्रकारची भीति राहणार नाही. अर्थात स्वतःच्या प्रकृतीस काय झेंपेल याचाहि त्याने विचार करणें जरूर आहे. **सं.**

३ ४-७-३०.

वि. वि. माझें लग्न १९२० सालीं झालें व १९२४ सालीं, पत्नीच्या विसाव्या वर्षी आम्हाला पहिली मुलगी झाली. यावेळीं तिला बराच त्रास झाला,

पण त्यांतून बरी होऊन नंतर दोन दोन वर्षांचे अंतराने दोन मुलगे झाले. तेव्हापासून पत्नीची तब्येत खालावली. तिची प्रकृति मूळची अशक्त पण निरोगी होती, गेल्या दोन वर्षांपासून रोगाने ठाणें दिलें आहे. या अवधींत तीं अस्पर्श झाली नव्हती, पण गेल्या आठवड्यांत झाली. आतां संततिनियमन करण्यांचें दोघांनी ठरवलें आहे. एक दोन डॉक्टरांस विचारलें, त्यांचे मतें निर्दोष असा उपाय नाही. एकच रामबाण उपाय आहे व तो ब्रह्मचर्य हा होय. हें त्यांचें मत ऐकून मी गेले सहा महिने त्याप्रमाणे वागलों, पण त्यापासून मन:स्वास्थ्य नाहींसें होऊं लागून कित्येक प्रसंगीं माझें मन समागम इच्छेने अनावर होऊं लागतें. आपल्या मतें निर्दोष उपाय कोणता व त्याची अंमलबजावणी कशी करावी हें कळविण्याची कृपा करावी.

समागमासंबंधीच्या माझ्या कल्पना आता पुष्कळच बदलेल्या आहेत. समागमापासून आपल्या पत्नीला सुख होत नसल्यास तो शक्य तितका टाळावा असें माझें मत आहे व माझी पत्नी अशक्त असल्यामुळे मी या बाबतींत अतिशय जपून वागत असतों. पण त्यामुळे समागमाची इच्छा पुरी न झाल्यामुळे मनास अस्वस्थता वाटते.

उ. आपण दिलेल्या हकीकतीवरून आपल्या डॉक्टराचा मूर्खपणा व अज्ञान दिसून येतें. असें म्हणण्यांत आम्ही त्यांना संशयाचा फायदा देत आहों, कारण तसें न म्हटल्यास त्यांजवर मतलबीपणाचा आरोप करावा लागेल. डॉक्टर नेहमी जीं औषधें देतात त्यांपैकीं कितीशीं निर्दोष असतात? केवळ रोग मात्र बरा होऊन बिलकूल अपाय न करणारीं अशीं किती औषधें आहेत? मलेरियाच्या तापावर सर्व डॉक्टर कोयनेल देतात, त्याने अपाय होत नाही काय? परंतु संततिनियमनाच्या योग्य उपायांनी बिलकूल अपाय होत नाही असाच निर्णय जवळजवळ एकमताने, ३ विरुद्ध १६१ मतांनी, लंडन येथील परिषदेंत डॉक्टरांच्या सभेने दिला आहे. जास्त माहितीकरतां आमचें 'संततिनियमन' पहा. आतां आपल्या डॉक्टरांनी सुचवलेला ब्रह्मचर्याचा उपाय रामबाण आहे खरा,

वर परिणाम झाला आहे परंतु तिच्यावर बिलकुल दिसत नाही. असें कां ? मी तेव्हापासून तिचा अंकित झालों. तिला सोडून मला एक घटकाहि करमेना. या रांडेपेक्षा माझी गृहपत्नी रूपाने, तारुण्याने अधिक उत्तम आहे खरी परंतु पतीस मोहित करण्याची कला तिच्या ठायी नाही, यामुळे ती मला नकोशी वाटते. हल्ली दोन्हीहि व्यक्ती मजजवळच आहेत. परंतु अधिक प्रेम रांडेवरच करावेंसें वाटतें. हें कां ? एकाद्या वेळीं रांडेनें मजवर वक्रदृष्टि केली, अपशब्दांचा वर्षाव केला तरी तिचीच कांस धरावीशी वाटते, थट्टेवारी बोलणें न्यावेंसें होतें. ती सांगेल तें ऐकण्याची व करण्याची मनाची नेहमी आनंदाने तयारी असते, परंतु बायकोचें कांहीच करावेंसें वाटत नाही. बरें प्रेम हें वयानें अधिक असलेल्या माणसाशीं कसें जडतें ? एके वेळीं मी प्रत्यक्ष मातेशीं सुद्धा रांडेचा कैवार घेऊन भांडलों, हा न्याय झाला काय ? ४. या दिवसापासून मला हा बाहेरख्यालीचा नाद लागला. माझें आज वय २६ वर्षांचें आहे, परंतु या दोनतीन वर्षांचे अवधींत माझा सोळा सतरा स्त्रियांशीं संग झाला. त्यांत कांही विधवा, बहुतेक सधवा आणि दोनतीन कुमारी लाभल्या. गोष्ट खोटी नाहीं. यांत मात्र मजा ही की मी कोणत्याहि रांडेवर आसक्त झालों नाही किंवा मी होऊन मागें लागून प्रयत्न केला नाही, मग असें कां होतें ? याचा कांहीच उलगडा होत नाही. या घडलेल्या थोड्या अवधीच्या लाभावरून निदान निंम्या आयुष्यांत तरी शतसंभोगवाला बनण्याची खात्रीने पाळी येईलशी वाटते. परंतु तसा माझा मानस नाही. परंतु त्याबरोबर वेळ आल्यावर आत्म-संयमन नाही. बरें त्यांचींहि मनें दुखवणें रास्त नाही, पातक आहे, मनाचा हिरमोड करणें अतिवाईट या तत्त्वावर मी वागतों. तरी असें करणें योग्य का नाही ? बऱ्याचशा स्त्रियांचा लोट मजकडे ओढल्यामुळे मला खरें प्रेम कोणाचें आहे हें कांहीच समजेना व कोणावर अधिक प्रेम करावें हें कळेना, तेव्हां हें कसें ओळखावें ? निरनिराळ्या स्त्रिया निरनिराळ्या रीतीने प्रेमाचे पाझर फोड-तात. कांही निरिच्छ आहेत तर कांही स्वार्थी आहेत, कांही चोरट्या प्रेमाच्या आहेत तर काही रस्त्याने हातांत हात घालून चालण्यास तयार आहेत, नव्हे

चालूंहि लागत आहेत. ५. एकादे वेळीं मजकडे एकदम दोन तीन, कधी कधी अधिक रांडांचें संम्मेलन होतें. ती रात्र मला फार धोक्याची वाटते. कारण त्यांच्या त्यांच्यांत हेवा उत्पन्न होतो व भांडण थांबवतां पुरेवाट होते. असा त्यांच्यांत मतभेद कां? माझ्या सुखाकरता कां झटत नाहींत? ६. शेवटीं एवढीच विनंति की मीं घडत असलेली हकीकत मोकळ्या मनाने मांडली आहे; शंकांचें निरसन करावें. अज्ञानपणांत सुचत नाहीं. प्रेम करावें का नको, याचा खुलासा करून मला सुमार्ग दाखवाल अशी आशा आहे. असेच पुष्कळसे तरुण तारुण्याच्या मदाने बहकून सैरावैरा भटकतात तरी त्यांनाहि योग्य मार्ग लागेल. इत्यलम्. वर्गणीदार, जि. सातारा.

उ. वरील हकीकतींत पुष्कळ मुद्दे विचार करण्यासारखे आहेत. लग्नाचे बाबतींत मुलांवर जुलूम करण्याचे परिणाम आईबापांस उमजतील तर जगांतील पुष्कळ दुःख कमी होईल. कोणाचें कोणावर प्रेम कां बसतें हें सांगणें जवळ जवळ अशक्यच आहे. आईबापांचें देखील सर्व मुलांवर सारखें प्रेम नसतें व त्यांत सद्गुणी मुलांवर जास्त असतें असेंहि नाहीं, तथापि सुज्ञ आईबाप मुलांच्या नजरेस हा फरक येणार नाही अशा रीतीने वागण्याचा प्रयत्न करतात, परंतु तेंहि नेहमींच साधतें असें नाही. वरील हकीकतींतील नावडत्या बायकोची कोणत्याहि प्रकारची चूक दिसत नाही. तिचेंहि लग्न आईबापांनीच करून दिलें व तिच्या अंगांत नवऱ्यास इष्ट वाटणारे कांही गुण नाहीत, यांत तिची चूक कोठेंच दिसत नाही. तेव्हा याबद्दल तिला शिक्षा व्हावी हें रास्त नाही. प्रेम कोणाचाहि हुकूम ऐकत नाही. तेव्हा स्वतःचे स्त्रीवर प्रेम करावें व परस्त्रीवर करूं नये हें म्हणणें फोल आहे व तसा उपदेश आम्ही करणारहि नाही. परंतु इतर स्त्रियांवर प्रेम बसल्यामुळे बायकोला कोणत्याहि प्रकारचा त्रास होतां कामा नये व समाजाच्या सद्यःस्थितींत बहुतेक स्त्रिया नवऱ्यावर सर्वस्वी अवलंबून असल्यामुळे त्यांची अन्नपाण्याची व्यवस्था त्याचे ऐपतीप्रमाणे लागली पाहिजे, इतकेंच आम्हांस सांगतां येईल. शिवाय प्रेमासंबंधी

वरील नियम सर्वांस सारखाच लागू असल्यामुळे तिचेंहि इतर कोणावर प्रेम बसल्यास त्याबद्दल तिला दोष न देण्याची नवऱ्याची तयारी पाहिजे.

खरें प्रेम कोणाचें आहे, हें सांगणें कठिण आहे, व प्रेम कशास म्हणावें यावर तें बरेंच अवलंबून आहे. वरील उदाहरणांत प्रेम म्हणजे समागमाची इच्छा इतकाच अर्थ घ्यावा लागेलसें वाटतें. केवळ प्रेमपात्राच्या सुखाचीचें इच्छा करणारें प्रेम फारच क्वचित दिसतें. बहुतेकांच्या प्रेमाचें ध्येय प्रेमपात्राशीं समागमांतच असतें, व यामुळेच हेवा उत्पन्न होतो. कांही असलें तरी, एखादी स्त्री केवळ शारीरिक सुखाकरता एखाद्या पुरुषाशीं समागमास सिद्ध झाली तरीहि तिला 'रांड' म्हणणें म्हणजे शिवी देणें आहे. शब्दांचा असा दुरुपयोग करण्यास आम्ही तयार नाही. रांड याचा अर्थ वेश्या, म्हणजे पैशाकरता समागम सोसणारी स्त्री, असा अर्थ आम्ही करतो. सुखाकरता समागम करणाऱ्या स्त्रीला जर रांड म्हणायचें असेल तर तशाच प्रकारची शिवी वरील लेखकाकरता तयार करावी लागेल ('रांड' या शब्दाचें पुल्लिंग होत नाही याला आमचा इलाज नाही.)

कामशास्त्रांतील मुख्य नीतितत्त्व म्हटलें म्हणजे दुसऱ्याच्या सुखाकरता झटणें हें होय व वात्स्यायनासारख्या कामशास्त्राच्या आचार्यांनी यावरच विशेष जोर दिला आहे. आता हें सुख केवळ शारीरिक दृष्टीनेच न पाहतां सर्व बाजूंनी याचा विचार करणें जरूर आहे. मन मोडणें बरोबर नाही या तत्वावर वरील लेखक कुमारी, विधवा, सधवा, येईल त्या स्त्रीशी सरसकट समागम करतात असें दिसतें. जोपर्यंत त्यांत कोणाचें नुकसान नाही तोपर्यंत आमचें कांही म्हणणें नाही, परंतु एखादी कुमारिका किंवा विधवा गरोदर झाल्यास तिची काय वाट होईल? एकंदरींत वरील हकीकतीवरून लेखकाने स्वतःवर शस्त्रक्रिया करून घ्यावी हें बरें दिसतें, म्हणजे अशा प्रकारची भीति राहणार नाही. अर्थात स्वतःच्या प्रकृतीस काय झेंपेल याचाहि त्याने विचार करणें जरूर आहे. **सं.**

३ ४-७-३०.

वि. वि. माझें लग्न १९२० सालीं झालें व १९२४ सालीं, पत्नीच्या विसाव्या वर्षी आम्हाला पहिली मुलगी झाली. यावेळीं तिला बराच त्रास झाला,

पण त्यांतून बरी होऊन नंतर दोन दोन वर्षांचे अंतराने दोन मुलगे झाले. तेव्हापासून पत्नीची तब्येत खालावली. तिची प्रकृति मूळची अशक्त पण निरोगी होती, गेल्या दोन वर्षांपासून रोगाने ठाणें दिलें आहे. या अवधींत तीं अस्पर्श झाली नव्हती, पण गेल्या आठवड्यांत झाली. आतां संततिनियमन करण्यांचें दोघांनी ठरवलें आहे. एक दोन डॉक्टरांस विचारलें, त्यांचे मतें निर्दोष असा उपाय नाही. एकच रामबाण उपाय आहे व तो ब्रह्मचर्य हा होय. हें त्यांचें मत ऐकून मी गेले सहा महिने त्याप्रमाणे वागलों, पण त्यापासून मन:स्वास्थ्य नाहीसें होऊं लागून कित्येक प्रसंगीं माझें मन समागम इच्छेने अनावर होऊं लागतें. आपल्या मतें निर्दोष उपाय कोणता व त्याची अंमलबजावणी कशी करावी हें कळविण्याची कृपा करावी.

समागमासंबंधीच्या माझ्या कल्पना आता पुष्कळच बदलेल्या आहेत. समागमापासून आपल्या पत्नीला सुख होत नसल्यास तो शक्य तितका टाळावा असें माझें मत आहे व माझी पत्नी अशक्त असल्यामुळे मी या बाबतींत अतिशय जपून वागत असतों. पण त्यामुळे समागमाची इच्छा पुरी न झाल्यामुळे मनास अस्वस्थता वाटते.

उ. आपण दिलेल्या हकीकतीवरून आपल्या डॉक्टराचा मूर्खपणा व अज्ञान दिसून येतें. असें म्हणण्यांत आम्ही त्यांना संशयाचा फायदा देत आहों, कारण तसें न म्हटल्यास त्यांजवर मतलबीपणाचा आरोप करावा लागेल. डॉक्टर नेहमी जीं औषधें देतात त्यांपैकीं कितीशीं निर्दोष असतात? केवळ रोग मात्र बरा होऊन बिलकूल अपाय न करणारीं अशीं किती औषधें आहेत? मलेरियाच्या तापावर सर्व डॉक्टर कोयनेल देतात, त्याने अपाय होत नाही काय? परंतु संततिनियमनाच्या योग्य उपायांनी बिलकूल अपाय होत नाही असाच निर्णय जवळजवळ एकमताने, ३ विरुद्ध १६१ मतांनी, लंडन येथील परिषदेंत डॉक्टरांच्या सभेने दिला आहे. जास्त माहितीकरतां आमचें 'संततिनियमन' पहा. आतां आपल्या डॉक्टरांनी सुचवलेला ब्रह्मचर्याचा उपाय रामबाण आहे खरा,

परंतु निर्दोष मात्र नाही. त्याचे काय परिणाम झाले हें आपणच सांगितलें आहे, व चाळिसाव्या वर्षी आत्महत्या करणें हा जसा म्हातारें न होण्याचा रामबाण उपाय आहे, त्याच किंमतीचा वरील उपाय आहे.

समागमाचे बाबतींत पत्नीस त्रास होत असल्यास तो 'शक्य तितका' नव्हे तर मुळींच टाळावा असें आमचें मत आपल्यापेक्षाहि अधिक जोराचें आहे, परंतु तिला त्रास होतो की काय हें तिलाच ठरवूं द्यावें, स्वतःचे मताने ठरवूं नये. सं.

४

वि. वि. आपल्या अंकांत 'विवाहितांस प्रश्न' केला आहे त्याचें उत्तर खालीलप्रमाणे आमच्या व इतरांच्या अनुभवावरून दिलें आहे..... ..ज्याचें मन सुसंस्कृत झालें आहे...तो तरी निदान ४० नंतर कित्येक वर्षें पत्नीशिवाय राहूं शकेल. पण त्यामुळे तो नपुंसक होईलच असें खात्रीने म्हणतां येणार नाही. भर तारुण्यांत कॉलेज स्टुडंट आपल्या विवाहित पत्नीस सोडून जवळ-जवळ एक वर्षभर राहतो. पण त्यामुळे तो नपुंसक ठरेल काय? हिंदुस्थनां-तून बरेच विद्यार्थी तरुण वयांत आपल्या पत्नीस सोडून शिक्षणाकरता परदे-शास दोन चार वर्षें राहतात पण त्यामुळे ते बिलकुल नपुंसक होत नाहीत.....

माझ्या एक मित्राचा इतिहास खालीलप्रमाणे आहे. आज त्याच्या वयास ४५ वर्षें झालीं असून तो सरकारी खात्यांत कारकून आहे. त्याची सांपत्तिक स्थिति उत्तम असून त्याचें लग्न अद्याप झालें नाही. त्याच्या तारुण्यांत बऱ्याच मुली सांगून आल्या होत्या पण त्यास एकहि पसंतीस उतरली नाही. नंतर तो स्वतंत्र राहूं लागला व त्याच्या ३० व्या वर्षी लग्नाचा बेत जुळून आला होता पण तो मोडला व त्यानंतर प्रत्येक सोयरिकीचे वेळीं त्यास कोणीतरी नपुंसक म्हणून नांवें ठेवूं लागला. त्याच्या ४० व्या वर्षी त्यास एका डॉक्टराने तपासून संभोगशक्ति कायम आहे असें सर्टिफिकेट दिलें पण लोक त्याच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. अद्याप त्याने कसलाच स्त्रीसंभोग केला नाही. पण वेश्यागमन

करण्याच्या तो विरुद्ध आहे. पण वीर्य सांठल्यामुळे त्रास होतो व आग होते असें नेहमी म्हणतो व त्याबद्दल औषध घेतें असतो. अशा स्थितींत त्याने काय करावें बरें ?

आमच्या समाजांत स्त्रीस गर्भ राहिल्यापासून दीड वर्ष तरी संभोग करीत नाहीत, कारण ९ महिन्यांनंतर पूर्ववत स्थितीस येईपर्यंत म्हणजे बालकास निदान वर्ष होईपर्यंत तरी स्त्रीस माहेरीं राहण्याची पूर्ण मुभा असते व असें असल्यामुळे विवाहित तरुणास तितके महिने पूर्ण ब्रह्मचर्य पाळावें लागतें. पण त्याचा त्यावर कसलाच परिणाम होत नाहीं.

गर्भ राहिला असतां दोन महिन्यांच्या आंत शस्त्रक्रिया न करतां गर्भपात कसा करतात त्याचा खुलासा कराल काय ? वेश्या दोनतीन महिन्यांच्या गर्भास नाहींसा करतात असें आमच्या नजरेस आलें आहे, पण त्यांचा काय उपाय असतो ?

उ. १. आम्ही विवाहितांस जो प्रश्न केला आहे तो त्यांस कामशास्त्रांतील तज्ञ समजून केलेला नाही. ४० वर्षानंतर मनुष्य समागमाशिवाय राहिल्यास नपुंसक होण्याचा संभव असतो, हें कामशास्त्रांतील तज्ञांचें मत आहे, व या मुद्द्यावर आपल्या मतास बिलकुल महत्त्व नाही. प्रश्न नीट समजून घेण्याचीं देखील आपण तसदी घेतलेली नाही. एरवी या बाबतींत तरुणांचीं उदाहरणें कशाकरतां दिलीं ? ४० वर्षांपुढील पुरुषहि खात्रीने नपुंसक होईलच असें आम्हीं लिहिलें नाहीं, होण्याचा संभव असतो इतकेंच लिहिलें आहे (जुलै १९३०). कामवासना कमी झाल्यामुळे तो सहज पत्नीशिवाय राहूं शकेल या म्हणण्याचाहि कांही उपयोग नाही. तो राहिल्यास नपुंसक होण्याचा संभव आहेच व कामवासना अगोदरच कमी झाली असल्यास हा संभव जास्तच आहे. २. कालेजांतील विद्यार्थी एक वर्षभर पत्नीपासून दूर राहतात हेंहि खोटें आहे. साडेतीन महिने राहतात हें खरें व सर्व ब्रह्मचर्याने

राहतात हेंहि खोटें आहे. हिंदुस्थानांतून परदेशांत गेलेले विद्यार्थी ब्रह्मचर्याने राहतात अशीहि आपली कल्पना दिसते, ती तर सपशेल खोटी आहे. अशा गोष्टी परत आल्यावर कोणी कबूल करीत नसतो. पुष्कळ वर्षें ब्रह्मचर्याने राहिल्यास तरुण लोक सुद्धा नपुंसक होतात अशीं उदाहरणें आहेत. ३. आपल्या ४५ वर्षांच्या मित्रास संभोगशक्ति कायम आहे असें ज्या डाक्टराने सांगितलें ते या विषयांतील तज्ञ नाहीत हें उघड आहे. शारीरिक दृश्य बिघाड झाला आहे की काय हें डाक्टरास समजेल, व सूक्ष्मदर्शक यंत्राने रेत तपासल्यास प्रजोत्पत्ति शक्य आहे की नाही हें समजेल, परंतु समागम शक्य आहे की नाही हें डॉक्टरास समजणें शक्य नाही, व लोक आपल्या मित्रास नपुंसक म्हणत असल्यास त्यांत आम्हांस त्यांची बिलकुल चूक दिसत नाही. ज्याला प्रचलित नीतीला इतकें महत्त्व द्यावेंसें वाटेल त्याने काय हाल होतील ते सोसण्यास तयार असलें पाहिजे, लोकांस नावें ठेवून काय उपयोग? ५. नैसर्गिक कामवासनेवर औषध देणारा तर मूर्खच. पण घेणारा शतमूर्ख, कारण देणाराचा त्यांत आर्थिक फायदा तरी असतो, परंतु घेणाराचा सर्वतोपरी तोटा असतो. ब्रह्मचर्याने त्रास होतच असतो, तेव्हा पुण्य लागायचें तें लागतेंच, मग औषधाने प्रकृति आणखी बिघडून जास्त त्रास झाल्याने जास्त पुण्य लागत असल्यास नकळे! अडाणीपणाची फळें ज्याचीं त्याला भोगावीं लागतात, त्याला लोक काय करणार? ६. बालक एक वर्षाचें होईपर्यंत माहेरीं राहण्याची मुभा असून काय उपयोग? अशा राहतात किती? व तितके दिवस विवाहित तरुणास ब्रह्मचर्य पाळावें लागतें म्हणण्यांत काय अर्थ आहे? कोणी पाळतात, कोणी पाळीत नाहीत. त्याचा त्यांवर कसलाच परिणाम होत नाही हें आपलें म्हणणें खरें कशावरून? आमचें म्हणणें याचे उलट आहे. ७. वेश्या गर्भपात कसा करतात याचा खुलासा वेश्यांसच विचारावा. आम्हांस असा खुलासा एखाद्या वेश्येने दिला तरी आम्हांस छापतां येणार नाही, कारण त्यांत कायद्याचा प्रश्न उपस्थित होईल. सं.)

५

'वीर्याचा मुख्य भाग म्हणजे शुक्रजंतु हे अंडयुग्मांत तयार झाल्यावर रेतवाहक नलिकेंतून रेताशयांत जाऊन बसतात. उद्दीपनामुळे त्यांस प्रेरणा होईल तेव्हा ते मूत्रमार्गांत उतरतात व दुसऱ्या अनेक रसांशीं मिश्र होऊन तें मिश्रण बाहेर पडतें, त्यास वीर्य म्हणतात. हें शरीरांत आगाऊ तयार नसतें. तें आयत्या वेळीं तयार होतें. वीर्य बाहेर न पडल्यास रक्तांत मिसळून प्रकृतीस त्याचा उपयोग होतो ही कल्पनाच खोटी आहे.' (समाजस्वास्थ्य, फेब्रु. १९२८, पान १३) यावरील शंका:-' उद्दीपन होऊं नये अशी खबरदारी घेतल्यास शुक्रजंतु उत्पन्न होतील काय? ते न झाल्यास काय फायदा आहे? शुक्रजंतु कशापासून तयार होतात? ब्रह्मचर्यव्रताने राहिल्यास उद्दीपन बऱ्याच अंशाने कमी होईल आणि तें तसें झालें म्हणजे शुक्रजंतु अंडयुग्मांत तयार होण्यास जी शक्ति, जें रक्त लागतें, तें सहजच खर्च होणार नाही. अशा तऱ्हेने बचत झाली तर तो फायदा नव्हे काय? यावरून ब्रह्मचर्यामुळे फायदा होत नाही हें म्हणणें फोल ठरतें. तरी कृपाकरून खुलासा करावा व शास्त्रीय उत्तर द्यावें.

उ. १. उद्दीपन होऊं नये अशी खबरदारी घेणें शक्य नसतें, कारण रेताचा संचय होणें इतकें कारण देखील उद्दीपनास पुरे होतें. स्त्रीचें किंवा स्त्रीशीं संबंध असलेल्या वस्तूंचें दर्शन वा स्पर्श हीं नैमित्तिक कारणें टाळणें झाल्यास अरण्यांत रहावें लागेल व तरीहि स्वप्नावस्था वगैरे प्रकार होतीलच. असें न झाल्यास त्या मनुष्यांत रेतोत्पत्ति होतच नाही असें समजलें पाहिजे. कधीकधी नकळत रेत मूत्राबरोबर बाहेर पडूं शकते परंतु तें बाहेर पडलेंच पाहिजे. २. ब्रह्मचर्यव्रत पाळल्याने उद्दीपन कमी प्रमाणांत होईल ही कल्पनाच हास्यास्पद आहे. कालांतराने नपुंसकत्व आल्यावर कदाचित तसा परिणाम होईल परंतु आरंभी तरी याच्या उलट स्थिति असते. बरींच वर्षें ब्रह्मचर्य पाळल्यास मात्र नपुंसकत्व येऊन इष्ट तो परिणाम बहुधा होईल, परंतु यालाच फायदा म्हणायचें असल्यास गोष्ट वेगळी, एरवी याने प्रकृति सुधारेल ही कल्पना चुकीची

आहे. तांदुळांत कमी पैसे खर्च केल्यास गहूं जास्त आणतां येतील किंवा राहिलेले पैसे ब्यांकेंत टाकतां येतील, अशा प्रकारचा जमाखर्च शरीराचे बाबतींत चालत नाही. प्रकृति उत्तम रहावयास पाहिजे असेल तर शरीराच्या सर्व भागांस योग्य व्यायाम मिळून त्यांस पुरेसें रक्त पोंचेल अशी व्यवस्था केली पाहिजे. एका भागाचें नुकसान तें सर्व शरीराचें नुकसान. प्रत्येक भागाचें आरोग्य त्याला पोंचणाऱ्या रक्तावर अवलंबतें व योग्य व्यायामाशिवाय रक्त पोंचत नाही. ब्रह्मचर्य म्हणजे शरीराच्या एका विशिष्ट भागाकडे जाणून दुर्लक्ष करणें आहे, म्हणून मूर्खपणा आहे. हा सिद्धांत शरीराच्या कोणत्याहि भागास लागू आहे, परंतु प्रकृतीचे दृष्टीने हतर भागांपेक्षा बीजकोशाचें महत्त्व विशेष आहे. शुक्रजंतु हे या बीजकोशांचा बहिःस्राव होत, याशिवाय या पिंडाचा एक अंतःस्राव असतो. तो नेहमीच रक्तांत मिसळतो व याचा एकंदर प्रकृतीस अत्यंत उपयोग असतो, शुक्रजंतूंचा मात्र बिलकूल नसतो. ब्रह्मचर्यामुळे बीजकोशांच्या कार्यांत व्यत्यय आल्यास हा अंतःस्राव कमी होऊन शेवटीं अजीबात बंद होतो, म्हणजेच नपुंसकत्व येतें, कारण अंतःस्रावाचें एक कार्य कामवासना उत्पन्न करण्याचें असतें. यामुळेच कांही पुरुषांच्या रेतांत रेतजंतूंचा पूर्ण अभाव असतांहि त्यांस कामवासना भरपूर असूं शकते. यावरून स्पष्ट दिसतें कीं ब्रह्मचर्यापासून कोणत्याहि प्रकारचा फायदा तर होतच नाही, परंतु नुकसान होण्याचा मात्र चांगलाच संभव असतो. **सं.**

६

पुणें, २५. १०. ३०.

माझी हकीकत खालीलप्रमाणे आहे. कुंडलीवरून, हा मुलगा स्त्रिया कडून बिघडला जाईल, असा इशारा वडील मंडळीस मिळाल्यामुळे मला लहानपणीं इतक्या कडक रीतीने वागवण्यांत आलें कीं मला मुलींबरोबर खेळ आठवत नाहीत किंवा ओळखहि आठवत नाही. असें असूनहि व या विषयासंबंधी कांही ज्ञान नसतांहि शेजारी राहणाऱ्या, तोंपर्यंत शरीराने कुमारिका असलेल्या, ३० वर्षे वयाच्या विवाहित स्त्रीशीं वयाच्या १३ व्या वर्षी संबंध

झाला व सरासरी १ वर्ष तो चालू राहिला. ही आमच्यावर कडक बंदोबस्त ठेवणारांपैकीच एक होती व तेंच ढोंग तिने कायम ठेवलें. मलई, आटीव दूध, बदामी हलवा वैगेरे पदार्थ उशाशीं ठेवून ही स्त्री रात्रींतून तीन तीन चार चार वेळा मजकडून संबंध करवीत असे. शिवाय छडी हातांत घेऊन अभ्यासहि करवून घेत असे. कदाचित अशा सुरवातीमुळेच असेल, पण माझे वेळोवेळीं जे संबंध झाले ते माझ्यापेक्षा वयाने जास्त व माझ्यापेक्षा उंच व शरीराने निदान दुप्पट अशा स्त्रियांशीं झाले आहेत. सतरा अठरा ते वीस वयाच्या स्त्रिया मला अल्पवयस्क वाटून त्यांविषयी मला विषयवासना आज-पर्यंत जागृत झाली नाही.

पुढें बऱ्याच कालाने सतरा वर्षें वयाच्या स्त्रीशीं लग्न होऊन तिला एक-दोन मुलें होऊन तिची प्रकृती ढांसळली. संभोगाचे बाबतींत तिची शांतता होते पण माझी होत नाही...मी शरीराने मजबूत असून माझ्या मतें माझी नीतिमत्ता चांगली आहे. आज एक उद्या एक अशा प्रकाराची मला किळस आहे. शरि-राने मी स्वच्छ आहें. फोड पुटकुळी मला माहित नाही. माझ्या ओळखीचे डॉक्टर मला असें सांगतात की वयाने ३०, ३५ व शरीराने धिप्पाड स्त्रीशीं तूं लग्न केल्यास तुझी प्रकृती याहीपेक्षा मजबूत राहून बुद्धिसामर्थ्याचा चांगला उपयोग होईल व तामसीपणा जाईल. पण १५ ते १९ वर्षांच्या मुली किंवा त्यांचे पालक माझ्या द्वितीय लग्नास तयार असल्याने हा प्रश्न तुटत नाही. तर ही एक महत्त्वाची बाब समजून यावर आपलें मत येत्या अंकांत द्याल काय?

उ. कामवासनेस प्रथम लागलेलें वळण पुष्कळ वेळा पुढे कायम होतें, याचें हें एक उदाहरण आहे. तशी संवय झाल्यामुळे प्रौढ स्त्रीपासून अधिक समाधान होणें शक्य आहे. प्रकृति सुधारेल असें म्हणण्यास यापेक्षा जास्त कारण दिसत नाही. **सं.**

---

१. रेतवाहक नलिकेचा छेद करतेवेळीं बेशुद्ध स्थिति असावी लागते की काय? २. छेद केल्यानंतर दवाखान्यांत किती मुदतीपर्यंत रहावें लागतें? ३.

छेदाची जखम पूर्ण बरी होण्यास किती दिवस लागतात? ४. छेद करविण्यापासून कांही शारिरिक अथवा मानसिक व्यंग अथवा व्याधि उत्पन्न होऊं शकेल की काय? ५ बरेच वर्षांपूर्वी छेद करवून घेणाऱ्या इसमाचे अनुभव कळले असल्यास ते?

उ. १. अर्लीकडे पुष्कळ शस्त्रक्रिया बेशुद्ध केल्याशिवाय करतात, तशीच हीही करतां येईल, व हें डॉक्टरावर व रोग्यावर अवलंबेल. २ व ३. घातलेले टांके काढण्यास ८–१० दिवस लागतात, परंतु इतके दिवस अंथरुणावरच रहावें लागतें असें नाही, व दवाखान्यांत राहिलें पाहिजे असेहि नाही. योग्य व्यवस्था असल्यास घरीं जातां येईल. ४ डॉक्टर वाकबगार नसल्यास कोणत्याहि शस्त्रक्रियेपासून शारीरिक व्याधि उत्पन्न होऊं शकेल, परंतु शस्त्रक्रिया योग्य रीतीने केल्यास होणार नाही. ५. आम्हीं स्वतः ही शस्त्रक्रिया अजमासें पांच वर्षांपूर्वी करवून घेतली व आमचेवर कोणताहि अनिष्ट परिणाम झालेला नाही. ही शस्त्रक्रिया केल्याने नपुंसकत्व येतें किंवा आवाज बायकी होतो असें कांही लोकांस वाटतें, तेंही निराधार आहे. इंग्लंडांत डॉ. नॉर्मन हेअर यांनी अशा प्रकारची शस्त्रक्रिया शेंकडों लोकांवर केली आहे, व सामान्यतः याने एकंदर प्रकृति सुधारते असाच त्यांचा अनुभव आहे.

८ कोल्हापूर, ता. २०–३–३१

वि. वि. आपल्या जानेवारी १९३१ च्या अंकांत एक पुणेंकर म्हणतात कीं 'माझ्या वयाच्या तेराव्या वर्षीं एका ३० वर्षें वयाच्या स्त्रीशीं संबंध झाला व तो सरासरी १ वर्ष चालू राहिला...ही स्त्री रात्रींतून तीन तीन चार चार वेळां मजकडून संबंध करवीत असे...मी शरीराने मजबूत असून...शरीराने मी स्वच्छ आहें. फोड पुटकुळी मला माहीत नाही.' यावरून सदर गृहस्थ पूर्ण निरोगी आहेत व अल्पवयी संभोगापासून त्यांच्या प्रकृतीवर कांहीच दुष्परिणाम झालेला नाही असें दिसतें. परंतु हें म्हणणें असंभवनीय व अशक्य वाटतें. यावरील आपलें उत्तर, 'कामवासनेस प्रथम लागलेलें वळण पुष्कळ वेळां पुढे कायम होतें,' हेंही अशास्त्रीय, विपर्यस्त व गैरसमज उत्पन्न करणारें आहे.

अपक्व शरीरावस्थेंत केवळ १३ वर्षें वयाचा मुलगा ३० वर्षें वयाच्या स्त्रीशीं रात्रींतून ३।३, ४।४ वेळां समागम करून तिचें समाधान करूं शकेल काय? शरीरांत रेत पूर्णपणें तयार होणेंचे अगोदर असा संबंध शरीरावर कोणताही अनिष्ट परिणाम केल्यावांचून राहील काय? व आपल्या उत्तरांतील 'प्रथम लागलेलें वळण' म्हणजे असल्या अल्पवयीं लागलेलें वळण कांही अनिष्ट परिणाम घडवून आणल्याशिवाय कायम होतें असें म्हणणें धाष्ट्यर्याचें नव्हे का? अशा उत्तराने अल्पवयी तरुणांस अनिष्ट प्रकारास उत्तेजन दिल्यासारखें नाही का होणार?

माझ्या मित्रांच्या दोन उदाहरणांवरून मी असें सांगूं शकतों की अशा अल्पवयी संभोगापासून दोघांनाही मलावरोधाचा विकार जडला आहे. एका मित्राचें वय हल्लीं २८ असून दुसऱ्याचें १९ आहे. दुसऱ्या मित्राचा संबंध सुमारें ४।५ वर्षांपासून त्याच्याच वयाच्या एका मोलकरणीशीं जडला आहे व तो अजूनही सुरू आहे. याचा परिणाम त्याला वरील विकार तर जडला आहेच, शिवाय त्याच्या हातापायांच्या साधारण काड्या झाल्या असून त्यांच्या नाड्या निघालेल्या आहेत व शरीरयष्टि क्षीण दिसत आहे. आपण कदाचित म्हणाल की हा परिणाम अशा संभोगापासून नसून त्याच्या अतिरेकापासून आहे परंतु असा संबंध चोरून करावा लागत असल्यामुळे तो आठवड्यांतून ३।४ वेळां घडणें मुष्किल असतें व असा संबंध वरील पुणेंकर मित्रांच्या संबंधाहून परिमित आहे हें उघड आहे व असें असून सदर मित्र बद्धकोष्ठ व क्षीणता याने जर्जर झाला असून शिवाय धातूच्या पातळपणामुळे आपल्या मैत्रिणीची इच्छा तृप्त करण्यास असमर्थ झाला आहे.

दुसऱ्या मित्राचाहि असाच अनुभव आहे. त्याचा १४।१५ वर्षें वयाच्या वेळीं २० वर्षें वयाच्या स्त्रीशीं संबंध एक वर्षभर होता व त्यामुळें त्यास बद्धकोष्ठ होऊन तो त्याचे लग्नानंतर १५।२० मिनिटांवरून आज एक तासावर येऊन ठेपला आहे. शीर्षासन, मयूरासन व स्वादिष्ट विरेचनाच्या सेवनाने त्याचा मला-

वरोध थोडा आटोक्यांत आला आहे ही गोष्ट खरी, तरीपण त्यास त्याचें पूर्वीचें सुदृढ आरोग्य पारखें झालें आहे तें कायमचें. मात्र वरील उपायांनी व थंड पाण्याच्या आंघोळीने त्यानें आपली संभोगशक्ति फारशी कमी होऊं दिली नाही.

उ. १ पुणेंकर गृहस्थाने लिहिलेली गोष्ट अशक्य आहे असें आम्हांस वाटत नाही. असें प्रत्येकाने करणें इष्ट आहे की काय हा प्रश्न वेगळा, व तसा ध्वनि आमचे उत्तरावरून बिलकुल निघत नाही. आपण शास्त्रीयतेचा फुकट आव आणीत आहांत परंतु आपल्या म्हणण्यांत शास्त्रीय असें कांहीच नाही. आपल्या दोन मित्रांचे अनुभवावरून सामान्य नियम निघत नाही, व त्यांसहि समागमामुळेच मलावरोध झाला असें म्हणण्यास जागा दिसत नाही. मलावरोध पुष्कळांस होतो व त्याचीं अनेक कारणें असूं शकतील. नुकसान किंवा फायदा होण्यासंबंधी आम्ही कांहीच म्हटलेलें नाही, व 'प्रथम लागलेलें वळण कायम होतें' हें आमचें म्हणणें कामशास्त्रांत सर्वमान्य आहे व याचा अर्थ काय तेंही आम्हीं सांगितलें आहे. तंबाकूची संवय कायम होते असें कोणीं म्हटल्यास त्या संवयीपासून नुकसान होत नाही असा त्याचा अर्थ होतो काय? असा अर्थ करणाराच अशास्त्रीय असला पाहिजे. कामशास्त्राचे बाबतींत स्वतःवरून किंवा दोन तीन मित्रांवरूनही सामान्य नियम बांधतां येत नाही. तीस वर्षें वयाच्या स्त्रीशीं संबंध होण्यांत कांहीच वावगें नाही, व प्रथस समागम अनुभवी स्त्रीशींच व्हावा असें हॅवलॉक एलिस प्रमाणेच आमचेंही मत आहे. आता कोणत्या वयांत किती समागम सोसेल व त्याने कोणाचें नुकसान होईल किंवा होणार नाही हें ज्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीवर अवलंबेल एखाद्या मनुष्याने स्वतःची हकीकत लिहिल्यास ती विनाकारण खोटी कशी म्हणावी? **सं.**

९

वि. वि. आमच्या हाताखालीं ६० शिपाई आहेत व त्यांची गणना क्षत्रिय ज्ञातींत होते. त्या ज्ञातींत कन्याविक्रय होतो व मुलींचीं १२ वर्षांच्या आंत लग्नें होतात व तो समाज गरीब असल्यामुळे पैसे गांठीस जमवल्यानंतर लग्नाची

गोष्ट बोलावी लागते, म्हणजे पुरुष ३० वयाचा असल्यास स्त्री १२ वर्षांची अंसते व ती वयांत येईपर्यंत कांही काळ जावा लागतो. गेल्या वर्षांचा आढावा काढला असतां असें दिसतें की प्रत्येकाने एक महिन्याची रजा घेतली आहे. त्याशिवाय प्रत्येकाने वर्षांतून तीन खेपेस ७ दिवसांच्या रंजेवर जाऊन गृहसौख्य भोगून आले आहेत, म्हणजे शिमग्यास, गणेशचतुर्थीस व नंतर दिवाळीच्या सुमारास. अर्थात कोणासही सहा महिन्यांच्या वर ब्रह्मचर्य पाळतां आलें नाही असें दिसतें. वरील माहिती त्यांच्या खासगी संभाषणावरून काढली आहे.

संभोगसुख किती वेळां घ्यावें याबद्दल वरील इसमांपैकीं अति दाट परिचयाच्या व्यक्तींस विचारतां त्यांनी स्वतःचा अनुभव सांगितला. त्यांच्या ऐन ज्वानीच्या वेळीं स्त्रीसमागमाशिवाय एकही दिवस गेलेला आठवत नाही. स्वस्त्री जवळ नसल्यास वेश्यांकडे जाण्यास त्यांस बराच मार्ग आक्रमावा लागे, पण अशाही परिस्थितींत सुमारे तीन वर्षें त्यांनी हा क्रम ठेवला. प्रथम समागमास सुरवात झाल्यापासून एक वर्षपर्यंत सरासरी रात्रींतून ६ ते ८ खेपा समागम होई. व पुढें पांच वर्षें रात्रींतून ३ खेपा व नंतर दोन खेपा याप्रमाणें क्रम असे. प्रथम वर्षीं स्वस्त्रियांशीं ५।६ खेपा व वेश्यांशीं ६।८ वेळां समागम करणें त्यांना अवघड वाटत नसे. वरील गोष्ट अतिशयोक्ति दिसण्याचा संभव आहे पण कारणेंही तशींच असतात. त्यांची नौकरी प्रथम सरहद्दीवरील जंगलमय प्रदेशांत होते व सुमारें ७।८ वर्षें घालवल्यानंतर त्यांच्या गांवाजवळ होते. स्त्रीपुरुषांच्या वयाच्या विषम प्रमाणामुळे स्त्रिया पुष्कळदा स्वपुरुषांशीं बेईमान होतात असें आढळून आलें आहे.

वेश्या ह्या चंचल मनाच्या असतात असा सर्वत्र समज आहे. पण आमच्या अवलोकनांत जीं उदाहरणें आलीं त्यांवरून असें दिसतें की योग्य व लायक पुरुषांशीं संबंध आल्यास त्या एकट्यासच वश होऊन राहतील. एवढेंच नव्हे तर त्याच्या सौख्याकरता आपले सर्व वैभवावर पाणी सोडतील. अशीं जोडपीं सुखानें राहिलेलीं समाजास पाहवत नाही व त्यांच्या मार्गांत कांटे घालण्याची ते संधि पहातच असतात व त्यामुळे खरी स्थिति समजण्यास कठीण पडतें.

स्त्रियांस स्वातंत्र्य असावें कीं नाहीं: हा प्रश्न अवघड आहे. पण तसें स्वातंत्र्य दिल्यास त्या काय करतील हें खालील उदाहरणावरून दिसून येतें.

एका ब्राह्मण स्त्रीचा श्वेतवर्णीय पुरुषाशीं कसा संबंध आला ? सदर्हू स्त्रीचा पति उच्चवर्णीय ब्राह्मण असून सुशिक्षित आहे व स्त्रीहि साधारण शिक्षित, पण तिच्या मताने पती नालायक ठरला. तिच्या ज्वानीच्या शरीराच्या मानाने तो टाकाऊ होता व रात्रीं तो मध्यरात्रींपर्यंत आफीसांत काम करीत असे. गांवांतील एक वृद्ध बाई तिच्या सोबतीस येई व त्या वृद्ध बाईची व जवळच्या साहेबाची दाट ओळख होती. कधी कधी ती बाई या तरुणीस घेऊन फिरण्यास साहेबाच्या बंगल्यावरील बागेंत जाई. असा क्रम बरेच दिवस चालल्यानंतर त्या तरुणीची व साहेबाची ओळख झाली व दर रात्रीं त्या वृद्ध बाईंच्या घरीं त्या दोघांचा समागम होऊं लागला. पण तिच्या पतीस ही बातमी नव्हती. ती वारंवार तेथें जाई व पति येण्याच्या आंत रात्रीं अंथरुणावर झोंपून राही. कारण त्याने घरीं येण्याची वेळ म्हणजे मध्यरात्रीं.

पुढे त्यास ती बातमी समजली पण काय उपयोग ? तो रजेवर जाण्यास निघाला पण ती त्याचेबरोबर येईना, उलट आपण बंगल्यावर राहणार असा हट्ट धरून बसली. ही बातमी सर्वांस समजली, व आता धडगत नाही असें समजून साहेबानें बदली करून घेतली. वरील गोष्टीवरून एवढेंच अनुमान निघतें कीं तिच्या इच्छेची पूर्तता करण्यास पति नालायक ठरला व तिची शांति ज्याने केली तोच प्रिय ठरला. नाहीतर असें धाडस आर्यस्त्री करतीना. आपला ....

उ. आपण दिलेली माहिती बरीच उपयोगी आहे यांत संशय नाही, तथापि स्वतःचे समागमविषयक पराक्रम फुगवून सांगण्याची संवय बऱ्याच लोकांस असते हें विसरून चालणार नाही. जंगलांत प्रकृति अधिक चांगली राहील हें खरें, परंतु तेथे उद्दीपनाचे प्रसंग शहरापेक्षा कमी असतात. तेव्हा आपण वर दिलेली समागमाची हकीकत एखाद्या मनुष्यासंबंधी खरी असली तरी या लोकांतही असा सामान्य नियम असणें अशक्य वाटतें. विषम विवाहाचे परिणाम आपण म्हणतां तसे व्हायचे हें ठरलेलेंच.

शेवटीं दिलेल्या स्त्रीच्या हकीकतासंबंधी आपलें अनुमान मात्र साफ चुकीचें आहे. तिची वागणूक स्वातंत्र्याचा परिणाम नव्हे, तर स्वातंत्र्य न मिळाल्याचा परिणाम आहे. तिचा विवाह तिच्या संमतीने झाला नाही हें उघड आहे, यामुळें भलत्याच मनुष्याशीं ती जन्मभर बांधली गेली. स्वातंत्र्य नाही हें माहीत असल्यामुळे नवऱ्याला फसवण्याचा प्रसंग तिच्यावर आला. स्वातंत्र्य असतें तर तिने आपल्या मनाप्रमाणे नवरा निवडला असता, किंवा एका मनुष्याने भागणार नाही असें वाटल्यास लग्न न करतां अनेकांशीं संबंध ठेवला असता. अशीही कल्पना करूं की प्रथम चुकीच्या कल्पनेने तिने लग्न केलें व नंतर नवरा आवडत नाही किंवा एका मनुष्याने भागत नाही असें समजलें असतें, तरीही स्वातंत्र्य असल्यास घटस्फोट करतां येईल, किंवा नवऱ्याची परवानगी असल्यास तसेंही करण्याचें कारण पडणार नाही.

आता ती श्वेतवर्णाकडे आकर्षण पावली यांत कांहीच नवल नाही. गोरा नवरा कोणत्या मुलीला आवडत नाही? गोरा रंग सर्वांस आवडतो याला एक शास्त्रीय कारण आहे, तें हें की बहुतेक वनस्पतींच्या व प्राण्यांच्या शरीररचनेमुळे त्यांची उजेडाकडे वळण्याची प्रवृत्ति असते. गोऱ्या कातडीवरून उजेड अधिक प्रमाणांत परावर्तन पावल्यामुळेच त्याकडे जास्त आकर्षण होतें, तेव्हा ही अत्यंत स्वाभाविक गोष्ट तिच्याच बाबतींत भयंकर मानण्याचें कारण दिसत नाही. आर्यस्त्रीने श्वेतवर्ण पुरुषाशीं समागम करण्यांत कांही विशेष भयंकर पाप आहे असें आम्हांस बिलकूल वाटत नाही. आर्यस्त्रीला यांत कमीपणा आला असें आर्य समजतात व अमेरिकेंतील नीग्रोने पांढऱ्या स्त्रीशीं समागम करणें म्हणजे पांढऱ्या स्त्रीला कमीपणा आहे असें समजून तिची संमति असली तरीही त्या नीग्रोला शिक्षा होते. एकंदरींत दोघेही घमेंडखोरच. वरील स्त्रीला स्वातंत्र्य असतें तर ती उघडपणें साहेबाकडे गेली असती व कोणाचेंही कांही बिघडलें नसतें.—सं.

१०

वि. वि. १. स्त्रियांच्या स्तनांचा कठीणपणा दीर्घकाळपर्यंत टिकणें हें कोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे? स्तन लौकर सैल अगर नरम होण्याचीं

कारणें काय ? ते पुन्हां घट्ट होण्यासाठीं कोणकोणते उपाय आहेत ? त्याचप्रमाणे स्तन नेहमी अगर कांही काळ मोकळे आधारावांचून लोंबत राहिल्यास त्यापासून कांही धोका आहे काय ? अंतःपुरांत समागम होईपर्यंत स्त्रीपुरुषांनीं नग्न राहण्याचा विचार केल्यास तें पुरुषास जड जाणार नाही काय ? तो अधिक आतुर होऊन त्याचे हातून पूर्व तयारी होणार नाही. नग्नतेच्या संवयीने त्याची स्थिति वरीलप्रमाणें होणार नाही असें आपलें शास्त्र सांगतें काय ?

उ. १. स्तनांचा कठिणपणा टिकण्यास मुख्य उपाय म्हणजे गर्भावस्थेंत जेव्हा स्तनांचें वजन फाजील वाढतें, तेव्हां त्यांस योग्य आधार देणें. अर्थात वय, प्रकृति, वारंवार गर्भावस्था वगैरे सर्वांचा परिणाम स्तनांवर होतो. त्याचप्रमाणे वेश्यांचे स्तन कांही वर्षांनीं नरम होतात, हा कदाचित फाजील मर्दनाचा परिणाम असेल. स्तनांचें वजन कधीकधी इतकें वाढतें की ते कापून कमी करण्याचा प्रसंग येतो. एका स्त्रीचे स्तन अशा रीतीने वाढून ते मांडीपर्यंत पोचूं लागले व ते कापून काढल्यावर त्यांचें वजन ५० पौड भरलें. बहुतेक स्त्रियांचे दोन्ही स्तन आकाराने सारखे नसतात. शेकडा ५० स्त्रियांचा डावा, व शेंकडा २८ चा उजवा मोठा असतो. मूल पाजते वेळीं हें लक्षांत ठेवून लहान स्तन अगोदर दिला पाहिजे, नाहीतर ही विषमता वाढत जाते. वयामुळे मासिक स्राव बंद झाल्यावर स्तनांचा आकार कमी होतो, परंतु मेद वाढल्यामुळे पुष्कळ वेळां फरक समजत नाही. बीजकोशांचा व स्तनांचा अत्यंत निकट संबंध आहे, व स्तनांत कांही कमतरता असल्यास बीजकोशांचा अर्क दिल्याने उपयोग होण्याचा संभव आहे, परंतु बाह्य उपायांचा उपयोग होत नाही. बीजकोशांचें कार्य बरोबर होत असल्यास स्तन फार मोठे होत नाहीत, परंतु घट्ट होतात. सामान्यतः स्तन फार मोठे असल्यास ते लोंबत ठेवणें बरें नव्हे, परंतु त्यास बिलकूल हवा मिळणार नाही असेंही करूं नये. कंचुकी वगैरे जाळीदार कापडाची केल्यास योग्य आधार मिळून हवाही मिळेल. फाजील उद्दीपन होणें हा दोष आहे व तो वस्त्राचे पद्धतीने उत्पन्न होतो. नग्नतेची संवय झाल्यास आपण म्हणतां तसा परिणाम होणार नाही. सं.

११

वि. वि. १. माझें लग्न होऊन दोन वर्षें झालीं परंतु माझी कामशांति अजून झाली नाही, मला २४ तास स्त्रीसहवास पाहिजे असें वाटतें. याचें कारण काय? माझें वय २२ वर्षांचें आहे. मी सशक्त आहे व दररोज तालीम करतों व सँडोचे कोर्स घेतले आहेत. हें कारण असेल काय? असेल तर माझा एक मित्र आहे तो सुद्धां माझ्याबरोबर तालीम वैगरे सर्व कांही करतो पण त्याला इंद्रिय-चेतनाशक्ति नाहीं, त्यांनी फार डॉक्टर वगैरे लोकांची औषधें घेतलीं, परंतु उपयोग झाला नाही, तर याचें कारण काय तें कळवणें व त्याला आपल्याजवळ कांहीं उपाय असतील तर कळवणें. २. आपली जेलोटयूब व पिशवी वापरून वेश्यांजवळ गेल्यास कांहीं भीती आहे काय हें कळवणें.

आपला...

उ. आपण म्हणतां हा तालमेचा परिणाम असणें शक्य नाही. तालमेंत किंवा इतर कोणत्याहि प्रकारच्या व्यायामांत विशिष्ट मर्यादेपलीकडे वेळ घालवल्यास बरीच शक्ति स्नायु वाढवण्याकडे खर्च होते व त्यामुळे पुष्कळ बेळां कामवासना कमीच होते, व या बाबतींत शक्तीही कमी होते. तालीमबाज लोकांच्या शरीरावर स्त्रिया पुष्कळ वेळां भुलतात, परंतु अनुभवांतीं पस्तावतात. अशा लोकांचे हातून फारसें डोक्याचें कामही होणें शक्य नसतें. मेंदूचें काम करणारालाहि विशिष्ट मर्यादेपर्यंत व्यायामापासून फायदाच होतो. परंतु त्यापलीकडे जातां कामा नये. आपल्या बाबतींत काय कारण आहे हें येथून सांगणें कठिण आहे. कांहीं शारीरिक कारण आहे की काय हें डॉक्टराकडून तपासून घेऊन ठरवावें व उपचार घ्यावा. तसें नसल्यास मनाला विसर पडण्याकरता एखादें उपयुक्त सार्वजनिक काम, एखादी कला, किंवा निदान एखादा बुद्धिबलांसारखा खेळ सुरू करावा. आपल्या मित्राकरता सल्ला येथे देण्याचें कारण दिसत नाही. २. जेलोटयुब वापरल्यास शिवाय पिशवी वापरण्याचें कारण नसतें. या औषधाने रोगप्रतिबंध होतो व पिशवी नेहमी वापरल्याने शेवटीं नुकसान होतें. **सं.**

१२

वि. वि. आपल्या संततिनियमन पुस्तकांत ब्रह्मचर्याविषयीं प्रतिकूल मतांच्या डॉक्टरांचें म्हणणें दिलेलें आहे. त्याचबरोबर अनुकूल मताच्या तज्ञांचें म्हणणें द्यावयाचें ठरविलें असतें तर बरें झालें असतें. तसें न दिल्यामुळे पुष्कळ सामान्य वाचकांची समजूत होण्याचा संभव आहे की ब्रह्मचर्यापासून तोटेच आहेत. आपलें पुस्तक अविवाहित विद्यार्थी व अन्यलोक यांचे नजरेस पडल्यास पुष्कळांचें वांकडें पाऊल पडण्याचा संभव वाटतो. कदाचित् कोणी म्हणेल की, ज्याला आम्ही वांकडें पाऊल म्हणतों तें वस्तुतः सरळ, व क्रमप्राप्तच व सौख्यदच आहे. परंतु माझी निश्चिति आहे की, ब्रह्मचर्यपालनापासून दुष्परिणाम झालेलीं जितकीं उदाहरणें दाखवतां येतील त्यापेक्षा कितीतरी जास्त **वांकडें पाऊल पडल्यामुळे** बिघडलेल्यांचीं व त्यामुळे जाहिरातींतील औषधें घेणारांचीं व त्यामुळेहि न भागल्यामुळे वैद्य डॉक्टरांकडे धांवणारांचीं उदाहरणें सांपडतील.

ब्रह्मचर्यव्रत पाळणें कठीण आहे, ही गोष्ट तें पाळण्यास सांगणारे सर्वच लोक कबूल करतात, पण म्हणून विवाह होईपर्यंत (कुटुंबाला पूर्वी ऋतु प्राप्त झालेला नसल्यास तो होईपर्यंत) ब्रह्मचर्याचें पालन करून पुढें गृहस्थाश्रम स्वीकारावयाला सांगितला जातो आणि **या वेळेपर्यंत पाळलेलें ब्रह्मचर्यव्रत कोणत्याहि प्रकारें हानिकारक होणें शक्यच** नाही. तसेंच पुढे जे आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर योग्य आहार ठेवून हें व्रत पालन करितात त्यांचे बाबतींतहि शरीरप्रकृति बिघडत असेल असें मला वाटत नाही. या बाबतींत आपण स्वानुभव घेतलेला असल्यास तो अवश्य प्रसिद्ध करावा. खुषीने असो, वा सक्तीने असो, ब्रह्मचर्यव्रताचें पालन झाल्यामुळे नपुंसकत्व येणें प्रजोत्पत्ति न होणें,.....इ. जे दोष जडतात असें आपण म्हणतां ते तर प्रायः जडत नसावे असें मी थोड्याशा स्वानुभवाने व तुरुंगांतून अनेक वर्षे शिक्षा भोगून आलेले लोकांचे उदाहरणांवरून म्हणूं शकतों.

पौराणिक काळांतील मारुति, भीष्माचार्य.....वगैरे त्याचप्रमाणें विद्यमान मसूरकर महाराज, डॉ. मुंजे.....वगैरे आदर्श ब्रह्मचारी समोर असतांना

ब्रह्मचर्याविषयीं दिशाभूल करण्याचा प्रयत्न आपल्या हातून व्हावा याबद्दल दुःख होतें. कळावें ही वि. आपला.....

उ. आपल्या पत्रावरून हें स्पष्ट दिसतें की तर्कशुद्ध विचार करण्याची आपणांस संवय नाही, पूर्वापरसंगतीची परवा नाही व पूर्वग्रह बाजूला ठेवण्याची तयारी नाही, अशा स्थितींत आपणास दिलेल्या उत्तराने आपला कांही फायदा होणें अशक्य आहे, परंतु इतरांस कांही बोध होईल म्हणून देतों. या बाबतींत तर्कशुद्ध विचार म्हणजे असा की ब्रह्मचर्यापासून नुकसान झालेलें मीं कधीही पाहिलें नाही असें म्हणणारे कितीहि डॉक्टर भेटले तरी त्यावरून इतकेंच सिद्ध होईल की त्यांचे नजरेस ती गोष्ट आलेली नाही, परंतु मी पाहिलें असें म्हणणारा एक डॉक्टर भेटला तरी तो पुरावा होतो. समजा की ज्वालामुखी पर्वत कधीही न पाहिलेले एक लक्ष लोक असले, तरी तसे पर्वत नाहीत असें त्यावरून सिद्ध होत नाही, पण पाहिलेला एक मनुष्य निघाला तरी त्याचें अस्तित्व सिद्ध होतें, तद्वतच हें आहे. शिवाय आम्हीं ज्या डाक्टरांची मतें दिलीं आहेत ते त्या विषयांतील अग्रगण्य तज्ज्ञ आहेत हें आधुनिक जग कबूल करीत आहे. मतें कोणाचीं घ्यावीं याची मुख्य कसोटी ही की तो डॉक्टर धार्मिक असतां कामा नये, कारण धार्मिक लोकांना आपल्या धार्मिक समजुती खोट्या ठरतील या भीतीमुळे विचार करण्याची परवानगी नसते, व शिवाय लोकमताविरुद्ध मत देण्याचें धैर्य त्याचे अंगांत असलें पाहिजे. जो या विषयांत तज्ज्ञ आहे, जो धार्मिक नाही, व ज्याने लोकमताविरुद्ध जाण्याचें धैर्य कोणत्याही एखाद्या बाबतींत दाखवलें आहे, असा एखादा आधुनिक डॉक्टर ब्रह्मचर्यापासून नुकसान होत नाही असें म्हणणारा असल्यास त्याचें म्हणणें आम्ही जरूर प्रसिद्ध करूं. परंतु असा डॉक्टर नाहीं. तो आधुनिक असणें जरूर आहे, कारण वीर्यासंबंधीच्या जुन्या कल्पना आता पार ढासळल्या आहेत व तें शरीरांत राहिल्याने फायदा न होतां नुकसान होतें असें आधुनिक मत आहे.

आपणास पूर्वापरसंगतीची परवा नाही असें म्हटलें याचें कारण, आपण ज्या ब्रह्मचर्यव्रताला एके ठिकाणीं कठीण ह्मणतां त्यालाच कांही ओळीनंतर सुलभ ह्मणतां.

याला उत्तर काय द्यावें ? ब्रह्मचर्यापासून तोटेच आहेत असें आम्हीं ह्मटलेलें नाही, परंतु विशिष्ट मर्यादेपुढें निःसंशय तोटे आहेत. जाहिरातींतील औषधांसंबंधी पाहूं गेल्यास, गर्मी होणें श्रेयस्कर नाही हें आम्हासहि कबूल आहे, परंतु एकतर हल्ली रोगांचा प्रतिबंध करतां येतो, व शिवाय गर्मी झाल्याबरोबर उपाय केल्यास ती हटकून बरी करतां येते, व नपुंसकत्व बरें करणें फार कठिण असतें, व कधी अशक्य असत. तेव्हा वैवाहिक सुखाचे दृष्टीने गर्मीच बरी असें डॉ. रॉबिनसन यांचें मत आहे. कोणत्याही अतिरेकाने नुकसानच होतें हीं गोष्ट समागमाचे बाबतींतही खरी आहे, परंतु अतिरेक न झाल्यास त्यापासून कोणताही तोटा नाही व उलट फायदा आहे त्याअर्थी ब्रह्मचर्य पाळणें हें कांही वयापर्यंत फारसें हानिकारक नसलें तरी निदान मूर्खपणा तरी आहे, कारण ब्रह्मचर्य पाळण्यांत बरीच शक्ति निरर्थक खर्च होऊन मनाला विनाकारण ताण पडतो. विवाह होईपर्यंत ब्रह्मचर्याने नुकसान होत नाही हें म्हणणें हास्यास्पद आहे, कारण बिवाह ही ऋतुप्राप्तीसारखी नैसर्गिक गोष्ट नाही व ती अमुक वेळीं व्हायची हें ठरलेलें नसतें. हल्ली कित्येक लोकांना विवाह कधीच शक्य होत नाही. विवाहानंतरही त्याने नुकसान होत नाही असेंही आपलें म्हणणें आहे. एकतर पतिपत्नींचें या बाबतींत एक मत न होणें स्वाभाविक आहे व तसें झालें तरीही विवाहित लोकांस तें इतरांपेक्षा जास्त कठिण आहे व पाळण्याचा प्रयत्न करणें हा निदान मूर्खपणा तरी आहेच. ब्रह्मचर्यापासून नुकसान होतें असा आमचा स्वतःचा अनुभव आहे. आपण आपला अनुभव उलट सांगतां, परंतु याकरताच व्यक्तींचें मत घेण्याऐवजी तज्ज्ञ डॉक्टरांचें मत घ्यायचें असतें तुरुंगांत जाऊन आलेल्या लोकांचा अनुभव लिहितां. परंतु तुरुंगांतील लोक ब्रह्मचर्य पाळतात तें कसें ? ते स्वसंभोग करीत नव्हते अशी आपण हमी घेतां काय ? तुरुंगांत याहीपेक्षा वाईट प्रकार चालू असतात, परंतु नीतीची घमेंड मारणारे लोक देखील स्वसंभोग करीत नाहीत असें नाही.

आपलीं पौराणिक उदाहरणें कुचकामाचीं आहेत. जॉर्ज वॉशिंगटन, नेपोलिअन, शिवाजी वगैरे ऐतिहासिक लोकासंबंधी देखील पाहिजे तितक्या खोट्या

गोष्टी लिहिलेल्या सांपडतात. मग पौराणिक लोकांची गोष्ट कशाला? ब्रह्मचर्य पाळणाऱ्या लोकांचे तीन वर्ग करतां येतील. एक पूर्ण नपुंसक किंवा कामवासना अत्यंत कमी असलेले लोक; यांचें ब्रह्मचर्य प्रयत्नाशवाय पाळलें जातें. दुसरे सामान्य कामवासना असणारे लोक; यांना ब्रह्मचर्य पाळावें लागल्यास ते स्वसं. भोग करतात किंवा न केल्यास स्वप्नावस्थेंत वीर्य निघून जातें. तिसरे प्रबल कामवासनेचे लोक. यांची मनोनिग्रहशक्ति अत्यंत प्रबल असल्यासच त्यांस ब्रह्मचर्य पाळतां येतें, पण त्या खटपटींतच त्यांचें सर्व आयुष्य जाऊन कोणतेंही काम त्यांचे हातून होत नाही. मारुति व भीष्माचार्य स्वसंभोग करीत होते की नाही याबद्दल साक्षी पुरावा बिलकूल नसल्यामुळे आम्हास कांहीच लिहितां येत नाही. भीष्माचार्यांनी लग्न न करण्याचें वचन दिलें होतें, तोहि मूर्खपणाच होता. परंतु ब्रह्मचर्य पाळण्याचा आणखी मूर्खपणा करण्याचें कांही कारण नव्हतें मारुति तर बोलून चालून वानर होता. ब्रह्मचर्य हा मनुष्याचा मूर्खपणा आहे, इतर प्राण्यांना तो नसतो, तेव्हां मारुति ब्रह्मचारी होता हें म्हणणें अत्यंत हास्यास्पद आहे. ज्या जिवंत लोकांचीं नांवें आपण दिलीं आहेत ते ब्रह्मचारी असले तर ते वरीलपैकी कोणत्या वर्गांत येतात हें त्यांसच विचारलें तर समजेल. तसें विचारण्याची आमची इच्छा नाही. ब्रह्मचर्याची घमेंड मारणारे लोक नेहमी ब्रह्मचारी असतातच असें नाही, व कांही लोक टॉलस्टॉयसारखे म्हातारपणीं ब्रह्मचारी होऊन लोकांस उपदेश करूं लागतात, त्यांचा पूर्वेतिहास पाहणें जरूर असतें.

शेवटचे वाक्यांत आपण आम्हांस एक शिवी दिली आहे, हें कदाचित् आपल्या लक्षांत आलें नसेल. मजप्रमाणे जो मनुष्य सुखाची नोकरी सोडून झीज सोसून स्वमतप्रसाराचे उद्योगास लागतो त्याचीं मतें निदान प्रामाणिक आहेत असे समजण्यास समंजस लोकांची हरकत नसावी. तीं प्रामाणिक नसून लोकांची दिशाभूल करण्याचा आम्ही बुद्धिपुरःसर प्रयत्न करतों असा आपल्या शेवटच्या वाक्याचा अर्थ होतो, मग आपल्या मनांत काय असेल तें असो. अर्थात शिवीला उत्तर देणें आम्हास शक्य नाही. सं.

१३

-संपादक महाराज

एका गरीब निरापराधी बाईवर पूर्ण बलात्कार १ दिवसापूर्वी झालेला आहे. त्यापासून गर्भसंभव झाल्यास तिजवर महाभयंकर आपत्ति ओढवणार आहे. तेव्हां गर्भधारणा न होण्यास जर कांही औषध किंवा उपाय असेल तर येत्या मासिकांत त्याचा जरूर जरूर खुलासा करावा. तिजवर फार उपकार होतील. असा कांही उपाय न सांपडल्यास तिला बहुतेक देहत्यागाची पाळी येईल, कारण ती गरीब बाई अत्यंत सासुरवासीण आहे. आजपर्यंत आपण अत्यंत स्तुत्य हेतु धरून मासिक चालवलें आहे. आणि आपल्या उपायांचा सदुपयोग करणारांस त्याचा फारच फायदा झालेला आहे. असो. तरी कृपा करून पुनः पुन्हा विनंती की तसा कांही उपाय असल्यास जरूर कळवण्याची तसदी घ्यावी. औषध असेल तर तें घेण्याचें प्रमाण व तें पुण्यांत कोठें मिळेल याबद्दलची माहिती कळवावी. गरीब भगिनिवर फार उपकार होतील. तसदीची माफी असावी.

१४

वि. वि.....मी एक तरुण विधवा आहे. चुकून फसली गेल्यामुळें वांकडें पाऊल पडून जें नको तें पाप उभें राहिलें आहे. इतके दिवस कसें तरी छपवून ठेवतां आलें, पण आतां पांच महिने पुरे होत आल्यामुळें यापुढें अब्रु सांभाळणें कठीण झालें आहे. आपण अशा प्रकारचीं संकटें दूर करतां असा आपला लौकिक ऐकून देव पावला असें वाटलें. मी अतिशय गरीब आहे, कोणाचा आसरा नसल्यामुळें एका नातेवाईकाकडे राहतें. माझी या जगांत जी काय सबंध इष्टेट आहे ती गळ्यांतील एक दोन तोळ्यांची एकदाणी. तथापि आपण हें काम अगदीं फुकट करावें अशी माझी इच्छा नाहीं. एकदाणी विकून आपली फी देईन...आपण मला या संकटांतून सोडवाल का, व या उपकाराबद्दल मज गरीब अनाथ विधवेकडून कमितकमी काय घ्याल तें खालील पत्त्यावर उलट टपालीं कळवावें. उत्तराची भाषा अगदीं मोघम असावी...

उ. वरील दोन्ही पत्रांस एकच उत्तर द्यावें लागतें की कायद्यापुढे आमचा इलाज नाही. मात्र औषधांनी गर्भपात करण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें आहे. हा प्रश्न पैशाचा नाही, कायद्याचा आहे. **सं.**

१५

वि. वि. आपलें **गुप्त रोगांपासून बचाव** हें पुस्तक वाचून पाहतां फक्त जननेंद्रियद्वारा प्रवेश करणाऱ्या जंतुचाच नाश करण्याची व्यवस्था आहे. गर्मीचे जंतु शरिरावरील कातडींतून कोठूनहि शिरूं शकतात काय? शकत असतील तर यास आपण उपाय सांगितलेला नाही. २. गुप्त रोगांपासून पछाडलेले स्त्रीपुरुष समाजांत ओळखूं येण्यासारखीं कांहीं स्पष्ट चिन्हें आहेत काय? असल्यास कोणचीं? ३. माझ्या ओळखींतील कांही लोक नित्य वेश्यांकडे जातात, ते प्रतिबंधक उपाय वापरीत नाहीत व त्यांस कांही रोगहि होत नाही हें कसें? ४. वेश्यासमागमप्रसंगीं हे उपाय न वापरल्यास रोग झालाच पाहिजे, किंवा होण्याचा संभव आहे?

उ. १. शरीरावरील कोणत्याहि कातडींतून गर्मीचे जंतू शिरत नाहीत, श्लेष्मल त्वचेंतून मात्र शिरूं शकतात, किंवा कातडीस एखादा ओरखडा असेल तेथूनहि शिरतील. या संबंधी ७६–७७ पानांवर उल्लेख आहे. २. गुप्त रोग डॉक्टरांसहि तुसते पाहून ओळखतां येतीलच असें नाही. कधी कधी दृश्य चिन्ह नसतांहि रोग असतो. तथापि पान ८३–८७ पहा. ३. वेश्यांकडे जाणाऱ्या प्रत्येकास रोग झालाच पाहिजे असा नियम नाही. केवळ साबणाचा उपयोग करणारे लोक देखील बऱ्याच वेळां वांचतात, कारण रोगजंतु कांही वेळपर्यंत त्वचेच्या आंत किंवा मूत्रमार्गांत जाणें शक्य नसतें. तथापि या बाबतींत निष्काळजी राहणें म्हणजे विषाची परीक्षा पाहणें आहे. एकाच वेश्येपासून कांही लोकांस रोग लागला व कांहीस लागला नाही अंसेंहि होतें. ४. सर्वच वेश्यांस रोग असतो असें नाही. कांही वेश्या देखील हल्ली प्रतिबंधाचे उपाय वापरून स्वतःचें संरक्षण करूं शकतात, परंतु रोग होण्याचा संभव राहतो यांत शंका

नाही. हेंहि खरें की वरच्या दर्जाच्या वेश्यांपेक्षा चोरटे व्यवहार करणाऱ्या गर्ती स्त्रियांपासून नेहमी जास्त धोका असतो, कारण त्यांस पुष्कळ वेळां साबणहि वापरण्याची सोय नसते, मग इतर मार्ग राहिलेच. **सं.**

१६

वि. वि. सांपत्तिक दृष्टीने मी एक गरिबांतला गरीब नोकर मनुष्य आहे. तीन पोटांचा संसार चालण्याइतकेंहि माझें सांपत्तिक अवसान नाही. पण मला आज पांच मुलें आहेत. पांच मुलें होऊनही कामवासना बिलकुल कमी झाली नाही. संततिनियमनार्थ टोपी व वड्या यांचा उपयोग करावयाचा नाही असें कुटुंबानें ठरविळें आहे. मला तर तसें रहावत नाही, दम निघत नाही. अशा स्थितींत आम्ही दोघांनी ठरविलें की सरळ समागम न करतां लोक ज्याला अनैसर्गिक म्हणतात तसा करावा. माझें या योगें समाधान होईल. परंतु शरीर-शास्त्राची मला मुळींच माहिती नाही. आपण आमच्यासारख्यांचे कनवाळू व या शास्त्रांतले निष्णात. म्हणून विचारतों की वरीलप्रमाणें केल्याने गर्भधारणा तर होणार नाही ना? या गोष्टीस तिची पूर्ण संमति आहे. १. वरीलप्रमाणे करण्यानें गर्भधारणा होईल किंवा कसें? २. यापासून कांही तोटा आहे काय? व तो कोणता? उपकार करण्याचें व्रत आपण पतकरिलें आहे वरील प्रश्नांचीं उत्तरें देवून मला ऋणी करावें. आपला.....

उ. मुलें झाल्याने कामवासना कमी होत नसते. आपल्या पत्नीचा निश्चय मूर्खपणाचा आहे व आपण केलेला बेत त्याहीपेक्षा मूर्खपणाचा आहे. १. शरीर-रचनेंत दोष असल्याशिवाय त्याने गर्भधारणा होणार नाही, तथापि हें लक्षांत ठेवावें की रेताचा एक कणही योनिमार्गाचे मुखाशीं पोंचल्यास तेथूनहि तो आंत जावून गर्भधारणा होऊं शकते. २. यापासून स्त्रीला शारीरिक इजा होण्याचा संभव आहे. **सं.**

३०-१०-३१

१७

वि. वि. १. एखाद्या वयांत आलेल्या मुलीने संभोगसुख घेतलें आहे की नाही हें तिच्या बाह्य लक्षणांवरून सांगतां येईल की नाही? कोणी म्हण-

तात की त्यामुळें जघन वाढून शरीर बेडौल दिसतें. २. आपण मागील अंकांत प्रतिपादन केलें आहे की वीर्य शरीरांत राहिलें तर तें हानिकारच आहे तरी तें बाहेर पडलेंच पाहिजे...असें जर आहे तर रात्रींतून २—३ वेळा स्वप्नावस्था होणाऱ्या मुलास शेवटीं क्षयाची भावना कां व्हावी?...वीर्य पडल्यावर निदान एक मिनिट तरी मनुष्य गढून गेलेला असतो. तरीहि आपण म्हणतां की वीर्याचा शक्तीशी कांहीहि संबंध नाही! ३. स्वप्नावस्था होत असतां मनुष्य जागा होतो व जागा झाल्याबरोबर त्यास पश्चात्ताप कां होतो? पश्चात्ताप होणें नैसर्गिक आहे, की ज्याचे त्याचे मानण्यावर आहे? ४. एका कॉलेजिअनशी संवाद करीत असतां त्याने सांगितलें की प्रत्येक मनुष्याने लग्न झाल्यानंतर लगेच कामशास्त्रावर पुस्तकें वाचावयास सुरवात करावी. तोंपर्यंत 'मुष्टिमैथुनाचे दुष्परिणाम' या पुस्तकाव्यतिरिक्त दुसरीं कोणतींहि पुस्तकें त्याने वाचूं नयेत, कारण अशीं पुस्तकें वाचून मिळवलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची त्यास अनिवार इच्छा होते. याच्या समर्थनाकरितां त्याने आपल्या एका १८ वर्षांच्या मित्राचा अनुभव सांगितला. त्याने आपले **समाजस्वास्थ्यांत** असें वाचलें कीं वीर्य शरीरांतून गेलें तरी त्याचा शरिरावर कांहीएक परिणाम होत नाहीं.....सदरहू मुलानें हें वाचल्याबरोबर तीं वाईट संचय जडवून घेतली व नंतर त्यास त्यांतून सुटतां येईना. तेव्हां त्याचे मित्राने त्यास एकांतवास मिळूं न देण्याची शक्य तितकी व्यवस्था केली. सध्यां तो मुलगा पूर्ववत चांगले स्थितींत आहे. तरी यावरून कामशास्त्राचें ज्ञान मुलांस केव्हां द्यावें? माझें असें मत आहे की मुलास निदान त्याची जवाबदारी कळूं लागेपर्यंत हें ज्ञान देवूं नये. कारण एकदां त्यास सारासारविचारशक्ति प्राप्त झाल्यावर तो समागमास फारसें महत्त्व देणार नाही. हल्लीं साधारण १४ ते १८ वर्षांपर्यंतचे बहुतेक मुलगे व मुली समागमास बळी पडतात, कारण त्यांस ह्या वयांत दुरदर्शित्व नसतें व त्यामुळेंच फक्त तीं मोहाला बळी बडतात. मनुष्याने स्वतःवर शक्य तितके निर्बंध लावून घ्यावेत असें महात्मा गांधींसारख्यांचें मत आहे, तर रवींद्रनाथ टागोरासारखे म्हणतात की मनुष्याने स्वतःवर कोणतेहि निर्बंध न लादूं देतां

मोकळेपणाने आयुष्य कंठावें. परंतु या दोहोंपेक्षा मनुष्याने स्वतःस थोड्याशा हितावह नियमांनी जखडून घेतल्यास त्याचें आयुष्य सुखावह होईल... संभोगेच्छेचे बाबतींत सुद्धा मनुष्याने जर थोडेसें दमन केलें तर हितावहच आहे, तसें न केल्यास तो फारच बहकण्याचा संभव असतो. ७. कार्ल बटेनस्टेड, स्वामी शिवानंद वगैरे प्रतिपादतात की १ थेंब वीर्य हें ८० थेंब रक्तावरोबर आहे. असें जर असेल तर ८० थेंब रक्त गेलें असतां जेवढी क्षीणता येते, तेवढी एक थेंब वीर्य गेल्याने मुळींच येत नाही, तरी वीर्य रक्तापेक्षा किती प्रबल आहे ते कळवावें. ८ मुष्टिमैथुनाने नपुंसकत्व कां येतें? ९. नपुंसकत्वाचीं लक्षणें कोणतीं?

उ. १. समागमाने शरीर बेडौल होतें हें खोटें. अशा प्रकारची कोणतीही बाह्य खूण नसते. २. स्वप्नावस्था झाल्याने क्षय होतो हें खोटें. क्षय एका विशिष्ट जंतूमुळे होतो, परंतु शरीर क्षीण झाल्यास जंतूंस अवसर सांपडेल. रात्रींतून दोन वेळा स्वप्नावस्था होणें हा रोग आहे. एक मिनिटभर गळून जाणें म्हणजे नुकसान होणें नव्हे. व्यायामाने देखील मनुष्य तात्पुरता थकतो, म्हणून व्यायामाने नुकसान होतें काय? रेतस्खलनानंतर थकवा येतो तो वीर्य गेल्यामुळे नव्हे, तर मज्जातंतूंवर ताण पडल्यामुळे येतो. ३ कोणत्याहि प्रकारचें स्वप्न पडल्यावर मनुष्य सामान्यतः जागा होतो, त्याचप्रमाणे स्वप्नावस्था झाल्यावर होतो. पश्चात्ताप कोणास होत असल्यास तो मूर्खपणामुळे होतो. बुद्धिपुरःसर केलेल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप होणें बरोबर आहे, एरवी पश्चात्तापाचा कांही अर्थच नाही. स्वप्नावस्था वारंवार झाल्यास नुकसान होईल, त्याबद्दल डॉक्तरांचा सल्ला घ्यावा. ४. कॉलेजिअनांस यांतील कांही माहिती असते असें आपणांस कोणीं सांगितलें? संवेदना अनेक कारणांनी होत असते, तेव्हां कामशास्त्रावरील पुस्तकांनीही कदाचित झाल्यास आश्चर्य नाही. परंतु संवेदना उत्पन्न करणाऱ्या ज्या शेंकडो गोष्टी रोज घडत असतात त्या सर्व टाळायच्या म्हटल्यास आत्महत्या करण्याशिवाय मार्ग नाही. ज्यास थोडीबहुत अक्कल असेल त्यास पुस्तकें वाचतांना ती गहाण ठेवावी लागत नाही. वीर्य बाहेर गेल्याने नुकसान होत नाही

हें खरें, परंतु स्वसंभोगाच्या अतिरेकाने नुकसान होतें व स्वसंभोगाचे बाबतींत अतिरेकाचा बराच संभव असतो, असें या मासिकांत अनेक वेळा स्पष्ट सांगितलेलें आहे, व कोणत्याहि प्रकारच्या अतिरेकाने नुकसानच होईल हें अगदी सामान्य बुद्धीच्या मनुष्याला देखील कळलें पाहिजे. आम्ही खरी माहिती देतों, अक्कल आम्ही किंवा कोणीहि देऊं शकणार नाही. ती ज्यांस मुळीच नसेल त्यांचें नेहमी नुकसानच होणार व याबद्दल इतरांस दोष देतां येणार नाही. कामशास्त्राचें ज्ञान शक्य तितक्या लवकर द्यावें असें आधुनिक तज्ज्ञांचें मत आहे. तें देण्याचा मार्ग म्हणजे यासंबंधी कितीही लहान वयांत मुलांनी प्रश्न विचारला की त्याचें सरळ खरें उत्तर त्यांस समजेल तितकेंच द्यावें (या अंकांतील पहिला लेख पहा). जबाबदारी कळेपर्यंत वाट पाहिल्यास त्यांस तें ज्ञान अत्यंत घाणेरड्या रीतीने मिळण्याचा संभव असतो, व जबाबदारीहि बऱ्याच अंशाने ज्ञानावरच अवलंबते. ५. आम्ही पूर्ण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहों, मात्र जेथे दुसऱ्यांचें नुकसान होत असेल तेवढ्यापुरते निर्बंध घातले पाहिजेत. जास्त घालतां कामा नये व ते घालण्याचा कोणासही हक्क पोंचत नाही. मानसिक गुलामगिरी हा गुलामगिरीचा सर्वांत वाईट प्रकार आहे. स्वतःपुरते तरी विनाकारण नियम करीत सुटणें हाहि मूर्खपणाच आहे. तथापि याचा विचार ज्याचा त्याने करावा, परंतु ते दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न कोणीं केल्यास तो समाजाचा शत्रु आहे व त्यास शक्य तितका विरोध केला पाहिजे. तुमच्या मताप्रमाणे जे न वागतील ते बहकले की काय ? संभोगाचे बाबतींत अतिरेक झाल्यास तो ज्याचा त्याला स्वतःचे प्रकृतीवरून कळतो, व त्याबद्दल काय करायचें तें तो पाहील, त्यांत इतरांस पडण्याचें कारण नाही. ७. वीर्य व रक्त यांचें कोष्टक काढण्याचा कोणताहि मार्ग नसल्यामुळे असें कोष्टक देणें म्हणजे नुसती थाप आहे. शिवानंदांच्या मतांचा उपयोग पुराणवस्तुसंशोधनांत जरूर होईल. परंतु त्यांस शास्त्रीय माहिती नसल्यामुळे व्यवहारांत उपयोग नाही. ८, ९. नपुंसकत्व येतें ही गोष्ट खरी, तें कां येतें याचा शोध अजून लागलेला नाही. अपूर्ण उत्थापनामुळे समागम अशक्य होणें याला नपुंसकत्व म्हणतात, परंतु शीघ्रपतन हेंही त्यांतच गणलें पाहिजे. सं.

१८ १-१२-३१.

वि. वि. आपल्या मासिकाच्या एका अंकांत दोन तरुणांनी आपल्या स्त्रियांची अदलाबदल केल्याचें वाचून आह्मां चौघा मित्रांच्या मनांत तसें करण्याचें आलें. प्रथमतः बायका या गोष्टीस कबूल नव्हत्या पण त्यांचें मन वळविण्यांत आलें. ह्याप्रमाणे प्रत्येक पुरुषास आपल्या बायकोशिवाय आणखी तीन स्त्रियांचा व प्रत्येक स्त्रियेस आपल्या नवऱ्याशिवाय आणखी तीन पुरुषांचा समागम घडला. कळविण्यास आनंद वाटतो की ह्या वैचित्र्यामुळे आह्मां सर्वांस फार मजा वाटली. आता आपणास पत्र लिहिण्याचें कारणः—१. ह्या आमच्या योजनेंत आणखी एकदोन जोडप्यांची येण्याची इच्छा आहे. पण अशा समागमामुळे सर्वांची प्रकृति उत्तम असली तरी कांही रोग होण्याचा संभव आहे की काय? २. वर सांगितलेल्या ३ मित्रांपैकी एक विशेष शहाणा आहे. त्याची बायको ज्यावेळी दुसऱ्याकडे गेली त्यापूर्वी मासिक स्नानानंतर तिचा व नवऱ्याचा समागम झाला नव्हता व योगायोग असा आला की तिच्या नवऱ्याला दुसऱ्याच दिवशीं (हा ट्रॅव्हलिंग् एजंट् आहे) सुमारे दीडदोन महिने फिरतीवर जावें लागलें. त्याची बायको गरोदर आहे व तो आता फक्त मुलाची पुढची जबाबदारी आपल्या मित्रावर टाकूं पहात आहे. त्याच्या बायकोला आज लग्न झाल्यापासून ९ वर्षांत मूल झालेलें नाही, तेव्हा ती या गोष्टीला कबूल नाही. आम्ही त्याला एकदा योजनेंत सामील झाल्यावर अशा गोष्टींकडे दुर्लक्षच केलें पाहिजे असें सांगितलें आहे व तोहि कदाचित थट्टेने असें म्हणत असेल, पण ह्याबद्दल तुमचें मत काय आहे तें येत्या अंकांत द्यावें अशी विनंति आहे.

आपला.....

उ १. कोणासहि सांसर्गिक रोग नसल्यास सांसर्गिक रोग होण्याचा संभव बिलकुल नाही, पण निरोगीपणाबद्दल खात्री मात्र करून घेणें जरूर आहे. अर्थात् सर्वानुमतें केलेल्या अशा प्रकारच्या कोणत्याहि योजनेला आमचे मतें कांहीच हरकत नाही, परंतु मित्रांचेंहि कधी कधी भांडण होतें व तसें झाल्यास काय

होईल यांचा विचार नेहमी केला पाहिजे. विवाहित स्त्रीला झालेलें मूल नवऱ्याचेंच आहे असें सामान्यतः कायदा समजतो व त्याचे उलट पुरावा करणें बहुधा अशक्य असतें, तेव्हा तें मूल दुसऱ्याचे अंगावर टाकतां येईलसें वाटत नाही. आपण चौघांत केलेला खाजगी ठराव कोर्टांत आणूं लागल्यास तो टिकणार नाही, कारण अशा प्रकारचा ठराव लेखी असेल तरीहि तो करार अनीतीचा असल्यामुळे कायदेशीर होतच नाही, असें कोर्ट म्हणेल. तेव्हा तें मूल नवऱ्यासच पोसावें लागेल. मूल होत नसलेले लोक अशा गोष्टी पुष्कळ वेळा बिनबोभाट कबूलहि करतात, व येथे तर तें त्याचे संमतीने झालें आहे. इतकें खरें की अशा प्रकारची योजना अमलांत आणण्यापूर्वी या सर्व गोष्टींचा विचार करणें जरूर आहे. सं.

१९

वि. वि. आपल्या मासिकांतील कांही माहिती उपयुक्त व समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने इष्ट अशीच असते हें कबूल करूनहि मला असें म्हणावयाचें आहे की त्यामुळे एका अत्यंत अनिष्ट व समाजविघातक व नाशमूलक वातावरणाची निपज होऊं घातली आहे. मला आपल्यास एका गोष्टीची जाणीव करून द्यावयाची आहे ती म्हणजे आपण महाराष्ट्रास ललामभूत असलेल्या परमपूज्य अण्णासाहेब कर्व्यांचे चिरंजीव आहां व आपण जीं आर्यस्त्रीजातीला कलंक लावणारीं मतें जनतेंत प्रसृत करीत आहां त्यामुळें पर्यायाने त्या महात्म्यास कमीपणा येणारा आहे. कर्मवीर अण्णासाहेब देशाची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून आजवर कायावाचामनाने झटले...आणि आपण सद्धेतूनें कां होईना, जें लिखाण प्रसिद्ध करीत आहां त्याचा परिणाम उलट होणार हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. ज्या वागणुकीनें पाश्चात्य देशांत गृहसौख्य पूर्ण नष्ट होत आलें आहे, ती वागणूक म. गांधी, लो. टिळक, कर्मवीर कर्वे, यांच्या या लाडक्या देशांत यावी म्हणून उघडपणें प्रयत्न व्हावे हें...दुर्दैव नव्हे काय ? मद्यपान, स्वैराचार वगैरेचा उघड उघड पुरस्कार व्हावा व तो पुष्कळांना आवडावा...अस्तु. आपण असें म्हणाल की समाजरचनेंत इष्ट बदल घडवून आणण्याकरता आम्ही प्रयत्न करीत आहोंत. युक्तिवादाने

आमच्याशीं बोला, भावनावशता हा मूर्खपणा, वगैरे वगैरे ...तेव्हां आपल्या आवडत्या युक्तिवादाचा आश्रय करून त्या द्वारेच आपलीं मतें अनर्थमूलक असल्याची खात्री पटवून देणें जरूर आहे. पण तसें करण्यापूर्वी आपल्याकडून कांही प्रश्नांचा उलगडा करून घेणें अवश्य आहे, म्हणून आजवर आपण जीं मतें वेळोवेळीं प्रतिपादन केलीं त्यावरून ज्या शंका येतात त्यांचें समाधान आपल्याकडून होणें जरूर आहे.

आपली शारदा.....हें तुमच्या आदर्श स्त्रीचें प्रतीक दिसतें व आपण आजवर जीं मतें प्रतिपादन केलीं त्या सर्वांचें हें प्रातीनिधिस्वरूप आहे असें म्हणण्यास हरकत नाही. तिचें नोवेंबरचें पत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांतून निघणाऱ्या शंकाः—१. लग्नसंस्था नाहींशी झाल्यावर म्हणजे स्त्री ही पशूंतल्या मादीप्रमाणें अगर हाटेलांतल्या चहाप्रमाणें थोड्या फार श्रमाने साध्य होणारी वस्तु झाली म्हणजे अनेक आषकांत लढे लागून खून मारामाऱ्या यांना ऊत येणार नाहीं काय? २. शारदा स्वतः पैसे मिळवते परंतु सर्व स्त्रियांना स्वतःसिद्ध होण्यासारखी त्यांची शारीरिक व बौद्धिक लायकी आहे काय? ३. लग्नसंस्था हजारों वर्षें चालत आली आहे यावरून ती स्वाभाविक प्रवृत्ति आहे असें सिद्ध होत नाही काय? ४ भूक, तृषा याप्रमाणेच वासना नैसर्गिक आहे, पण... चोरी, लबाडी वगैरेहि नैसर्गिक आहेत, त्या समाजाच्या किंवा शिक्षेच्या भीतीने बंद होतात हें चांगलें की वाईट? ५. कांता व कनक याने मोहित झाल्यामुळेच पुरुष पराक्रम करतो. कांता माळावरची माती झाली म्हणजे कनक तरी कशासाठी मिळवायचें? ६. ब्राह्मणांत लग्नसंबधी आचरण शक्य तितकें कडक असतें. या जातीचे बुद्धीचा लौकिक सनातन आहे. सैल नीतीच्या खालच्या वर्गांत बुद्धी बेताचीच दिसते. वेड्यांचें प्रमाणहि पवित्र आचरणाचे लोकांत कमी असतें...आ. कृ.

उ. आपण आपल्या भरमसाट लेखनाचें नियमन न केल्यामुळे आम्हांस संक्षेप करावा लागत आहे. पुनः अशा भारुडास स्थान मिळणार नाही. आपल्या

शंकांच्या पूर्वीच्या भारुडाकडे लक्षच देण्याचें वास्तविक कारण नव्हतें, कारण त्यांत अविचार, पारंपरिकता व अहंमन्यता यांशिवाय कांही सांपडतच नाही हीं विशेषणें शिव्या म्हणून दिलेलीं नसून सकारण दिलेलीं आहेत आपण आमचा सद्धेतु खरोखरच कबूल करीत असाल तर आपल्या म्हणण्याचा अर्थ इतकाच होईल की आमचा हेतु जरी चांगला असला तरी, काय लिहावें व देशाची उन्नति कशाने होईल, हें आम्हांस कळत नाहीं व आपणास कळतें. जर आमचा हेतु केवळ शिष्टाचाराकरता कबूल करीत असाल तर आम्ही आपल्या मताने वास्तविक हलकटच ठरतों, मग आमचे बरोबर वाद करण्याचे भरीस आपल्यासारख्या नीतिबाजांनी कां पडावें ? तेव्हा आमचा सद्धेतु आपणांस कबूल आहे असेंच धरून चालतों. आता प्रश्न इतकाच राहिला की खरोखरच सामाजिक बाबतींत आपण आमचेपेक्षा जास्त तज्ज्ञ आहांत की काय ? सुशिक्षितांत मोडण्याइतकें आमचें शिक्षण झालें आहे व त्यांतहि आमची बुद्धि सामान्यापेक्षा वरच्या दर्जची दिसून आली आहे असें आम्हांस जरूर पडल्यास सिद्ध करतां येईल. त्याचप्रमाणे समाज-कार्याच्या वातावरणांत आम्ही वाढलेले आहोंत हें आपणहि कबूल केलें आहे. आपली बुद्धि, विद्वत्ता, शिक्षण व समाजकार्याची जाणीव, हीं सर्वच कदाचित आमचेपेक्षा जास्त असतील, परंतु अर्थात आमचे मधेहि थोडीबहुत अहंमन्यता असल्यामुळे या बाबतींत आम्हासच अधिक कळतें असें आम्ही म्हणतों. तेव्हा आम्ही जीं मतें प्रसृत करतों त्यासंबंधीं आम्हीं स्वतःपेक्षा आपल्या मतास अधिक महत्त्व कां द्यावें ?

यूरोपांत काय चाललें आहे याबद्दल आपण गप्पा सांगितल्यास इतर लोक कदाचित ऐकतील परंतु आम्ही तेथे वर्षभर राहून आलों आहोंत व पुस्तकें आम्हांसहि वाचतां येतांत. यूरोपांत गृहसौख्य नाही व हिंदुस्थानांत आहे हीहि अहंमन्यताच आहे. ज्यावर आपण टीका करतां तें आपण धड वाचलेलेंहि दिसत नाहीं. आमचे मद्यपान व व्यभिचारावरील लेख पुन्हा वाचा, म्हणजे निदान आपणास त्यांचा अर्थ कळण्याचा संभव आहे. आपलें असेंहि म्हणणें दिसतें कीं आमचे वडील समाजाची उन्नति करतातें व आम्ही

त्यास अधोगतीला नेऊन त्यांचे नावाला काळिमा लावतों. आपणास अविचारी म्हटलें याचें कारण हेंच. वडिलांप्रमाणेच मुलांनी वागलें पाहिजे हें आम्हांस कबूल नाही, कारण अशाने प्रगति होणेंच शक्य नाही, परंतु आमचे वडिलांनी उत्कृष्ट उदाहरण घालून दिल्यामुळे आम्ही त्याप्रमाणेच वागत आहोंत, असें आपणास विचारांतीं दिसेलें. वडिलांनी ज्या गोष्टी केल्या त्याच आपण करीत राहिलें पाहिजे असें आमचे वडिलांचें मत नाही, कारण त्यांचे वडिलांनी विधवेशीं विवाह केला नसतांहि त्यांनी केला. म्हणजे स्वतःला जें योग्य दिसेल तेंच करावें, मग तें इतरांस पटो की न पटो, असेंच उदाहरण त्यांनी घालून दिलें व तसेंच आम्ही करीत आहोंत. त्यांत आणखी साम्य दाखवायचें म्हणजे आता आपण जसे आम्हांस शिव्या देत आहांत (हो, शिव्याच नाहीतर काय ?) तशाच त्या वेळीं लोकांनी त्यांना दिल्या होत्या. विधवांचे विवाहानें तर काय, परंतु शिक्षणानेहि समाज रसातळाला जाणार असें लोक म्हणत होते. आता त्यांच्या कृतीमुळे आपणांस या गोष्टींची संवय झाली म्हणून त्या आपणांस वाईट दिसत नाहीत इतकेंच, कारण तशी परंपरा पडली. सारांश नवीन गोष्टींबद्दल स्वतंत्र विचार करण्याची आपणांस शक्ति नाही, यामुळे त्या आपणांस वाईट दिसतात असेंच म्हणावें लागतें. आम्हांस स्वतंत्र विचार करण्याची ताकत आहे तेव्हा म. गांधी व लो. टिळक काय म्हणतात हें पाहण्याचें कारण आपणाप्रमाणे आम्हांस नसतें. यांपैकी म. गांधी धर्मवेडे आहेत. तेव्हा त्यांच्या मतांस शास्त्रीय दृष्टीने किंमत नाही, आणि टिळकांस लोकमान्य होण्याकरता धार्मिकपणाचें ढोंग करण्याची खोड असल्यामुळे खरीं मतें सांगतां येत नसत.

आपल्या शंका:—१. स्त्री ही परावलंबी असल्यामुळेच व लग्नसंस्थेमुळेच थोड्याफार श्रमाने हल्ली साध्य आहे. लग्नसंस्था नाहीशी झाल्यावर पाहिजे ती स्त्री पाहिजे त्या पुरुषाला सहज मिळेल ही आपली पुरुषी अहंमन्यता आहे, भ्रम आहे. खून, मारामाऱ्यांबद्दल कायदे आहेत. २. बहुतेक सर्व स्त्रियांस पैसे मिळवण्याइतकें शिक्षण घेतां येईल व तसें झाल्याशिवाय स्वातंत्र्य अशक्य होईल. जें पुरुषांस करतां येतें तें स्त्रियांस येणार नाही ही आपली घमेंड आहे.

३. हिंदुस्थानांत विवाहसंस्था श्वेतंकेतूने निर्माण केली. ही जर स्वाभाविक प्रवृत्ति असेल तर त्यापूर्वी हिंदूंस स्वभावच नव्हता काय? ४. नैसर्गिक गोष्टी सर्व चांगल्या असें आम्ही म्हटलें नाही, तें आपणच म्हटलें, व आता त्याच्या उलट म्हणण्याचा आपला विचार दिसतो. ५. कांता व कनक यांचा मोह विवाहसंस्थेमुळे उत्पन्न झालेला नाही व तीबरोबर नष्टहि होणार नाही. स्त्रियांस स्वातंत्र्य मिळाल्यास त्या सवंग होतील हा भ्रम सोडा, नाहीतर माळावरची माती म्हणून उचलायला जाल आणि स्वतःच मातीस मिळाल. अहंमन्यतेंत शहाणपण नाही. ६. आपण ब्राह्मण आहांत इतकेंच या शंकेवरून दिसतें, बाकी आपले विधान अहंमन्यतेचेंच द्योतक आहे. इतर जातींत बुद्धि कमी असते हें खोटें. शिक्षणाचे दृष्टीने त्या मागसलेल्या आहेत इतकेंच. वेड्यांचे प्रमाणाबद्दल पाहिजे तीं विधानें दडपून देण्यांत काय अर्थ आहे? लग्नसंबंधी आचरण ब्राह्मणांत कडक असतें हेंहि खोटें. इतर जातींत घटस्फोट तरी आहे, तशी सुटका ब्राह्मणांस नसल्यामुळे नावडत्या नवऱ्याशीं किंवा बायकोशीं जन्माची गांठ पडल्यास कडक आचरण राहणार नाही आणि रहातही नाही. अकलेचा व नीतिबाजीचा कांही संबंध असलाच तर तो आपण म्हणतां त्याचे उलट आहे. इतिहासावरून आपणांस असें दिसून येईल की जे लोक अपूर्व बुद्धिमान म्हणून नांवाजलेले आहेत त्यांचें आचरण कडक नव्हतें, व तेंच साहजिक आहे ज्या मनुष्यांत तडफ जास्त असते तो निर्बंधांस फारसा जुमानीत नाही. सारांश आपण धर्माचा, जातीचा, देशाचा व परंपरेचा वृथाभिमान सोडल्याशिवाय आपणांस साध्या गोष्टीही कळणार नाहीत. आपण पूर्वजांच्या पराक्रमाच्या गप्पा मारतों व हातून मात्र कांही होत नाही म्हणून लोक हंसतात. हीहि अशीच एक साधी गोष्ट आहे, व ही राजकीय बाबींप्रमाणेच सामाजिक बाबतींतहि लागू पडते. **सं.**

२०

वि. वि. पहिल्या संभोगाचे वेळीं इंद्रियाला जखम होते असें ऐकतों (शिस्नावरील कातडें तुटून)-तरी त्या जखमेचे रोगापासून जेलोटचूबने संरक्षण

होईल का ?...शेवटीं एवढेंच लिहितों की आपल्यावरील या खटल्यांत माझी व्यक्तिशः सहानुभूति आहेच, पण आमच्या कालेजांतील बहुतेक तरुणांची आहे. तरुण पिढीला आपले बहुतेक विचार पटतात व आपण जिव्हाळ्याच्या विषयावर माहिती देऊन विशेषतः आमचेसारखे अननुभवी तरुणांवर फार उपकार करीत आहांत, त्याबद्दल तरुण पिढी आपली सदैव आभारी राहील. अंगीकृत कार्य वाटेल त्या अडचणींतून तडीस नेण्यास तुम्हांस धैर्य येवो अशी आशा करून पत्र संपवतों...आपला...

उ. प्रथम समागमाचे वेळीं जखम स्त्रियांस होते, पुरुषांस नव्हे, व तीहि आपोआप बरी होते. ती रोगांचे सदरांत येत नाही. आपल्या सहानुभूतीबद्दल मी अत्यंत आभारी आहें. **सं.**

वि. वि. १. सगोत्रीय वधूवरांत विवाह कां होऊं नयेत ? २. बाप-लेक, भाऊ-बहीण, आई-मुलगा, यांच्यांत केव्हा केव्हा संभोगसंबंध होतात व तें निसर्गविरुद्धहि दिसत नाही, मग त्याला कोणतीहि आडकाठी कां असावी ? ३. वेश्येच्या मध्यस्थाने द्रव्य न घेतां समागमाचे रूपांत मोबदला घेतल्यास हल्लीच्या नवीन कायद्याची आडकाठी आहे की काय ? ४ डाक्टरांनी तपासून वेळोवेळीं सर्टिफिकीट दिलेल्या वारांगनांची यादी कोठें मिळेल ? तशी यादी करण्यास कायदा आड येतो काय ? आपला.....

उ. १. या बाबतींत वेगवेगळ्या धर्मांत व देशांत वेगवेगळी रूढि आहे व रूढीला कांही शास्त्रीय कारणच लागतें असें नाही गोत्र पाहण्याची पद्धत अगदीच खुळेपणाची आहे, कारण गोत्र फक्त बापाचे बाजूने पाहतात, परंतु आईचे बाजूने नातें आहे की काय, हे फारसें लांब पाहतांच येत नाही. त्यांत शास्त्रीय कारण इतकेंच की स्त्रीपुरुषांत एकच रोग किंवा दोष असल्यास तो संततींत पुष्कळ वेळा वाढत्या प्रमाणांत येतो, आणि स्त्रीपुरुषांचें जवळचें नातें असल्यास दोघांत एकच दोष असण्याचा बराच संभव असतो. अर्थात हाच नियम चांगल्या गुणासही लागू

आहे व दोषांप्रमाणे गुणहि द्विगुणित होतात. तेव्हा असा दोष असल्याशिवाय सर्वांस सरसकट एकच निथम लावणें शहाणपणाचें नाही. पण कायदाहि रूढीवरच उभारला असल्यामुळे तेथे शहाणपणाचा उपयोग नाही. २. इतर प्राण्यांत असे संबंध नेहमी होतात व मनुष्यांतहि चोरून कधीकधी होतात. या बाबतींतहि शास्त्रीय कारण वरीलप्रमाणेच आहे. ३. एखादा मनुष्य मध्यस्थी करतो असें कोर्टांत शाबीत झाल्यास तो पैसे घेत असलाच पाहिजे असें कोर्ट धरून चालण्याचा संभव आहे. एरवी कायदा अशा मनुष्याला लागणार नाही. ४. यादी करूं नये असा कायदा नाही, परंतु ती करणार कोण? तपासून घेऊन सर्टिफिकीट मिळवण्याची पद्धत युरोपीय वेश्यांत असे, परंतु उघड धंदा करणाऱ्या युरोपीय वेश्या आता नाहीशा झाल्या आहेत. अशी यादी करणें कठिण जाईल. **सं.**

२२ २१–५–३२.

वि. वि. १. शिस्नाची जाडी कृत्रिम उपायाने कमीजास्त करतां येणें शक्य आहे काय? तसेंच योनिमार्ग आकुंचित करता येणें शक्य आहे काय? असल्यास उपाय. २. क्वचित प्रसंगीं शिस्नाचा पुढील भाग मुळाकडल्या भागापेक्षा जाड असतो याचें कारण.

उ. १. शरीराचे वाढींतच कांही कमतरता राहिली असल्यास वाढीचे वयानंतर उपाय चालत नाहीं. तथापि कोणत्याहि अवयवाचा योग्य उपयोग केल्यासच तो सुस्थितींत राहील, परंतु आकारांत फरक करणें फारसें शक्य नसतें. २. ज्याप्रमाणे इतर इंद्रियांचे आकार सर्वांचे सारखे नसतात, त्याप्रमाणे हेंही आहे. कोणाचें नाक उंच असतें, कोणाचें चपटें असतें, याचें कारण काय?

२३

'संपत्ति, शक्ति आणि नैसर्गिक सौंदर्याची विपुलता असलेला, सृष्टीवरील स्वर्ग असलेला, असा जर एखादा देश कोणी मला शोधून काढावयास सांगेल तर मी हिंदुस्थानाकडेस अंगुली निर्देश करीन. सर्व जगांत बुद्धीचा विकास कोठें झालेला आहे? असें जर कोणी मला विचारील तरी देखील मला हिंदुस्थानचेंच

नांव घ्यावें लागेल. सर्व जगाच्या संस्कृतींत हिंदु संस्कृतीचें स्थान अत्यंत वरच्या दर्जाचें आहे, यांत शंका नाही. युरोपखंडाला हिंदुस्थानापासून बऱ्याच गोष्टी शिकल्याच पाहिजेत.' प्रो. मॅक्समुलर यांच्या 'हिंदुस्थानापासून आपण काय शिकावें' या पुस्तकांतील भाषांतरित उतारा.

वि. वि. आपल्या मासिकाच्या प्रत्येक अंकांत शारदेचीं पत्रें प्रसिद्ध होतात. सदरहू बाई आपणांस सर्वज्ञ आणि महाविद्वान समजतात. कोणत्याहि विषयांत यांची गति नाही, असा विषयच नाही, यांना कामाविषयक स्वातंत्र्याची मोठी आवड आहे, असें त्यांचीं पत्रें चाळलीं तर दिसून येतें. परंतु वरील गोष्ट जर सत्य आहे तरमग कांही लोकांनी त्यांना फक्त पत्रें लिहिल्याबद्दल मागील एका अंकांत त्यांनी त्यांची ग्राम्य शब्दांत निर्भत्सना केली आहे, तिचें कारण समजत नाही. वास्तवीक लोकांचा यांत दोष नसून बाईचें स्वातंत्र्यहि कांही नष्ट झालें नव्हतें. मग केवळ पत्रें लिहिल्याबद्दल मागें त्यांनी इतका जळफळाट कां केला तें समजत नाहीं, असो. गेल्या महिन्याच्या अंकांत जें पत्र प्रसिद्ध झालें आहे, त्यांत बाईनी संस्कृतीचा प्रश्न उपस्थित केला असून त्यावर बरीच मल्लीनाथी सुद्धां केली आहे. 'आर्यसंस्कृति हें काय बंड आहे, तुला माहीत आहे काग? मला तर अजून कांहीं उलगडा होत नाही!' बाईसाहेब, आर्यसंस्कृति म्हणजे काय हें जर आपणास माहीत नाही, तरमग आपण हिंदु असाल तर इतके दिवस कोठे झोंपा गेलां होतां! याची माहिती आपण अगोदरच करून घेणें योग्य नव्हतें का? आणि वरील संस्कृतीबद्दल आपणांस कांहीच माहिती नसेल तरमग ज्या विषयाची आपणांस कांहीच माहिती नाही, अशा विषयांत लेखणी चालवणें हा शहाणपणा आहे का? बाईसाहेब म्हणतात, आर्यांचा आज कित्येक हजार वर्षांचा इतिहास जर कोणीं पाहिला तर त्यांच्या रीतिभातींत फरक पडला नाहीं, असें दिसत नाहीं. बाईसाहेबांस कोणत्या कर्णपिशाचानें सांगितलें की संस्कृति म्हटली म्हणजे तींत बदल होतां कामा नये, थोडा जरी झाला तरी ती संस्कृति नष्ट झाली आहे का एखादा असा आधार? आणि श्वेतकेतुसारख्यांनीं फरक करून सुद्धां संस्कृति अद्याप कायम आहे ती? श्वेतकेतूच्या पूर्वी विवाहपद्धति

नव्हती, ती त्याने काढली. बेटा मूर्खच होता. आमच्या बाईसाहेबांना ती नडते ? शुक्राचार्याच्या पूर्वी सर्व लोक दारू पीत होते, म्हणून आतां सुद्धां प्यावी असें बाईचें म्हणणें. बाईसाहेब, आपण वरीलसारख्या अनेक गोष्टींची चिकित्सा करतांना थोडातरी विचार करतां का ? शुक्राचार्यासारख्या विद्वान मनुष्याने दारू पिण्याला बंदी केली, याचें कारण दारूचे समाजावर होणारे दुष्परिणाम दृष्टोत्पत्तीस आले म्हणून. आणि संस्कृतींत समाजाला हितकारक (परंतु स्वैराचारी लोकांना पीडादायक) असा धार्मिक निर्बंध घातल्याबद्दल जर बाईच्या मतानें शुक्राचार्य मूर्ख असेल, तरमग अमेरिकेंत दारूला कायद्याने बंदी करणारे अमेरिकन लोक बाईच्या मताने मूर्खांचे शिरोमणी ठरतील, नाही ? आणि ज्या गडकऱ्यांनीं स्वतःच्या अनुभवावरून दारूचा दुष्परिणाम दाखवणारें ' एकच प्याला ' हें परिणामकारक नाटक लिहिलें त्यांच्याविषयी तर बाई ' ते के न जानीमहे ' असेच उद्गार काढणार ! बाईसाहेब, आपण म्हणतां कां, श्वेतकेतूने विवाहाची पद्धत पाडली. कां पाडली याविषयीं आपण विचार केला आहे का ? पण आपल्याला काय गरज ? आपल्याला तो गोष्ट अनिष्टच आहे. पाणिनीच्या वेळेपर्यंत कुमारिकांना मुलें झालेलीं समाजाला चालत, असें कै. राजवाडे म्हणतात. मग त्यानंतर कां चालत नाहींशीं झालीं ? हा प्रश्न विचार करण्यासारखा नाहीं काय ? ज्या काळांत पाणिनीसारखे संस्कृत व्याकरणाचे अध्वर्यु, किंवा इतर शास्त्रांचे जे प्रणेते होऊन गेले, ते आणि त्यांच्या ग्रंथांचें ज्या काळांत समाजाला आकलन करतां येत असे, त्या काळांतील समाज म्हणजे सुद्धां बुरसटांचो बजबजपुरी होती असें बाईना सुद्धां म्हणतां येणार नाही. मग अशा काळीं श्वेतकेतु आदिकरून समजाच्या ज्ञानी अध्वर्यूनीं सुरू केलेली, आणि त्या वेळच्या सुज्ञ समाजाने पूर्वी नसतांहि हितकारक म्हणून संस्कृत केलेली विवाहाची पद्धत, बाई म्हणतात म्हणून सोडून द्यावी काय ? आणि त्यांनी अहितकारक व त्याज्य ठरवलेली कुमारिकादिकांच्या प्रजोत्पादनाची पद्धत सुरू करावी काय ? समाजांतील प्रत्येक व्यक्तीने याचा पूर्ण विचार केला पाहिजे. केवळ युरोपांत किंवा अमेरिकेंत (वरील देशांत विवाहसंस्था नसल्यामुळें अनेक हास्योत्पादक

गोष्टी प्रत्यहीं ऐकूं येतात) आपल्यासारखी विवाहपद्धति नाहीं म्हणून, किंवा शारदाबाई, कु. कारा, यांच्यासारख्या अनर्गल स्त्रिया प्रतिपादन करतात म्हणून, एकदम विवाहसंस्था नको असें म्हटलें, तर तें सुविचाराचें होणार नाही. मतें प्रतिपादणारे स्वार्थांधतेनें एकतर्फीच प्रतिपादन करतात. पण समाजाला प्रतिपाद्याची सारासारता व युक्तायुक्तता पाहिलीच पाहिजे. यानंतर बाईनीं आपल्या निशाविहाराकरतां सार्वजनिक उद्यानें रात्रंदिन उघडीं असवीं असें प्रतिपादिलें आहें. पण ती गोष्ट गव्हरमेंटच्या मर्जीची असल्यामुळें या बाबतींत त्यांना सरकारचे पाय धरणें भाग आहे. आम्ही त्यांत कांही लिहूं शकत नाही. पण इतकें मात्र खरें कीं जर अशीं सारासार विचार न करतां केवळ आपल्या स्वैराचाराच्या समर्थनार्थ लिहिलेलीं पत्रें मासिकांत न छापिलीं तर वर्गणीदारांच्या मेंदूवरील बराच ताण कमी होईल अशी आमची खात्री आहे.

आ. एक वर्गणीदार.

ता. क. आपण स्वैरसंभोगाची शिफारस करितां म्हणजे एकमेकांची संमति असेल तर संभोगाला हरकत नाही असें प्रतिपादन करतां. सख्खी बहिणभाऊ, किंवा माता व पुत्र यांचा खुशीचा संभोग आपल्या स्वैरसंभोगाच्या कक्षेंत येत असेलच. अशीं एकदोन उदाहरणें आमच्या कानावर आलीं आहेत. म्हणून आपलें मत विचारावें असें वाटल्यावरून तसदी दिली आहे.

उ. आपल्या पत्रांतील बहुतेक भाग शारदाबाईस उद्देशून असल्यामुळे व त्या आपणांस उत्तर देण्यास समर्थ असल्यामुळे तें काम आम्ही त्यांचेवरच सोपवीत आहों. त्यांचें पत्र पहावें. (नं. १३) राहिलेल्या भागास आम्ही उत्तर देतों. वाचकांच्या मेंदूस ताण देण्याचा या मासिकाचा एक उद्देशच आहे, व आपल्या म्हणण्यावरून तो सिद्धीस जातो असें दिसतें. विचार करणें ज्यांना जड जात असेल त्यांचेकरता **मनोरंजना**सारखीं मासिकें आहेतच, तींच वाचावीं. ताज्या कलमांतील आपल्या प्रश्नाचे बाबतींत मागील अंकांतील तिसऱ्या पत्राचें (नं. २१) उत्तर पहावें. सं.

२४ **गगन बावडा,** १७-८-३२

वि. वि. प्राचीन काळीं कवि कल्याणमल्ल याने केलेला ग्रंथ 'अनंगरंग' उर्फ रतिशास्त्र आपले अवलोकनांत असेलच, त्यांत इंद्रियप्रमाण प्रकरण आहे, त्याबद्दल आपला सविस्तर खुलासा यावा, तसेच शरिरांतील निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या तिथीला कामाचें वास्तव्य असतें, अशाबद्दल त्याच ग्रंथांत एक कोष्टक आहे, त्याचाहि खुलासा करावा. संतति होणेस शिस्नाची लांबी किती असणें अवश्यक आहे तेंहि कळविण्याची कृपा करावी.

आपला **रघुनाथात्मज.**

उ. इंद्रियांचे लांबीरुंदीवर स्त्रीपुरुषांचें वर्गीकरण करून त्यांस वेगवेगळीं नांवें देण्याचा आमचे मतें कांहीं उपयोग नाही. त्यांतून इतकेंच तत्त्व घेण्यासारखें आहे की स्त्रीपुरुष या बाबतींत एकमेकांस अनुरूप असावीं. परंतु आजच्या विवाहपद्धतींत हें विवाहोत्तर समजतें व त्याचा उपयोग नसतो. २. कामाचें वास्तव्य निरनिराळ्या तिथीला निरनिराळ्या अवयवांत असतें, ही केवळ कविकल्पना आहे, त्यांत तथ्य दिसत नाही. ३. संतति होण्यास शिस्नाची लांबी अमुक असणे जरूर असतें असें नाही. **सं.**

२५ १८-८-३२

१. प्रथमप्रसूतीनंतर कांहीं स्त्रियांची प्रकृति सुधारते हें शक्य आहे काय? २ असें म्हणतात की कांहीं पुरुष विवाहानंतर स्थूल होतात, हें खरें असल्यास कसें टाळतां येईल?.....

उ. १. सुधारणे शक्य आहे. २. बरेच लोक ४० वयाचे पुढें स्थूल होतात, व तेथपर्यंत बहुतेक लोकांचें लग्न झालेलें असतें, यामुळे तसें कदाचित् म्हणतां येईल. विवाहित पुरुषांस स्थूल होण्यास आणखीहि एक कारण असतें की त्यांची खाण्याचे बाबतींत आबाळ होत नाही व पत्नीला स्वयंपाक रुचकर करतां येत असल्यास अधिकउणें खाण्याचीहि संवय लागते, व पत्नीचे अंगावर

काम टाकून बरेच लोक आळशीहि होतात, तेव्हा विवाहाला फारतर स्थूलतेचें अप्रत्यक्ष कारण म्हणतां येईल, तें प्रत्यक्ष कारण होऊं शकत नाही. हीं कारणें लक्षांत ठेवल्यास टाळण्याचे उपाय आपोआप दिसतील. **सं.**

२६

वि. वि. १. शीघ्रपतनावर बरेचसे लोक हमेशा औषधें मागवितांना दिसतात, तरी समागमांत लवकर पतन होणें अगर उशिरां पतन होणें हे रोग आहेत काय? रोग असल्यास त्यावर खात्रीचें औषध कोणतें व तें कोठें व काय किमतीस मिळतें, तसेंच एका निरोगी माणसाचें आजमास किती मिनिटांत पतन व्हावयास पाहिजे व त्यापेक्षां लवकर अगर उशिरा झाल्यास रोग समजावा काय?

२. आजकाल कोणत्याहि नियतकालिकांत पहा त्यांत अनेक हेअरआईल, पावडर, साबण, उटणें वगैरे यांचा बाजारांत फारच सुळसुळाट झालेला दिसून येईल. यांचा समाजस्वास्थ्यावर कितपत उपयोग झाला आहे हें आजपर्यंत कोणीच आजमावण्याची फारशी परवा केलेली दिसत नाही जाहिरातीतील सर्वच जिनसा समाजस्वास्थ्यकर असतील असेहि शक्य नाही, त्यांत बऱ्याचशा अपायकारक सुद्धां असण्याचा संभव आहे. तरी वर लिहिलेल्या प्रत्येक बाबीवर आपल्या समाजस्वास्थ्यांत आपले व तज्ज्ञांचे लेख येऊन कोणाची कोणती वस्तु हितकर आहे व कोणाची कोणती वस्तु अहितकारक आहे यावर प्रकाश पाडणें जरूर आहे. हें काम जिकीरीचें, दगदगीचें व कठिण आहे खरें, परंतु आपल्याशिवाय कोणीही हे हाती घेईल असें आज दिसत नाहीं. आज प्रत्येक पत्रकारास खोट्या-नाट्या जाहिराती छापून स्वार्थापलीकडे पाहण्याची अक्कलच नाही असें वाटतें. आपण ज्या अर्थी समाजस्वास्थ्याचा चंग बांधून विडाच उचलला आहे त्याअर्थी हें समाजस्वास्थ्यकारक, अप्रिय कामहि आपणांसच केलें पाहिजे. आपला...

उ. १. किती वेळ लागावा हें निश्चित सांगणें अशक्य आहे आणि हें प्रकृतीवर अवलंबणार. यासंबंधी आंकडे कोणी प्रसिद्ध केल्याचें ऐकिवांत नाही आणि जवळजवळ अशक्यच दिसतें. लोकांना वेळेचा बिलकूल अजमास नसतो, तेव्हा

लोक जें सांगतात त्यावर विश्वास ठेवतां येत नाही. तथापि इंद्रियप्रवेश होण्यापूर्वीच किंवा होतांक्षणींच पतन होणें नैसर्गिक नाही व तो रोगच समजला पाहिजे. सामान्यतः प्रवेशानंतर अर्ध्या मिनिटापासून तीन मिनिटांपर्यंत वेळ धरल्यास यांत बहुतेकांचा समावेश होईल. यापेक्षा जास्त टिकणारे अपवादात्मक किंवा खोटें बोलणारे समजावे. शीघ्रपतनाचा दोष अमुकच औषधाने बरा होईल, असें सांगतां येणार नाही. मारी स्टोप्स यांनी आपल्या पुस्तकांत दिलेला उपाय मासिकांत मागे प्रसिद्ध झालेला आहे. त्याचा उपयोग न झाल्यास तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. वेगवेगळ्या लोकांस वेगवेगळे उपाय लागतील.

२. आपलें म्हणणें खरें आहे, परंतु हें काम करण्यास रासायनिक तज्ज्ञाची मदत पाहिजे इतकेंच नव्हे तर तें अतिशय खर्चाचें काम असल्यामुळे सरकारलाच तें करणें शक्य असतें, व अमेरिकेंत तें सरकारकडूनच होतें. संततिनियमनाकरता पोटांत घेण्याच्या औषधांच्या सर्व जाहिराती खोट्या, हें आम्ही पूर्वीच सांगितलें आहे. या बाबतींत आम्हास शक्य असेल ती माहिती आम्ही देतच आहोत. केंस लांब होण्याकरता किंवा नवीन येण्याकरता कोणताहि उपाय यशस्वी होत नाही. पावडर, क्रीम, स्नो वगैरेबद्दल पुष्कळ शास्त्रीय माहिती उपलब्ध आहे, व तीं प्रामाणिकपणे बनवल्यास निदान अपायकारक तरी होण्याचें कारण नाही. याकरता हे पदार्थ नांवाजलेल्या कंपन्यांचेच वापरावे, कारण त्यांना थोडी-बहुत अब्रूची परवा असण्याचा संभव असतो. सं.

२७ १८–९–३२.

वि.वि. मी एक ३ वर्षांपूर्वी विवाह केलेला गृहस्थ आहें. या विवाहाला माझी पूर्ण संमती नव्हती, पण केवळ मातेच्या आग्रहाला बळी पडून विवाह केला. गेल्या ६ वर्षांत माझ्या वैवाहिक पत्नीबद्दल माझ्या मनांत अद्याप प्रेमोद्भव झाला नाही. तथापी पत्नीला मार झोड करण्याच्या मनोवृत्तीचा मी नाही. तिचा माझा शरीरसंबंध कांही वेळां घडला, पण तो माझ्या दृष्टीने मी व्यभिचार मानतों. या काळांत माझी कामतृषा मीं कांही निरनिराळ्या मार्गांनी भागविली.

आहे हें सांगावयास—आपल्यासारख्या विचारवंतास सांगावयास—मला लाज वाटण्याचें कारण नाही, कारण भूक लागली म्हणजे ती भागवणें याचप्रमाणे या गोष्टीची सोय करून घेणें असें मी मानतों. परंतु अलीकडे मला अत्यंत मानसिक त्रास होऊं लागला आहे. मी वाचनाचा अतिशोकी असूनहि वाचन जवळजवळ संपुष्टांत आलें आहे. दोनदोन महिने एकत्र असूनहि मी स्त्रीशीं भाषण करीत नाहीं. अशा परिस्थितींतून बाहेर पडण्याला अगदीं कायदेशीर मार्ग असल्यास मला त्याची माहिती पाहिजे आहे. जन्माने हिंदु ब्राह्मणाला आपल्या विवाहित स्त्रीला कायदेशीर रीतीने कायमची सोडावयाची असेल तर त्याने ही गोष्ट कशी घडवून आणावी ?

उ. यांत प्रथमदर्शनींच आम्हास जी महत्त्वाची गोष्ट दिसते ती ही की या प्रश्नाचा विचार आपल्या स्त्रीच्या दृष्टीनेहि केला पाहिजे. या सर्वांत तिची कांही चूक आहे असें दिसत नाही, तेव्हां कांहो झालें तरी तिच्या पोटगीची व्यवस्था आपणासच केली पाहिजे, व आपणांस तीं करणें कायद्यानेहि भाग पडेल. कायदा बाजूला ठेवला तरी भूतदया असतेच, तेव्हा यांतून सुटका नाही. अर्थात सर्वांत उत्तम पोटगीची सोय म्हणजे तिला स्वतःचें पोट भरण्यास शिकवणें. उदाहरणार्थ नर्सचा धंदा थोड्या वेळांत व पैशांत शिकतां येतो. असा धंदा करून स्वतःचें पोट भरण्याची कोणत्याहि समंजस स्त्रीची तयारी असली पाहिजे. परंतु नवऱ्याने आपणास फुकट खावूं घातलें पाहिजे असेंहि समजणाऱ्या स्त्रिया असतात, व तसें असल्यास कायद्याने आपणांस पोटगी देणें भाग पडेल.

२८ लिंगसुधारणासंघ, लंडन, १७–१०–३२

मी आजारी असल्यामुळे मला आपल्या पत्रांची उत्तरें पाठवतां आलीं नाहीत. आपला आक्षेपित लेख लिंगसुधारणासंघाच्या गेल्या महिन्यांतील परिषदेंत वाचणें शक्य झालें नाही, कारण निबंध इतके आले होते की जे प्रत्यक्ष हजर होते त्यांनाच आपले निबंध वाचतां आले. आपलें अपील यशस्वी झालें नाही याबद्दल खेद वाटतो. आपल्या लेखाचें सरकारी भाषांतर मीं वाचून पाहिलें

आणि माझ्या मतें तो बिलकूल अश्लील नाही, परंतु पारंपरिक लोकांचा शाब्दिक पाठिंबा असलेल्या नीतिनियमांना तो धरून नाही, तेव्हा पारंपरिक न्यायाधीशांचे मताने आपलीं मतें क्रांतिकारक व आपण भयंकर ठराल. तेव्हा त्यांनी आपणास अशा तऱ्हेने वागवलें याबद्दल मला वाईट वाटतें, परंतु आश्चर्य वाटत नाहीं. सुदैवाने लंडनमधील लोकमत आता बदललेलें आहे आणि आता क्रांतिकारक मतें असली तरी येथे शिक्षा होत नाही ३ नवंबरला गर्भपातासंबंधी कायद्यांचा विचार करण्याकरता आम्ही 'लंडन् स्कूल् ऑफ् हायजीन्' मधे एक जंगी सभा भरवणार आहोंत. माझ्या एका व्याख्यानाची छापील प्रत आपणास पाठवीत आहे. आपला.....**नॉर्मन् हेअर** (अध्यक्ष)

२९

वि. वि. माझा मित्र.....ह्यानें केवळ वडील माणसांच्या आग्रहास्तव लग्न केलें, परंतु स्त्रीसंभोग करण्याची त्याच्या अंगीं मुळीच ताकद नव्हती. पहिल्या रात्रीं केवळ स्त्रीचा हात धरतांच वीर्यपतन झालें. लग्न होऊन सुमारें दीड वर्ष झालें पण आतांपर्यंत एक वेळही त्याला संभोग शक्य झाला नाही. शीघ्रपतन होऊं नये म्हणून तो आठवडाभर तिच्याजवळ सुद्धां जात नसे, तरी ठरलेल्या रात्रीं पुन्हा तीच स्थिति होत असे. ही मुदत वाढवूनहि फायदा झाला नाहीं. किंचित फरक झाला, परंतु केव्हाहि पूर्ण समागम करतां आला नाही. यामुळें त्याची प्रकृतिहि खालावली व बायकोशीं रोज भांडण होऊं लागलें. अखेर ती दुसऱ्याशीं संबंध ठेवणारच याची खात्री पटल्यामुळें पुढील संतति चांगली निपजावी व निरोगी पुरुषाशींच तिने संबंध ठेवावा म्हणून त्याने तिला माझ्याशीं एकट्याशींच संबंध ठेवण्यास सांगितलें. मी अविवाहित असून सदर इसमाच्या ब्लॉकमधील एक खोली भाड्याने घेतली आहे. मी शरीराने मजबूत असून मला थोडेंबहुत रूपहि आहे. त्याच्या सांगण्यावरून व त्याची परवानगी आहे हें मला न कळवतां माझ्या मित्राच्या पत्नीने एके रात्रीं (तो बाहेरगांवीं गेला असतां) माझ्याशीं शृंगारचेष्टा केल्या व माझी तयारी आहे असे पाहून

समागमाची इच्छा दर्शविली व मी ती पुरी केली. माझा व तिचा संबंध साधारणतः दिवसाआड होत असे व तिचें पूर्ण समाधानहि होत असे. पुढेंपुढें माझा मित्र घरांत असतांनाहि तो झोंपला असतां ती माझ्या खोलींत येऊन जात असे. नवऱ्याच्या संमतीने हें होत आहे याची मला कल्पनाहि नव्हती. परंतु पुढेपुढे ती माझ्याशीं त्याच्या देखतहि शृंगारिक भाषण करीत लगट करावयाची. एके दिवशीं तर तिनें त्याच्यासमोर मला कडकडून आलिंगन देवून माझें चुंबन घेतलें. मी अगदीं बावरून गेलों, तेव्हा माझ्या मित्रानें सर्व गोष्टींचा उलगडा केला. इतकेंच नव्हे तर त्यापूर्वी आमचा समागम तो आडून पहात असल्याचें त्यानें कबूल केलें. त्यांत त्याला स्वतः समागम केल्यासारखें वाटत असे .... आमचे व्यवहार पूर्वीप्रमाणें चालू आहेत. इतकेंच नव्हे तर मी तिला घेवून बाहेरगांवींहि राहिलों आहे. प्रथम एक वर्षभर मी संततिनियमनाचे उपाय वापरीत असे. गेल्या महिन्यापूर्वी तिनें मूल व्हावें म्हणून नवऱ्याच्या संमतीने हे उपाय बंद केले आहेत. तेव्हा तिला मूल झाल्यास माझा मित्र त्या पुराव्यावर मला कायद्यांत अडकवूं शकेल काय? कारण त्याचे संमतीने आमचे व्यवहार होत असत याला माझेकडे पुरावा नाहीं. तरी कृपा करून याविषयीं खुलासा कराल काय? दुसरा प्रश्न असा की आमचा समागम पाहून माझ्या मित्रास सुख कां व्हावें?.....

उ. कोर्टाकडे जाण्यांत आपल्या मित्राचा कोणत्याहि प्रकारचा फायदा दिसत नाही. स्वतःचें नपुंसकत्व कबूल करण्यास लोक सामान्यतः तयार नसतात आणि हें प्रकरण कोर्टात गेल्यास त्याचीच बेअब्रू व फजीति होईल. आपल्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर असें आहे की-ज्यांना प्रत्यक्ष समागम शक्य नसतो, त्यांस इतर कांहीतरी मार्गाने स्वतःचें समाधान करून घ्यावें लागतें. आपल्या मित्रासारखे लोक पुष्कळ असतात आणि त्यांत विशेष चमत्कारिक असें कांही नाही. सिनेमांतील लांबलचक चुंबनें पुष्कळ लोकांना कां आवडतात? लोकांना नग्न चित्रें कां आवडतात? समागामच्या चित्रांनाहि अतिशय मागणी असते आणि ती नपुंसकांकडूनच असते असें नाही.

३०

वि. वि. १. सर्व राष्ट्रांच्या दृष्टीने एकाद्या स्त्री किंवा पुरुषास सुंदर केव्हा म्हणतां येईल ?...या ठिकाणीं 'सुंदर' या शब्दाचा अर्थ वर्णाने गौर, नाका-डोळ्याने नीटस, अवयवांनीं बांधेसूद, किंवा उंचापुरा एवढाच नसून तो पुष्कळच व्यापक आहे...उदाहरणार्थ वरील गुणांनी युक्त अशी स्त्री किंवा पुरुष आपण फारतर सुंदर म्हणूं. पण नकटेपणाच्या अभावीं चिनी किंवा जपानी लोक अशा व्यक्तीला हंसल्याशिवाय राहणार नाहीत. पायाच्या आंखुडपणालाही ते सौंदर्यांत गणतात. कोणी कोणासच हंसावयास नको असेल तर ईशनिर्मित गर्भ धारण करणें हें स्त्रियांचें सौंदर्य व प्रजोत्पादन सामर्थ्य असणें हें पुरुषांचें सौंदर्य, मग ते स्वरूपाने कसेहि असोत. अशी सौंदर्याची कल्पना करून घेणें हेंच श्रेयस्कर ठरतें. मला जें वाटेल तें मीं स्पष्ट लिहिलें आहे, कदाचित भ्रामकहि असूं शकेल. मी 'माझें तें सत्य' असें म्हणणारांपैकी नसून 'सत्य तें माझें' अशापैकी आहे...

उ. सौंदर्याचा सर्वसामान्य विचार करणें असल्यास त्यांत वेषभूषेचे सर्व कृत्रिम प्रकार बाजूला ठेवले पाहिजेत, कारण ते रूढीवर अवलंबून असतात आणि रूढि देशकालमानाने बदलल्यामुळे लोकांची अभिरुचिहि बदलते, तेव्हा या-संबंधी कोणताहि सामान्य नियम करतां येणार नाही. सामान्य नियम पाहिजे असल्यास सौंदर्य शरीरावरूनच ठरेल आणि हल्ली बहुतेक शरीर झांकण्याची पद्धत रूढ असल्यामुळे शरीराबद्दल कल्पनाच कराव्या लागतात ! सौंदर्याची मूळ कल्पना म्हणजे अन्यलिंगी व्यक्तीस जें आकर्षक होतें तें, अशीच असली पाहिजे. हें आकर्षण नैसर्गिक असतें आणि या आकर्षणामुळेच मनुष्येतर प्राण्यांत प्रजोत्पत्ति होते. तेव्हा लिंगवैशिष्ट्य तावडतोब ठळक रीतीने दिसेल अशी शरीररचना म्हणजेच सौंदर्य, हें उघड आहे. अर्थात लैंगिक आकर्षण केवळ शरीररचनेवरच अवलंबत नाही, शरीराच्या हालचालीची ढब केवळ शरीररचनेपेक्षाहि परिणामकारक होईल. तेव्हा तिचाहि समावेश व्याख्येंत केला पाहिजे. अर्थात शरीराची ढब वेगवेगळ्या देशांत वेगवेगळी असूं शकेल आणि संवयीमुळे ती सुंदर वाटूं शकेल, परंतु एका यूरोपीय प्रवाशाने असें नमूद केलें

आहे की सौंदर्याच्या कल्पनेंत आपणास वाटतो तितका फरक नसतो. हबशांना देखील गोरीं माणसें आवडतात आणि आर्य लोकांतील स्त्रिया चिनी किंवा जपानी लोकांसहि सुंदर दिसतात. इतकेंच नव्हे तर एकदा मोठ्या समुदायांतील जपानी स्त्रियांत, तुम्हांला सर्वांत कोण सुंदर दिसते, असें कांही जपान्यांस विचारतां त्यांनी बहुमताने जी सुंदर ठरवली, तिच्यांत जपानी वैशिष्ट्य कांहीच नसून तिचा चेहरा आर्य स्त्रियांच्या वळणावर होता. तें कांही असलें तरी इतकें मात्र खरें की कृत्रिम रीतीने बारीक केलेले पाय किंवा कुंकवासारखा अंगाला लावलेला रंग, वगैरे गोष्टींचा विचार सौंदर्यांत येत नाही. सौंदर्य आकर्षक असलें पाहिजे, हें जर त्याचें मुख्य लक्षण आहे, तर आपण दिलेली व्याख्या अर्थातच खोटी आहे. कारण जगांतील सर्व लोक ज्यांस अत्यंत कुरूप ठरवतील अशींहि माणसें आपल्या व्याख्येप्रमाणे सुंदर ठरतील **सं.**

३१

१. वि. वि. रेतस्खलन झाल्यामुळे किळस येऊन व स्वच्छतेच्या दृष्टीने मी इंद्रिय धुऊन टाकीत असें व पत्नीसहि धुवावयास लावीत असें. गेल्या वर्षी माझ्या एका मित्राने प्रजोत्पादन बंद होईल व कदाचित आरोग्याला विघात येईल या सबबीवर न धुण्याचा सल्ला दिला, तेव्हापासून मी धुणें बंद केलें आहे. तरी आपण कोणत्या मार्गाचा उपदेश करतां? २. पत्नीचा समागम नेहमी उपलब्ध आहे तरी आम्हां तिघां पदवीधर मित्रांना मधूनमधून वियोग व बदल या दोहोंची इच्छा होत असते. तात्पुरत्या वियोगानंतर कामवासना प्रज्वलित होते असा अनुभव आहे. तसेंच बदल म्हणजे दुसऱ्या स्त्रीशीं समागम करण्याची इच्छा होते. अर्थात परिस्थितीमुळें तें शक्य होत नाही व त्यामुळें मन संतुष्टसें वाटत नाही. तरी या बाबतींत आपण काय सल्ला देतां? **आपला जिज्ञासू ग्राहक.**

उ. १. स्त्रीने तावडतोब इंद्रिय धुणें हें गर्भाधारणेस विघातक होण्याचा संभव आहे हें खरें व प्रकृतीचे दृष्टीनेहि तें फारसें हितावह नाही, तथापि पुष्कळांस धुण्याची जरूरी भासते, व धुण्याकरता गरम पाणी वापरल्यास त्यापा-

सून फारसें नुकसान होऊं नये. अर्थात समागमानंतर थकवा वाटल्यास कांही वेळ पडून राहणेंच बरें. २ हा मनुष्यस्वभाव आहे व तो कृत्रिम सामाजिक निर्बधांनी बदलणें शक्य नसतें इतर बाबतींत फेरपालट हितकर व जरूर आहे असें जे लोक ताबडतोब कबूल करतील, ते एवढ्याच बाबतींत मात्र त्याला निदान स्त्रियांपुरतें तरी महत्पाप म्हणतील. पुरुषांना वैचित्र्याचा समाजसंमत मार्ग म्हणजे पुष्कळ बायका करणें. जास्त लिहिण्याचें कारण दिसत नाही. सं.

३२ सांगली, ८।३।३३.

गेल्या जानेवारीच्या अंकांत पान १८२ वर नं. २ चें एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. (नं. २९ पहा) पत्र लिहिणाऱ्या गृहस्थांनी आपणास दुसऱ्याने पोसलेली बायको राजरोस उपभोगावयास मिळते या गोष्टीचा आनंद पोटांत न मावल्यामुळेच सदर पत्र आपणाकडे प्रसिद्धीकरतां पाठवलें असावें असें वाटतें, नाहीतर त्या पत्रास आपण दिलेलें सरळ व सोपें उत्तर त्यांस न कळण्याइतके ते सद्गृहस्थ अप्रबुद्ध असतील असें वाटत नाही.

आपणास बायको असूनहि समागमसौख्य अनुभवतां येत नाही याबद्दल नवऱ्यास वैषम्य वाटून पश्चात्तापहि होत असेल. अशा स्थितींत निव्वळ पाजी-पणाचें पत्र प्रसिद्ध करून आपल्याच मित्राचे दुःखावर आपण डाग देत आहों या गोष्टीचा पत्रलेखकाने विचार करावयास पाहिजे होता.

सदर पत्रास आपण दिलेलें उत्तर योग्यच आहे, परंतु त्याबरोबरच वरील पत्रलेखकाचे मित्रास शीघ्र वीर्यपतन न होण्यास एखादा प्रयत्नसाध्य उपाय सांगितला असता तर निराशेंतहि त्यास आशा वाटली असती. आपलें उत्तर थोडें विसंगत परंतु समाजस्वास्थ्याच्या धोरणास योग्य असेंच झालें असतें.

आ. एन्. व्ही. आठवले.

उ. 'दुसऱ्याने पोसलेली बायको' या आपल्या शब्दप्रयोगावरून, कांही लोक ज्याप्रमाणे दुधाकरता एक किंवा अधिक गाई बाळगतात त्याचप्रमाणे

समागमाकरता एक किंवा अधिक बायका बाळगतात अशी आपली विचारसरणी दिसते. जो गाय विकत घेतो व पोसतो तो तिचा मालक आणि तिचें दूध काढण्याचा हक्क दुसऱ्या कोणास पोंचत नाही, त्याचप्रमाणे जो बायको घेतो व पोसतो तो तिचा मालक आणि त्याकडेच समागमाचा अधिकार साहजिकपणें जाणार, त्यांत गाईप्रमाणेच तिच्या मर्जीचा प्रश्न बिलकुल येत नाही, हें ओघानेच आलें. अर्थात या बाबतींत धर्म व कायदाहि आपल्याप्रमाणेच म्हणतील. पशूंप्रमाणे मनुष्यांवर कोणाची मालकी चालूं नये हें तत्त्व सामान्यतः गुलामांचे वगैरे बाबतींत कबूल केलेलें आहे, इतकेंच काय पण वेश्यांचा देखील कोणी विक्रय करूं नये, हें कायद्यास मान्य आहे, म्हणजे वेश्या देखील कोणाची मालमत्ता होऊं शकत नाही, परंतु विवाहित स्त्रीला मात्र मालमत्ता समजण्याची पद्धत तथाकथित सुधारलेल्या देशांत देखील दिसते. तथापि आमचे मतें हे कायदे व धर्म रानटी आहेत, आणि ते आम्हांस कबूल नाहीत. आता तें पत्र सदभिरुचीस धरून होतें की नाही हा प्रश्न वेगळा, परंतु एखाद्यास खरोखरच कायद्याची भीति वाटणें शक्य आहे. आणि अशा वेळी मनुष्य सदभिरुचीकडे दुर्लक्ष करतो. शीघ्रपतनावर उपायांसंबंधी मजकूर मासिकांत पूर्वी येऊन गेलेला आहे व आमचे **आधुनिक कामशास्त्रांतहि** माहिती सांपडेल. शिवाय प्रत्येकास लागू पडेलच असें औषध सांगणें शक्य नसतें. नपुंसकास वाईट वाटणें शक्य आहे, पण पश्चात्ताप होण्याचें कारण नाही. शिवाय नपुंसकाने लग्न कां करावें ? सं.

३२ मुंबई, ३१-३-३३

वि. वि. मी आपलें मासिक आज चार वर्षें नियमीतपणे वाचीत असतो. माझें वय अवघे २७ वर्षांचें आहे, लग्न झाल्यास दोन वर्षें झाली, पैकी पहिलें सव्वा वर्षपर्यंत बायको घरीं कोकणांत होती. हल्ली ८-१० महिने आम्ही एकत्र आहोंत. आपल्या मासिकांचे सर्व अंक मी बायकोस दाखविले...व तिला आपले विचार फारच आवडले, ते इतके की ती आपल्या नव्या अंकाची नेहमी वाट

पहात असते. नम्रतेवरील आपल्या लेखांचा आम्हांस फार उपयोग झाला आहे. या बाबतींत तिनेच माझें मन वळवले आणि यामुळे तिची त्वचा सुधारली आहे च घट्ट नेसल्यामुळे कमरेस आलेला काळेपणा आता पुष्कळच कमी झाला आहे...

३४ २३-३-२३

१. स्त्रीपुरुषांची कामवासना तृप्त होणें त्यांच्या इंद्रियांच्या प्रमाणांवर अवलंबून आहे काय ? म्हणजे प्रमाणबद्धतेंत दोन्ही विषम असल्यास कामशांतींत अडथळा येतो काय ? शीघ्रपतनाने स्त्रीची कामशांति न झाल्याने तिची तळमळ होते तशीच फार दीर्घ कालाने वीर्यपतन झाल्यानेही होते काय ? २. पुनर्विवाहित स्त्रीमध्ये प्रथमपतिसंभोगाने काही शारीरिक वा आरोग्यविषयक दोष राहिलेले असतात का ! म्हणजे दुसऱ्या पतीने तिच्याशीं संग केल्याने त्याला कांही हानि पोंचते काय ? तसेंच एकाच स्त्रीशी अनेक पुरुष रत झाल्याने सांसर्गिक दोष निर्माण होतो काय ? सुप्रजाजननशास्त्राच्या दृष्टीने यांत कांही दोष आहे का ? किंवा अनेक पुरुषसंबंधाचा संततीवर काही परिणाम होईल का ?

उ. १. विषमता असल्यास सुखांत कमतरता येईल. सामान्यतः पतनास दीर्घ काल लागल्याने स्त्रियांस समाधानच वाटतें. २. केवळ अनेक पुरुषांशी समागमाने कोणताहि दोष उत्पन्न होत नाही. सांसर्गिक रोग नसल्यास वेश्यांशी समागमानेहि हानि होत नाही, मग पुनर्विवाहित स्त्रीविषयी विचार करण्याचें कारणच नाही. अर्थात प्रथम पतीपासून सांसर्गिक रोग झालेला असणें शक्य आहे, परंतु सांसर्गिक रोग कोणासहि असणें शक्य असल्यामुळे कितव्याहि विवाहाचे पूर्वी वधूवरांनी आरोग्यासंबंधी दाखले आणण्याची चाल पाडणें जरूर आहे, आणि आमचे मतें असा कायदाच केला पाहिजे. अनेकांपैकी कोणासहि सांसर्गिक रोग पूर्वी नसल्यास तो केवळ अनेकसंभोगाने ~~उत्पन्न होणें शक्य~~ नाही, आणि त्याचा संततीवरहि कांही परिणाम होत नाही.

स्त्रीपुरुषांचें आरोग्याचें मासिक

स मा ज स्वा स्थ्य

संपादक : **प्रो. र. धों. कर्वे**, एम्. ए.

दिप्लोम् द् एत्युद् स्युपेरिअर (पॅरिस)

जुलै १९२७ पासून सुरु होऊन दर महिन्याचे १५ तारखेस नियमाने निघत आलें आहे. यांत सामाजिक व वैयक्तिक आरोग्यावर व विशेषतः ज्या विषयांची इतरांस निष्कारण लाज वाटते, अशा विषयांवर निर्भीड लेख येतात.

ट. ख. सह वार्षिक रु. १॥, व्ही. पी. ने रु. १॥।

हिंदुस्थानाबाहेर रु. २, किंवा तीन शिलिंग.

किरकोळ अंकास २ आणे, मागील अंकास ३ आणे, तीन अंकांस ८ आणे. बाहेरगांवचे लोकांनी १ आण्याचें तिकीट पाठवल्यास नमुना अंक पाठवूं.

पोर्तुगीज **नाहीं.**

REFBK-004811

नाटककार **श्री. कृ. कोल्हटकर** लिहितातः विषय व भाषा चित्ताकर्षक असल्यामुळे मासिक बरेंच लोकप्रिय व्हावें असें वाटतें.

रियासतकार **गो. स. सरदेसाई** लिहितातः श्री. कर्वे यांनी स्वीकारलेला हा विषय राष्ट्रीय दृष्ट्या बिलकूल हेटाळणी करण्याजोगा नाही. तत्संबंधी शास्त्रीय माहिती घेऊन तदनुसार समाजसुधारणेचे इलाज केले तरच हल्लीच्या प्रखर जीवनकलहांत आपला निभाव लागेल असे माझें निश्चित मत आहे.

राइट एजन्सी, जयकर बिल्डिंग, नवी भटवाडी,

गिरगांव मुंबई नं. ४.

आधुनिक कामशास्त्र

लेखक : **प्रो. र. धों. कर्वे,** एम्. ए.

तीस वर्षांच्या व्यासंगाचा निष्कर्ष

तरुणतरुणींस अत्यंत उपयुक्त शास्त्रीय माहिती

किंमत अडीच रुपये, ट. ख. ६ आणे

ज्ञानप्रकाश : या नाजुक विषयांची चर्चा या पुस्तकांत शास्त्रीय दृष्टीनेंच केलेली आहे व ती मननीय आहे.

सत्यवादी : हें पुस्तक म्हणजे: प्रमाणभूत ग्रंथच म्हणावयास हरकत नाहीं.

लोकमित्र : तरुण लोकांना प्रिय होईल यांत शंका नाहीं.

भारतमित्र : पुस्तकांतील एकंदर माहिती अत्यंत उपयुक्त असून ती सशास्त्र व सुलभ पद्धतीनें लिहिलेली असल्यानें पुस्तकास विशेष महत्त्व आलें आहे.

राइट एजन्सी, जयकर बिल्डिंग, गिरगांव, मुंबइ नं. ४

समाजस्वास्थ्य (मराठी)

निदान २०००० स्त्रीपुरुष वाचतात.

स्वस्त्या जाहिराती

देऊन निवडक वाचकवर्गापुढे
आपल्या मालाचे गुण मांडा

जाहिरातींचे दर

एक पान, दर वेळीं	...	...	रु. १५
अर्धें ,, ,, ,,	...	...	रु. ८
पाव ,, ,, ,,	...	...	रु. ५

लहान जाहिरातींस शब्दास एक आणा.

राइट एजन्सी,

जयकर बिल्डिंग, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४.